
# आनंदलहरी

## द्विसाहस्री - १



।। श्री गणेशदत्तरेणुकादेवी प्रसीदताम् ।।

# द्विसाहस्त्री - १

## (ज्ञानकांड)

**प.पू.श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज कृत श्रीगुरुचरित्रावर प.पू.श्री दत्तमहाराजांनी केलेली प्रवचने**


संकलन

**श्री. गोपाळ गोडसे**

संपादन

**डॉ. सौ. माधुरी पणशीकर**



प्रकाशक

**श्री भगवती प्रकाशन**

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन



**प्रकाशन दिवस**
२२ जुलै १९९४
शुक्रवार, आषाढ पौर्णिमा,
गुरुपौर्णिमा,शके १९१६.

**मुखपृष्ठ**
आमोद दामले

**मुद्रक**
के.जोशी आणि कंपनी
१७४५/२, सदाशिव पेठ,
पुणे-३०.

**प्रकाशक**
श्री भगवती प्रकाशन
६/१, साईविहार,
कर्वेनगर,पुणे-५२

**किंमत रु. २५/-**




प. पू. दत्तमहाराज कवीश्वर

जो ब्रह्मज्ञान उपदेसी। अज्ञानअंधार निरसी।
जीवात्मया परमात्मयासी। ऐक्यता कारी ।।
विघडले देव आणि भक्त। जीव शिवपणें द्वैत।
तया देवभक्ता येकांत। करी तो सद्‌गुरु ।।

जेथें सारासार विचार। तेथ होय जगोध्दार।
नवविधाभक्तीचा आधार। बहुत जनांसी ।।
म्हणोनी नवविधा भजन। जेथे प्रतिष्ठिलें साधन।
हें सद्‌गुरूचें लक्षण। श्रोतीं वोळखावे ।।


तो बहुतांचा पाळणकर्ता। त्यास बहुतांची असे चिंता।
नानासाधने समर्था। सद्‌गुरूपासीं ।।
अंतरी शुद्ध ब्रह्मज्ञान। बाह्य निष्ठेचे भजन।
तेथे बहु भक्त जन। विश्रांति पावती ।।

ओम् नमो सद्गुरु तूं ज्योतिषी। एकात्मतेचे घटित पाहसी।
चिद्ब्रह्मेंसी लग्न लाविशी। ओम् पुण्येंसीं तत्त्वतां॥
वधूवरां लग्न लाविती। हें देखिलें असे बहुतीं।
आपुली आपणा लग्नप्राप्ती। हे अलक्ष्य गती गुरुराया॥

ओम् नमो सद्गुरु धन्वंतरी। ज्याची दृष्टीचि निरुज करी।
त्यावांचोनि संसारीं। भवरोगु दुरी न करवे।
ज्या भवरोगाचेनि दर्पें। फुंफात तापलीं त्रिविधतापें।
'मी माझें' येणें संकल्पें। वाग्जल्पें जल्पती॥

जय जय सद्गुरु परम। जय जय सद्गुरु पुरुषोत्तम।
जय जय सद्गुरु परब्रह्म। ब्रह्मा ब्रह्मनाम तुझेनी॥
जय जय सद्गुरु चिदैक्यस्फूर्ती। जय जय सद्गुरु चिदात्मज्योति।
जय जय सद्गुरु चिन्मूर्ती। मूर्तामूर्ती चिद्रूप॥


# श्री सद्गुरु मांदियाळी




श्री दत्तात्रेय



पू. श्रीपादश्रीवल्लभ




पू. नृसिंह सरस्वती




पू. वासुदेवानंद सरस्वती

॥ गुरो तुझी ही पदवारीधारा । धुवो सदा कायिक दोष सारा ॥


# श्री सद्गुरु मांदियाळी



पू. लोकनाथतीर्थ स्वामी



पू. दीक्षित स्वामी



पू. गुळवणी महाराज




पू. धुंडिराज महाराज

।। सदैव माझे मन वाणी शुध्द । करो तुझे नाम पवित्र सिध्द ।।

ओम् नमो जी श्रीगुरुराया। म्हणोनि सद्भावें लागें पायां।
तवं मीपण गेलें वायां। घेऊनियां तूंपणा॥
नवल पायांचें कठिणपण। वज्रें न तुटे लिंगदेह जाण।
त्याचेंही केलें चूर्ण। अवलीळा चरण लागतां॥

ओम् नमो श्रीगुरु शिवशिवा। नमनें जीवत्व जीवा।
नुरविसी, तेथें देहभावा। कैसेनि रिघावा होईल॥
जीवें घेऊनि जीवा। देहत्व मोडूनि देहभावा।
याहीवरी करविसी सेवा। हें लाघव देवा नवल तुझें॥

एवं स्वस्वरूप द्यावयासी। उदारत्व तुजपासीं।
हें न ये गा आणिकांसी। हृषीकेशी कृपाळुवा॥
तो तूं परम उदार ऐसा। राया रंका समभावें सरिसा।
भावो तेथ भरंवसा। तू आपैसा आतुडसी॥



प. पू. ताईमहाराज चाटुफळे

‘जागृती’ जागे तुझेनि हरिखें। ‘स्वप्न’ स्वप्ना तुझेनि देखे।
‘सुषुप्ती’ सुखावे जेणें सुखें। पूर्ण संतोखें तुझेनि ।।
मी जे जे ‘विषय’ भोगीं। तें भोक्तेपण तुझे अंगी।
तुझेनि निजसंयोगीं। मी पणें जगीं वर्तविशी मज ।।

सुखेंचि तुझें नाम घेतां। घातु करिसी जीविता।
जीवु घेऊनि तत्त्वतां। होसी सर्वथा कृपाळू ।।
तुझे नामाचें प्रबळ बळ। माथा नुधविती कळिकाळ।
चारी मुक्ति केवळ। होती निश्चळ निजदासी ।।

आतां सद्‌गुरु वर्णवेना। जेथे माया स्पर्शो सकेना।
ते स्वरूप मज अज्ञाना। काय कळे ।।
न कळे न कळे नेति नेति। ऐसें बोलतसे श्रुती।
तेथें मज मूर्खाची मती। पवाडेल कोठे ।।

।। श्रीगणेशदत्तगुरूभ्योनमः ।।

## कैसे याचे करणे । दिवसा चांदणे ।।

प.पू.वासुदेवानंद सरस्वती टेंबेमहाराजांनी लिहिलेल्या 'द्विसाहस्त्री ' वरची प.पू.दत्तमहाराज कवीश्वरांची प्रवचने 'भगवती प्रकाशना ' तर्फे प्रसिध्द करताना आनंद मनात दाटून राहिला आहे. दत्तसंप्रदायाचा उपासनाग्रंथ असलेले, गंगाधर सरस्वती विरचित ' गुरूचरित्र ' प.पू.टेंबेस्वामी महाराजांनी संस्कृतात शब्दबध्द केले. तो ग्रंथ ' द्विसाहस्त्री ' नामे लोकमानसात विशेष आदरणीय ठरला. त्या ग्रंथावर श्री. कृष्णराव मोघे यांचेकडे प.पू. दत्तमहाराजांनी चैतन्यशील आणि प्रेरणादायक अशी जी प्रवचने केली, ती पुस्तकरुपाने आज गुरूपौर्णिमेच्या दिवशी साधकांसमोर चिंतनासाठी ठेवत आहोत. तथापि ही प्रस्तावना लिहितांना मात्र आपण कोणत्या अधिकारात हे लिहित आहोत, हा प्रश्न मनाला बेचैन करत आहे. विश्वगुरू असलेल्या श्रीदत्तप्रभूंच्या ह्या भावभक्तीमुक्त चरित्राला भिडतांना भावनेचे बळ आणि अंतर्मुखतां आपल्याजवळ हवी. ह्या गुणांच्या अभावात ही कथा अंतःकरणाला स्पर्श करणार नाही पण हे गुण नसले तरी आपण सश्रध्द आहोत एवढेच सूत्र पकडून मी ही प्रस्तावना लिहिते आहे.

अविनाशी गुरूतत्वाचा विचार हा एक दत्तसांप्रदायाचा कणाच आहे. ईश्वर आणि गुरू एकरुपच असल्याची प्रणाली ह्या सांप्रदायाने मांडली. श्रीगुरू हे साक्षात् चैतन्य असून आध्यात्मिक प्रगतीची दिशा श्रीगुरूच दर्शवत असतात. त्यांचे बोट धरून, त्यांनी दाखवलेल्या मार्गावरून वाटचाल करणाऱ्या साधकाला त्यांची सदैव सोबत असते. तो साधक अनाथ असत नाही, हा दृढ विश्वास दत्तसांप्रदाय शतका मागून शतके देत आला आहे.

' गुरूचरित्र ' हा उपासना ग्रंथ महाराष्ट्रात अनेक

भाविकांच्या नित्य पठणात असतो. बहुतेक वेळा ही भक्ती सकाम असते. निरनिराळ्या अडचणींना तोंड देता देता मेटाकुटीला आलेली माणसे अतीव विश्वासाने आणि श्रध्देने गुरूचरित्राचे पारायण, आपल्या इच्छांच्या परिपूर्तीसाठी करतात. त्या पारायणाचे फळ अनेकांच्या पदरात पडलेले दिसते. कित्येक भाविकांकडून त्यांनी श्रध्दायुक्त अंतःकरणाने केलेल्या वाचनाच्या आणि इच्छापूर्तीच्या हकीगती आपल्याला ऐकायलाही मिळतात. पण हा ग्रंथ स्त्रीयांनी वाचू नये असा दंडक आहे. इतरही कडक नियम आहेत. त्यांचे पालन करणाऱ्यांनाच हा ग्रंथ वाचण्याचा अधिकार आहे. श्रध्दायुक्त अंतःकरणाने उपास्य दैवताची भक्ती करण्याच्या हेतूने योगीराज गुळवणीमहाराज ह्या ग्रंथाचे नित्यपठण करीत असत, प.पू.दत्तमहाराजांच्याही नित्यपठणात गुरुचरित्र आहे, हे वेगळे सांगायला नकोच. दत्तावताराचे रहस्य शोधण्याचा आजवर अनेक अभ्यासकांनी प्रयत्न केला. कुणाला ' दत्त ' हे प्रतीक वाटते तर कुणी दत्तप्रभूंना तांत्रिकातील सिध्दमुनींचा मान देतात. कित्येक साधकांच्या मनात, दत्तावताराची वैशिष्ट्ये कोणती? त्या अवताराचे प्रयोजन काय? 'अवधूतां ' शी त्याचे कोणते नाते आहे? असे प्रश्न तरळत असतात. ह्या प्रश्नांचा मागोवा घेण्याचा एक अल्प प्रयत्न इथे केला आहे.

दत्तसंप्रदायाकडे ऐतिहासिक दृष्ट्या बघतांना असे दिसते की बहामनीकाळाच्या उत्तरार्धात हा पंथ विशेषत्वाने लोकांपर्यंत जाऊन पोहोचला. श्रीपादश्रीवल्लभ आणि नृसिंहसरस्वती महाराजांनी अनेक जीवांना आधार दिल्याने, माणसे त्या पंथाकडे आकृष्ट झाली. यवनांच्या अत्याचाराला कंटाळलेल्या समाजाच्या अस्मिता रक्षणाचे कार्य ह्या संप्रदायाने केले. अनेक आघातांनी विस्कळीत झालेल्या मनांना निश्चित विचारांची बळकटी दिली. श्रीदत्त ह्या दैवताबद्दल ठळकपणे ध्यानात येणारी गोष्ट म्हणजे त्यात असलेले ब्रह्मा-विष्णू-महेश ह्या तिन्ही देवतांचे एकत्रीकरण ! त्यामुळे शैव आणि वैष्णव परस्पर संघर्ष विसरुन इथे एकरुप झाले. या शिवाय दत्तात्रेयांच्या जीवनातील काही घटनांशी कोल्हापूर, औदुंबर

आणि माहूर ही शक्तिस्थाने निगडित आहेत, परिणामतः शाक्तही इथे नतमस्तक झाले. याचा अर्थ असा की शैव, वैष्णव आणि शाक्त ह्या तिन्ही मार्गांचे एकत्रीकरण ह्या दैवतात झाले. शिवाय ब्रह्मा-विष्णू-महेश म्हणजे उत्पत्ती- स्थिती-लयाचे तत्वही इथे समग्रतेने दिसते. दत्तात्रेय हे योगी आहेत. योगमार्गातल्या अनेक गूढ आणि अद्भुत प्रक्रियांचे वलय त्यांच्याभोवती आहे. ते योगमार्गातले सर्वोच्च अधिकारी समजले जातात. स्मर्तृगामी, वैराग्यसंपन्न, अनुभूती प्रामाण्याला महत्व देणारे दत्तगुरू आजही सश्रध्द भाविकांना दर्शन देतातअसा दृढविश्वास भक्तगण व्यक्त करतात.

योगमार्गाला महत्व देणारा महाराष्ट्रातला आणखी एक पंथ म्हणजे नाथपंथ. नाथपंथाला ‘ अवधूतपंथ ’ असेही नाव आहे. दत्तसंप्रदायिक ‘ अवधूतचिंतन श्रीगुरूदेव दत्त ’ असा जयघोष करतात, हे लक्षात घ्यावे लागते. नाथसंप्रदायाचे महाराष्ट्रातले उद्‌गाते गोरक्षनाथ यांना दत्तात्रेयांचा उपदेश झाला होता. समर्थविरचित दासबोधात याचा उल्लेख येतो. ( अवधूत गीता केली । गोरक्षास निरोपिली । ते अवधूत गीता बोलीली । ज्ञानमार्ग ।। ७:७:३४ ) गुरूचरित्रात सुमती नावाच्या स्त्रीची कथा आहे. तिच्या घरी दत्तगुरू अवधूत रुपाने आले होते. ‘अवधूत ’ ह्या शब्दाचा नेमका अर्थ काय, असा प्रश्न मनात निर्माण होतो. मला वाटते ‘ अवधूत ’ ही एक मानसिक अवस्था आहे. श्रीदत्तात्रेयप्रणीत ‘ अवधूतगीतेत ’ ह्या अवस्थेचे वर्णन पुढील प्रमाणे केलेले आहे,

‘ आशापाशविनिर्मुक्त आदिमध्यान्तनिर्मलः ।  
आनंदे वर्तते नित्यमकारं तस्य लक्षणम् ।।  
वासना वर्जिता येन वक्तव्यंच निरामयं ।  
वर्तमानेषु वर्तेत वकारं तस्य लक्षणम् ।।  
धूलिधूसरगात्राणि धूतचित्तो निरामयः ।  
धारणाध्याननिर्मुक्तो धूकारस्तस्य लक्षणम् ।।’

तत्वचिंता धुता येन चिंताचेष्टाविवर्जितः ।
तमोहंकारनिर्मुक्तो धूकारस्तस्यलक्षणम् ।।

आशापाशातून मुक्त, नित्य आनन्दी, वासनारहित, निरामयचित्ताचे धारणाध्यानात मग्न असणारे, अहंकार नाहीसा झालेले असे ' अवधूत ' दत्तात्रेय आहेत.

ज्ञानाची दिवाळी करणाऱ्या योगीराज ज्ञानदेवांचा दत्तप्रभूंवर एक अभंग आहे, ज्यात ' योगी ' असलेले दत्तात्रेय त्यांच्या अंतःकरणात घर करून राहिले आहेत असा उल्लेख येतो. तो अभंग असाः

' पैल मेरुच्या शिखरी । एक योगी निराकारी ।
मुद्रा लावुनि खेचरी । ब्रह्मपदी बैसला ।।
तेणे सांडियेली माया । त्यजियेली कंथा काया ।
मन गेले विनया । ब्रह्मानंदामाझारी ।।
अनुहतध्वनिनाद । तो पावला परमपद ।
उन्मनी तुर्या विनोदे । छंदे छंदे डोलतुसे ।।
ज्ञान गोदावरीच्या तीरी । स्नान केले पांचालेश्वरी ।
ज्ञानदेवाच्या अंतरी । दत्तात्रेय योगिया ।। '

याशिवाय वारकरी संप्रदायातले संतकवी एकनाथ आणि तुकाराम यांचेही दत्तभक्तीपर अभंग आहेत.

देवदेवतांच्या चरित्राचे निरीक्षण केल्यावर असे दिसते की प्रत्येक अवतारामागे अनैतिकता दूर करून नीतीप्रधान जीवनमार्ग दाखवणे, दुष्टांचे निर्दालन करून सुव्यवस्था प्रस्थापित करणे, साधूंचे संरक्षण करणे यासारखा काहीतरी सद्हेतू असतो. पार्थिव देहाच्या चौकटीत चैतन्याने स्वतःला आकारबध्द करून घेतल्याने,' जातस्य ही ध्रुवो मृत्यू ' ह्या न्यायाने कार्यसमाप्तीनंतर त्या देहातून चैतन्य मुक्त होते. रामावताराच्या, कृष्णावताराच्या अवलोकनातून हे स्पष्ट दिसते. तथापि दत्तात्रेयांचा अवतार मात्र

अविनाशी आहे, चिरंतन आहे, अक्षय आहे.ह्या अवताराचे प्रयोजन ब्रह्मपुराणात असे आले आहेः

भूयो भूयात्मनो विष्णोः प्रादुर्भावो महात्मनः ।
दत्तात्रेय इति ख्यातः क्षमया परया युतः ।।
तेन नष्टेषु वेदेषु प्रक्रियासु भरवेषु च ।
चातुर्वर्णेच संकीर्णे धर्मे शिथिलतां गते ।।
अतिवर्धति चाधर्मे सत्ये नष्टेऽनृते स्थिते ।
प्रजासु शीर्यमाणासु धर्मे चाकुलतां गते ।।
सयज्ञाः सक्रियाः वेदाः प्रत्यानीता हि तेन वै ।
चातुर्वर्ण्यसंकीर्णं कृतं तेन महात्मना ।।

ज्या गंगाधर सरस्वतींनी ' गुरूचरित्र ' हा पूजनीय ग्रंथ रचला ते गंगाधर सरस्वती हे नृसिंह सरस्वतींचे शिष्य सायंदेव यांचे वंशज होते. गुरूचरित्रात श्रीपादश्रीवल्लभ आणि नृसिंह सरस्वतींचा चरित्रपट उलगडला आहे. त्यापैकी श्रीपादश्रीवल्लभांची फारशी माहिती उपलब्ध नाही. त्यांचा काळ इ.स.१३२०-१३५० हा असून, जन्म ' पीठापूर ' येथे झाला. तिथे आपळराज आणि सुमती असे सदाचारी जोडपे होते. सुमतीचा रोज अतिथिला भिक्षा घालण्याचा नेम होता. एकदा श्राध्दाला ब्राम्हण आलेले असतांना अवधूत रुपाने आलेल्या दत्तात्रेयांना तिने ब्राम्हणभोजनापूर्वी भिक्षा घातली. अवधूतांनी ' वर माग ' म्हटल्यावर ती म्हणाली,

'व्हावा पुत्र आम्हा ऐसा । ज्ञानवंत परमपुरूषा ।
जगद्वंद्य देवसहशा । तुम्हासारिखा मज आता ।। '

पुढे तिला जो पुत्र झाला तेच श्रीपादश्रीवल्लभ ! अश्विन वद्य द्वादशीला ते कुरवपुराहून अदृश्य झाले.

यांच्या आयुष्यात चमत्काराच्या घटना आहेत. ' नृसिंह

सरस्वती ' हे त्यांचेच रुप. अंबिका नांवाची स्त्री आपल्या मूर्ख मुलाला घेऊन आत्महत्या करायला निघाली असताना, नदीवर श्रीपादश्रीवल्लभ तिला भेटले. त्यांनी तिला आत्महत्येपासून परावृत्त करून शनिप्रदोष व्रत करायला सांगितले. ही अंबिका म्हणजे कारंज्याची अंबभवानी आणि तिचा पुत्र ' नरहरी ' म्हणजेच 'नृसिंह सरस्वती '. यांच्याही आयुष्यात खूप चमत्कार आहेत.

हा सर्व कथाभाग प.पू.दत्तमहाराजांनी अतिशय रसाळ व ओघवत्या शैलीत सांगितला आहे. चमत्कारांच्या माध्यमातून भक्तीची पुष्टी होते हे त्यांचे महत्व लक्षात घेऊन, कथेतल्या केवळ चमत्कारांवर महाराज आपले लक्ष केंद्रित करत नाहीत. तर चमत्कारांपेक्षा संतांची शिकवणूक साधकाच्या मनावर ठसवतात. कथेच्या अनुषंगाने तत्वज्ञानात्मक विचार मांडून ते श्रोत्यांचा, वाचकांचा अधिकारही पुढे नेतात. गुरूसेवा, पातिव्रत्य, आचारनिष्ठा, श्रध्दा यासंदर्भातले त्यांचे विचार सर्वच साधकांना मननीय वाटतील.

गुरूचरित्रातल्या कथा फार उद्‌बोधक आहेत आणि प.पू.महाराजांनी त्या आपल्या चित्तावर ठसतील अशा भाषेत सांगितल्या आहेत. त्या कथांमधल्या मर्मावर अचूकपणे बोट ठेवले आहे त्यामुळे आपले जीवनाच्या संदर्भातले आकलन बदलू लागते. कार्तवीर्यार्जुनाच्या सकाम भक्तीची कथा, रजकाची कथा, पोटशूळ झालेल्या ब्राम्हणाची कथा आपण वाचतो तेव्हां वृत्ती अंतर्मुख होतात. वैराग्यविचार मनात स्थिरावतो. आणि क्षणिक सुखाच्या पलिकडे असलेल्या अक्षय, अनंत चैतन्याच्या दिशेने आपण असोशीने पाहू लागतो. अशा वेळी आपल्या डोळ्यातून वहाणाऱ्या अश्रूंचे नाते भाबडेपणाशी नसते, ते एका कणखर श्रध्देशी असते.

ह्या प्रवचनांचे आणखी वैशिष्ट्य जाणवते ते असे की प.पू.महाराजांच्या निवेदनातली कित्येक वाक्ये बाह्यतः साधे रुप दाखवतात पण मुळात ती फार घनगंभीर आशयाशी बांधलेली असतात. उदा. 'संतांनी दाखवलेला भक्तीमार्ग हा मोठा प्रयत्नवाद आहे ' ' कर्ममार्ग फार कठिण आहे पण ज्याला ईश्वराच्या

आज्ञेप्रमाणे वागायचय त्याला काही कठिण नाही ' 'सद्गुरूंची सेवा कशी करावी हे समजणं हे फार कठीण आहे ' ह्या वाक्यांमध्ये लपलेल्या अर्थांचा शोध घेता घेता आपल्या जाणीवेच्या कक्षा रुंद व्हायला लागतात.

' द्विसाहस्त्री ' वरच्या महाराजांच्या प्रवचनातले विचार मनाचा गाभारा उजळून टाकतात. कल्याणकारी, मंगल जीवन कसे जगावे यासंदर्भात मार्गदर्शन करतात आणि साधकाला मानसिक उन्नयनाची दिशा दाखवतात. ज्ञानकांड, कर्मकांड आणि भक्तीकांड अशी त्रिकांडात्मक रचना मूळ गुरूचरित्राची आहे. प.पू.वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी महाराजांनी ती तशीच ठेवली आहे. त्यातला हा पहिला भाग आहे. उर्वरित भाग यथावकाश प्रसिध्द होईल.

प्रवचनांच्या ध्वनीफिती उलगडण्याचे काम श्री.गोडसे यांनी मनःपूर्वकतेने केले. त्यांच्या सहकार्यामुळेच हा ग्रंथ अल्पावधित आपल्यासमोर आला.

प.पू. महाराजांची ही प्रवचने मी परत परत, पाने मागेपुढे करुन वाचली. ती वाचतांना मनात श्रध्दा, भक्तीच्या लाटा एकामागून एक उसळत होत्या. प्रवचने वाचून संपली तरी वाचतांना झालेला आनंद आणि त्यातली शिकवणूक मनात रेंगाळत राहिली. प्रवचने वाचतांना आनंदविभोर झालेल्या माझ्या मनाला मुक्ताबाईच्या अभंगातल्या ओळी आठवत होत्या. मुक्ताबाई म्हणतात,

' कैसे याचे करणे। दिवसा चांदणे।
आदि अंती राहणे। एकातत्वे।। '

दिवसाच्या रखरखाटात नेहमीच चांदण्याचा शीतल अनुभव देणाऱ्या प.पू. दत्तमहाराजांच्या चरणी मस्तक ठेवून ही प्रस्तावना संपवते.

-डॉ.सौ.माधुरी पणशीकर
११,गुडविल बिल्डिंग,
मनमाला टँक रोड,
माहीम, मुंबई-१६.

।। श्री गणेश दत्त गुरुभ्यो नमः ।।

श्री गणेशाय नमः । श्री गुरुचरणारविंदाभ्यां नमः ।

**भगवान् दत्तात्रेयांचे** चरित्र सद्‌गुरु वासुदेवानंदसरस्वति स्वामी महाराजांनी संस्कृत भाषेमध्ये लिहिलेलं आहे. एक मराठी ओवीला एक संस्कृत श्लोक असं ' समश्लोकी गुरुचरित्र' आहे. आणि दुसरं अगदी आरंभाला जे झालं, पूर्वाश्रमामध्ये ते ' श्री गुरुचरितम् ' असच त्याचं नांव आहे. दोन हजार श्लोक आहेत; असं दत्तात्रेयांनी सांगितल्यामुळे 'द्विसाहस्त्री गुरुचरित्र ' असंहि त्याला म्हणतात. ज्ञानकांड, कर्मकांड आणि भक्तीकांड - मूळ गुरूचरित्रात देखिल अशीच रचना आहे, असं महाराजांच्या या ग्रंथावरुन वाटतं. या ग्रंथात जी रचना आहे ती महाराजांनी अशी केली आहे.

आपलं मुख्य ध्येय, साध्य, काय आहे हे समजावून सांगण्याकरता ज्ञानकांड प्रथम सांगितलं आहे. भक्तीसहीतच हे सर्व आहे. भक्ती ही ज्ञानकांडालाही आवश्यक आहे. स्वतंत्र भक्तीयोग म्हणून तर आहेच आहे. तर ज्ञानाकरता म्हणून, कर्म हे साधन आहे, म्हणून ज्ञानकांडानंतर कर्मकांड हा एक विषय मांडला. आणि त्याच्यानंतर भगवत् भक्ती. ज्ञान, कर्म, योग सर्वांना पोषक अशी भगवत् भक्ती. किंवा स्वतंत्रही भक्तीयोग, काही शास्त्रकारांनी काही ठिकाणी सांगितला आहे.

तर भगवंताचं चरित्र आहे. 'श्रीगुरूचरितम् ' असं याचं नांव ठेवलं आहे महाराजांनी. दत्तात्रेय अवतार आणि त्यानंतर त्यांनी घेतलेले श्रीपादवल्लभ व नरहरी हे दोन अवतार. हे अवतार, हे गुरूस्वरूप अवतार आहेत. मार्गदर्शक सद्‌गुरूंचे अवतार आहेत. मत्स्य, कूर्म, वराह वगैरे अवतार शासन

करण्याकरता झालेले आहेत. भक्तांच्या रक्षणाकरता झालेले आहेत. रक्षणाबरोबर शासनही त्यांनी केलेले आहे, दुर्जनांना. ह्या अवतारामध्ये फक्त अज्ञानी जीवांना मुक्त करायचयं, त्यांचं कल्याण करायचयं, मार्गदर्शन करायचं आहे. योग्यता पाहून मार्गदर्शन करायचं. सर्वच काही समान भूमिकेवर नसतात. म्हणून कोण कोणच्या अधिकाराचा आहे हे ज्ञान सद्‌गुरूंशिवाय इतर कोणालाही होणार नाही. श्रध्दा, भक्ती, सेवाभाव ही शिष्याच्या जवळची साधनं आहेत. ह्या साधनांचा अभ्यास करणाऱ्या शिष्याची भूमिका कशी आहे हे पाहून सद्‌गुरूंची कृपा झाली तर भूमिकेपेक्षाही एकदम त्याला ते निराळे करू शकतात. असंही उदाहरण ह्या गुरूचरित्रातल्या दुसऱ्या अध्यायामधल्या कथेत सांगितले आहे.

पण सर्व सामान्य लोकांना सकाम भक्तीकडे वळिवलेलं आहे. गुरूचरित्रामध्ये बहुतेक ज्या कथा आलेल्या आहेत त्या सकाम भक्तीच्या कथा आहेत. कोणाला रोग झालेला आहे, कोणाला बुध्दी पाहिजे आहे, कोणाला द्रव्य, संतती पाहिजे आहे. अशा संसारातल्या अनेक कामना मनामध्ये असणारे अनेक जीव सद्‌गुरूंना शरण गेलेले आहेत. आणि सद्‌गुरूंनीही त्यांना त्या त्या कामना पूर्ण होण्याकरता मार्गदर्शन केले आहे.

पहिल्याच श्लोकाच्या टीकेमध्ये हा विचार महाराजांनी मांडलेला आहे. मुक्तीची इच्छाच, म्हणाले, पुष्कळ लोकांना होत नाही. मोक्षाची इच्छा करणारे जीव कमी आहेत. संसाराचीच इच्छा प्रत्येकाच्या मनामध्ये आहे. कारण मोक्ष शब्दाचा अर्थ सगळ्यांना इष्ट असला पाहिजे. कायमची दुःख निवृत्ती हे वास्तविक कोणाला नको आहे? परंतु अनंत वासना मनामध्ये असल्यामुंळे त्यातच मन गुंतते आणि संसार बरा वाटतो. आणि त्या संसाराबद्दलच सगळ्या कामना मनात उत्पन्न होतात.मोक्षाची इच्छा धरून आणि त्याप्रमाणे साधन संपत्ती संपादन करून, श्रवण, मनननिदिध्यासन या ज्ञान साधनांमध्येच अखंड निमग्न असणारे अधिकारी महात्मे फार दुर्लभ आहेत. म्हणून सर्व सामान्य माणसांची ईश्वराकडे प्रवृत्ती आहे ना, प्रेम आहे ना मग ठीक आहे. 'ईश्वर सगळ्यांची

इच्छा पूर्ण करणारा आहे, आपलीही इच्छा ईश्वर पूर्ण करील,' म्हणून का होईना, सकाम भजन करणाऱ्या लोकांच्याकडेच विशेष लक्ष दिलेलं आहे. कारण लहान मुलांना चांगलं गोड पक्वान्न, पेढे, बर्फी खायला लागती. पण शरीरामध्ये रोग झाला म्हणजे कडू औषध घ्यायला पाहिजे. ते औषध ती कशी घेणार? म्हणून त्याची माता त्याला एका हातात लाडू, पेढा आणि दुसऱ्या हातात औषध घेऊन म्हणते, ' हे औषध घे, तुला हा लाडू, पेढा देते. ' म्हणजे त्या लाडूचं किंवा पेढ्याचं आमिष दाखवून ते औषध पाजते त्याला. त्याप्रमाणे सकाम भक्ती ही अशी लाडू, पेढ्यासारखी आहे.

खरा जो मोक्ष आहे, त्या मोक्षाचे साधक होणं, हे सुध्दा किती तरी कठीण आहे. मोक्षाची इच्छा मनामध्ये उत्पन्न होणं, दुःख निवृत्ती ही कायमची झाली पाहीजे, ही इच्छा मनामध्ये उत्पन्न होणं, हेच किती तरी कठीण आहे. आज घरात अन्न नाही, काही नाही अशा व्यक्तीला नोकरी पाहिजे. त्याला जर कोणी सांगितले, 'आम्ही तुम्हाला एक महिना नोकरी देऊ. ' ' एक महिना तर एक महिना, ' असे म्हणून लोक जातात त्या नोकरीवर. कायमची नोकरी पाहिजे हे खरं आहे. पण एक महिना असली तरी, आज आपला निर्वाह होतो आहे या इच्छेने तिकडे तशी प्रवृत्ती होते. त्याप्रमाणे सकाम भजनाच्या निमित्ताने का होईना निष्काम भजन तो करू शकेल.

सुदामजींच्या पत्नीची इच्छा जाणून भगवंतांनी त्यांना संपत्ती दिली. सुदामजी निरिच्छ होते. पण ती ईश्वरापासून संपत्ती मिळाल्यामुळे मनातली जी कामना, ही ईश्वराने संपत्ती दिली, आणि त्या संपत्तीच्या व्दाराने विषयभोग जरी तो घेत राहिला तरी त्या सकाम भक्तीने दुसरं एक कार्य होतं ते म्हणजे मनातल्या कामना हळू हळू कमी होत जातात. ती सकाम भक्तीच आणखी शुध्द भक्तीच्या स्वरूपात प्रगट होते. म्हणून ईश्वराची सकाम भक्तीसुध्दा करायला हरकत नाही असे मोठे मोठे शास्त्रज्ञही मान्य करतात.

हे श्रीगुरूचरित्र म्हणजे त्या मिषाचे आहे म्हणतात महाराज. सगुण भक्ती हे मिष आहे. जाऊ दे, देवाकडे जाऊ दे. देवाला विसरून जाऊन दुसऱ्या कोणाकडे जायचं, हात पसरायचा आणि काही मिळायचं नाही, उपकार मानायचे, याच्यापेक्षा देवाला शरण जाताहेत, सकाम भजन करताहेत, करू दे. त्यांची सकाम बुध्दीच कमी कमी होत जाईल. संपत्ती मागताहेत देवाकडे, मागू दे. त्या संपत्तीमुळे विषयभोगाकडे लक्ष गेलं तरी सुध्दा ईश्वराच्या कृपेने मनातल्या वासना, इच्छा कमी कमी होत गेल्यानंतर त्यांच्या मनात शुध्द भक्ती निर्माण होते. पुढं ते ज्ञानयोगाचे अधिकारी होतात. खरा भक्तीयोग त्यांना प्राप्त होतो. म्हणून सकाम भक्तीचा पुरस्कार केला गेलेला आहे. या चरित्रामध्ये अशा प्रकारच्या सकाम भक्तीचा पुरस्कार केला असला तरी त्याचा मूळ उद्देश हा आहे. औषध कडू आहे. क्लेश आहेत फार. व्यक्ताच्या ठिकाणी चित्त स्थिर होणं हे सुध्दी कठीण आहे. त्यासाठी चित्त शुध्द व्हायला पाहिजे ना. पापक्षयाशिवाय सकाम भक्ती घडणेही कठीण आहे.

म्हणून या गुरूचरित्रामध्ये अशा कथा अनेक आल्या आहेत. त्रिविक्रम भारती सारखे मोठे भक्त. ज्ञानसंपन्न असलेले. तीन वेदांचा अभ्यास त्यांचा होता असे सांगतात. त्यांनाही महाराजांनी मार्गदर्शन करून मार्गावर आणलेल आहे. असे विवेकसंपन्न थोडे अधिकारी आहेत. सायंदेवांसारखा मोठा भक्त आहे. पण सायंदेवांना ताकीद करावी लागली. 'ह्याच्या पुढे म्लेंच्छांची सेवा करायची नाही ती जर कराल तर तुम्हाला मृत्यू येईल.' अशी भीती दाखवावी लागली. मग सोडली सेवा त्यांनी.

म्हणजे मोठमोठ्या ज्ञानसंपन्न भक्तांची थोडी फार उदाहरणे आहेत. पण बहुतेक भक्तांच्या मनात भगवंताबद्दल प्रेम आहे. त्या आत्मीयतेमुळे भगवंताकडे काही मागायला संकोच वाटत नाही त्यांना. मागून घेऊया आपण काय हवे ते. देव समर्थ आहे. 'दाता एक रघुनंदन ' त्याच्याजवळ काय मागेल ते मिळते आहे. सांदीपनी गुरूमहाराजांची खात्री होती की राम, कृष्ण हे मनुष्य

नाहीयेत, तेही ज्ञानी होते. त्यामुळे जेव्हा गोपालकृष्णांनी विचारलं, ' गुरूदक्षिणा काय देऊ,' तेव्हा पत्नीचा विचार घेतला आणि तिने सांगितलेलं मागणं मागितलं. ' आमचा एकुलता एक मुलगा समुद्रामध्ये बुडून गेलेला आहे. तो तेवढा आम्हाला आणून द्या ' आता इथे काहीही मागितलं तरी हरकत नाही. मुलगा झालाच नाही असं नाही, तो गेलेला होता. म्हणजे भगवंतांना सुध्दा ज्यांनी सगळ्या विद्या शिकवल्या, ज्ञान दिलं, त्यांनी सुध्दा हे मागणं मागितलं आहे, 'आमचा गेलेला मुलगा तेवढा आणून द्या.' श्रीकृष्णांनी दिला आणून तो मुलगा. ईश्वराच्या कृपेने तो मुलगा यमलोकात गेला असतानासुध्दा तो परत मिळाला आहे.

तर मन हे घोड्यासारखं आहे म्हणतात. तरूण, अगदी नवीन आहे घोडा, अद्यपि ज्याला घोडेस्वाराची सवय झालेली नाही. पक्का जो घोडेस्वार असेल तो अशा नवख्या, नाठाळ घोड्यावर बसल्यानंतर नेहमी लगाम खेचून घेणं असही करत नाही. अधून मधून लगाम सोडतो आहे. उधळू देतो त्याला. उधळू दे. तो बसण्यात पटाईत असल्यामुळे पडू शकत नाही. किती उधळतो, उधळू दे. मध्ये खेचून धरणं, पुन्हा मोकळ सोडणं असं पुष्कळ त्या घोड्याला धावाधाव करायला लावून तो शांत करतो. ताब्यामध्ये आणतो. त्याप्रमाणे मनाला ताब्यात आणण्याचा मार्ग भगवंतांनी उध्दवजींना सांगितलेला आहे. तो असा की प्रत्येक वेळी अत्यंत निग्रह हाही उपयोगी नाही. तो निग्रह सफल होत नाही.. अनंत वासनांनी भरलेलं मन त्या वासनांच्या योगाने केव्हा बेकाबू होईल हे सांगता येत नाही. म्हणून शास्त्रकारांनी मनाचा निग्रह करण्यासाठी, योग्याभ्यासासारखी साधने जरी सांगितली असली, तरी मनाचा संयम होणे कठीण आहे. योगशास्त्र म्हणजे प्रयोग शास्त्र आहे. प्राणायामादिकांनी प्राण स्थिर करून नंतर मनाची स्थिरता करायची. हा एक मार्ग आहे.

सांख्यमार्ग म्हणजे तत्वविचार करायचाय. श्रवण, मनन, निदिध्यासन इकडं लक्ष लागलं आहे. सगळेच योगाभ्यास करू शकत नाहीत. सगळेच काही श्रवण, मननही करू शकत नाहीत.

कोणाला ते आवडतं, कोणाला हे आवडतं. म्हणून श्रवण, मनन, निदिध्यासन म्हणजे आत्मानात्म विचार करण्याकडे आपली बुध्दी ही स्थिर करणं आणि तोच विचार करणं, विषयांचा संबंध सुटणं याकरता प्रयत्न आहे. प्राणांचा निग्रह करणं, त्याच्या द्वारानी मनाचा निग्रह करणं, म्हणजे त्या विषयाचा संबंध सुटणं. विषयांचा संबंध आल्यामुळे पुनः पुनः वासना ज्या उत्पन्न होतात त्या संसाराच्या संस्कारांनी ( विषयांच्या संस्कारांची ) मनामध्ये अधिक अधिक भर पडत जाते. अगोदर अनेक जन्मांचे कितीतरी विषय संस्कार आहेत. ते कमी होण्याकरता म्हणून योगमार्ग आहे. मनाची स्थिरता झाली की मनाचा विषयांशी संबंध बंद झाला. ती योगमार्गाने प्राणायामादिकांनीही करता येईल.

संतांचे ग्रंथ आहेत. त्यांनी दृष्टांत वगैरे देऊन आणखी उत्तम प्रतिपादन केलेलं असतं. सगळ्या संतांचे ग्रंथ म्हणजे उत्कृष्ठ मनन रूप आहेत. मनाला आवडेल अशा रीतीनं त्यांनी मनन केलेलं आहे. आपल्या एकट्याच्या मनानी श्रवण केल्यानंतर, मनन करण्याची शक्ती प्रत्येकाला असेल असं नाही. ऐकतो आपण पुष्कळ. वाचतोही पुष्कळ. पण ते वाचलेलं किंवा ऐकलेलं जे आहे पुनः पुनः त्याचं अनुसंधान करणं, योग्य अयोग्य त्याच्यामध्ये काय आहे हे पाहणं, आपण जे आपल्या मनात ठरवितो तेही योग्य आहे की नाही याचाही तपास करणं हे आपण करत नाही. आपल्याला जे वाटतं तेच योग्य आहे असा आग्रह उत्पन्न होतो, असा आग्रह उत्पन्न झाल्यावर, ते मनन निर्णायक होऊ शकत नाही. त्याकरता असे जे योग्य पुरूष, अधिकारी महात्मे असतील त्यांच्या बरोबर मनन करणं अथवा समानशील जे असतील, अभ्यास करणारे साधक त्यांच्या बरोबर मनन करणं, हाही मननाचा दुसरा प्रकार आहे.

तर ही मननाची आवड ज्या मनाला उत्पन्न झाली ते मन विषयांपासून बाजूला होतं. वेदांत विचारांमध्ये तीन भाग येतात. ' अहम् ' हा जो जीवात्मा आहे तो कोण आहे?

जीवात्म्याचं स्वरूप काय हे अगोदर ठरवायचं आहे.

त्याच्यानंतर, हे समोर दिसणारं जे जग आहे, ते जग म्हणजे काय आहे? याचा कर्ता कोण आहे? आपोआप झालय का? आपोआप कसं होतं, होणं शक्य आहे का? असा जगासंबंधी विचार करायचा आहे. मनाची इतकी विलक्षण देणगी देवाने दिली आहे. मनुष्य देहामध्येच हे सगळे आहे. ' संवित्पात्रं नरोत्तमः' म्हणतात महाराज. देह ज्याला मिळाला तो जीवात्मा ज्ञान मिळवण्याचा अधिकारी आहे. तर त्याच्यामध्ये सगळ्या शक्ती आहेत. ज्ञानेंद्रिय आहे, कर्मेंद्रिय आहे, अंतःकरणतत्व तर इतकं समर्थ आहे, किती जन्मांच्या वासना असतील, किती ज्ञानाचा अभ्यास झाला असेल, किती ज्ञानाच्या वासना असतील, कर्माचही आचरण झालेल असेल, भक्तीही झालेली असेल. जितके जन्म झालेले आहेत ते सगळे संस्कार त्या मनामध्ये आहेत. मनुष्य जन्म आल्यानंतर, त्याचं संशोधन करताना राजस, तामस वासना दूर करून विचार करता आला पाहिजे. सात्विक वासनांची वृध्दी करायची आहे. आणि वृध्दी झाल्यानंतर, त्या सात्विक वासना वाढत वाढत गेल्यानंतर, ज्ञान म्हणा, ध्यान म्हणा तिकडे ते मन प्रवृत्त होतं.

म्हणून भगवान महाविष्णूंनी, भगवान दत्तात्रेय हा अवतार धारण केला. त्यांनीच श्रीपादवल्लभ आणि नृसिंहसरस्वती हे दोन अवतार कलियुगामध्येच धारण केलेले आहेत. यांच कारण एका स्तोत्रामध्ये महाराजांनी दाखिवलेलं आहे. दत्तात्रेय अवतार का झाला?

दृष्ट्वाजनान् विविध कष्टवशान्दयालु
ज्ञात्वाबहुव सकलार्तिहरो दत्तः ।

दत्तात्रेय अवतार घेण्याचं एक प्रयोजन असे सांगतात की अनेक जीव विविध कष्टवशानदृष्ट्व, अनेक कष्ट भोगताहेत. सुखाच्या इच्छेने प्रयत्न चाललेले आहेत. प्रयत्न फलदायी ठरला, सुख मिळालं तरी ते विनाशी सुख आहे. सर्वकाल टिकणारं सुख

पदरात पडत नाहीये. यज्ञयाग वगैरे करुन स्वर्गात जातात, देव होतात, पण जीवभाव जाईल कसा हा विचार तेही करू शकत नाहीत. देवांना ज्ञानाचा अधिकार आहे. सर्व योगसिध्दी त्यांच्या जवळ असतात. वेदाध्ययन वगैरे त्यांना स्वतंत्र करावं लागत नाही. उपनयन वगैरे संस्कारांची त्यांना आवश्यकता नसते. वेद वगैरेंची त्यांना परिस्फूर्ती असते. पण इतकही असून या भक्तीमार्गाकडे, ज्ञानयोगाकडे त्यांचं लक्ष नाही. कर्मयोगाची तर त्यांना जरूरीही नाहीये. पण इतकं सगळं पुण्यकर्म करून स्वर्गात गेले, सुख मिळालं, पण ते सुख अविनाशी नाही. ' क्षीणेपुण्ये मर्त्ये लोकेविशंति ' पुण्य असेपर्यंत ते स्थान आहे.आणि पुण्य संपले की ते स्थान पण राहात नाही. स्वर्गात राहाण्याचा अधिकार संपलेला आहे.

तर अशा रितीने कष्ट काही संपत नाहीत. देव झाले जरी तरी कष्ट आहेत. मानवामध्येही आहेत. इतर पशुपक्षादि योनी आहेत, स्थावरांतर्गत योनी आहेत, स्थावर योनीपर्यंत जातात म्हणाले, जीव आपल्या कर्माचं फल भोगण्याकरता. कर्म संपत नाही. आणि त्यांचे भोग सुख दुःख हे संपत नाही. हे संपवण्याची योग्यता त्यांना येत नाही. वाटतही नाही यातून आपली सुटका करून घ्यावी म्हणून. हे पाहून भगवंतांना दया आली, म्हणाले.

भगवंतांना दया येणे म्हणजे पूर्ण कार्य झालं आहे. माणसाची दया आणि देवाची दया याच्यामध्ये कितीतरी अंतर आहे. कोणचाही जीव असला तरी तो दुसऱ्यावर दया करण्यास असमर्थ आहे. इंद्रादिक देवतांनी जरी दया केली तरी ती अपूर्ण दया आहे. पूर्ण होऊ शकत नाही. मुचकुंद राजाला देवांनी सांगितलं, ' बाबा, तू आमच्या उपयोगी पडलास, आमचा सेनापती झालास, पुष्कळ दिवस झाले, तू आता जा आपल्या राज्यात. तुझी सगळी माणसं वगैरे गेली सगळी. काय तुला पाहिजे माग. कैवल्य तेवढं आम्ही देऊ शकत नाही. तो कैवल्य देणारा एकच परमात्मा आहे. '

म्हणजे देव सुध्दा आणखी मोक्ष देऊ शकत नाहीत. काही साधनांमध्ये ते आपल्याला प्रवृत्त करतील. त्यांच्या शक्तीचा

उपयोग माणसाला अगदीच नाही असं नाही. चांगल्या मार्गाकडे नेणे, चांगल्या साधनांमध्ये प्रवृत्त करणं, हे ते करू शकतील. तर देवाला जरी उपकार, दया करावीशी वाटली तरी त्यांच्यामध्ये सामर्थ्य नाहीये. पण इथं ( भगवंताजवळ ) पूर्ण सामर्थ्य आहे. संपूर्ण विश्व उत्पन्न करणं, त्यांचं संरक्षण करणं आणि पुन्हा त्याचा संहार करून टाकणं हे भगवंत करतात. इतकं निर्माण केलं आहे, पुन्हा संहार केल्यानंतर ते पुन्हा कसं होईल, पुन्हा आपल्याला बांधता येईल का घर अशी काही काळजी नाही त्याला. पंचमहाभूतांसारखी भूतं, ' एकोऽहं बहुस्याम् ' असा नुसता संकल्प होता क्षणीच निर्माण होताहेत. आमच्या संकल्पाला मनोरथ म्हणतात. जीवांचे संकल्प म्हणजे मनोरथ आहेत. ते असेच चालायचे. पण तो सत्य संकल्प आहे ईश्वराचा. ती संकल्पवृत्ती अशी आहे की, असं व्हावं असं वाटल्याबरोबर ते कार्य होऊन जातं. अशी शक्ती ज्या परमेश्वराची आहे, त्यांच्या मनामध्ये दया उत्पन्न झाली. ' सकलार्ति हराः 'हे विशेषण दिलं आहे महाराजांनी. आर्ति म्हणजे सर्वांची दुःख दूर करणारे. कोणी कितीही दुःखी असले तरी(व्यवहारात आपण पहातो त्याप्रमाणे) इतक्यांनाच घेतलं जाईल, आमच्याकडच्या जागा संपल्या असं ते कधीही म्हणत नाहीत. म्हणून सर्वांची आर्ति दूर करणारा जो परमात्मा आहे, त्याला जर दया उत्पन्न झाली तर ती कार्य केल्याशिवाय कशी रहाणार ? म्हणून हे एक प्रयोजन आहे. भगवान दत्तात्रेय अवतीर्ण झाले. लोकांची दुःख दूर करावीत या हेतूने आलेले आहेत.

आणि दुसरं एक प्रयोजन सांगतात-

अत्रि महर्षी ब्रह्मदेवांचे मानसपुत्र. ब्रह्मदेवांच्या संकल्पाने उत्पन्न झालेले. अनेक जन्म ' स्वयंसिध्द ' याचं ते उदाहरण आहे. ऋग्वेदाच्या पांचव्या मंडळाचे ते द्रष्टे आहेत. प्रथमतः सूर्यग्रहण लागलं, अंधार पडला, कोणाला काही कळेना; अत्रि ऋषिंनी ते ओळखलं म्हणतात. वेदामध्येच ते वर्णन आलेलं आहे. सव्विसाव्या अध्यायात आहे म्हणतात, महाराजांनी सगळा खुलासा केलेला

आहे. तर त्या अत्रि महर्षींचं अखंड तप चालू आहे. तपोधन म्हणतात त्यांना. ते तपोधन किती आहे काही पत्ता लागायचा नाही. तर त्या अत्रि महर्षींच्या तपाचं फळ देण्याकरता म्हणून भगवान अवतार घेऊन आले. एकट्या अत्रिऋषींच्याकरता आले. सगळ्या जीवांच्याकरता आलेले आहेत. एकट्या रूक्मिणीकरता भगवान गोपालकृष्ण आले आहेत, भगवान श्रीहरि, त्यांची भक्ती करणारा एक असो किंवा समूह असो. समूह पाहिजे हे सध्याच्या कायद्याप्रमाणे आहे. मंडळ पाहिजे, युनियन पाहिजे, त्याशिवाय अर्जाचा विचारच केला जाणार नाही. कायदा आहे सध्या. बुध्दीनं निर्माण झालेला कायदा. पण ईश्वराच्या सृष्टीतला हा नियम आहे. आर्त, जिज्ञासू,अर्थार्थी, एक व्यक्ती जरी असली तरी त्या व्यक्तीचंही कार्य करणं, त्याला मार्गदर्शन करणं, त्याला संकटमुक्त करणं, याकरताही भगवान दत्तात्रेय आले. हाही उपदेश महाराजांनी मुद्दाम केलेला आहे.

म्हणजे सगळ्या देवांना दुःख झाल्यावर तसाही प्रसंग आहे. ब्रह्मादिक देव भगवंताकडे गेले, कृष्णावतार होण्यापूर्वी. सगळे असूर जन्माला आले आहेत, सगळ्यांची बुध्दी बिघडलेली आहे. असुरांचच राज्य झालेलं आहे. सगळ्यानी मिळून प्रार्थना केली, तेव्हाही भगवंतांनी अवतार घेतले आहेत. तसा दत्तात्रेय अवतार सर्वही जीवांचं दुःख मोचन व्हावं या उद्देशाने झालेला आहे. म्हणून षोडषावतारातल्या एका कथेमध्ये महाराजांनी दत्तात्रेयांच्या अवताराचं महत्त्व एका ठिकाणी सांगितलं आहे की ह्या अवताराला कालाची मर्यादा नाहीये. रावणादिक राक्षसांचा नाश झाला, अवतार कार्य पूरे केलं रामचंद्रांनी. कंसाचा नाश झाला, कौरवांच्या बाजूनं जमलेल्या लोकांचा नाश झाला. भूमीचा भार दूर झाला, सगळं झालं. गीता ज्ञानही व्यक्त केलं. आता पुरे म्हणाले. अवताराचं कार्य संपलेलं आहे. त्याच्या अवतारांचा काल मर्यादित आहे पण दत्तात्रेयांच्या अवताराला कालमर्यादा नाहीये. सगळे जीव दुःखामध्ये सापडलेले आहेत त्यांना दुःखातून मुक्त करण्याकरता हा अवतार आहे.

जीव तरी किती आहेत ! अनंत आहेत ना ! लोकसंख्या म्हणजे फक्त माणसाचीच मोजतात. ८४,००,००० योनी म्हणजे शरीर आहेत जीवांची. इतके अनंत, असंख्य जीव आहेत की त्यांची गणना करता येणं शक्य नाहीये. सगळ्याही जीवांचं कल्याण करायचंय. म्हणजे मानवावरतीच कृपा होती देवाची असं नाही. गजेंद्रावरही कृपा झालेली आहे. तोही भक्त होता पूर्वजन्मीचा. गजयोनीमध्ये गेल्यावरही ते भक्तीचे संस्कार त्याच्या बुध्दीमध्ये होते म्हणून संकटात सापडल्यानंतर गजाच्या जन्मातसुध्दा त्याने भगवंतांची स्तुती केली, भगवान आले आणि त्याला मुक्त केलेलं आहे. आर्त भक्त आहे.

तर दत्तात्रेय अवताराचा हा जो हेतू आहे, प्रयोजन आहे ते मर्यादित स्वरूपाचं नाहीये. म्हणून सर्व जीवांचा उध्दार करण्याकरता झालेला हा अवतार कायमचा अवतार आहे. अमूक कालापुरता अवतार नाही. त्यानंतर श्रीपादवल्लभ आणि नृसिंहसरस्वती ही दोन रूपं कलीयुगात घेतलेली आहेत.

'कलौ श्रीपादश्रीवल्लभः' असंही सांगतात. श्रीपादश्रीवल्लभ अवतारालाही पांच सातशे वर्ष होऊन गेली. ज्ञानेश्वर महाराजांच्या पूर्वीचा तो अवतार आहे. आणि नंतर हा नरसिंह सरस्वती महाराजांचा अवतार आहे. ते हेही अवतार अजून आहेत असा उल्लेख टीकेमध्ये महाराजांनी केलेला आहे. तर हे सगळे अवतार धारण करून सर्वांनाही योग्य मार्गदर्शन करायचं आहे. त्यांना आणखी योग्य मार्गावरती आणायचं आहे. साधक बनवायचं सर्वांना. हे मोठे काम आहे.

दत्तात्रेय, श्रीपादवल्लभ, नरसिंह सरस्वती, हे अवतार काय आहेत, हे समजून घेतलं की मग तिकडे प्रवृत्ती होणार. त्या अवतारांचं ज्ञान झालं, संबंध आला की मग भक्ती घडेल. तर ही प्रवृत्ती झाली, तशी संगती घडली की उध्दार वगैरे त्याची सगळी साधनं वगैरे आपल्याला समजून येताहेत. म्हणून या अवताराचं वर्णन अशा रीतीनं केलेलं आहे. आणि विशेषतः नरसिंह अवताराच्याच पुष्कळ कथा याच्यामध्ये आहेत. श्रीपादवल्लभांच्याही

एक दोन कथा आल्या आहेत. दत्तात्रेय अवताराचं स्वतंत्र चरित्र महाराजांनी दत्तपुराण म्हणून करून दिलेलं आहे. दत्तमहात्म्य म्हणून मराठीत त्याचं विवरणही पुष्कळ स्पष्टीकरणही दिलेलं आहे. हे चरित्र ऐकून त्याप्रमाणे आपली बुध्दी अनन्य जर करता आली दत्तात्रेयांची भक्ती असो, श्रीपादवल्लभांची असो, नरसिंह सरस्वती महाराजांची असो कोणाचीही असो. ते प्रेम, भक्ती उत्पन्न झाली, जरी आरंभाला ती सकाम असली तरी हरकत नाही. त्याला प्रवृत्त करण्याकरता हे सगळं केलेलं आहे.

म्हणून मूळ जे परमात्म स्वरूप आहे त्या स्वरूपाचं मंगल स्मरण, अनुसंधान या गुरू चरित्राच्या आरंभी महाराजांनी केलं आहे.

नौम्युदेति यदज्ञानाज्जगद्रज्ज्वहिवत्पुनः
यत्तत्वं मीलति ज्ञानां तं चिदानंदसद्गुरूम् ।।

सच्चिदानंदरूपी परमात्मा तोच गुरूरूपी आहे. गुरू स्वरूप हे त्याचंच आहे. एक मार्गदर्शक आहे, एक नियामक आहे. ईश्वरस्वरूप आणि गुरू स्वरूप हे त्याचं परमात्म्याचं रुप आहे. ईश्वर स्वरूप हे नियामक आहे. नियामक होण्याला इच्छा शक्ती परमेश्वराची मोठी आहे. ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती, इच्छाशक्ती श्रीगुरू याचा अर्थच तो आहे. श्री म्हणजे सर्व प्रकारची शक्ती, सर्व प्रकारचं ऐश्वर्य त्यांच्याजवळ आहे. तर ही इच्छाशक्ती जरी असली तरी, जीवांचं नियमन जे केलं जातं ईश्वराकडून ते नियमन म्हणजे केवल त्याच्या इच्छेने होत नाही. जीवांची कर्म जी आहेत, ती कर्म सर्व पाहून, नियमन केलं जातं जीवांचं. म्हणून कोणचाही दोष ईश्वराच्या ठिकाणी नाही.

न्यायाधीश जो शिक्षा करतो, ती, तो रागद्वेषादि विकारी होऊन तो करत नाही. तो जो अपराधी आहे त्याचा अपराध बरोबर प्रमाण सिध्द झाला म्हणजे त्याला तो शिक्षा करतो. तो अलिप्त आहे. त्याप्रमाणे ईश्वर नियामक याचा अर्थ व्यवस्थापक

म्हणून आहे. निर्माणही तोच करतो. व्यवस्थाही तोच करतो. संहार करतो. हे सगळं कार्य चालू आहे. तेव्हा ज्ञानशक्ती केवढी मोठी आहे, क्रियाशक्ती केवढी आहे. इच्छाशक्ती केवढी आहे. तर अशा रूपाने तो सच्चिदानंद घन परमात्मा आहे. सत् म्हणजे त्रिकालाबाधित आहे. कालमर्यादा त्याला काही करू शकत नाही. कालाच्या आधीन सगळं आहे. परंतु काही काही साधनांचा उपदेश करताना कालसुध्दा त्याला ( गुरूभक्ताला ) काही करू शकणार नाही असाही उपदेश या गुरूचरित्रामध्ये आलेला आहे. कलीला ब्रह्मदेवांनी सांगितलेलं आहे. तर ही कालाची मर्यादा ईश्वरभक्तालासुध्दा नाहीये. मग प्रत्यक्ष ईश्वराला कुठली कालाची मर्यादा. तो ' सत् ' म्हणजे अस्तित्व नेहमी त्याचं आहे. आयुष्य संपलं म्हणजे झालं असं नाही. जन्मानंतर मृत्यू, मृत्यूनंतर जन्म अशी परंपरा ईश्वराला नाहीये. जन्मही नाही आणि मृत्यूही नाहीये. तो कालत्रयातीत असल्याचं हे उदाहरण आहे. तर असा सत् परमात्मा त्रिकालाबाधित आहे. म्हणून तर तो सर्वांना मार्गदर्शन करू शकतो. आणि स्वयंप्रकाश आहे. आत्मप्रकाशी असल्याने त्याला दुसऱ्या कोणत्याही प्रकाशाची जरूरी नाहीये. याच्याच प्रकाशाने सर्वही जगत् प्रकाशित् होतं आहे.

आणि आनंदस्वरूप आहे तो. हा आनंदस्वरूप परमात्मा सत्य आहे. कालमर्यादारहित आहे, नित्य आहे. हा आनंद मिळिवण्याकरता सगळा आणखी साधनमार्ग आहे. सगळ्याही साधनांचं पर्यवसान याच्याकरता आहे. असा जो सच्चिदानंदघन परमात्मा तोच गुरू आहे. अशा सद्गुरूला मी वंदन करतो. या परमात्म स्वरूपाची जी मायाशक्ती आहे त्या मायेच्या योगाने संपूर्ण जगत् हे उत्पन्न होतं म्हणाले. त्यांनी असा दृष्टांत दिलेला आहे. अंधारामुळे दोरी काही कळत नाही. पण तिला पाहिल्याबरोबर सापाला पाहिल्याचे आठवते, तो चावला तर मृत्यू येतो वगैरे सगळे स्मरते कारण त्या सर्पाबद्दलचे तसे संस्कार बुध्दीवर झालेले असतात. रज्जू समजली नाही पण संस्कारांमुळे सापाचे स्मरण झालेले आहे. तो सापच दिसायला लागला. ते संस्कार

इतके बलवत्तर होऊन त्यावेळेला प्रगट झाले की त्या रज्जूच्या अज्ञानाने साप तयार केला. साप दिसतो असं म्हणायला लागला आणि साप मला चावला असंही म्हणायला लागला. शंकाविष ज्याला म्हणतात. ' मला साप चावला, मला साप चावला, ' अशी त्याची कल्पना दूर करायला किती प्रयास
करावे लागतात ! कुठलातरी दुसरा साप मारून आणून, ' हा बघा साप मेलेला आहे आता घाबरू नका, ' वगैरे सांगून त्याची भीती घालवावी लागते. किती खटपट करावी लागते. शंकाबीज सुध्दा बाधक आहे.

तसं हे जे विष आहे, रज्जूवरं ज्याप्रमाणे भासतो आहे अज्ञानामुळे, रज्जूचे अज्ञान, त्याप्रमाणे सर्व विश्वाला अधिष्ठानभूत जो परमात्मा, सच्चिदानंदघन सद्‌गुरूस्वरूप त्याच्याविषयीच्या अज्ञानामुळे सगळे जगत् भासते आहे. ह्या जगताचं ज्याला ज्ञान झालं आहे ते जाऊ शकते. ते राहाणारं,स्थिर नाहीच आहे. अज्ञानामुळे आलेलं स्थिर कसं असेल ? त्या परमेश्वराच्या अधिष्ठानाचं ज्ञान झाल्याबरोबर सगळं अज्ञान गेलं. साप आलाही नाही, साप दिसलाही नाही, साप चावलाही नाही. काही नाही. दोरी दिसायला लागल्यानंतर पुढची अवस्था आहे ही. अगोदर सापच आहे, साप चावलाय असं म्हणायला लागलेला आहे. अशा एकेक एकेक मनाच्या कल्पना वाढायला लागतात.

तर सबंध विश्वाला आधारभूत असलेल्या परमेश्वराचं स्वरूप, ज्या महात्म्याने जाणलेलं आहे, त्याला हे सगळं जग नाहीसं होतं, म्हणाले. आलेलं असेल, तर नाहीसं होईल. आलंही नाही आणि गेलंही नाही म्हणतात ते त्याला. अविद्या पूर्वीही नव्हती, जग पूर्वीही नव्हतं, आत्ताही नाही आणि पुढेही असणार नाही. जग नाहीच आहे. जगाला अस्तित्वच नाही. तेव्हा विश्वाधार असा जो परमात्मा आहे त्याचे स्मरण पहिल्या प्रथम केलेलं आहे. वस्तू निर्देश केलेला आहे - परमात्म स्वरूपाचा

आणि त्यानंतर एकेक एकेक करून ही सृष्टी कशी निर्माण झाली हे सांगताहेत.

भात्यनेकवदेकं सध्दीभेदादेकरूपया
विदास्यैक्यं परं ब्रह्म तत्सत्यं दत्तसंज्ञितम् ।।

तेच परमात्म तत्व म्हणजे भगवान दत्तात्रेय आहेत. हे सांगताहेत महाराज. एकच आहे ते. पण अनेकवत् भाति. अनेक असल्याप्रमाणे जग दिसायला लागलं तर ' अज्ञानात् जगत् उदेति' म्हणतात. अज्ञानामुळे सगळं जग मला समोर आलेलं आहे. जग म्हणजे अनेक आहे. तर एक तत्व असतानासुध्दा अनेकाप्रमाणे वाटायला लागलं - बुध्दी भेदामुळे. शत्रू-मित्र, पुण्यं-पाप, चांगलं-वाईट वगैरे अनेक भास त्यात वाटायला लागले. द्वंद्व भासायला लागलं. बुध्दी जशी जशी शुध्द होत जाईल तसा तसा हा बुध्दीभेद, भास कमी कमी होत जातो.

ईश्वराच्या स्वरूपामध्ये सुध्दा भेद आहे ना. गणेश उत्सवात प्रत्येक पेठेत वेगळी वेगळी गणपतीची मूर्ती बसवलेली असते. वास्तविक गणपती म्हणजे एकच आहे की नाही. पण पहायला जाताना, चर्चा करतात. ' त्या पेठेतल्या गणपतीपेक्षा हा गणपती चांगला आहे बाबा. तो काही बरोबर नाही. ' गणपती एकच आहे ही सुध्दा कल्पना होत नाही मग सर्व ठिकाणी ईश्वर एकच आहे ही बुध्दी व्हायला किती काळ जायला पाहिजे? बुध्दीतले सगळे संस्कार कमी झाले पाहिजेत. त्यावेळेला या एकत्वाची जाणीव होते ' तत् पदार्थशुध्दि ' असे वेदशास्त्रकार त्याला म्हणतात.

त्या महावाक्यामध्ये असलेल्या ' तत् ' पदार्थाचा अर्थ म्हणजे ईश्वर एक आहे.

' अहम् ' ही एकच आहे. तोही एकच आहे हे सुध्दा समजून घेतलं पाहिजे. मग ब्रह्म आणि अहम् पदार्थ एकच आहेत हे ज्ञान होतं. तर त्या बुध्दीभेदामुळे अनेकत्व दिसायला लागलं आहे. मूळ अज्ञान आहे. अज्ञानामुळे हे सगळं होतं. आणि तेच परमात्मतत्व गत्तात्रेय रूपाने प्रगट झालेलं आहे.

बोद्धुं भूत्वात्रिपुत्रः स्वपदरसपरान्दिव्ययोगेन बालान्
दत्ताख्यःकार्तवीर्यं यदुमपि च समान्स्वाश्रितानुद्दधार ।

भूयोद्मन्यान् श्रीपदाख्यः पुनरपि नृहरिः संज्ञया स्वीयभक्तान्
कृष्णाभीमातटस्थो जयति परगुरुः स्मर्तृगाम्येष दत्तः ।।

एक रूपाने पहाणं ही कला किंवा हे खरं ज्ञान, ज्ञानी माणसाला किंवा महात्म्याला आलेलं आहे. हे मूल जे जगत् अधिष्ठान परब्रह्मतत्व आहे ज्याला भगवान्, परमात्मा ब्रह्म असे म्हणतात तेच दत्त रूपाने अवतीर्ण झालं आहे. जे भक्त आहेत त्यांना सगळं ज्ञान करून द्यायचं आहे ना ! आपलं जे आनंदस्वरूप ( आत्मरूप ) त्या आनंदाचा आस्वाद घेण्याकडे ज्याचं चित्त गेलं आहे, संसार ज्यांच्या चित्तामधून नाहीसा झालेला आहे, काही नाही, संसारिक गोष्टींचं काही स्मरणही नाही. आपल्या चित्तातले सगळे संस्कार ज्यांनी आपल्या भक्तीमुळे ईश्वरकृपेने घालविलेले आहेत, ते भगवंताचं जे आनंद स्वरूप आहे, त्या आनंदाचाच आस्वाद घेत राहाताहेत. पण अद्यापि त्यांचा उध्दार करायचा आहे. ' बालान् ' म्हणतात. बालान् याचा अर्थ रागद्वेषादि विकारांनी शून्य,असं ज्यांचं अंतःकरण झालेलं आहे. बालकांच्याप्रमाणे ज्ञानी माणसाने रहावं असं उपनिषदकार सांगताहेत. उपनिषदामध्ये असं मुद्दाम सांगितलेलं आहे. बालकांच्या मनात रागद्वेषादिक कोणतेहि विकार नाहीत. बालवृत्तीचा अभ्यास आहे. दत्तात्रेय अवधूतांची तीच वृत्ती आहे. अशांनाही सगळं ज्ञान करून द्यायचं आहे. त्यांच्याकरताही अवतार आहे.

त्याचप्रमाणे हा अवतार घेऊन कार्तवीर्यार्जुनाचाही उध्दार केलेला आहे. किती सत्ता त्या कार्तवीर्यार्जुनालाही मिळालेली आहे. सकाम भक्त आहे तो अगोदर. पुढे त्या मनातल्या सगळ्या कामना गेल्या. अगोदर सगळ्या सिध्दी दिल्या म्हणे त्याला.

वाटेल तितक्या सिध्दी दिल्या. कार्तवीर्याच्या राज्याचं वर्णन कालीदासांनी रघुवंशामध्ये केलेलं आहे. अकार्याची चिंता. ' आज अमक्याच्या घरावर दरोडा घालायचा आहे, ' या विचाराने चार लोक बसलेले आहेत. त्यांचा तो विचार चाललेला आहे. त्यांची चिंता म्हणजे अशा वेळेला हा कार्तवीर्यार्जुन धनुष्य बाण घेऊन एकदम त्यांच्यासमोर जात असे. अशी एकाच वेळी अनेक रूपं धारण करण्याची शक्ती त्याला दिली होती दत्तात्रेयांनी. तसाच वर त्याने मागितला होता. त्याशिवाय मी राज्य करणार नाही म्हणाला. कारण अधिकारी लोक येऊन सांगणार, अमुक एक जण अपराधी आहे, राजद्रोही आहे. ह्यांच्या सांगण्याप्रमाणे त्याला शिक्षा करायची. अशा वेळी एखादे वेळेस खरा अपराधी बाजूला राहातो आणि निरपराधी माणसाला शासन होते. हे असलं राज्य करून मला नरकात जावं लागेल, म्हणाला. म्हणून मला हे सगळं बसल्या जागेवर कळलं पाहिजे. आणि ते निवारण करण्याची शक्तीही पाहिजे, तर मी राज्य करीन. दिली त्याला शक्ती ( दत्तात्रेयांनी ). अकार्य विचार चालू असताना हा अचानक तिथे जात असे. गुप्तहेर खात्याची त्याला काही जरूर नाही. हेर खात्यावर कशाला अवलंबून राहायचं ? राजाला 'चार चक्षू ' असं म्हटलं आहे. ' चार ' म्हणजे हेर त्याचे डोळे आहेत. स्वतःचे डोळे नसतात त्याला. तर त्या ठिकाणी स्वतः जाऊन काय चाललं ते पहाणं, त्यांच्या बुध्दीचं परिवर्तन करणं, हे त्यांचं कर्तव्य होतं, तशी शक्ती होती. एवढा मोठा नेता तो होता.

आज अंतःकरणामध्ये उत्पन्न झालेला जो अविनय आहे, दुष्ट प्रवृत्ती आहे ती सुध्दा तो दूर करू शकत होता. पण त्यालासुध्दा शेवटी ते नको वाटलं. आता किती दिवस करायचं ? लोकसंग्रह, लोकसंग्रह, म्हणतात लोक पण किती करायचा ? तो तरी शेवटपर्यंत टिकतो का ? सुधारणा झाली म्हणायची आणि एकदम एखाद्या प्रांतात भडका उडतो. तिकडे लोकांची बुध्दी अशी झाली, तिकडे संप झाला, असं किती तरी चाली असतं. तर कार्तवीर्यार्जुनाने ८५००० वर्षे एकछत्री राज्य केले. या सगळ्यांचे नियमन तो

एकटा करत होता. शेवटी तो म्हणाला, ' आता हे पुरे झालं. लोकांच्या बुध्दीत परिवर्तन करणं, सुधारणा करणं हे ईश्वराचंच काम आहे. आपण यात पडलो हे आपलं चुकलं. मिळालं तर काहीच नाही. समाधान नाही. 'त्यामुळे पुन्हा तो दत्तात्रेयांकडे गेला.

दत्तात्रेयांनी त्याच्याशी भाषणही केलं नाही. दोन दिवस झाले. चार दिवस झाले. कोण्या एका ऋषींनी त्यांना सांगितलं, ' तुमचा इतका मोठा प्रिय भक्त येऊन बसलेला आहे. काय त्याचं म्हणणं आहे ते ऐकून तरी घ्या. ' त्यावर दत्तात्रेय म्हणाले, त्यालाआणखी काही सिध्दी पाहिजे असल्यास घेऊन जा म्हणाव. कार्तवीर्य म्हणाला, 'चुकलो मी. जे मागितलं तेच चुकलं. तुम्ही ज्या सिध्दी दिल्यात ते काढून घ्या, म्हणून विनंती करायला आलोय मी. '

म्हणजे सकाम भक्त जरी झाला तरी किती दिवस प्रवृत्ती होईल? कारण रोजच्या रोज तेच काम आहे ना. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण करतो तरी काय दुसरं? पदार्थां मधला फरक सोडला तर तेच जेवणखाणं चाललेलं आहे रोज. त्यामुळे याच्याहून काहीतरी वेगळा आनंद पाहिजे, ज्यामुळे नेहमी मनाला प्रसन्नता राहील, ही इच्छा त्या कार्तवीर्याला उत्पन्न झाली, नंतर त्याला ज्ञानोपदेश झालेला आहे. सकाम भक्त आहे.

तसाच यदु राजा ययातीचा मुलगा. त्यानें काही बापाला सहाय्य केलं नाही, त्यामुळे त्याला बापाने राज्य दिलं नाही. पुरूला राजा केलं. आणि त्या जेष्ठ चार बंधूंना त्याच्या हाताखाली नेमून तो ययाती राजा वनात निधून गेला. यदुला ते दुःख होतं की मी ज्येष्ठ पुत्र असून मला राज्य न देता माझ्या धाकट्या भावाला राज्य कसं दिलं? मनाला उद्वेग व्हायची सवय, काहीतरी आपल्याजवळ कमी आहे. अभिमानही आहे, पण सतत ' हे पाहिजे, ते पाहिजे ' असे होत असते. म्हणजे काही तरी कमी आहे. त्यामुळे त्याच्या मनाला शांती नाही. मग दत्तात्रेयांचं दर्शन झालं, भेट झाली आणि त्यांनी त्याला उपदेश केला. दत्तात्रेयांना

अवधूत वेषामध्ये पाहिल्यानंतर, यदुने विचारले, ' आपण काही करत नाही ? आपल्या जवळ कोणत्या प्रकारचा संग्रह नाही ? राज्य नाही, सत्ता नाही. संसाराला कारण आम्ही विषय समजतो. धन इ.. अनेक विषयांचा संग्रह करायचा, त्यांचा उपभोग घ्यायचा. हे सगळं सुखाचं साधन आम्ही समजतो. यापैकी आपल्याजवळ काहीही नाही. असं असताना आपल्याला इतका आनंद कसा मिळाला की आम्ही जवळ आल्याबरोबर आमची दुःख आम्ही विसरून गेलो. तुमच्या नुसत्या सान्निध्यात आल्याबरोबर आमची दुःख गेली. इतका आनंद तुम्ही कसा मिळविलात ? '

भगवान दत्तात्रेयांचं दर्शन झालं, भेट झाली ते त्याचं भाग्य होतं म्हणून! मग त्याला उपदेश करून त्याचाही उध्दार केला. अशा किती तरी भक्तांचा उध्दार केला. कलीयुगातही चालू आहे. पहिला अवतार सत्ययुगात झाला. आणि तो कायमचा अवतार आहे. त्यावेळेला काय फक्त कार्तवार्य, यदु एवढेच लोक होऊन गेले असं थोडंच आहे ? कितीतरी भक्त होऊन गेले असतील. त्यांची चरित्र लिहून ठेवणारे कोण आहेत ? व्यास ऋषींनासुध्दा इतकं शक्य आहे काय ? इतकी सगळी चरित्रे. आज कोणत्या भक्ताचा उध्दार केला, कोणच्या भक्ताला संसारात अडचण आली आहे, कोणाला योग मार्गात अडचण आली आहे, कोणाला भक्ती मार्गामध्ये आलेली आहे. किती प्रकार आहेत ! असंख्य भक्तांच्या अनंत वासना, त्यांच्या त्यांच्या इच्छे प्रमाणे पूर्ण करायचे कार्य अविच्छिन्नपणे चालू आहे. ते लिहून ठेवणे कसं शक्य आहे. इतकी चरित्र आम्हाला सात दिवसात, रोज तीन तास बसून पूर्ण समजावून घेणं कधीच शक्य नाही.

या कलीयुगामध्ये भक्तांचा अधिकार कमी कमी झालेला आहे. मनोधैर्य संपलेलं आहे. आयुष्य कमी झालेलं आहे. सगळच कमी झालेलं आहे. कार्तवीर्य, यदु वगैरे मंडळींचं एवढं भाग्य आहे की साक्षात दत्तात्रेयांची आणि त्यांची भेट झाली. पूर्वीची त्यांची किती पूण्यकर्म झाली असली पाहिजेत की त्यांना दत्तात्रेयांचे दर्शन झाले आणि त्यांच्याकडून ज्ञानोपदेश झाला. त्यांची भेट

झाल्यावर आता दुःख उरणारच नाही. कायमची दुःख निवृत्ती होऊन ते मुक्तच करणार ! इतकं भाग्य आमच्या कलीयुगामध्ये कोठे आहे ? भाग्यहीन मंदबुध्दी जीव झालेले सगळे. सगळंच कमी कमी होत चाललय तरीसुध्दा भगवान दत्तात्रेयांनी श्रीपादवल्लभ हा अवतार धारण केला. त्यानंतर पुन्हा नरसिंह सरस्वती अवतार धारण केला. भगवान दत्तात्रेयांच्या सहस्त्र नामामध्ये त्यांना ' स्मर्तृगामी ' हे विशेषण दिलेले आहे म्हणजे स्मरण केल्या बरोबर येणारे. ते स्मरण मात्र अधिकारी भक्तांचं पाहिजे आहे. तसे केल्याबरोबर भगवान येत आहेत आणि त्यांचा उध्दार करताहेत.

याऽजाऽक्रियोऽस्पृहोऽप्येको बहु स्यामिति तृष्णया
प्रकृत्या गुणमय्येदं ततानेशो जगत्प्रभुः ।।

अजः, अक्रुयः आणि अस्पृहः भगवान दत्तात्रेयांचे या शब्दात वर्णन केलेलं आहे. जन्म नाही. क्रिया नाही आणि काहीही इच्छा नाही. इच्छाशक्तीचं जे वर्णन केलय, ते सगळ्या जगतातच कार्य सुरू झाल्यावर ज्या शक्तीचा अविर्भाव होतो तीचं आहे. एकच असल्यामुळे कशाची इच्छा करायचीआणि काय भोगायच ? पण त्यांना जेव्हा ' बहुस्याम' अशी तृष्णा उत्पन्न झाली. ' मी बहुरूप व्हावे ' हा एक त्या चैतन्याचा, परमात्म्याचा संकल्प झाला आणि त्या संकल्प शक्तीच्या सहाय्याने ह्या गुणमयी प्रकृतीचं हे सगळं जग निर्माण केलं आहे. कारण प्रकृती जड आहे ना ! अचेतन आहे. अचेतन प्रकृतीपासून कार्य होऊ शकत नाही.

सांख्यांच खंडन याच मुद्यावर केलं आहे आचार्य महाराजांनी. प्रकृती सगळं कार्य करू शकते असे सांख्य म्हणतात, पण ती जड आहे. आत्मा तुम्हाला मानायचा नाही. नुसता जडवाद तुम्ही जर मानला तर नुसत्या जडाकडून कार्य होणार नाही. कुठेतरी, काहीतरी चेतनाचा संबंध पाहिजे. नाहीतर रचनाच व्यवस्थित होणार नाही. त्या चेतनाच्या संबंधामुळे प्रकृतीकडून हे कार्य झालेलं आहे. त्याच परमेश्वराने संपूर्ण विश्व उत्पन्न केलं.

ब्रह्मादिक देवांपासून स्तंब पर्यंत सगळी सृष्टी झाली. तृणरूप झालेला जीवात्मा आणि ब्रह्मरूप झालेला जीवात्मा दोन्हीही जीवचं आहेत. पण त्याच्यात सर्व शक्तीचा अविर्भाव झालेला आहे. हा जो तृणरूपाने असलेला जीवात्मा आहे त्याला काहीच शक्ती नाही. वृक्ष वगैरे केवळ भोग योनी म्हणून मानलेल्या आहेत, तर हे संपूर्ण चराचर विश्व उत्पन्न केलेलं आहे, त्यातही सगळ्या जीवामध्ये हा नरोत्तम आहे. हा संवित् पात्र म्हणून सांगताहेत. तो ज्ञानाधिकरी आहे, या जगाचा अधिष्ठाता कोण आहे, या विश्वाचा निर्माता कोण आहे हे जाणून घ्यायचा अधिकार मनुष्यालाच आहे. हे समजलं पाहिजे. एवढी तरी इच्छा व्हायला पाहिजे. जिज्ञासा अगोदर पाहिजे. जिज्ञासेनंतर मग प्रयत्न. ज्ञानाची इच्छा पाहिजे ती ज्ञानाची इच्छाच उत्पन्न व्हायलाच किती काळ जातो. ज्ञान ही पहिली भूमिका आहे असं वसिष्ठ सांगतात. तर अशा मानवामध्ये एखादाच या मार्गाचा अधिकारी होतो. योग्यता असली तरी प्रत्यक्ष कार्य करायला सुरवात करणं, साधन मार्गाचा प्रत्यक्ष अभ्यास करणं, अतिशय कठीण आहे. कारण रागद्वेषादिक विकार आपल्या मनात उत्पन्न होतात, काही आपल्याला अनुकूल होणारे विषय आहेत, हे मला पाहिजे आहे, हे प्रतिकूल आहे हे मला नकोय असे वाटते. हा मनुष्य चांगला आहे, हा आपल्याला भेटावा. तो चांगला नाही तो भेटू नये, तो प्रतिकूल आहे, शत्रू आहे, त्याची मैत्री नको. हे जे रागद्वेष विकार मनामध्ये उत्पन्न होतात, हे ज्या मनुष्याने जिंकले आहेत, दैवी संपत्ती त्याने आपली वाढवलेली आहे. दैवी संपत्तीने हे सगळे विकार नाहीसे होतात. भगवत् गीतेच्या सोळाव्या अध्यायामध्ये भगवंतांनी दैवी संपत्तीचे वर्णन केले आहे.

असा जो असेल, मानव जन्म आला असतानासुध्दा ही दैवी संपत्ती प्राप्त करून घेऊन सगळे विकार मनातले ज्याने जिंकलेले आहेत, त्यालाच मोक्ष मिळतो म्हणतात. आपल्या मनातले सगळे विकार नाहीसे व्हावेत, दैवी संपत्ती ज्याला म्हणतात, असे सद्गुण जास्ती जास्ती वाढावेत त्याकरता प्रयत्नशील राहाणारा

जो आहे, खरा मोक्षाधिकारी, त्याच्याकरता भगवंतांचा अवतार आहे. सर्व सामान्य लोकांकरता नाहीये. श्रेष्ठ पुरूष जो आहे, वरच्या वरच्या भूमिकेवर तो जाऊ शकतो, निघाला आहे. जाणार आहे त्याला जर काही अडचण आली, तो जर खाली कोसळून पडला तर केवढा अनर्थ होईल. इतक्या भूमिकेपर्यंत गेलेला आणि तो पुन्हा भ्रष्ट झाला. त्याची सुधारणा करायची आहे. अर्जुनाला सुधारण्याकरिता गीता सांगितली, त्याच्या द्वाराने सगळ्यांनाच तो ज्ञानोपदेश झाला. अर्जुन हा मोठा होता ना. 'अर्जुन तू परिससी परिसूनीया अनुष्ठिसी ' म्हणतात ' नुसतं एकून घेणारा नाहीस प्रत्यक्ष त्याप्रमाणे आचरण करणारा तू आहेस म्हणून मला सांगावेसे वाटते. '

तेव्हा आचार्य महाराजांनी तेवढ्यासाठी सांगितले की श्रेष्ठ पुरूष जे आहेत त्यांनी धर्माचं ज्ञान करून घ्यावं आणि जर अनुष्ठान जर केलं तर धर्माचा प्रसार होतो, नाही तर होत नाही. इतर सामान्य लोक ज्ञान करून घेण्यालाही असमर्थ आहेत. एकून घेतलं तरी त्यातलं रहस्य कळलं पाहिजे नां ! म्हणून त्यानी अर्जुनाला लढाई करण्याचा उपदेश केला. नाही तर त्यांना काय? असे शेकडो अर्जुन त्यांनी निर्माण केले असते. हा गेला तर गेला. नाही, उपेक्षा केली. तो खरा भक्त होता, दैवी संपत्ती घेऊन जन्माला आलेला होता. त्याचा जन्म वाया जाऊ नये, त्याची सुधारणा केली की बाकीच्यांची सुधारणा आपोआप होते. अनुयायी मिळायला वेळ लागत नाही. श्रेष्ठ नेता होण्यालाच वेळ लागतो. अनुयायी आपोआप जमतात. अनुयायांची काळजी करायचे कारण नाही. अनुयायांची काळजी करणारा खरा नेता होऊ शकत नाही. ती शक्ती त्याच्याजवळ येत नाही.

म्हणून ' तदर्थम् संभवत्यजः 'महाराजांनी मुद्दाम सांगितलं आहे. त्याकरता भगवान अवतार घेताहेत कारण तो ज्ञानी महात्मा भगवंताचा अत्यंत मोठा भक्त असतो. भगवान त्याला अतिशय

प्रिय आहेत आणि भगवंतांनाही तो प्रिय आहे ज्ञानी तू आत्मेवम'
म्हणून भगवान म्हणतात. म्हणून त्यांच्या संरक्षणाकरिता भगवान्
अवतार घेताहेत. मुख्य हेतू हा आहे, ' परित्राणाय साधूनाम् '
साधू, जेष्ठ ज्ञानी महात्मे त्यांचं संरक्षण करायचं.

तेव्हा अशा रितीने अनेक अवतार झाले म्हणते शेवटी-

दारूणेऽस्मिन्कलौ प्राप्ते ज्ञात्वा स्वांशांशजोतयः ।
दयोना इत्याविरासीद्दत्तस्तु भगवान्स्वयम् ।।

या कलीयुगामध्ये कलीचा प्रभाव मोठा आहे. बुध्दीला मोह पाडणारे कलीयुग आहे. ईश्वराचा प्रभाव तोही मोठा आहे. त्याची नाम शक्ती केवढी मोठी आहे! इतकी की पापच मनुष्य करू शकत नाही, म्हणे! इतकं नामाच महात्म्य वर्णन केलं आहे. तसे या कलीचंही माहात्म्य पुष्कळ आहे. ब्रह्मदेवाने अधिकारच त्याला दिलेला आहे. ' जा, ' म्हणाले. तो आलेला आहे. त्या कलीच्या प्रभावामुळे आणखी बुध्दीला मोह उत्पन्न होतो आहे. धर्म भ्रष्ट होतो, साधनं भ्रष्ट होताहेत. सगळी अशा प्रकारची स्थिती होती. मग नेमलेल्या इतर देवताहि पुष्कळ आहेत. ईश्वराच्या सृष्टीमध्ये अधिकारी जीवही पुष्कळ आहेत. सूर्य आहे, चंद्र आहे, वरूण आहे. हेही मोठे पुण्यशील जीवात्मे, ईश्वराच्या सृष्टीमध्ये आणखी अधिकारी जीव म्हणून नियुक्त झालेले आहेत. त्यांना नाही कंटाळा येत. ' काय बुवा, किती या लोकांना सांगायचं, किती करायचं, ऐकत नाहीत, जाऊं देआपल्याला जरूर नाही. ' कंटाळून जातात का ते ? मग भगवान दत्तात्रेय म्हणाले, आपणच जायला पाहिजे. आपणचपुढे होऊन कार्याला लागलो म्हणजे हे येतील आपोआप. ' म्हणून गोपालकृष्णांनी अवतार घेतला. इंद्र रागावला. पाऊस पाडला. गोपालांचा नाश करण्याचा प्रयत्न केला. मग भगवंतांनी गोवर्धन पर्वत उचलून धरला. त्यांच संरक्षण केलं, नंतर इंद्राला पश्चाताप झाला ही कथा आहेच.

तसे हे झाले तरी जीवच आहे. पुण्यात्मे आहेत. अनेक यज्ञयागादि कर्म करून ईश्वराच्या सृष्टीमध्ये अधिकारी झालेले आहेत. तरीसुध्दा ते सामान्य जीवत्मे आहेत. ज्यांना काहीतरी मार्गदर्शनाची अपेक्षा आहे. आणि स्वतःजवळ शक्ती नाही. मनाचा, इंद्रियांचा निग्रह नाही. त्यांना सहाय्य करताना कंटाळून जाऊन चालत नाही. कर्तृत्व खरं नाही. खरा कर्मयोग म्हणजे कंटाळा नाही. आणखी ती दया खरीच असती. म्हणून भगवान दत्तात्रेयांनी पुन्हा श्रीपादवल्लभ म्हणून अवतार धारण केला. आणि पुन्हा नरसिंह सरस्वती असे दोन अवतार धारण केले.

हे ईश्वरावतार कशावरून आहेत, याचा चरित्रामध्ये उल्लेख केलेला आहे.

ओंकारोच्चारणं जात-मात्रेण नयनं तथा
स्वर्णतामयसोऽभ्यासमृतेपि ब्रह्मपाठनम् ।।

गुरूचरित्रामध्ये झालेल्या लीलांचा मुद्दाम त्यात उल्लेख केलेला आहे. जन्माला आल्याबरोबर ओंकार उच्चार करणं. प्रणवाची काय शक्ती आहे, काय सामर्थ्य आहे कोणाला माहितही नाहीये. हा बालक प्रणवाचा उच्चार करीतच जन्माला आलेला आहे. हे ईश्वराशिवाय कधीही शक्य नाही. अज्ञानामध्ये सापडला असल्याने तो रडायलाच लागतो ना ! लोखंडाचं सोनं करणं, शुष्क काष्ठाला पुन्हा पल्लव आणणं, अत्यंत मंद बुध्दीच्या- ज्याला जन्माला आल्यापासून काही ज्ञान नाही त्याला- पूर्ण ज्ञानी करणं, अशी अनेक चरित्रं आहेत की जी पाहिल्यानंतर, हे साक्षात दत्तात्रेयांचा अवतार आहेत, हे मानल्याशिवाय त्याला काही उत्तर मिळू शकत नाही. म्हणून अशा सगळ्या मुख्य मुख्य कथा त्यांनी सांगितल्या आहेत.

तेव्हा असे भगवान् दत्तात्रेयांचे अनेक गुण आहेत. तेच

भगवान् त्यांच चरित्र श्रवण करताना, आपल्या श्रोत्रेंद्रियातून प्रवेश करून आपल्या हृदयातलं सगळं पाप दूर करतात. अतःकरण शुध्द करण्याचं कार्य करतात. हा भगवान् सामान्य लोकांना दिसत नाही म्हणतात.

अयं हि ब्रह्मभूयाप्ति-सत्पथो नाक्षिगोचरः
मोहांधानामसत्संग-विवेकानां कुसंपदाम् ।।

तेव्हा भगवान् दत्तात्रेयांची कृपा संपादन करणं, त्याच्या चरित्राचं श्रवण करणं, चिंतन करणं, हा मार्ग जो आहे, हा मोक्षमार्ग आहे म्हणाले, सामान्य लोकांना. माया मोहामध्ये सांपडलेले ज्यांना सत्संग नाही, विवेक नाही, दैवी संपत्ती नाही अशा लोकांना हा मार्ग सापडत नाही. म्हणून आता प्रत्यक्ष चरित्राला सुरूवात करीत असताना, एका नामधारक भक्ताची स्थिती कशी झाली, त्याच्यावर भगवंतांची कृपा कशी झाली हे सांगताहेत.

आपलं स्वधर्माश्रमाचे आचरण करून राहणारा, गुरूदेवतांची भक्ती करणारा, त्यालाच या ठिकाणी ' भुक्ति ' आणि 'मुक्ति ' प्राप्त होते आहे. असं सगळं समजून घेऊन, एक नामधारक नावाचा भक्त, भीमा अमरजा संगमावरती भगवान् नरसिंह सरस्वती महाराज राहाताहेत, त्यांचं दर्शन व्हावं, त्यांची कृपा व्हावी अशा उद्देशानं, अत्यंत तळमळीनं त्यांची स्तुती करीत त्यांना शरण जाण्यासाठी निघालेला आहे. पुष्कळ त्यानं स्तुती केलेली आहे. त्याची तळमळ किती आहे ती दाखिवली आहे.

सर्वज्ञ मां न जानीषे विश्वसाक्षिन्न चेक्षसे ।
विलापो न श्रुतो विष्णो मम श्रुत्वाप्युपेक्षसे ।।.

आपण सर्वज्ञ आहात देवा. मी आपल्याला ओळखत नाही. ' मला कळलं नाही, तुला दुःख झालं, ' हे तुम्ही म्हणू शकत नाही. आपण सर्वज्ञ आहात, आपल्याला कळलं नाही

असं कसं होईल ? आपण सर्वसाक्षी आहात. सर्वसाक्षीला कोणी दिसला नाही असं म्हणता येईल काय ? 'विष्णू ' म्हणजे सर्व व्यापक आपण आहात. माझं दुःख आपल्या कानापर्यंत आलं नाही असं कसं म्हणता येईल ? ऐकायला आलं तरी मी उपेक्षा केली आहे, हे कसं शक्य आहे ? सगळं ऐकलेलं आहे. माझं दुःख आपण ऐकलं आहे, सर्व साक्षी आपण आहात. सर्वव्यापी आहात. दयाळू आहात. आपण उपेक्षा करणं बरं नाही, अशी पुष्कळ प्रार्थना केली.

'सेवा केली नाही म्हणुन काही देत नाही' हे तुमच्या सारख्या दात्याने म्हणून काही उपयोग नाही. सेवा केली नाही म्हणून काही मिळायचं नाही, असं खरा जो दाता आहे तो कधी म्हणणार नाही. आपण पर्जन्याप्रमाणे आहात. आचार्य महाराज म्हणतात,' ईश्वर हा पर्जन्याप्रमाणे असतो म्हणजे तो समदृष्टीचा असतो. मी काहीही साधन करू शकत नाहीये. किंवा झालेल्या अनेक पातकांचा नाश कर्माने होणार नाहीये. कर्मयोगावरती अविश्वास दाखवायचा असा त्याचा अर्थ नाही. पण अनंत पातकं आहेत. त्यांचं क्षालनही होणार नाही. त्या करता मी आपल्याला शरण आलेलो आहे.

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।।

ही आपली उक्ती आहे. म्हणून लवकर आपण मला दर्शन द्या. ध्यायस्थ आहे. तन्मय झालेला आहे. प्राण राहातात किंवा नाही अशी अवस्था झालेली असताना त्याच अवस्थेमध्ये त्याला थोडी ग्लानी आली आणि स्वप्नामध्ये महाराजांचं दर्शन झालं.

स्वप्नदृष्टान्त होण्याला सुध्दा आणखी किती काळ लागतो आहे. आनंद झालेला आहे. सावध होऊन तो उठला आणि निघालेला आहे. कोण, कोणाचं दर्शन आपल्याला झालं ? पाहू

या. आणि स्वप्नामध्ये ज्यांचं दर्शन त्याला झालं होतं तशाच प्रकारच्या योगी पुरूषाचं दर्शन त्याला जागृतावस्थेत झालं. अभिवादन केलेलं आहे. आनंदाश्रु नेत्रातून वाहाताहेत. आणि गद्गद् वाणीने तो म्हणतो आहे-

माता पितोपदेष्टा भी-हर्ता भर्तापि मे भवान् ।
क्वायातोस्ति कुतो गन्ता दिष्ट्या मेद्याक्षिगोचरः ।।

सर्व संबंध आणखी त्या सद्गुरूच्या ठिकाणी जोडले गेले पाहिजेत.' त्वं नो माता त्वं पिताप्तोधिवस्त्वं '........ या स्तोत्रामध्ये महाराजांनी जे सांगितलं आहे, त्या प्रमाणे माता, पिता, संरक्षक सगळेच आपण आहात. ' कुठून आलात महाराज आपण ? आपलं दर्शन मला झालेलं आहे. मी आणखी या संसारामध्ये सापडलेलो आहे. माझा उध्दार आपण करा. ' अशी प्रार्थना त्यांने केली. शोक दूर झाला. ' शांती नाही मला, ती शांती मिळेल अशी कृपा करा ' अशी प्रार्थना त्याने केल्या नंतर त्या योगी पुरूषांनी आपला परिचय करून दिलेला आहे......

योगिध्येयस्त्रिमूर्त्यात्मा यभ्दक्ता भुक्तिमुक्तिगाः ।
योस्ति भीमातटेद्मसौ तच्छिष्यः सिध्दो धराचरः ।।

त्या त्रिशति काव्यामध्ये आणखी एका रूपाने परिचय करून दिलेला आहे. ' भगवान् दत्तात्रेयांचा मी शिष्य आहे, ' असं त्यांनी सांगितलं. सद्गुरू दत्तात्रेयांची, नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांची, पूर्ण कृपा ज्याच्यावर झालेली आहे तो शिष्य, भक्त कसा असतो हे त्यामध्ये व्यक्त केलेलं आहे. महाराजांचच ते आहे त्रिशती काव्य. आणि या गुरूचरित्राचं महात्म्यही त्यात दाखवलेलं आहे.

गुयोश्चरित्रामृतशान्ततर्षः सिध्दोयमीशेक्षणजातहर्षः
भूपृष्ठचारी विधिलब्धतोषः सदा गुरोरस्य च संनिकर्षः ।।

सिध्द आपला परिचय करून देताहेत नामधारकाला. 'सद्गुरुंच चरित्र जे आहे हेच अमृत आहे. हे अमृत मला मिळाल्यामुळे आणि त्याचाच आस्वाद मी घेत असल्यामुळे, माझ्या सगळ्या वासना, सगळ्या इच्छा शांत झालेल्या आहेत. ' स्थितप्रज्ञ अवस्था सद्गुरूंच्या चरित्रामुळे प्राप्त होती. ' सिध्द' म्हणून नावं सांगितले. ' मी कृतकृत्य आहे, मला आता काही करायचं नाहीये. सद्गुरूंच्या चरित्र रूपी अमृताचा आस्वाद घेण्यामध्ये, मी नित्य निमग्न असल्यामुळे, ईश्वराचा साक्षात्कार मला झालेला आहे. त्यामुळे परमानंद आहे. सगळी दुःख गेली माझी. '' कुठे राहाता ? '' भूपृष्ठधारी-हे विश्वची माझे घर. ' ' काय तुमची योगक्षेमाची व्यवस्था काय ? -' ' विधीलब्ध तोषः-. जे काही विधीने मिळेल मला त्याच्यामध्ये मला आनंद आहे. चांगलं अन्न मिळो, वाईट अन्न मिळो, मानाने मिळो अपमानाने मिळो, संतोष माझा कधी बिघडत नाही. आणि सर्वात जास्ती फायदा म्हणजे भगवान् सद्गुरू महाराज नेहमी माझ्याजवळ आहेत. '

तर सद्गुरूंच्या चरित्र पठणाचं हे फल सिध्दांनी आपला परिचय करून देतांना सांगितलं आहे. तो भीमातीर निवासी भगवान् नरसिंह सरस्वती प्रभु त्यांचा मी शिष्य आहे, म्हणाले. असाच फिरत असतो.

नामधारकाने सांगितले, 'तुम्ही जे सद्गुरू सांगितलेत तेच आमचे कुलदैवत आहे. आमच्या कुलामध्ये त्यांचीच भक्ती चालू आहे. मी त्यांची भक्ती श्रध्देनं करत असतो. मग मला दुःख का ? माझी दुःख का शिल्लक राहिली ?' असं त्याने विचारले. भगवान् नरसिंह सरस्वती प्रभू त्रिमूर्तीस्वरुप आहे, म्हणाले. 'उत्पत्ती, स्थिती, संहार या तीनही शक्ती त्यांच्या जवळ आहेत. बाकी

सगळे जरी जीव रागावले तरी ' अयम् प्रभुः ' हा समर्थ आहे. सर्वांचा कोप दूर करणारा आहे. त्रिमूर्तीस्वरुप दत्तात्रेय भगवान् नरसिंह सरस्वती त्यांची अशी शक्ती आहे, बाबा. सामान्य व्यवहारातले, लौकिक गुरू जरी असले तरी त्यांचे एवढे सामर्थ्य आहे. आपल्या शिष्याचे ते पूर्ण कल्याण करू शकतात. तुझ्यावर कृपा झाली नाही ती तुझ्या अपराधांमुळे, एवढा विचार कर. तु काही त्यांना बरोबर वाटत नाहीस असं वाटतं. त्रिमूर्तीस्वरुप जे सद्गुरू आहेत त्यांनी ज्याला टाकून दिलेलं आहे, त्याचं संरक्षण कोण करणार आहे, असा संशय तुझ्या अंतःकरणात आहे. अश्रध्दा आहे. गुरुचं चरित्र तू ऐकलेलं नाहीस. त्यामुळे हे संशयादि विकार तुझ्या चित्तामध्ये आहे. ' हे सांगितल्यावर,' लौकिक सद्गुरु सुध्दा श्रेष्ठ आहेत. मग मूर्तीत्रयस्वरुप सद्गुरुंचं सामर्थ्य काय आहे, त्याचे काय वर्णन करायचं,' म्हणाले. नामधारकाने सिध्दाला विनवले की या बद्दल एखादी कथा तुम्ही सांगा, ज्यामुळे सद्गुरुंचं महात्म्य मला कळून येईल. त्यावेळेला सिध्दांनी क्रमाक्रमाने सृष्टी रचना वगैरे कशी झाली हे सांगितलेलं आहे.

योगनिद्रित भगबान् होते. ' योग ' शब्दाचा अर्थ महाराजांनी असा केला आहे की प्रलयाच्या वेळेला सृष्टी कार्य करण्याकरता म्हणून कर्मामध्ये शक्ती निर्माण केली आहे. जीवात्म्याकडून जे जे कर्म झालेले आहे-पाप पुण्यात्मक- ते कर्म फल दिल्याशिवाय नाहीसे होत नाही. आपण समजतो,' आपण करुन गेलो, संपलं ते कर्म, आता आपल्याला कोण विचारणार आहे.' नाही संपत नाहीये. तर कर्मामध्ये शक्ती आहे. सारखं आणखी जन्म येणं, त्या जन्मामध्येसुध्दा पापपुण्यात्मक कर्माचा फल म्हणून सुख दुःखात्मक अनुभव घेणं, अशी ही कार्यशक्ती सतत कार्यान्वित आहे. त्यामुळे सृष्टी चालू आहे.

प्रलयाच्या बेळेला ही शक्ती बंद झाली. स्थगित झाली. त्यामुळे सृष्टी संपली. त्यावेळेस ही जी कर्म झालेली आहेत, ही कुठं राहतात, कोणी याची नोंद ठेवली, नोंद करायला किती कागद लागेल ! एवढं लिहून ठेवणं शक्य आहे? एका माणसाची

एका जन्मातलीच कितीतरी कर्म होतील. रोज मानसिक कर्म आहेत, वाचिक कर्म आहेत, कायिक कर्म आहेत. रोज मानसिक वृत्ती इतक्या निरनिराळ्या उत्पन्न होताहेत की त्यांचा उल्लेख करणं कितीतरी कठीण आहे.

तर ह्या सर्व कर्मांच्या वासना संस्कार रुपाने मनामध्ये आहेत. क्रिया होऊन गेल्या. पण त्या क्रियांचे संस्कार मनावरती आहेत. कोण मनुष्य ऑफिस मध्ये वेळेवर येतो आहे, चांगलं काम करतो आहे, रोजचं काम करुन जातो आहे. त्याचे सगळे संस्कार वरच्या अधिकाऱ्याकडे जमा आहेत. त्या संस्कारांच्या शक्तीमुळे त्या माणसाची, त्याचा अधिकारी बढती करु शकतो. कर्म शक्ती मानली की ईश्वर शक्ती मानावीच लागते. कर्म अचेतन आहे. कर्म संस्कार रुपाने मनामध्ये राहिल. परंतु कोणचं कर्म, कोणच्या वेळेला फलान्मुख होईल, हे सगळं ज्ञान पाहिजे ना ! त्याप्रमाणे, त्याला त्याच्या कर्माप्रमाणे कोणच्या जन्मात घालायचे, सगळा विचार करुन विचारपूर्वक सगळं कार्य चाललय. तर सर्व प्राण्यांच्या वासना आहेत, संस्कार सगळे ते मनामध्ये आहेत. मन अत्यंत सूक्ष्म आहे म्हणतात पण त्याच्यामध्ये या सगळ्या वासना आहेत. प्रत्यक्ष वासना प्रगट झाल्या, कर्माचं फल मिळायला लागलं, शरीर उत्पन्न झालं. सगळी कार्य बंद झाली. फक्त मन तेवढं आहे, सूक्ष्म शरीर ज्याला म्हणतो आपण - त्यातलं मनचं मुख्य आहे. त्यामनाचा योग ईश्वरस्वरुपाशी झाला त्यालाच निद्रा असे म्हणतात. सगळ्या स्थूल रुपाचा, व्यक्त रुपाचा संहार झाला, पण सूक्ष्म रुपाने सर्व संस्कार घेऊन मन शिल्लक राहीले. ती योगनिद्रा सर्व संहार रुप झाली आहे.

पुढे तो संहारकाल संपला. कालही कारण आहे आणि संस्कार रुपाने दिसणारी सर्व कर्मही कारण आहेत. सर्व सृष्टीची सगळी कारण सामुग्री आहे ईश्वराजवळ. त्यामुळे संकल्प फक्त झाला आणि सगळी सृष्टी निर्माण झाली.

प्रथमतः ब्रह्मदेवांना निर्माण केल. तेही असेच आनंदामध्ये समाधि कालात निमग्न आहेत. ब्रह्मदेवांच्या रात्रीच्या वेळेला

त्रैलोक्याचा प्रलय होतो. नैमित्तिक प्रलय. पण त्यांना त्या निद्रेतून जागृत केलं, आणखी त्यांच्या द्वाराने पुढची सगळी सृष्टी भगवंतांनी निर्माण केली. त्यांना अगोदर वेदज्ञान दिले. आणि त्या वेदज्ञानाच्या प्रभावाने सगळी सृष्टीची रचना त्यांनी केली. वर्ण विभाग, आश्रम विभाग वगैरे सगळे त्यांनी निर्माण केले. त्यानंतर प्रत्येक युगाची योजना त्यांनी केली. कालामध्ये त्यांनी विभाग पाडले आहेत. कृतयुगामध्ये ज्ञान वैराग्य म्हणजे निवृत्ती मार्गाला जास्तीत जास्त प्राधान्य आहे. त्याप्रमाणे त्रेतायुगामध्ये यज्ञ यागाला प्राधान्य आहे. द्वापार युगामध्ये पाप-पुण्य सम झालेले आहेत. द्वंद प्राधान्य त्याला आहेत. कलीयुगामध्ये तर केवल विषय वासना!अर्थ आणि काम या दोनच पुरुषार्थाला प्राधान्य आहे. या प्रत्येकाचा काल मात्र ब्रम्हदेवांनी ठरवून दिलेला आहे. तो किती ते महाराजांनी सांगितलं आहे. १७,२८,००० वर्षे हा कृत युगाचा काल आहे. त्यानंतर १२,९६,००० वर्षे हा त्रेता युगाचा काल आहे. आणि ८,६४,००० वर्षे द्वापार युगाचा काल आहे. आणि कलियुगाचा ४,३२,००० वर्षे काल आहे. त्यापैकी आता ५००० वर्षे झालेली आहेत म्हणतात. एवढा काल जायला किती जन्म घ्यायला लागतील, ते कोणत्या प्रांतात होतील काही सांगता येत नाही.

तर असे सगळे युग भेद त्यांनी केले. त्या प्रत्येक युगाचा प्रवर्तक जो आहे,त्याला त्या युगामध्ये भूलोकावरती पाठवला आहे. कलीची पाळी आली. तो ब्रह्मदेवांना म्हणाला,'मला तुम्ही भूलोकावरती पाठवू नका, मला भिती वाटते. धार्मिक लोक आहेत, सद्वासना, दैवी संपत्ती असणारे लोक आहेत. माझा स्वभाव याच्या विरूध्द आहे. परस्त्री हरण करणारा माझा मी बंधू समजतो. कामक्रोधादिक षड्विकारांची आपल्या मनामध्ये वाढ करणारा मला अत्यंत प्रिय असतो. आपला धर्म सोडून वाटेल तसे वागणारे माझे आत्मीय आहेत. अशा भूलोकावरती गुरूंची, देवांची, पितरांची पूजा चालू आहे तिथे मी जाऊ कसा ?'कलीलाहि प्रश्न पडला.

ब्रह्मदेवांनी सांगितलं,' तुझा काल आलेला आहे. बाकीच्या

सगळ्या युगांचे काल संपलेले आहेत, तू आता जा. त्यांनीच नेमणूक केलेली आहे ना. असुरी संपत्ती बरोबर घेऊन जा, तिचा विस्तार झाला म्हणजे जास्ती वाव तुला मिळेल परंतु सद्‌गुरूंची, ईश्वराची, विप्रांची सेवा करणारा धर्मशील जो महात्मा आहे, त्याला तुझा काहीही दोष लागणार नाही. जास्तीत जास्त गुरूभक्ती ज्याला मिळालेली आहे पूर्वसुकृताने, त्याला तू काहीही करू शकणार नाहीस. तो अलिप्त अशा प्रकारचा आहे.'

कलीने विचारले,' सर्वांपेक्षा श्रेष्ठ अशा गुरूचे महात्म्य, आपण जे आता सांगितलत, यांचं कारण काय आहे ?' ब्रह्मदेव म्हणाले,' सद्‌गुरू म्हणजे मार्गदर्शक आहेत. योगाभ्यास हे प्रयोगशास्त्र आहे. तिथे आपल्या बुध्दीने, वाटेल तो अभ्यास करून चालत नाहीये. योगी पुरूषांच्या सान्निध्यातच प्राणायामाचा अभ्यास करावा, एरवी पुस्तके वाचून प्रणायाम करता येत नाही. कुठल्यातरी नाडीत चुकून प्राणवायू शिरून बसला म्हणजे वेड लागायची पाळी. आयुष्य सबंध फुकट गेलं. तर ते ज्ञान मिळवण्याकरता सद्‌गुरूंची अत्यंत जरूरी आहे, साधकाची योग्यता आणि सद्‌गुरूंची कृपादृष्टी यामुळे ज्ञान प्राप्त होते. म्हणून सद्‌गुरू श्रेष्ठ आहे.'

देव जरी झाले तरीसुध्दा त्यांनी गुरूभक्ती केली, म्हणाले. बृहस्पतींची सेवा केली इंद्रादिक देवांनी. अश्विनीकुमारांनी दधीचीची सेवा केली. यातून काही काही मार्ग त्यांनी मिळवलेले आहेत. म्हणजे देवांनीसुध्दा गुरूभक्ती करून आपली इष्टसिध्दी करून घेतली आहे. म्हणून देवापेक्षाही सद्‌गुरू श्रेष्ठ आहे. हे पटवण्याकरता म्हणून ब्रह्मदेव एक कथा कलीला सांगताहेत.

गोदावरीच्या तीरावरती वेदधर्मा ऋषींचा आश्रम होता. सगळे ऋषी तपस्वी होते.' तप ' याचा अर्थ समाधी स्थिती. समाधीमध्ये जितका काल राहाता येईल तितकं रहायचं. कश्यप ऋषींना पुष्कळ स्त्रिया होत्या पण ते एकदा नदी तीरावर जाऊन समाधी लावून बसले म्हणजे केव्हा सावध होतील कोणाला ठाऊक ! अन्न नाही, पाणी नाही. मग कुठल्यातरी स्त्रीच्या आश्रमात जायचं, तिच्या योगक्षेमाची चौकशी करायची. बलिराजा झाला.

त्याने सर्व राज्य घेतलं. सर्व देवांना निर्वासित केलं, यांना काही कल्पना देखिल नाही. तसे हे वेदधर्मा मुनी मोठे ज्ञानी महात्मे, श्रेष्ठ योगी पुरूष होते. त्यांची पुष्कळ शिष्य मंडळी होती. अनेक गायी असायच्या. सात्वक आहार असल्यामुळे चित्त शुध्दी असायची. सत्संगती असायची. सर्व शिष्य मंडळींच्या समोर एकदा ते वेदधर्मा ऋषी म्हणू लागले.

' पुष्कळ माझं संचित कर्म होतं. पुष्कळ तपश्चर्या करून, ते संपत संपत आलेलं आहे. त्याच्यापैकी काहीच प्रारब्ध रूपाने पर्यावसन झालेलं आहे. संचित कर्माचा क्षय करता येतो. जे संचित कर्म प्रारब्धरूप बनलेलं आहे की ज्याने फल द्यायला सुरवात केली ते मात्र भोगावेच लागते.तेव्हा काही माझं प्रारब्ध कर्म शिल्लक राहिलेलं आहे. आणि ते मला व्याधीरूपाने भोगलं पाहिजे. अनेक आधीव्याधी मला उत्पन्न होतील. तेव्हा तुमच्या पैकी माझ्याजवळ राहून सेवा करणारा, संरक्षण करणारा कोण आहे ? '

शिष्य मंडळी म्हणाली,' सगळेच आम्ही आहोत.'

वेदधर्मा म्हणाले,' सगळेच असे नाही. काय काय व्याधी होणार आहेत सांगता येणार नाही. नुसतं रक्षण करायचं नाहीये. सगळ्या शरीरातून गलत्कुष्ठ वाहू लागेल. माशा बसणार अंगावरती. ते धुवून काढायचं. भिक्षा मागून मला अन्न आणून द्यायचं. एवढी सेवा कोण करणार आहे ? 'अजून प्रारब्ध भोगाला सुरवात होणार होती. चांगल्या स्थितीमध्ये असताना हे सांगितले.

सगळे स्तब्ध बसले. भीती आहे. होय म्हणणही कठीण आहे. सेवा झाली पाहिजे. नाहीतर शाप मिळायचा. म्हणून सगळी मंडळी स्वस्थ बसलेली असताना एक दीपक नावाचा शिष्य पुढे आला. त्याचे अनेक जन्मांचे पुण्य उदयाला आले होते.

ज्ञानेश्वर महाराजांनी वर्णन केलेलं आहे ना ! गुरू शब्दाची व्याख्या करताना मातापिता हेच गुरू आहेत. दुसरे म्हणजे-

संसार ऐसा दारूण।जो भेटताची करी हरि शीण सकरूण ।

तर संसाररूपी जो रोग आहे तो कायमचा दूर करणारे जे सद्गुरू आहेत त्यांची सेवा घडली पाहिजे. तशी बुध्दी दीपकाला उत्पन्न झाली. निश्चय झाला. आणि ते ज्या अवस्थेत आहेत त्या अवस्थेत सेवा करायची. हा निश्चय होणं फार कठीण आहे.

त्याने सांगितलं,' महाराज हा दोष शिल्लक ठेवू नका, घालवून टाका नाहीतर मोक्षाला विघ्न निर्माण होईल. तुमचं सगळं पाप मला द्या. मी ते भोगतो. गलत्कुष्ठरोग व्हायचा, अन्नपाणी काही गोड लागायचं नाही, सगळ्या शरीराला वेदना व्हायच्या वगैरे सगळं मी भोगतो. तुम्ही त्यातून मुक्त व्हा.'

वेदधर्मा ऋषी म्हणाले,' नाही, तसं करता येणार नाही.' तशी जर सोय असती तर पहायलाच नको. पण कोणत्यातरी धर्मात आहे म्हणतात. अमूक एवढे पैसे दिले की तुमचे पाप गेले. फार चांगली सोय झाली. म्हणजे पुन्हा पाप करायला मोकळे झाले की नाही? ' नाही, बाबा स्वतःच भोगलं पाहिजे. जीव इथे जन्माला येतो पुण्यपाप करून निघून जातो. त्याच्या पुण्यपाप कर्माचा भोग त्याला एकट्याला भोगावा लागतो. हा ईश्वराचा मोठा कायदा आहे. काशीमध्ये जाऊन हा भोग भोगायचा आहे. तुझी शक्ती आणि निश्चय असेल तर कर माझं रक्षण . '

तो म्हणाला,' मी यायला तयार आहे.'

ते दोघे काशीत आलेले आहेत. काशीत प्रवेश केल्याबरोबर वेदधर्माच्या शरीरातून तो रोग गलत्कुष्ठ होऊन वाहायला लागला. भोगून पापक्षय करायचाय. काही त्याला दुसरा उपाय नाही. त्यावेळेला विचार शक्ती मनामध्ये रहात नाही. योग्य अयोग्य काहीही विचार करायची मनाची स्थिती नाहीये. आणि शिष्याला बोलायचं, अपमान करायचा. तो आपलं अंग धुवून काढतोय, पुसून काढतोय. त्यावेळेला सांगायचं, ' अरे इतकी भूक मला लागली असताना भिक्षा आणली नाहीस. जा, भिक्षा घेऊन ये. ' वर तो भिक्षेला निघाला की म्हणायचं, 'हे माझं कोण करणार ? माशा अंगावर बसलेला काढतोस की नाही, कशाला आलास?'

वेळ प्रसंगी त्यांनी मारावं सुध्दा. वर भिक्षा मागून आणल्यावर, 'हे चांगलं नाही, ते तिखट आहे,' वगैरे तक्रार करून ती फेकून द्यायची. चांगलं पक्वान्न घेऊन ये म्हणून सांगायचे. तो बिचारा पुन्हा भिक्षेला निघाला की लगेच म्हणायचे,' इकडे ये माझे अजून कपडे धुतले नाहीस, माझं शरीर पुसलं नाहीस, कशाला आलास इथे सेवा करायचे कबूल करून ? ' मानापमान सारखेच वाटणे ही सिध्दाची अवस्था आहे. पण गुरूची सेवा करणाऱ्या शिष्याने/ साधकानेही त्याचा अभ्यास करायचा आहे. अमानित्व हे पहिले साधन आहे. ज्ञान साधनेमध्ये भगवंतांनी 'अमानित्वम्' हे पहिले साधन सांगितले आहे. ' मान ' ज्याचा गेलेला आहे तो खरा ज्ञानाचा अधिकारी आहे. पहिले मुख्य साधन आहे.

त्याप्रमाणे हा संदीपक गुरूसेवा करणारा खरा भक्त होता. त्याने ते सगळं सहन केलेलं आहे. स्वतःच्या देहाकडेही लक्ष नाही. आपण जेवलो की नाही इकडे लक्षच नाहीये. इतर देवदेवतांकडे लक्ष नाही. सर्वही देवांचे अधिपति आपले सद्‌गुरू महाराज आहेत. सर्व देव इथेच आहेत. 'गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णू.....' हा श्लोक रोज म्हणतो आम्ही. पण नुसतं म्हणणं निराळं. आणि त्याप्रमाणे वागणं निराळं. विश्वेश्वराच्या नगरीत राहूनही कधी तो दर्शनालासुध्दा जात नव्हता. फक्त आपल्या गुरू महाराजांची सेवा करायची. कुठेही मन जायचे नाही. सगळं पुण्य आपल्या गुरूसेवेतचं आहे. आणि ते आपल्याला मिळालेलं आहे. पवित्र झालेलं आहे त्या गुरूभक्तीच्या योगाने. दुसरं काही साधन नाही. हे त्याचं तप पाहून विश्वेश्वरांनासुध्दा आनंद झाला. रागावले नाहीत विश्वेश्वर. ' काशीमध्ये येऊन राहिलाय एकदासुध्दा आमच्या दर्शनाला आला नाही '. असे म्हणाले नाहीत ते. त्यांना उलट आनंद झाला. तो माझ्या दर्शनाला आला नाही, हा काही दोष नाही म्हणाले. तो काही नास्तिकपणाने आला नाही असे नाही. विश्वेश्वराबद्दल आदर आहे, पण विश्वेश्वराचं प्रतिक म्हणजे आपले गुरू महाराज आहेत. शिवलिंगाचे दर्शन म्हणजे विश्वेश्वराचे दर्शन नाहीये. इतका उच्च अधिकारी आहे.

आले विश्वेश्वर आणि सांगितलं, ' दीपका तुझी सेवा फार चांगली चालली आहे. तुला वर देण्यासाठी मी आलेलो आहे. तुला काय हवा तो वर मागून घे. ' दीपक म्हणाला, ' देवा मी माझ्या गुरूमहाराजांना विचारून येतो. ते सांगतिल तो वर मी मागेन, नाहीतर मला काही वर नको. ' आणि गुरूमहाराजांकडे तो आला, ' आपल्यासाठी विश्वेश्वरांना प्रार्थना करू का, त्यांनी कृपा केली तर आपला रोग बरा होईल आपल्या वेदना कमी होतील.'

चांगल्या बुध्दीने म्हणाला तो. गुरूमहाराज म्हणाले,'काय कंटाळा आला काय आमच्या सेवेचा तुला ? भिती वाटली काय आणखीन किती दिवस करायला लागेल याची?' एकवीस दिवसांची सेवेची मुदत ठेवली होती. थोडंथोडकं काम नाहीये. आला बिचारा. विश्वेश्वरांना म्हणाला,'गुरूमहाराजांना काही मागायचं नाही. माझी स्वतःची काही इच्छा नाही. ' खिन्न झाले विश्वेश्वर. मी स्वतः ह्याला वर द्यायला आलो आणि हा नको म्हणतो.

मग त्या मोक्ष मंडपामध्ये सगळे देव जमले होते तिथे त्यांना जाऊन सांगितलं, ' वेदधर्मांचा दीपक नावांचा शिष्य केवढा मोठा गुरूभक्त आहे. मी आपण होऊन त्याला वर द्यायला गेलो असता गुरूंची सेवा सोडून त्याला कांहीच नकोय. ' भगवान श्रीहरींनासुध्दा कौतुक वाटलेलं आहे. जीवात्मे कसे अधिकारी असतात ते पहाण्याकरता देवांना जावं लागतं. विष्णूभगवान् आलेले आहेत. आणि त्याची ती गुरूभक्ती पाहून त्यानी त्याला सांगितलं, ' बाबा मी तुला वर द्यायला आलेला आहे. विश्वेश्वरांना तू नको म्हणालास पण मी येऊन पाहिलं तर तू खरोखरचं वर द्यायला योग्य आहेस. मी काही सामान्य लोकांना वर देत नाही. तपश्चर्या करणारे पुष्कळ आहेत. योगाभ्यास करणारे आहेत. आत्मानात्म विचार करणारी मंडळीही पुष्कळ आहेत. उपास व्रतवैकल्य करतायत. पण त्याने काही माझी प्राप्ती होणार नाही. गुरूभक्त जो आहे, एखाद्या महात्म्याचा सद्विप्राचा शिष्य असेल माझ्याकडे ज्याने आपलं अंतःकरण स्थिर केलं असेल, द्वंद्वातीत

जो झालेला असेल त्याला मी दर्शन देतो. पतिव्रता स्त्री जी असेल तीही माझ्या वराला योग्य आहे. तेव्हा इतके कष्ट तू केलेस, कष्ट करून सद्गुरूची सेवा तू केली त्यामुळे तुझ्यावर आम्ही संतुष्ट झालो आहोत. '

महाविष्णू हे मोठे देव आहेत. दीपकाने सांगितले,

श्रीसद्गुरुर्देवदेवो यतो ज्ञानं ततोमृतम्।
अतोधिकं किमस्माकं भवंति त्वादृशा वशाः ।।

' सदगुरु हेच सर्व देवांचे देव आहेत.' इथे गुरु आणि ईश्वर वेगळे आहेत अशी त्याची भावना आहे असा त्याचा अर्थ नाहीये. गुरुभक्तीचं महात्म्य सांगताना एका स्तोत्रामध्ये महाराजांनी सांगितले आहे-

गुरुदेव हे एक मानूनि भक्ति तयाची
करी त्या करी येई मुक्ति।।
सुयुक्ति अशी ही धरी नित्य चित्ता
त्वरे आदरे तू स्मरे नित्य दत्ता।।

चित्तसद्बोध नक्षत्र माला म्हणून २७ श्लोकांचे स्तोत्र आहे. तर गुरु आणि देव एकच आहे असे मानून भक्ती झाली पाहिजेत. ईश्वराला काही मानायचं नाही, फक्त गुरु श्रेष्ठ आहेत असं म्हटलं म्हणजे भेद बुध्दी आली.

तर याची बुध्दी अशी आहे की सर्वांचा अधिपती तो आहे, सर्व रुप तो आहे, सर्व देणारा तो आहे, मग त्याची भक्ती सोडून दुसऱ्या कोणाची भक्ती कशासाठी करायची, काय वरबीर कशाला मागयचा, असे त्यांना सांगायचं, त्यामुळे विश्वेश्वरांचा किंवा विष्णूंचा अवमान करायचा अशी बुध्दी नाहीये. आता विश्वेश्वरांना तसच जावं लागलं. काही मागितलं नाही. विष्णूंना तसं जाणं बर वाटत नसेल तर दीपक म्हणतो-

गुरावेवाचलां भक्तिं देह्यन्यन्न वृणेन्नध्रुवम् ।।

सद्गुरुंच्याबद्दल स्थिर, दृढ भक्ती माझ्या चित्तामध्ये असावी. म्हणजे इतकी भक्ती करतो आहे तो की ज्या गुरु भक्तीमुळे विश्वेश्वर येताहेत, विष्णू येताहेत तरी सुध्दा आपली भक्ती कमी आहे असे तो समजतोय. हे त्याचे महत्व आहे. आपली भक्ती कमी आहे. वर द्यायचाच असेल तर ही भक्ती दृढ व्हावी, स्थिर व्हावी, वाढावी, असा वर द्या. दुसरं काहीही नको. हा पक्का निश्चय आहे.

नित्यानित्य विवेक पक्का आहे. साधन चतुष्ठ्य संपत्ती करता काहीही स्वतंत्र प्रयत्न करण्याची जरुरी नाहीये. 'हे सगळं अस्थिर आहे,' म्हणाला. मला दुसरं काहीही नकोय. त्यावेळेला विष्णूनी वर दिला त्याला.

श्रध्दाभक्तिः सदा तेस्ति दास्येप्यन्यदयाचितम् ।
दत्ता भुक्तिश्र्च ते मुक्तिः सत्कीर्तिः स्मर्तृतापहृत् ।।

किती वर देऊ, काय वर देऊ असं विष्णूंना झालं. 'तुझ्या अंतःकरणात दया भक्ती आहेच, म्हणाले. आणखी सुध्दा तू जे मागितलं नाहीस तेही देतो. भुक्ती आणि मुक्ती दोन्ही तुला दिली. पुर्ण सुखाचा संसार तुझा होईल.' तो म्हणाला,' मी त्यात आसक्त झालो तर?' महाविष्णू म्हणाले,'नाही, मुक्ती सुध्दा तुला मिळणार आहे.' हेही सांगून ठेवलयं. संसार जरी दिला भगवंतांनी तरी मुक्तीही ते देणार आहेत. त्यामुळे ईश्वराने दिलेल्या संसारात तू आसक्त होणार नाहीस. विवेकही त्यांच्याच कृपेने प्राप्त होतो. 'तुझी सत्कीर्ती होईल. तुझे स्मरणं करणाऱ्याची सगळी दुखः दूर होतील. तुझ्या सारख्या गुरुभक्तालाही कालाचीही भीती नाही. इंद्राला भीती आहे, सूर्याला भीती आहे, अग्निला भीती आहे, सगळ्यांना कालाची भीती आहे. हे सगळे कालाच्या भीतीने

आपापली कार्ये करताहेत. पण त्या गुरुभक्ताला कालाचीही भीती नाही, कालमर्यादेतून तो मुक्त होतो आहे. सगळ्या सिध्दी तुझ्या दासी होतील.' असा आशीर्वाद देऊन भगवान् विष्णू तिथून गुप्त झाले.

दीपक येऊन गुरु महाराजांना वंदन करुन उभा राहिला. गुरु महाराजांनी विचारलं,' काय मागितलंस, बाबा, विष्णूंकडे?' दीपकाने सांगितलं,' असं असं मागितलं. सद्गुरुंवर अचल भक्ति द्या असं मागितलं. ' आनंद झाला वेदधर्म मुनींना, आणखी त्यांनी आपला हस्त स्पर्श केला त्याच्या मस्तकाला. तत्क्षणी सगळं वेदज्ञान, शास्त्रज्ञान त्याला झालेलं आहे. जीवन्मुक्त झालेला आहे.

वेदधर्मा मुनींचा आश्रम गोदावरीच्या तीरावर होता. 'रेवा तीरे तपं कुर्यात्' म्हणतात. त्याप्रमाणे गोदावरी-गौतमीचं महात्म्य त्याच्यापेक्षाही जास्ती आहे.मग असं असताना वेदधर्मा मुनी काशीला का गेले ? काशीचाही काही प्रभाव आहे, म्हणाले. मोक्षपुरी आहे ती. काशीचा प्रभाव सर्वांना कळावा आणि शिष्याचा गुरूभाव किती आहे याची परीक्षा करण्याकरता ते तिथे गेले. दीपक शिष्य खरा आहे काय, ही परिक्षा करायची आहे. परीक्षा झाली की संपलं. जन्म मरण संपलेलं आहे. काही पुढे करावं लागत नाही. म्हणून वेदधर्मा मुनी कुष्ठी झाले. नाहीतर त्यांना कुठलं पाप ?

तेव्हा ब्रह्मदेव सांगताहेत कलीला, ' बाबा अशा पुष्कळ गुरूशिष्यांच्या कथा झालेल्या आहेत. तेव्हा खरा जो गुरूभक्त असेल त्याच्या वाटेला तू जाऊ नकोस. ' मग कली भूमिवर आलेला आहे. तेव्हा सिध्द नामधारकाला म्हणतात, की ' ब्रह्मज्ञान मिळवणारे लौकिक गुरू, यांचा महिमा इतका आहे तर प्रत्यक्ष त्रिमूर्तीस्वरूप भगवान नरसिंह सरस्वतीस्वामी महाराज,त्यांचा महिमा किती असेल ! तुला तो माहित नाही. त्याबद्दल तुला श्रध्दा नाही. तू सात्विक धैर्य धारण कर. दृढ भक्ती जर तुझ्या अतःकरणामध्ये उत्पन्न झाली तर तू आणखी कृतकृत्य होशिल.

संशय धारण करणाऱ्याला आणखी काही फल मिळत नाही. म्हणून श्रध्दाभक्ती हृदयात धारण करून, मोक्ष इच्छेने त्या भगवंताचं तू भजन कर. नरसिंह सरस्वती सद्गुरूरूपाने भगवान् दत्तात्रेय या भूतलावरती आलेले आहेत. त्यांची सेवा तू श्रध्दा भक्तीने केलीस म्हणजे भवाब्धेःपारमेष्यसि. '

' परंतू कोणीतरी त्याच्याबद्दल जिज्ञासा व्यक्त केल्यावाचून त्याचं स्मरण कसं होणार ? तू आज विचारणारा मला भेटलास म्हणून मला आज आनंद झालेला आहे. कलीयुगामध्ये लोकांना हे कळत नाही म्हणाले. भगवंताच्या कथा श्रध्दाभक्तीने श्रवण करणे म्हणजे भवसागर तरून जाण्यासाठी असलेली श्रवणरूपी नौका आहे. तुला ही साधनं चतुष्टयरूपी मोक्ष साधने मिळालेली आहेत. तुझ्या चित्तामध्ये सद्गुरूंच्या कथा श्रवण करण्याबद्दल इच्छा उत्पन्न झालेली आहे. तेव्हा सगळ्याही सद्गुरूंच्या कथा मी तुला सांगतो. '

भीमाअमरजा संगमावरती सिध्दांनी नामधारकाला नेलेलं आहे. आणि सद्गुरूमहाराज ज्या अश्वत्थ वृक्षाखाली बसत होते, त्या वृक्षाखाली बसून भगवंतांचं चरित्र ते सांगताहेत.

मुमुक्षुभेषजं मुक्त-जीवनं विषयीष्टदम् ।
श्रीगुरोश्चरितं वाग्हृद् दूरत्वाद्वच्मि तेल्पकम् ।।

मुमुक्ष जे आहेत, संसारातून मुक्त व्हावं अशी तळमळ ज्यांना उत्पन्न झालेली आहे, त्यांना हे श्रीगुरूंचे चरित्र म्हणजे भेषज आहे म्हणाले. जरी सकाम भक्तांच्या कथा असल्या तरी त्यावरून आणखी सद्गुरूंच्या सामर्थ्याची कल्पना येते. अद्भुत कथा आहेत. लोकांच्यामध्ये जी आपण शक्ती पहातो, त्या शक्तीने अशा प्रकारच्या गोष्टी कधीही घडणं शक्य नाही. अशा कथा ऐकल्यानंतर, आपल्याला जो मोक्ष पाहिजे तो देण्याचे सामर्थ्य सद्गुरूंच्या जवळ असलच पाहिजे, ही भक्ती त्या योगाने उत्पन्न होते. त्यांनासुध्दा या कथा औषधासारख्या आहेत.

मुक्तांचं तर जीवन आहे, म्हणाले. मुक्तांना ज्ञान मिळालेलं आहे. समाधी सुख मिळालेलं आहे, पण ते ज्ञान मिळालं असतानासुध्दा आपल्याला ज्ञान मिळावं म्हणून, पूर्वीसुध्दा ईश्वराची सेवा केली पाहिजे. आणि ज्ञान मिळाल्यानंतर ज्या ईश्वराच्या कृपेने आपण कृतकृत्य झालो, ज्ञानसंपन्न झालो त्या ईश्वराचे स्मरण केलं नाही तर कृतघ्नता दोष येईल. म्हणून मुक्त झाल्यावरही ते भक्ती करतात. आणि त्या सामर्थ्यामुळे अशा भक्तांचं नैसर्गिक प्रेमही ईश्वरावर असतं. सहेतुक भक्ती नसते ती, पराभक्ती असते. आणि संसारी जीवांना तर त्यांची इष्टसिध्दी होते. तुला आता मी सांगणार आहे उपक्रम असं सिध्दाने नामधारकाला सांगितलं.

पूर्वी म्हणाले प्रलयकाल झालेला आहे. शेषशय्येवर श्रीहरि निद्रिस्त असताना त्यांना जगत् निर्माण करावं अशी इच्छा उत्पन्न झाली. ब्रह्मदेवांना त्यांनी सावध केलं. त्यांना सृष्टी करण्याची आज्ञा केलेली आहे. त्या ब्रह्मदेवांनी आपल्या मनःप्रभावाने, मनःसंकल्पाने सप्तऋषी अगोदर निर्माण केले.

तत्रैकोत्रिस्तपस्वीशो यस्याभूभ्दगवान्सुतः ।।

त्या सप्त ऋषींपैकी अत्रिऋषी एक आहेत. भगवान् दत्तात्रेय त्यांचे पुत्र झालेले आहेत. अत्रि महर्षि हे तपोधन होते. तप हाच त्यांचा ‘ अर्थ ’ आहे दुसरं काहीही त्यांना मागायचं नाही. अखंड तप चाललेलं आहे. आणि त्यांची स्त्री ‘पातिव्रत्यविभूषिता आहे. ’ पातिव्रत्य हेच तिचं भूषण आहे म्हणाले. स्त्रीयांच्या भूषणांचे अनेक प्रकार आहेत. केसांची भूषणं, देहावर धारण केली जाणारी भूषणं, त्यातल्या त्यात पातिव्रत्य हे मोठं भूषण आहे. विशेष भूषण आहे. हे भूषण त्या अत्रिमुनींच्या भार्येजवळ होतं. अनुसूया तिचं नाव. अनुसूयेची माता ही ब्रह्मज्ञानी कर्दम ऋषींची पत्नी आणि कपिलांची माता. तीही ब्रह्मज्ञान संपन्न होती. आणि तिची ही कन्या अनुसूया. अनुसूया म्हणजे तिला दुसऱ्याचे अवगुण दिसायचेच नाही कधी. प्रत्येक दोष

असेल तो ती गुण स्वरूप करायची. धर्मराज दुर्योधनाला सुयोधन म्हणायचे, दुर्योधन कधी म्हणायचे नाहीत. दुर्योधनाची दृष्टी वेगळी, धर्मराजाची दृष्टी वेगळी.

आपल्या पातिव्रत्य भूषणाने अनुसूयेची त्रैलोक्यामध्ये कीर्ती पसरलेली होती. धर्मशील आहे. धर्म हेच परमात्म्याचे स्वरूप आहे. तो धर्म जिने आपल्या मनामध्ये धारण केला आहे, धर्मरूपी परमात्म्याचा मनामध्ये आश्रय केल्यामुळे इतर सर्वही देवतांच्या मनामध्ये भीती उत्पन्न झाली. तिच्या तपःप्रभावाने भूमीही मृदू झाली आहे. सूर्य चंद्रसुध्दा शांत झाले आहेत. त्यांच्या किरणांचा कधी ताप व्हायचा नाही. सर्व देवांच्या मनामध्ये सुध्दा भीती उत्पन्न झाली की हीने जर कोणाला वर दिला, तर तो आमच्या वरचढ होऊन, आमचे स्थान हिरावून घेईल. अनुसूयेला तसलं काहीच करायचं नव्हतं. पण इतरांच्या मनात भीती मात्र उत्पन्न झाली.

नारद महर्षि त्रैमूर्तिच्या स्थानामध्ये गेले एकदा. अनुसूयेचे पातिव्रत्य किती मोठं आहे, अतिथी सेवा किती करते आहे, धर्माकरण कसं आहे वगैरे सर्वच त्यांनी त्रिमूर्तींना सांगितलं. आता ब्रह्मदेव, विष्णू आणि शंकरांच्या शक्तीरूप ज्या स्त्रीया होत्या, त्यांना त्या अनुसूयेचं, नारदांनी केलेलं वर्णन काही खपलं नाही. मनामध्ये त्यांच्या असूया उत्पन्न झाली. असूया आहे, अनसूया नाही. हा मोठा धर्म आहे, आत्मगुण म्हणून ज्यांचं वर्णन केलं आहे शास्त्रकारांनी, अनसूया, त्याग आहे, संतोष आहे; वैराग्य आहे असे आत्मगुण आहेत. त्या त्रिमूर्तीच्या पत्नींना आणखी विषाद उत्पन्न झाला, मग त्या पतिव्रता स्त्रीया, आपण मोठ्या पतिव्रता आहोत, आपल्यापेक्षा ही वरचढ पतिव्रता कोण आहे, या विचाराने भीतीग्रस्त झाल्या आहेत. सावित्री, लक्ष्मी आणि पार्वती. मग या तिन्ही देवांनी आपल्या स्त्रीयांचे समाधान करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण समाधान झाले नाही शेवटी अतिथीप्रमाणे त्यांनी वेष धारण केला.

आश्वास्यातिथिवभ्दूत्वा रोषाच्छप्तुं सतीं ययुः ।।

‘ रोषाच्छप्तुसतींययुः ’असाही अर्थ केला आहे महाराजांनी. त्यांनाही रोष आला. राग आला. आपली अवस्था काय होणार आहे ते समजून चुकलेले आहेत. सगळ्या लोकांना दाखवायचं आहे, त्या स्त्रीयांच्या नादाला लागून आपण गेलो, त्या सतीचं सत्व हरण करण्याकरता आणि शेवटी आम्हालाच बालक व्हावं लागलं, हे दाखवायचंय सर्व लोकांना.

किंवा अरोषाः असाही पाठ करायला हरकत नाही. जरी स्त्रीयांच्या आग्रहामुळे त्यांचं समाधान करण्याकरता गेले असले तरी अनुसूयेचं दर्शन आपल्याला होईल. अनुसूया म्हणजे तीर्थ आहेत म्हणतात. पतिव्रता स्त्री ही तीर्थस्वरूप आहे. त्या पतिव्रता स्त्रीचं आपल्याला दर्शन होईल या उद्देशाने आणखी ते आले, असंही महाराजांनी लिहिलेलं आहे.

अत्रि महर्षींच्या आश्रमात हे तिन्ही देव मध्यान्ह काली आलेले आहेत. अनुसूया मातेने त्यांना बसायला आसने दिलेली आहेत. वारा घातला. हातपाय धुतले. अनुसूया माता म्हणाली, ‘आपलं स्वागत असो. आपण आलात बरं झालं. ऋषीमहाराज तपश्चर्येला गेलेले आहेत. काय आपलं कार्य आहे सांगा. ’

त्यांनी सांगितलं......

त ऊचुः साध्वि नो विद्मस्तपःसक्तमना मुनिः ।
कदाऽऽगमिष्यतीत्यतो देहि क्षुधितेभ्योन्नमाश्वलम् ।।

तप शब्दाचे दोन अर्थ केले आहेत महाराजांनी. ‘ तपा आलोचने ’ हा एक अर्थ आहे किंवा ‘ तप संतापे. ’ त्या धातूचे दोन अर्थ आहेत व्याकरण शास्त्राप्रमाणे. शरीराला कष्ट देणं, उपोषण वगैरे करणं, आहार त्याग करून राहाणं, हा एक तप

शब्दाचा अर्थ आहे. आणि आलोचन करणं. ब्रह्मचिंतन करणं. परमात्म्याचे चिंतन करणं. हे एक तप आहे.

मनसेश्वेंद्रियाणांचह्यैहाग्र्यंपरमंतपः
तज्जायःसर्वधर्मेभ्यःसधर्मःपरउच्चते ।।

हे मोठं तप आहे. मन आणि इंद्रियांची एकाग्रता होणं. म्हणजेच मन स्थिर होणं. समाधी अवस्था त्याला म्हणतात. तर त्या परमात्म्याचं चिंतन करणं हे तप त्या अत्रि महर्षींचं चाललेलं आहे. आता ती केव्हां समाधी उतरेल याचा नेम नाहीये.

म्हणून या देवांनी सांगितलं, साध्वी, ऋषींचं तप सध्या चालू आहे. समाधी आहे. त्यांना यायला किती वेळ लागेल याचा काही नेम नाही. आम्हाला भूक लागलेली आहे. लवकर अन्न द्या. ती म्हणाली ' बरय. पात्र मांडलेली आहेत. अन्न वाढलं आणि सांगितलं, या, बसा. ' त्यांनी आता परीक्षा पाहिलेली आहे. ते म्हणाले, ' हे असं अन्न आम्हाला नकोय. तू जर अंगावरचं वस्त्र वगैरे काढून आम्हाला वाढलस, तर आम्ही जेवू, नाहीतर आम्ही परत जाऊ ' आता इथं मोठीच परीक्षा आहे. धर्म संकट आलेलं आहे. परंतु अनुसूयेच्या मनावर काहीही परिणाम झाला नाही. हसली ती.

अत्रि महर्षींचं केवढं तप आहे. त्यांची संगती मला आहे. त्यामुळे मी पवित्र आहे. माझ्या मनात कोणचाच विकार नाही. निर्विकार अंतःकरण झालेलं आहे. हा एक विचार आहे. काम काय करणार आहे ? कामाचा माझा संबंध काय आहे ? वेदात सांगितल्याप्रमाणे एखाद्या ज्ञानी महात्म्याकडून कामक्रोधादिक विकारांनी घडलेली कर्मे जरी दिसली, तरी त्याची वृत्ती अशी असते की कामाचा संबंध मला काय ? आत्मस्वरूपाला कामाचा काही संबंध नाही.देहादिक जड आहे त्यांनाही कामाचा संबंध नाही. त्याला काम काय करणार आहे ? म्हणून केवळ आत्मनिष्ठ बुध्दी आहे. बाह्य रितीने आपल्या पतीच्या तपाचं महत्व जाणणारी

आहे. पतीच्या तपामुळे मला कोणाचाही दोष लागणार नाही. हा तिच्या मनात दृढ विश्वास आहे.

आणि देहात्म विवेक इतका पूर्ण झालेला आहे की देहावरचं वस्त्र काढलं तर मला काय होणार आहे? आपण तर देहापेक्षा वेगळे आहोत, हे ज्ञान पक्क आहे त्या अनुसूया मातेचं. म्हणून यांना यांच्या इच्छेप्रमाणे अन्न द्यायचं तिनं ठरवलं. ' दिले नाही तर? शाप देऊन निघून ज़ातील. हे महात्मे दिसताहेत कोणीतरी. माझ्या आश्रमात येऊन अशी मागणी करणे हे सामान्य माणसाचं काम नाही. ही माझी मुलं आहेत. बालबुध्दीने विचारत आहेत,' असा विचार करुन अंगावरची सर्व वस्त्र वगैरे काढून टाकली आहेत.

तिचं पातिव्रत्य मोठं आहे. पतीच्या तपावर मोठी निष्ठा आहे. आत्मविश्वास आहे. ' मी पवित्र आहे. अलिप्त आहे, मला काही दोष नाही. ' असा तिने विचार केला. ही विवेक ज्ञानाची समृध्दीही आपल्या जवळ बाळगली आहे तिने. हा काही अहंकार नाहीये. पूर्ण विवेक ज्ञान संपन्न होणं, हे यथार्थ पावित्र्य आहे. आत्मस्वरुप कसं आहे हे जाणलेलं आहे. ह्या तिच्या पातिव्रत्याच्या प्रभावाने तिचा संकल्प झाला, वस्त्र टाकल्यावर आणि ते त्रिमूर्ती बालरुप झाले. ' माझ्या मुलासारख बोलताहेत म्हणाली. माझी मुलं आहेत. '

संपूर्ण विश्व उत्पन्न करणारे ब्रह्मदेव आहेत. त्या सर्वही विश्वाचं नियमन करणारे विष्णू आहेत. आणि त्या विश्वाचा संहार करणारे शंकर भगवान् आहेत. पण हे तिघेही बालरुप झाले. लगेच वस्त्र धारण करुन ती आली. प्रसूत झाल्यावर जसे दुग्ध येतं तसं तिच्या स्तनातून दुग्ध वाहायला लागलं. आणखी अद्‌भुत सगळ्या गोष्टी घडलेल्या आहेत. मोठे दिसणारे, भिक्षा मागायला आलेले एकदम बालरुप झाले. आत्तापर्यंत मुलबाळ काही नसल्याने तिचा मुलांशी काही संबंध नाहीये. पण तिच्या मनात त्या बालकांच्या बद्दल प्रेम उत्पन्न झाल्यामुळे तिच्या स्तनात दूध उत्पन्न झालेलं आहे. प्रत्येक बालकाला आणखी स्तनपान

तिनं करिवलेलं आहे. जगाची उत्पत्ती करणं, इतक्या सगळ्या जीवांना जन्माला घालायचं म्हणजे किती मोठं कार्य आहे. किती श्रम आहेत. हे काम करुन दमल्याप्रमाणे ब्रह्मदेवांनी त्या पतिव्रता स्त्रीचं स्तनपान केलं आणि पूर्ण शांती त्यांना मिळाली. विश्वरक्षण करण्यामुळे दमले होते भगवान् श्रीहरि, ते पतिव्रतेचं पवित्र दुग्धपान केल्यानंतर त्यांचे सगळे श्रम दूर झाले. तर संहाराचे श्रम वगैरे जाऊन त्या दुग्धपानाने भगवान शंकरांची पुष्टी वाढली म्हणतात.

या प्रमाणे त्या सतीला आपल्या पातिव्रत्य धर्माचे काय महत्व आहे हे समजून आलेलं आहे. आजपर्यंत आपण पतीनिष्ठा धारण करुन त्यांच्या आज्ञेप्रमाणे आतिथ्य वगैरे धर्मपालन करीत राहिलो त्याचं हे फलं आहे. त्या बालकांना तिने दुग्धपान करिवलेलं आहे. पाळण्यामध्ये निजवून ती गायन करती आहे. इतक्यात अत्रि महर्षी आश्रमामध्ये आले. त्यांनी पाहिलं अनुसूया गायन करती आहे. ती बालके पाहिल्यावर ध्यानाने त्यांना सगळं कळून आलं. नमस्कार केला त्या त्रिमूर्तींना आणि त्यांनी स्तुती पुष्कळ केली आहे. विश्वाची उत्पत्ती स्थिती लय करणारे भगवान विष्णू त्रिमूर्तीरुप एकच, अशा भावनेनं त्यांनी स्तुती केली.' विश्वसाक्षी परमात्मा. त्याला आणखी वंदन मी करतो 'अशी प्रार्थना केली. आणखी सांगितलं, ' देवा ज्याकरता मी तपश्चर्या केलेली होती, आपलं दर्शन व्हाव, आपला साक्षात्कार व्हावा, आपण एक असूनसुध्दा तीन रुपं धारण करुन या ठिकाणी प्राप्त झालात. सगळं विश्व आपल्यापासून उत्पन्न झालं म्हणजे आध्यारोप आहे. आपापलं ज्ञान करुन देण्याकरता सबंध दाखिवलं आणखी उपनिषदामध्ये पुन्हा त्याचा अपवाद केला.सगळ्याचा विलय आणखी त्या आपल्या स्वरुपामध्ये होतो आहे. आम्ही वेगळे आहोत, निराळे आहोत हा जो भेद आहे तो अहंता, अहंकार, अभिमानामुळे उत्पन्न होतो.' अशी स्तुती अत्रि महर्षींनी यथार्थ ज्ञानपूर्वक केल्यानंतर, ती तिन्ही मुले पाळण्यात असतानाच त्रिमूर्ती प्रगट झाले. आपली स्त्री साध्वी, पतिव्रता आहे हे जाणणारे अत्रिऋषी होते. तिला मान देण्याकरता अत्रिमुनी म्हणाले,' मोठी भाग्यवान

आहेस तू, अनुसूये. हे ब्रह्म, विष्णू, महेश्वर जगताचे अधिपति तुझ्या भक्तीने इथे आलेत. ' मनोदूरः ' जे आहेत म्हणजे मनानेसुध्दा ज्यांचं चिंतन करता येत नाही, ध्यान करावं म्हटलं तर ध्यानामध्ये सुध्दा भगवान येणं कठीण आहे, ते आलेले आहेत इथे. काय तुला पाहिजे तो वर मागून घे.'

तिला मान दिला अत्रि महर्षींनी. पण तिची भावना अशी आहे की ती पतीला म्हणते,' हे तपस्वी महाराज ! आपलीच तपस्या मोठी आहे. आपल्या तपश्चर्येमुळे भगवान् जे आहेत त्रिमूर्ती, ब्रह्मा विष्णू महेश्वररुप झालेले, त्यांनीच ब्रह्मदेवरुपाने आपल्याला निर्माण केलं आहे. त्यांचे पुत्र आपण आहात. आपणच त्यांना मागून घ्या. भगवान आपले पुत्र व्हावेत अशी मागणी तुम्ही करा.' अत्रि महर्षींनीही त्याप्रमाणे मागितलेलं आहे. भगवान् विष्णूंनी सांगितलं' मी आत्मदानच तुम्हाला केलयं. मी माझचं दान तुम्हाला केलं.' आत्मनिवेदन ही मोठी भक्ती आहे. ही भक्ताकरता सांगितलेली आहे. आत्मनिवेदन म्हणजे बली राजाप्रमाणे स्वतःच शरीरसुध्दा दान करुन टाकणं. याचा अर्थ असा.आपल्या घरातील गाय किंवा बैल जर दुसऱ्याला विकून टाकला की त्याला चारा घातलाय का, पाणि पाजलय का ही काळजी आपल्याला राहाती का ? एकदा दिला की देऊन टाकला.

तसा देवाला आपला देह समर्पण केल्यानंतर, आत्मनिवेदन केल्यानंतर त्याला खायला मिळेल की नाही, प्यायला मिळेल की नाही ही चिंता नाही. ही आत्मनिवेदन भक्ती, श्रेष्ठ भक्ती आहे. स्वतःची सगळी चिंता सोडून देणं. तर ही आत्मनिवेदन भक्ती भक्ताने करायची असती तर इथे देवानेच आत्मनिवेदन केलं. 'दत्त' हे नाव त्यामुळे प्राप्त झाले.

अनुसूया मातेची पातिव्रत्य हीच तपश्चर्या आहे. तिचे तप सामर्थ्य एवढं मोठं आहे की संपूर्ण ब्रह्मांडाचं नियमन करणारी जी ईश्वरशक्ती आहे ती अनुसूयेची नियम्य झाली आहे. भगवंताला नियामक म्हणतात. ' सर्वलोक महेश्वरम् ' असं त्याचं वर्णन केलेलं आहे. ब्रह्मादिक देवांचाही नियामक असणारा, सर्वांचाही

नियामक असणारा, परमात्मा तो अनुसूयेचा नियाम्य झालेला आहे. धर्माचरणाची काय शक्ती आहे हे सुध्दा अनुसूयेच्या उदाहरणावरून दाखवलं आहे. मग त्याचं नामकरण झालेलं आहे. आत्मदान केलं म्हणून ' दत्त ' हे नाव पडलं आहे. सर्वांना आनंद देणारे म्हणून ' चंद्र ' हे नांव त्याचं ठेवल. मोठे उग्र तपस्वी म्हणून शंकरांचं ' दुर्वास ' हे नाव ठेवलं. त्रिमूर्तीस्वरूप भगवान् दत्तात्रेय हे त्या ठिकाणी राहिले. अनुसूयेची तपश्चर्या आणित्या तपाचे महात्म्य यासाठीही एक कथा सांगितली. अत्रि महर्षींच्या तपाची परीक्षा पहाण्याकरता येऊन त्याचं धर्माचरण पाहून पुत्ररूपाने देव तिथे राहिले.

दुसरी एक कथा म्हणजे दुर्वास ऋषींनी त्या अंबरीष राजाला शाप दिला, भगवंतांनी तो शाप आपल्याकडे घेतला आणि त्यामुळे त्यांना जन्म घ्यावे लागले. सगळे अवतार दुर्वास मुनींच्या शापामुळे झालेले आहेत. दुर्वास मुनींनी शाप का दिला वगैरे कथा सिध्द सांगताहेत.

भगवंतांनी शाप स्वतःकडे घेतला म्हणजे सहिष्णूता आहे, म्हणाले. अत्यंत सहनशील आहेत. कारण काय आहे की भक्ताधीन भगवान आहेत आणि भक्तांची भक्ती वाढीला लागावी हीच त्यांची इच्छा आहे. अव्यक्त असूनसुध्दा सव्यक्त झाले आहेत. सर्वांना अगदी इंद्रियांनी दिसताहेत. ही त्यांची सहिष्णूता आहे, म्हणाले. अंबरीष नावाचा एक मोठा भगवत भक्त पूर्वी होऊन गेला. एकादशी करणारा मोठा विष्णूभक्त. आलेल्या अतिथी, आभ्यासगतांची पूजाअर्चा करणारा. एका द्वादशीच्या दिवशी दुर्वास मुनी राजवाड्यात आलेले आहेत. दुर्वास अत्यंत रागीट. दुर्वासांचं मन ज्याला सांभाळता आलं त्याचं कोणतही कार्य झाल्याशिवाय रहात नसे. कुंतीने त्यांचं मन सांभाळलेलं होतं.. त्यांची सेवा फार कठिण, पण कुंतीने त्यांची सेवा केली आणि त्यांनी तिला ते मंत्र दिले. दुसरी दुर्योधनाने सेवा केली. चार महिने दुर्वासांना ठेवून घेतलं. त्यांनी मारलं, वाटेल ते बोलले तरी सहन केलं. तो स्वार्थी होता. प्रसन्न झाले दुर्वास, म्हणाले, ' काय बाबा, दुर्योधना,

चांगली सेवा केलीस काय वर पाहिजे तुला तो माग. '

दुर्योधनाने असा वर मागितला, अरण्यामध्ये पांडव आहेत सध्या. सूर्यनारायणाने त्यांना पात्र दिलेलं आहे. त्याच्यातून पुष्कळ अन्न मिळतं. द्रौपदी अन्नदान करती आहे पण द्रौपदीचे जेवण झाले की त्यानंतर त्या दिवशी अन्न मिळणे बंद. मग पुन्हा दुसऱ्या दिवशी सूर्योदयानंतर मिळते. दुर्योधन म्हणतो, ' तुम्ही असं करा दुर्वास ऋषी महाराज की, द्रौपदीचे जेवण झाल्यावर पांडवाच्या आश्रमामध्ये जा, आपले सर्व शिष्य बरोबर घेऊन जा आणि आम्हाला जेवायला घाला असे सांगा. 'असा वर त्याने मागून घेतला आणि दुर्वासांना तो द्यावा लागला. दुसऱ्याची कोणाची सेवा घ्यावी आणि कोणाची घेऊ नये हे शिकण्यासारखं आहे इथे. दुर्योधनाने सेवा केली पण ती कशाकरता केली हे त्यांना कळायला पाहिजे होते. अंर्तज्ञानाने दुसऱ्याच्या मनातले जाणून लगेच शाप देणारे ते, त्यांना कळले नसेल असं नाही. पण झालं. द्रौपदीची कृष्ण भक्ती मोठी होती, धर्मराजाचा धर्मप्रभाव सुध्दा कमी पडला त्यावेळेला. धर्मराजा मोठा धार्मिक आहे पण आता. मध्यरात्री दुर्वासांना जेवायला कुठून घालणार. सूर्यनारायण आल्याशिवाय पात्रातून अन्न मिळणार नाही. मग द्रौपदीने भगवान गोपाल कृष्णांचा धावा केला, ते आले वगैरे कथा माहीत आहे सर्वांना.

सोनं तापवल्यानंतर त्याचा कस वाढतो आणि ते शुध्द होतं तसं अंबरिष राजाची परीक्षा बघण्यासाठी दुर्वास मुनी आले. द्वादशी आहे, पारण्याचा दिवस आहे. दुर्वास मुनी म्हणाले, नदीवर जाऊन स्नान करून येतो. नदीवर गेले. त्यांना वेळ झाला म्हणा, मुद्दाम वेळ लावला म्हणा. आता करायचं काय ? ते आल्याशिवाय जेवता येत नाहीये. म्हणून देवाचं तीर्थ तेवढं राजाने घेतलं. तीर्थावरच पारण केलं. म्हणजे आपण अतिथीला सोडून जेवलो असं होत नाही. तीर्थजल प्राशन केलेलं आहे.

आले ऋषीमहाराज. आणि त्यांना लगेच समजलं. जा, म्हणाले, 'अनेक जन्मामध्ये फिरावं लागेल तुला. ' असं म्हणताहेत

इतक्यात अंबरीष राजाने आपल्या कुलदेवतेचं, म्हणजे भगवान विष्णूंचे, स्मरण केले. आपले लगेच. भगवान आलेले आहेत. ते म्हणाले, दुर्वास ऋषीमहाराज, ' आपलं वाक्य हे खोटं होणार नाही. मला शाप द्या आपण. हा सामान्य जीव आहे. ह्याला सहन करणं कठिण आहे. भक्त वात्सल्य मला आहे. या भक्ताकरता कितीही जन्म घ्यायला मी तयार आहे. काय आपला शाप आहे तो सांगा. '

हे ऐकलं ऋषी महाराजांनी. चांगली संधी मिळाली, म्हणाले. वैकुंठ लोकातून भगवान् वाटेल त्याने बोलावलं म्हणून येणार आहेत काय. माझी लोकात निंदा झाली तरी हरकत नाही. पण भूलोकावरती दुर्लभ असलेले भगवान आले तर सर्वांना त्यांचं दर्शन घडेल. हे पुण्यकारकच आहे. म्हणून त्यांनी सांगितलं अंबरीषा का करता होईना, भगवान् भोगायला तयार आहेत म्हणून शाप दिला. अंबरीषाकरता जो शाप द्यायचा तो विष्णूंना त्यांनी दिला, 'तुम्हाला अनेक जन्म घ्यावे लागतील.' तेव्हा मत्स्य, कुर्मादि पुराणात सांगितलेले दहा अवतार भगवान् विष्णूंचे झाले.

टीकेमध्ये महाराजांनी त्याचं सगळं वर्णन केलेलं आहे. चैत्र शु. तृतीयेच्या दिवशी मत्स्य अवतार झालेला आहे, अपराण्ह काळी. वैशाखी पौर्णिमेच्या दिवशी सायंकाळी कूर्मावतार झालेला आहे. भाद्रपद शु. तृतीयेला अपराण्ह काळी वराह अवतार झाला. वैशाख शु. चतुर्थीच्या दिवशी प्रदोष काळी नरसिंहाचा अवतार झाला. भाद्रपद शु. द्वादशीला मध्यान्ह काळी वामन अवतार झाला. वैशाख शु. तृतीयेला परशुरामावतार झाला. चैत्र शु. नवमीला रामावतार झाला. श्रावणात अष्टमीला कृष्णावतार झाला. दसऱ्याच्या दिवशी सायंकाळी बुध्दाचा अवतार झाला. आणि पुढे श्रावण शु. षष्ठीला कलंकी अवतार झाला. त्यानंतर मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी, सायंकाळी मृग नक्षत्र असताना, बुधवारी प्रदोष काली दत्तात्रेयांचा अवतार झालेला आहे. असे आणखी पुष्कळ अवतार त्यांनी सांगितले आहेत. हे पौराणिक अवतार झाले.

पुन्हा कलीयुगामध्ये दोन वेळेला भगवान दत्तात्रेयांनी अवतार धारण केले. दीन जीवांचं संरक्षण करण्याकरता अवतार घेतलेला आहे. जरी सामान्य भक्तांना ते अगोचर असले तरी कलीयुगमध्ये भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारे दोन्हीही अवतार अद्यापि आहेत.

श्रीपाद अवतार आहे, नरसिंह सरस्वती अवतार आहे. दत्तात्रेय अवतार आहे, मग या कलीला का ठेवलं त्यांनी? त्याचा बंदोबस्त का केला नाही? त्याचा काल ठरलेला आहे. मानवांच्या दृष्टीने तो काल पुष्कळ वाटत असेल पण त्यांच्या दृष्टीने तो अगदी अल्प आहे. त्याला कालाची मर्यादा आहे. जाईल, म्हणाले, आपोआप. आणि दुसरी गोष्ट म्हणजे पुण्यकर्माचं फलं तत्काळ मिळतं. कर्माचं फळ मिळायला फार वेळ लागतो असं सांगतात शास्त्रकार. पण जर सद्वासना उत्पन्न झाली आणि पुण्यकर्म घडलं तर त्याचं फल तत्काल मिळतं. पाप कर्माचे फळ मिळायला वेळ लागतो. म्हणून कलीचा हा एक गुण जाणून राहू दे म्हणाले. नाहीतर त्यांना काय अशक्य होतं?

यानंतर पुढच्या अध्यायामध्ये अवधूतांनी चोवीस गुरू केले, त्यांचं पुष्कळ वर्णन आहे. भागवतामध्येसुध्दा गोपाल कृष्णांनी अवधूतांनी यदुला काय उपदेश केला, ते सांगितलं आहे. हेच या ठिकाणी सिध्दांनी नामधारकाला सांगितलं आहे. दत्तात्रेयांनी यदु राजाला हेयोपादेय विवेकाचा उपदेश केला. बुध्दी स्थिर होण्याकरता ते सर्व आहे. काय घ्यावं आणि काय सोडावं हे आमच्या बुध्दीला समजत नाहीये. आता वाटतं हे घ्यावं, पुढे नंतर वाटतं हे घेतलं नसतं तर बरं झालं असतं. टाकलं असतं तर बरं झालं असतं. अगोदर बुध्दी स्थिर होत नाही. तर तो हेयोपादेय विवेक व्हायला पाहिजे. कोणाचा गुण आहे आणि कोणाचा दुर्गुण आहे, दोष कसा सोडायचा, गुण कसा समजून घ्यायचा, हे समजून सांगण्याकरता ती कथा सांगितली आहे.

**श्रीपादश्रीवल्लभ** अवताराबद्दल आता नामधारक विचारताहेत. चौथ्या अध्यायामध्ये यदु राजाला केलेला हेयोपादेय विवेकाचा उपदेश सांगितला. प्रत्यक्ष परमात्म्याने सगळी सृष्टीकर्मे करण्याकरता दत्तात्रेय अवतार घेतला. आणि तो अवतार अत्रि महर्षींच्या आश्रमामध्ये झालेला आहे. अत्रि महर्षींच्या तपामुळे आणि अनुसूयेच्या पातिव्रत्यामुळे तो अवतार झाला. हे दत्तात्रेयांचं चरित्र म्हणजे सद्गुरूंचा पहिला अवतार आहे. आणि अवताराचं प्रयोजन सांगताना अंबरीष राजाही निमित्त मात्र झालेला आहे. ईश्वरभक्त राजा आहे. त्या राजावरही संकट आलेलं आहे. अनुसूयेवरतीही असच संकट आलेलं आहे. धर्मानी वागणाऱ्या अनुसूयेची परीक्षा पाहाण्याचं त्रैमूर्तींनी ठरवलं. धर्म संकटात ती पडली. पण तीचाही उध्दार झाला. त्याकरता त्यांना तिच्या घरी रहावं लागलं. हा दत्तात्रेय अवताराचा चरित्र हेतु सांगितला आणि अंबरीष राजाच्या भक्ती, निष्ठेमुळे हे अवतार झाले.

आता श्रीपादवल्लभांचा अवतार कसा झाला ते सांगताहेत. एक ब्राम्हण स्त्री, आंध्र प्रांतातमध्ये राहाणारी, पतिव्रता आणि मोठी धर्मनिष्ठा असणारी तिचे पुत्र दत्तात्रेय झालेले आहेत. श्रीपाद श्रीवल्लभ या नावाने ते चरित्र सांगताहेत.

आत्मसाक्षात्कार करून घ्यायचा म्हणजे साधनचतुष्टय संपत्ती पाहिजे. नित्यानित्य विवेक, इहामूत्रार्थपरभोग विचार, दम, शम, उपरति, तितिक्षा, समाधान, श्रध्दा ही षट् संपत्ती आणि तीव्र मुमुक्षा. ही साधनं चतुष्टय संपत्ती ज्याने मिळवली तो क्रमाने श्रवण, मनन, निदिध्यासन हे करू लागतो. आत्मानात्म विचाराकडे त्याची प्रवृत्ती होते. त्या विचारांच्या भूमिका आहेत. अगोदर श्रवण भूमिका आहे. संपूर्ण एकंदर उपनिषदांमध्ये काय सांगितलेलं आहे, आत्मस्वरूप कसं आहे, त्याच्यानंतर हे ज्ञान दृढ करण्याकरता मनन भूमिका आहे. मनातून सर्व असंभावना गेल्या. एक परमात्मा, परब्रह्म आहे ही भावना दृढ झाली. त्याचं

प्रमाणही आहे- उपनिषदरूपी ! ही प्रमाणाचीही असंभावना गेली. प्रमेय जे ब्रह्मतत्व आहे ते, प्रमाणाने सिध्द आहे; ही सुध्दा असंभावना गेली. मग त्याचं साधन सुरू झालं.

निदिध्यासन ही साधन भूमिका आहे. ध्यान सुरू झालं. त्या ध्यानामध्ये सगुणाचे ध्यान आहे आणि उपासनाही आहे. तर हे निदिध्यासन जे आहे ते विपरीत बुध्दी दूर करण्याकरता आहे. प्रमेयालाही प्रमाण नाही ही जी असंभावना होती चित्तामध्ये, ते दोष श्रवण मननाने गेले. ध्यानाला सुरवात केल्यानंतर एक परमात्मा आहे सर्व स्वरूप परमात्मा आहे हेही ध्यान आहे. हे जे काही दिसतं आहे, हे सर्व वासुदेवरूपच आहे, ही बुध्दी होण्याकरता हे जे स्थूल विश्व दिसतं आहे, त्या विश्वरूपाचं ध्यान किंवा सूक्ष्म मनोमय अशा प्रकारचं वर्णन केलेलं आहे त्या स्वरूपाचं ध्यान आहे. म्हणजे दृष्य रूप आहे. विश्वरूपाच्या ध्यानामध्ये मन जर अशा प्रकारे स्थिर झालं तर विपरीत बुध्दी हळूहळू कमी कमी होते. अहंकार कमी होतो, काम क्रोधादिक विकारही कमी होतात. ममता कमी होते. हे सगळं विपरीत बुध्दीचं लक्षण आहे. हे सगळे दोष कमी करण्याकरता निदिध्यासन, म्हणजे सगुण परमेश्वराचे ध्यान सांगितलं आहे. पुढे निर्गुण स्वरूपाच्या ठिकाणी चित्त स्थिर झालं की झालं. सगुणाचं ध्यान किंवा निर्गुणाचं ध्यान यात श्रेष्ठ कनिष्ठ काही नाही.

ध्यान करणं याचाच अर्थ मनाची स्थिरता आहे. मनाची स्थिरता झाल्यावर, वासनाक्षय होऊन मनावरचे सगळे कुसंस्कार नष्ट होतात. आमचा वासनाक्षय न होण्याचं कारण असं आहे की आमच्या अनेक जन्मांच्या वासना पक्क्या झाल्या आहेत आणि त्या वासना पक्क्या करण्याकरता पुन्हा आम्ही विषय भोग घेतो, संसारामध्ये पडतो. म्हणजे जास्तीच त्या दृढ होत जाताहेत. स्थिर नाही ना मन ! त्यामुळे त्या विषय वासनांचाच अभ्यास जास्ती जास्ती होतो.

पण ज्ञान भूमिकेवर आल्याबरोबर त्या वासनांचा क्षय होऊन जातो आणि मनाची स्थिरता येते. सगुणाचं ध्यान झालं

तरी हरकत नाही. किंवा निर्गुणाचं ध्यान झालं तरी हरकत नाहीये. सगुण ध्यानामध्ये त्या रूपाच्या ठिकाणी भक्ती प्रेम आहे. निर्गुण निराकार अशा प्रकारच्या आत्मस्वरूपाच्या ठिकाणी मन स्थिर होणं, ही सुध्दा एक प्रकारची भक्तीच आहे. अनन्य मन झालं. अन्य कुठेही मन जात नाही. केवळ भगवंताच्या ठिकाणी मन स्थिर होणे हे ज्ञान पूर्वक आहे म्हणतात. सर्वही भूतांचा कर्ता, परमात्मा आहे. ' ओम् नमोजी आद्या ' असं म्हणून ज्ञानेश्वरीला सुरूवात झाली आहे. सर्वांचा आदि परमात्मा जाणून हे म्हटलं आहे.

तर श्रवणादिकांनी ती भक्ती वाढत जाते आहे. ज्यांचं इकडे लक्ष जात नाही, त्यांच्या त्यांच्या अधिकारानुरूप कर्मयोग सांगितलेला आहे, उपासना योग सांगितलेला आहे. अंतःकरण शुध्दी जशी जशी होईल, चित्ताची एकाग्रता, स्थिरता जशी जशी होत जाईल, त्याप्रमाणे पुढे आणखी ज्ञान साधन मिळतात आणि त्या साधनांनी ते पुढे जातात.

सर्व जीवांच्या करता प्राथमिक म्हणून कर्मानुष्ठान सांगितलं आहे. त्या कर्मानुष्ठानाचं महत्व वर्णन करण्याकरता ही कथा आहे. ईश्वराचीच आज्ञा आहे ती. ' मातृदेवो भव, ' 'पितृदेवो भव, ' ' अतिथी देवो भव ' ही सगळ्या देवतांची उपासना म्हणजे प्रत्यक्ष मूर्तीचीही उपासना होईल किंवा माता, पिता, आचार्य या प्रतिकांच्या ठिकाणी देवत्व बुध्दी धारण करून, त्यांची उपासना म्हणजे ती देवाची उपासना आहे. त्यानेसुध्दा आणखी अंतःकरण शुध्दी होते. ' पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा' हे जे सांगतात नामदेव हे त्यांची माता पित्यांची उपासना पाहून सांगताहेत. तर कर्मानुष्ठानाचं महत्व सांगताहेत.

धर्म संरक्षण करायचय भगवंतांना. धर्माचं संरक्षण केलं म्हणजे विश्वाचं संरक्षण होतं. भगवतीचे वाहन सिंह जे आहे तो धर्म आहे. सिंहावर बसून सर्व असुरांचा नाश भगवती करते. तर धर्म संरक्षण करणं म्हणजे धर्मशील अशा सज्जनांचही संरक्षण करायच. धर्मविरोधी प्रवृत्तींचा नाश करण्याकरता प्रत्येक युगात,

देवीने अवतार घेतले आहेत. व्यास महर्षी म्हणतात. जग निर्माण करणारा म्हणून लोकांनी आपला सत्कार समारंभ करावा अशी त्याची इच्छा आहे काय ? काहीच नाही. नैसर्गिक शक्ती आहे ती. लीला आहे. कशा करता करतो, हे सांगता येत नाही. दीन जे आहेत, अज्ञानी, ज्यांना भक्ती सुध्दा करता येत नाही, कारण भक्तीसुध्दा मोठी आहे. भारतीय युध्द समाप्त झालं. धर्मराज राज्यावर बसले, श्रीकृष्ण कुंतीच्या जवळ आले. नमस्कार करून म्हणाले, 'आत्याबाई जातो आम्ही द्वारकेला ' त्यावेळी कुंतीने श्रीकृष्णांची स्तुति केली. त्या स्तुतिमध्ये श्रीकृष्ण अवताराचे अनेक हेतु तिने वर्णन केले.

कृष्णावताराचा एक हेतु कुंतीने असा सांगितला की परमहंस अवस्थेत जे आहे, पूर्ण ज्ञान झालेलं आहे, अन्य सगळं मनातलं गेलेलं आहे, संसार गेला मनातून असे शांत चित्त झालेले जे मुनी, त्यांना भक्तीयोग शिकवण्याकरता कृष्णावतार झाला आहे. शुक्राचार्यांची गोष्ट प्रसिध्दच आहे. ब्रह्म समाधिमध्ये निमग्न असणारे शुक्राचार्य, त्यांनी व्यासांच्या शिष्यांच्या मुखातून कृष्णाचा श्लोक ऐकला आणि आले लगेच. विचारलं, ' कोणी केला हा श्लोक, कोणाचं वर्णन आहे ? ' व्यासांच्या जवळ राहून संपूर्ण भागवताचा अभ्यास त्यांनी केला. आणि त्या सगुण भक्तीमध्ये इतके निमग्न झाले आहेत शुक्राचार्य महाराज, की निर्गुण निराकार भक्ती सुटली त्यांची. ' तुज सगुण म्हणू की निर्गुण रे । सगुण निर्गुण एकू गोविंदू रे ।। ' ही त्या श्रेष्ठ ज्ञानी महात्म्याची भावना आहे.

ज्यांना भक्ती नाही, ज्ञान नाही, कर्म नाही अशा लोकांचा उध्दार करण्याकरता या मलीन अशा कलीयुगामध्ये भगवंतांनी अवतार धारण केलेला आहे. पीठापूर नांवाचे गांव आंध्र प्रांतात हैद्राबादहून जगन्नाथपुरीला जाताना वाटेत लागते. ' श्रीपाद ' आडनावांची मंडळी तिथे आहेत. त्या पूर्व देशामध्ये आपळ राजा नावाचा एक द्विज होता. मोठा धर्मशील, अध्ययनशील. त्याची स्त्री सुमती नांवाची होती. दत्तात्रेयांची उपासना पूर्वीपासून चालत

असली पाहिजे त्यांच्या घराण्यात कारण हे दोघे त्यांची उपासना करत होते. हे दोन अवतार नंतर झालेले आहेत.

तेव्हां दत्तात्रेयांच अर्चन ती सुमती करती आहे, तो ब्राम्हणही करतो आहे. त्या सुमतीला पूर्वी दोन मुलं झाली परंतु एक पांगळा आणि एक आंधळा. म्हणजे त्या मुलांची सगळी सेवा हिलाच करावी लागत होती. आंधळ्याला पांगळ्याला सहाय्य करावे. पांगळ्याला आंधळ्याने सहाय्य करावे म्हणतात. ही सृष्टी कशी निर्माण झाली सांख्य सांगतात की आत्मरूपी पुरुष उदासीन आहे. ज्ञानशक्ती आहे. त्रिगुणात्मक प्रकृतीमध्ये क्रिया शक्ती आहे. पण ती अंध आहे. आत्मस्वरूप, परमात्म स्वरूप, नुसतं ज्ञान आहे, पण ते पंगु आहे. म्हणून त्या दोघांचा संबंध आला आणि सृष्टी निर्माण झाली, असं काहीतरी ते वर्णन करतात.

तर ही सुमतीची लहानपणा पासून पराधीन असलेली मुलं पुढे काय करणार ? सगळे त्या बिचाऱ्या मातेला करावे लागत असे. सुमतीची नावाप्रमाणे उत्तम बुध्दी आहे. अनेक लोकांची सत्संगती घडायची, चांगले विचार कानावर पडायचे, आपला धर्म काय , आपण कोणत्या भूमिकेवर आहोत, आपलं कर्तव्य काय, त्याप्रमाणे काय करावं हे सगळं तिला समजायचं. ' अतिथी देवो भव ', हे घरात राहून ती शिकलेली आहे. दुसरीकडे कुठे जायला नको काही नको. कोणीही अतिथी आणखी मध्यान्हकाली आल्यानंतर, त्याला अन्नदान करावं, असा तिचा नियम होता. अनुसूया मातेचाही तोच नियम होता. त्या दोन स्त्रीयांच्यामुळे भगवंतांचे अवतार झालेले आहेत. जगावर केवढे उपकार आहेत त्यांचे की त्यामुळे भगवान आलेले आहेत. लोकांचा उध्दार होतो आहे.

दोन्ही मुले अशी अंध पंगु आहेत. संसारात काही सुख नसलं तरी तिचं धर्माचरण चाललेलं आहे. अमावास्या दर्श श्राध्दाचा दिवस होता. ब्राम्हण मंडळी यायची होती अजून. स्वयंपाक सगळा तयार झालेला आहे आणि भगवान दत्तात्रेय हे भिक्षुक वेषामध्ये तिच्या घरामध्ये आलेले आहेत. मध्यान्हकाली आले.

अन्नाची याचना केली. आता श्राध्द अजून व्हायचय. ब्राम्हणांचं जेवण झाल्याशिवाय अतिथीला अन्न द्यायचं की नाही ? हा एक प्रश्न आहे. ' अतिथी देवो भव ', हे काही कामापुरतं मानायचं एरव्ही आणि श्राध्दाच्या दिवशी मात्र ' भूदेवो भव ' वगैरे काही म्हणायचे का ? हा एक शास्त्रीय प्रश्न आहे. चर्चा आहे. परंतु त्या स्त्रीची एकनिष्ठा होती. तिचं एक पहिल्यापासून व्रत चालू आहे. अतिथी म्हणजे साक्षात् भगवंताचे स्वरूप आहे, अशी तिची भावना आहे.

त्यामुळे कर्ममार्गामध्ये काही दोष दाखवून ती प्रवृत्त झाली असती, ' कर्ममार्ग निंद्य आहे, कोणीही कर्म करु नये. नुसती देवाची भक्ती करावी.' अस जर म्हटलं असतं तर शास्त्रदृष्ट्या तो दोष झाला असता. पण तसं काही नाही. श्राध्द आहे, म्हणाली. नंतर स्वतंत्र स्वैपाक करता येईल. काय तिला वाटलं असेल. परंतु अतिथी आलेले आहेत त्यांना लगेच अन्न समर्पण करायचे. आणलेलं आहे अन्न आणि त्यांच्या झोळीमध्ये ते अन्न टाकलेलं आहे.

कर्मयोगाचे अनुष्ठान वारंवार व्हायला पाहिजे. मनातले सगळे संशय दूर व्हायला पाहिजेत. निःसंशयरीतीने आणखी अनुष्ठान झाले पाहिजे. आजपर्यंत अतिथीला अन्न देणं, सेवा करणं हे कार्य अत्यंत शुध्द बुध्दीने चाललेलं आहे. आणि त्याचं फल मिळण्याचा क्षण आलेला आहे. त्यावेळेला जर मनात काही संदेह आला असता,' थांबा महाराज, पतीमहाराजांना विचारुन येते, श्राध्द आहे आमच्या घरी आज, दुसर काही दिलं तर चालेल का, ' हे जर ती विचारत बसली असती तर तिचं हेही कार्य झालं नसतं. पण संदेह नाहीये. अतिथी आल्याबरोबर त्याला अन्न समर्पण करायचे. कोणत्याही साधनाबद्दल, कर्माबद्दल श्रेष्ठ कनिष्ठ बुध्दी आणायचीच नाही. आपण जे साधन घेतलेलं आहे त्या साधनाप्रमाणे वागायचं. त्याचं फल असं मिळालं की भगवान् दत्तात्रेय संतुष्ट झालेले आहेत. संशय नाही ना ! एकदम त्यांनी आपलं स्वरुप प्रकट केलं आहे. ईश्वर साक्षात्कार होणं

म्हणजे केवढ मोठ पुण्य आहे.अतिथीला देव म्हणून ( समजून ) ती आचरण करीत राहिली म्हणून ईश्वर साक्षात्कार तिला झाला.

त्यांनी तिचा हात धरलेला आहे. दत्तात्रेयांनी विचारलं, आई काय तुझी इंच्छा आहे?

मालाकमण्डलुरधः करपद्मयुग्मे ।
मध्यस्थपाणियुगुले डमरुत्रिशूले ।
यस्य स्त उर्ध्वकरयोः शुभशंखचक्रे ।
वंदे तमत्रिवरदं भुजषट्कयुक्तम् ।।

हा महाराजांचा श्लोक आहे. हे ध्यान प्रत्यक्ष पाहून या श्लोकाची रचना झालेली आहे. कुठे कुठल्यातरी पुस्तकात वाचून श्लोक तयार केलेला नाहीये. म्हणून भगवान् आपल्या चर्मचक्षूला प्रत्यक्ष जरी दिसले नाहीत, तरी असे भगवान् दत्तात्रेय आहेत. खाली माला कमंडलू आहेत. मध्ये डमरु शूल आहे. वर शंखचक्र आहे. असं स्वरुप माहात्म्यांनी पाहून वर्णन केलेलं आहे. ते आपल्याला दिसण्याची आज आमची योग्यता नाहीये. ती देवाने आम्हाला द्यावी, स्वरुप दाखवावं अशी प्रार्थना करायला काय हरकत आहे ! हे खरच नाही, खोटच नाही, म्हणजे मुळातच सगळी अश्रध्दा बाळगून काहीच फायदा होत नाही.

भस्म धारण केलेलं आहे. जटा आहेत. दत्तात्रेय म्हणतात, 'आई, आज तुझ्या घरी श्राध्द आहे. ब्राम्हण मंडळींच जेवण व्हायचय. तरी सुध्दा अतिथी म्हणजे साक्षात भगवान विष्णू आहे. देवांना दिलं जाणारं अन्न, पितरांना दिलं गेलेलं अन्न, सर्व अन्नाचा भोक्ता हाच आहे. सगळं तोच आहे. इतक्या शुध्द बुध्दीने तू मला अन्न समर्पण केलंस, त्यामुळे तुझी बुध्दी पाहून मी संतुष्ट झालो आहे. काय पाहिजे वर?'

आता काय मागायचं? स्पष्ट तर काही बोलता येत नाही. दुःखी आहे बिचारी. दोन मुलं तर अशी जन्माला येऊन फुकट गेलेली. ती म्हणाली,' देवा आपलं दर्शन मला झालं, मी

धन्य झाले. मनुष्य जन्माला मी आले. हा जन्म माझा सफल झालेला आहे. माझ्या पितरांच श्राध्द आहे. ते पितर संतुष्ट झाले. तेही धन्य आहेत. योग्यांच्या मनाला सुध्दा न सापडणारे आपण आहात. आज माझ्या दृष्टीला आपलं स्वरुप दिसलेलं आहे. पितरांना द्यायचं अन्न आपण ग्रहण केलत या पेक्षा आणखी मला काय पाहिजे? आणखी दुसर फल काय आहे.'

ती सुमती मोठी चतुर होती. ती पुढे म्हणाली,' संपूर्ण विश्वाला उत्पन्न करणारे आपण आहात आपल्याला अशक्य असे काही नाही. जीवात्मा आपल्या कर्मानुसार कोणत्याही स्थितीत असला, तरी त्याचं स्वरुप बदलणं, काय वाटेल ते आपण करु शकता. आणि भक्तांना धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे सर्वही पुरुषार्थ देणारे आपण कल्पवृक्ष आहात. मला चांगला मुलगा पाहिजे, महाराज, आपण मला आई म्हणून हाक मारलेली आहे. सगळ्या जगाने ज्याची सेवा करावी अशी प्रजा मला पाहिजे. ते सुध्दा देव, योगी वगैरे काही चालणार नाही.आपण मला 'माता' म्हणून संबोधलेले आहे. आपल्या संबोधनाची सिध्दी व्हावी,' म्हणजे आपणच पुत्र व्हावं अशी इच्छा तिने व्यक्त केली. अत्रि महर्षीही तसेच म्हणाले. दत्तात्रेय म्हणाले, ' बरय, माझ्यासारखा म्हणजे आता मलाच यायला पाहिजे. पण तुला जो मुलगा होईल त्या मुलाच्या वचनाच्या बाहेर जाऊ नकोस. तो जे म्हणेल त्याप्रमाणे वाग.'असं म्हणून भगवान् दत्तात्रेय गुप्त झालेले आहेत.

मग तिने पतीला सांगितलं,' श्राध्दाकरता केलेला स्वयंपाक आपण आता अतिथींना अर्पण करा. ' पण इथे आता अतिथीरूपाने साक्षात दत्तात्रेयांनाच अर्पण केलेला आहे. दुसऱ्या कोणा अतिथीला अर्पण केला असता आणि मनामध्ये संशय आला असता तर सत्कर्म बिघडलं असतं की ! केलेल्या कर्माचे आपणच दोष काढीत बसायचं. हे चांगले झालं नाही, हे केलं नसतं तर बर झालं असतं वगैरे. दान करायचे आणि, 'इतकं दान केलं नसतं तर बर झालं असत, ' असं म्हणायचं म्हणजे केलेले दान गेलं की नाही फुकट. देण्यापूर्वीच विचार करून कमी द्यायचं होतं.

त्याप्रमाणे इथे साक्षात दत्तात्रेयांचे दर्शन झालय, त्यामुळे तो काही संशय नाही पण पतीच्या कानावर घालावं की असं असं झालं. 'हा काय दोष झाला काय ? तिचं काम झालं होतं. दोष असता तर तिला वर कसा मिळाला असता ?

अत्रि महर्षीनाही आनंद झाला. ते म्हणाले, 'बाई, तुझ्या हातून जे कर्म घडलय ते अतिशय उत्तम आहे. पितरांसाठी अन्न तयार करायचं आणि द्विजांना आणि शेवटी भगवान विष्णूंना अर्पण करायचं आहे. तो साक्षात विष्णू तुझ्या घरी येऊन, श्राध्दान्न त्याने ग्रहण केलं आहे आणि तुला वर दिला आहे. यापुढे असच तू वागत जा.' कोणत्याही रूपात भगवान् दत्तात्रेय येतात. मध्यान्ह काली दत्तात्रेय कोल्हापुरात भिक्षा मागायला जातात, असे सांगतात. त्यांची दिनचर्या महाराजांनी सांमितली आहे. पण इथे तर आता पीठापूरामध्ये आलेले आहेत महाराज. सगळीकडे संचार करीत. त्यांचं हे जे रोज आसेतु हिमाचल पर्यटन चाललेलं आहे, ते भक्तांच्या उध्दारासाठी आहे- कोण भक्त अडचणीत सांपडला आहे, कोणत्या भक्ताला त्याची कर्म प्रतिबंध निर्माण करताहेत हे सगळं बघून त्याला त्यातून सोडवायचा आहे. सुमतीची प्रजा चांगली नाही, तरीसुध्दा ती अतिथीची सेवा करती आहे. त्या 'अतिथी देवो भव' या व्रताचं फल तिला मिळालं पाहिजे. चांगल्या शुध्द बुध्दीने करते आहे. शुध्द कर्मामुळे तिचं पूर्वीचं प्रतिबंध निर्माण करणारं प्रारब्ध कर्म असेल तर ते दूर झालं पाहिजे. म्हणून याकरता स्वतंत्र स्वतः जाऊन भगवान दत्तात्रेय सर्व पहाताहेत. जर कार्तवीर्य अनेक रूप घेऊन स्वतंत्र संचार करीत होता, मग ह्यांना काय अशक्य आहे ? तिला त्या पतीने सांगितलं, ' आपल्या भक्तांचा उध्दार करण्याकरता भगवंताचा सर्वत्र संचार होतो आहे. त्यांचं तुझ्याकडून अर्चन झालं, उत्तम झालं. आपले कुल आज पवित्र झालं आहे. आणि तुला वरही मिळाला आहे.' उरलेल्या अन्नातून श्राध्दकर्म भोजन वगैरे झालं. ती सुमती गर्भिणी झाली आणि भाद्रपद शुध्द चतुर्थीला श्रीपादांचा अवतार झालेला आहे. ज्योतिषी मंडळींनी त्या बालकाचे जातक

सांगितले. साक्षात् भगवान दत्तात्रेयांचा हा अवतार आहे. शास्त्रज्ञान सुध्दा किती मोठं आहे हे ह्यावरून दिसतं. मुलाचा मागचा जन्म कोणता, पुढचा जन्म कोणता येणार आहे हे कर्मविपाक शास्त्राच्या साह्याने सांगता येतं. त्यांनी सांगितलं, ' भगवान दत्तात्रेयांचं अर्चन तू केलेलं आहेस त्यामुळे हा अवतार झालेला आहे.' सर्वांना आनंद झालेला आहे. कोमल सुंदर पाय त्या बालकाचे होते म्हणून श्रीपाद नाव ठेवलेलं आहे. उत्तम शरीर आहे. हळूहळू ते मोठे झाले. उपनयन संस्कार त्यांचा झाला. उपनयन झाल्यावर ते लगेच स्वतः यजुर्वेद, अथर्ववेद, ऋग्वेद, सामवेद वगैरे म्हणायला लागले. शिकण्यासाठी जी जी मंडळी त्यांच्याकडे आली त्यांना शिकवलेलं आहे. अध्यापनही केलं.

दिव्य ज्ञान आहे त्यांच्याकडे अशी सर्वांची खात्री झाली. अनेक मोठीमोठी जिज्ञासू मंडळी त्यांच्याकडे येऊ लागली आपली जिज्ञासा व्यक्त करुन निवारण करुन घेताहेत.

पंधरा सोळा वर्षांच वय झालं. विवाहाला ते योग्य झाले. त्यासाठी पिता प्रयत्न करताहेत.पण श्रीपादांनी सांगितल, 'महाराज, मला काही विवाह करायचा नाही. मला संन्यास दीक्षा धारण करुन बाहेर पडायचय. योगश्री ही माझी स्त्री आहे. दुसरी स्त्री नाही. आणि ती योगश्री माझ्याजवळच राहाणारी आहे. त्या योगश्रीचा मी वल्लभ आहे. मला दुसरी कांता नको.' निघाले श्रीपाद.

लगेच बाहेर पडलेले आहेत. आत्मस्वरुप हे असंग आहे. काही संबंध नाही. ही सावधान दृष्टी ज्ञानी माणसाची आहे. ते अखंड सावधान असतात. म्हणून कुठही ममता नाही काही नाही माता पित्यांना दुःख झालेलं आहे. डोळ्यातून अश्रूधारा वाहाताहेत. ती म्हणती आहे,' आपण साक्षात भगवान् विष्णू, पुत्र रुपाने माझ्या घरामध्ये आलात. राहिलात इतके दिवस, महाराज. काय पूर्वीचं पुण्य होत कोणास ठाऊक ! आणि आता एकदम या दुःख समुद्रात लोटून निघून चाललात.' हे दुःख तिने सांगितलं. ती बोलून गेली. आत्तापर्यंत आपल दुःख तिने सांगितलं नव्हतं.

त्यांनीही काही विचारलं नव्हतं. कोणीतरी असतील किंवा दुसरीकडे कुठे मुलं ठेवली असतील. एक पंगु आहे एक अंध आहे. हे मुलांचं दुःख तिने सांगितलं नव्हतं. साक्षात भगवान् श्रीपाद रुपाने अवतीर्ण झाले. त्यांच्या सान्निध्यामध्ये आणखी सर्व दुःख ती विसरुन गेली होती. पण तेच दुःख आता जन्मभर भोगावं लागणार आहे, म्हणून तिला राहावलं नाही. आत्तापर्यंत दुःख व्यक्त केलं नव्हतं तिनं.

पंग्वंधार्भेक्षणान्नित्यं भवपाशविमोचनी ।।
स्मृतिः प्रवयसोर्नौ ते हरे दूरतरा भवेत् ।।

बालकाचं दुःख नाहीये. आपलं स्मरणसुध्दा आम्हाला राहाणार नाही हे दुःख आहे. ' आपण आता निघालात दर्शन तर अंतरलच. आपलं स्मरण तरी करावं, पण डोळ्यासमोर ही दोन मुलं आहेत. एक पांगळा आहे, एक आंधळा आहे, यांचं कसं होईल? आजपर्यंत आपल्याच सगळ्या कार्यात निमग्न राहिलो आम्ही. यापुढे आपलं स्मरणही आम्हाला घडणार नाही. हे मोठं आमचं पाप आड आलेले आहे.' हे दुःख त्यांना होत आहे. हे ऐकल्यावर-

इति वाक्यं सकारूण्यं श्रुत्वारं भ्रातृमस्तके ।
सुखाकरं निजकरं तद्वात्सल्याद्दधौ हरिः ।।

मातृवात्सल्य मोठं आहे. धर्मशील मातेबद्दल आदरभाव मोठा आहे. प्रत्येक अवतारामध्ये हे दाखिवलेलं आहे. भगवान गोपालकृष्ण आपल्या माता पित्यांच्याबद्दल अत्यंत आदरभाव बाळगणारे होते.

पंगु आणि अंध बालक, ह्यांचे प्रारब्ध भोग भोगताहेत. श्रीपादांनी त्यांच्या मस्तकावर हात ठेवून स्पर्शदिक्षा देताच, ते प्रारब्ध कर्म सर्व संपलेलं आहे. ईश्वराच्या इच्छेने प्रारब्ध कर्म

फल देताहेत.ईश्वराची इच्छा नसेल तर प्रारब्ध कर्म काय करू शकणार? त्यानेच सगळे नियम घालून दिलेले आहेत. प्रत्यक्ष भगवंतांचा हस्तस्पर्श ज्यांना मिळाला, त्यांना किती पुण्य मिळालं असेल. इतकं पुण्य मिळाल्यानंतर ते प्रारब्ध पाप राहील कसं ? लगेच तो पांगळा चालायला लागला आणि आंधळ्याला दृष्टी उत्पन्न झाली. आणि

स्वंगौ ज्ञौ च बभूवतुः ।।

उत्तम शरीर झालं आणि उत्तम ज्ञानही त्याला मिळालेलं आहे. पुढे कोण शिकवणार त्यांना? श्रीपाद घरात राहात होते, तोपर्यंत पुष्कळ विद्वान मंडळी येत होती. त्या देवकीने शेवटी एकदा कृष्णांना विचारलं म्हणे, कृष्णांचं लग्न झाले, मुलंबाळं झाली, राज्य स्थापन झाले, श्रीकृष्ण देवकी वसुदेवांच्या दर्शनाला रोज येत होते. देवकीने विचारले, ' तू सांदीपनी गुरूमहाराजांना गुरू दक्षिणा म्हणून त्यांचा मेलेला मुलगा परत आणून दिलास, हे खरं का?'श्रीकृष्ण म्हणाले,'बर मग तुझी काय इच्छा आहे ?'

देवकी म्हणाली, ' माझी सहा मुलं कंसाने मारली, ती मला आणून दाखिव. ' असं त्यावेळी बोलली म्हणे. श्रीकृष्णांनी आणून दाखिवली आणि गेले. पण इथे श्रीपादवल्लभ जोपर्यंत होते तोपर्यंत पुष्कळ ज्ञानी अज्ञानी, जिज्ञासू मंडळी यायची. श्रीपाद त्यांना ज्ञान देत, संशय दूर करत. यांना का झाले नाही असे ?

मध्यस्थ पाहिजे ना. कर्मभोग चाललेला आहे. कशाला मधे घ्यायचा ? ती माता जेव्हां पुढे आली, तेव्हां कोणीतरी पाहिजे. मातेचाही उपयोग झाला त्या जीवांना. ती माताही मोठी भक्त होती. प्रारब्ध कर्माची सबब देवाला सांगता आली नाहीये. 'त्यांचं प्रारब्ध ते भोगताहेत ' असं म्हणता आलं नाही. मुक्त करायलाच पाहिजे. मातेला दुःख होईल ना नाहीतर ! ' तुमचं स्मरण मला होणार नाही, तुमचं स्मरण मला व्हावं अशी इच्छा

असेल तर हे करा, ' असं तिनं सांगितलं.

' तुझा विसर न व्हावा. ' दुसरं काही नकोय. उत्तम भक्तांचं लक्षण आहे. विस्मरण होणं म्हणजे फार दुःख आहे. हे दुःख ज्यावेळेला त्या मातेनं व्यक्त केलं, त्याचं कारण हे आहे, म्हणाले. ही दोन मुलं आहेत. ती व्यवस्था करून टाकली भगवंतांनी. अशक्य असं काहीच नाही त्या शक्तीला. प्रारब्ध कर्म संपलं म्हणा किंवा त्या पुण्याने त्याचा क्षय झाला म्हणा. बुध्दीने काय ठरवायचे ते ठरवून समाधान करून घ्या म्हणतात. भगवंताची इच्छा आहेः-

आनंद झालेला आहे-

माताप्यदृष्टपूर्वं तद्रूपमाश्र्चर्यवत्तदा ।
दृष्ट्वा दत्तोदितं स्मृत्वा प्राह गव्ददया गिरा ।।

आपलं ते मूळ स्वरूपही दाखवलं. दत्तात्रेय स्वरूपाचं दर्शन पूर्वी झालं होतं तेही मातेला दिसलं आहे. ती म्हणाली, 'आपल्या मायेनं मोहात पडले होते इतके दिवस. ते रूप आपलं मला दिसलेलं आहे. संपूर्ण अनंत ब्रम्हाण्ड ज्याच्या उदरामध्ये आहे असे आपण माझ्या उदरातून जन्माला आलात. हे जगामध्ये आपलं महत्व कमीच आहे. ( म्हणजे माझं महत्व वाढलं असं ती म्हणत नाही. ) तेव्हा मला एवढच मागायचय की आपली माया सर्वांना मोहात टाकणारी आहे. माझ्या मनावर तिचं आवरण नसावं. आपल्या स्वरूपाचे स्मरण नेहमी असावं. '

मग भगवंतांनी तिला वरप्रदान केलं ' या स्वरूपाचं तू नित्य चिंतन करीत जा तुला सायुज्य मुक्ती प्राप्त होईल. ही दोन्हीही मुलं शतायुषी होतील. माता पितरांची सेवा करण्याकडे यांचं लक्ष लागेल. विद्या,श्री, पुत्रपौत्र सगळं यांना प्राप्त होईल.'

त्या बंधूनाही आज्ञा केली, ' मी संन्यास दीक्षा धारण करून इथून जाणार आहे. मातापितरांची तुम्ही सेवा करा. गृहस्थाश्रमी सत्पुत्रांचे ते मुख्य कर्तव्य आहे. '

आई वडिलांना तीन वेळा प्रदक्षिणा घातली, प्रणाम केला. आणि काशी क्षेत्रामध्ये श्रीपादवल्लभ निघून गेलेले आहेत.

साधूनुध्दर्तुकामोथ गौकर्णं सज्जनाश्रयम् ।
ययौ यत्र गणेशेन शैवं लिंगं प्रतिष्ठितम् ।।

काशी क्षेत्र, बद्रिकाश्रम वगैरे सगळ्या तीर्थयात्रा करून गोकर्ण क्षेत्रात भगवान श्रीपाद वल्लभ येऊन राहिलेले आहेत. वस्तुतः देवाला इच्छा काहीच नाही. पण त्यांनासुध्दा इच्छा आहे. साधूंचा उध्दार करायचा, एवढी एक इच्छा आहे. त्याकरता ते अवतार घेतात. सगळ्या यात्रा करतात, सगळीकडे फिरतात. कष्ट घेतात. गोकर्ण या महाक्षेत्रात गणेशांनी स्थापना केलेली आहे. तिथे येऊन महाराज राहिलेले आहेत.

गोकर्ण क्षेत्राचं महात्म्य नामधारकांनी विचारलेलं आहे. तेही सिध्द मुनींनी त्यांना सांगितलं. ' श्रीपादवल्लभ ज्या ठिकाणी येऊन राहिले त्या स्थानाचं काही महात्म्य मला सांगा, ' म्हणाले. श्रीपादवल्लभांचं पुष्कळ चरित्र अज्ञात आहे. जे काही ज्ञात चरित्र आहे ते क्रमाक्रमाने पहायचं आहे.

शैवं तत्र गणेशेन कुतो लिङ्गं प्रतिष्ठितम् ।
सज्जनाश्रयमेतत्तु कथं श्रावय मे मुने ।।

भगवान श्रीपादश्रीवल्लभ महाराज मातापितरांची अनुज्ञा घेऊन आपल्या दोघा बंधुंनाही पूर्ण ज्ञानी करून, मातापितरांच्या सेवेकरता त्यांची नेमणूक करून बाहेर पडले. काशी क्षेत्रामध्ये त्याचप्रमाणे बद्रिकाश्रम, सगळ्या तीर्थयात्रा करीत करीत गोकर्ण महाबळेश्वर जे स्थान आहे- आत्मलिंग शंकरांचं- गणेशांनी ज्यांची विष्णूच्या आज्ञेवरून स्थापना केली आहे- त्या स्थानामध्ये येऊन राहिले आहेत. अनेक महात्मे ज्या गोकर्णक्षेत्रामध्ये राहाताहेत. भगवान शंकरांचे जे स्थान, आणि गणेशांनी त्या आत्मलिंगाची

स्थापना केली म्हणून श्रीपादवल्लभांचं येऊन तिथे राहाण्याचं प्रयोजन, म्हणजे जे साधू वृत्तीचे जीव आहेत त्यांचा उध्दार करायचा आहे.

बाकीचे जीव आपल्या कर्माप्रमाणे जन्ममृत्यूच्या प्रवाहात सापडलेले आहेत, त्यांच्या उध्दाराची वेळ जेव्हां येईल तेव्हां येईल. पण जे जीव या परमार्थ मार्गामध्ये अत्यंत आदराने, प्रेमाने आलेले आहेत त्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांचा उध्दार करायचा आहे.

नामधारकाने नंतर प्रश्न केला- शंकरांच्या आत्मलिंगाची स्थापना त्या ठिकाणी गणेशांनी केली होती, असं त्यांनी ऐकलं होतं. ' याचं कारण काय घडलं ? शंकरांचं कैलास पर्वतावर असणारं आत्मलिंग इथं आलं कसं ? त्यांना त्यात भाग घेण्याचं कारण काय ? आणि सगळ्याही महात्म्यांचं हे आश्रयस्थान कसं झालं ?' हा सर्व वृत्तांत ऐकण्याची नामधारकाने इच्छा प्रदर्शित केल्यानंतर सिध्द सांगतायत.

भगवान् विष्णूंच्या आज्ञेनं हे शिवलिंग भगवान् गणेशांनी रावणाकडून घेतलं आणि त्याची प्रतिष्ठा करून टाकली. द्वादश ज्योतिर्लिंगासारखी काही भगवंतांची स्थाने स्वयंभू अशी आहेत. स्वतः भगवान् त्यारूपाने अवतीर्ण झाले. तो एक अवतार मानतात भक्तीशास्त्रामध्ये. अर्चन, प्रतिमा, मूर्तिसुध्दा भगवंतांचा एक अवतार आहे. त्या मूर्तीमध्ये स्वयंभू अशा काही मूर्ती असतात. आपोआप भगवान् त्या रूपाने प्रगट होतात. देवस्थापित काही मूर्ती असतात.ईश्वराच्या आज्ञेने सर्व लोकांच्या कल्याणा करता म्हणून देवांनी आणि सिध्द महात्म्यांनी स्थापन केलेल्या काही मूर्ती आहेत. वैदिक शास्त्रामध्ये जो विधी आहे त्या विधी प्रमाणे काही मूर्तींची प्रतिष्ठा केली जाते. असे प्रकार त्या मूर्तीमध्ये आहेत.

त्यापैकी हे जे आत्मलिंग आहे, शंकरांच, गणेशांकडून याची स्थापना झालेली आहे. तर ते शिवलिंग रावणाकडे कसं आलं ? त्याने ते कसं मिळिवलं ? त्याचा वृत्तांत सिध्द सांगताहेत. रावणाची माताही शिवभक्त होती. रावणही शिवभक्त होता. पण

तो अर्थार्थी होता. जिज्ञासू किंवा आर्त अशा परिस्थितीत नव्हता. जास्तीत जास्त आपली इच्छा पूर्ण करावी, ज्या ज्या इच्छा, वासना आहेत त्या ईश्वर कृपेने पूर्ण करुन घ्याव्यात असे विचार करणारे काही भक्त असतात. वासनांचा निरोध करणे, इंद्रियांचा निरोध करणे इकडे त्यांच लक्ष नाहीये. कारण इंद्रियांनी विषयांचा भोग घेत असताना वासना वृध्दी होत असती. विषयांचा उपभोग घेतल्यानंतर सगळ्या इच्छा पूर्ण होतील असे वाटते लोकांना; कामना, इच्छा या विषय भोगाने पूर्ण करुन घ्यायला काय हरकत आहे ? पण होऊ शकत नाही. ज्या विषय वासना मनामध्ये उत्पन्न होतात त्या थांबत नाहीत. तृप्ती नाहीये. भोगाने आणखी तृप्ती होईल, वासना क्षय होईल, हा मार्गच नाहीये. मनाला जास्ती जास्ती विषय भोग मिळायला लागले म्हणजे मनामध्ये त्या विषयींच्या इच्छा वाढत असतात.

म्हणून काम, वासना, इच्छा या घालिवल्या पाहिजेत. त्या नाहीशा करण्याकरता म्हणून बाह्येंद्रिये आणि अंतरेंद्रिये यांचा निरोध प्रथम केला पाहिजे. निरोध केल्यानंतर ज्या काही वासना साठल्या असतील पूर्वीच्या भोगांनी, त्याचीच निवृत्ती आणखी राहिलेली आहे. नविन वासनांची भर काही पडत नाहीये. त्यासाठी इंद्रियांचा निरोध प्रथम करायला सांगितला आहे.

पण रावणांच्यासारखे म्हणतात इंद्रियांनी विषयाचा भोग घेऊनच आपली तृप्ती होते, वाढल्या वासना तर वाढेनात का. निरोधापासून काय सुख आहे वगैरेंचा विचारच त्याच्या मनामध्ये नाहीये. म्हणून या भगवंतांनी सांगितलेल्या मनोनिग्रहाकडे, निरोधांकडे त्यांच लक्ष नाहीये. लक्ष नाही म्हणा किंवा त्यांची प्रकृतीच तशी बनून गेलेली आहे. 'प्रकृतिंस्त्वा नियोक्षती ' म्हणून अर्जुनाला जे सांगितले. ही असुरी, राक्षसी प्रकृतीच बनून गेलेली आहे.. आणि त्या प्रकृती बरोबर ते वाहात जाताहेत. इकडं त्यांच लक्ष जात नाहीये. तेव्हां रावणही शिवभक्त होता. त्याला शंकरांचा प्रसाद आपल्या इच्छा पूर्ण व्हाव्यात यासाठी पाहिजे होता. अर्थार्थी भक्त तो आहे. असूर आहे. त्याची माता मात्र कैलास पर्वतावर आपल्याला

राहायला मिळावं, शंकरांची पूजा करायला मिळावी, रोज त्यांच दर्शन व्हाव अशा इच्छेने शिवपूजा करीत होती. एकदा पार्थिव लिंग तिने तयार केलं मृत्तिकेपासून, शिवपूजन चालू आहे. रावण दर्शनाकरता आला. मातेच्या दर्शना करता येत असे तो. काही काही चांगले गुणही असतात असूरांच्या जवळ. आपल्या प्रकृतिच्या जे विरुद्ध असेल ते त्यांना मान्य नाही. त्यांना अनुकूल असेल ते मान्य असते. असुरांनी शास्त्रीय पध्दतीने साधना केली आहे. म्हणजे शास्त्रावर पूर्ण अविश्वास असा त्याचा अर्थ नाही. आईला मातीचे शिवलिंग करुन पूजा करताना पाहिल्यावर त्याने विचारले, ' आपल्याला काही कमी आहे का? रत्नाचं, सोन्याचं वगैरे असं चांगलं शिवलिंग तयार करुन त्याची पूजा करावी.'

रावण केवळ बाह्य दृष्टीने बोलला, पूजा करायला बसलेलं असताना सुध्दा चांगलं दिसलं पाहिजे. पण मृत्तिकेचं लिंग असलं तरीसुध्दा तिथे शंकरांच आवाहन करता येत. प्रेम आहे, भक्ती आहे, इकडे त्याचे लक्ष आहे. अहंकार आहे. या अहंकारामुळे त्याने आपल्या मातेला विचारलं,' काय, याचं (पूजेचं) फळ काय मिळतं?' ती म्हणाली,'कैलास पर्वतावर राहायला मिळतं शंकरांच्या जवळ.' तो म्हणला,' कैलास पर्वतच मी घेऊन येतो.' त्याच्याकडे नैसर्गिक बल आहेच शिवाय तपोबलही आहे. शास्त्रीय प्रयत्नांनी असूर आपल्या बलाचे संवर्धन करतात. पण केवळ भोगाकडे त्याचं लक्ष आहे.

कैलास पर्वताजवळ तो गेला आणि तो पर्वतच त्याने उचलला म्हणतात. तो कैलास पर्वत आपल्या आईकडे घेऊन जायचाय. सगळा भूभाग हालायला लागला. घाबरली मंडळी. पार्वती मातेलाही आणखी भीती उत्पन्न झाली. शंकरांना ते समजलं. पार्वती मातेने त्यांना इकडे लक्ष द्यायला सांगितले. सगळ्या लोकांचा आता नाश होणार, म्हणाली. रावणाची शक्ती जरी कैलास पर्वत उचलण्याची असली, तरी शंकरांची शक्ती ही काही मर्यादीत नाही. त्यांनी सहज आपल्या डाव्या हाताने तो पर्वत दाबल्याबरोबर त्याच्या खाली रावण सापडला. अगदी मरणोन्मुख

अवस्था झाली. शरण आलेला आहे भगवान् शंकरांना. मग त्यांनी सोडून दिलं. तिथून उठला तो. आणखी शंकरांना संतुष्ट करण्यासाठी गायन करायला लागला. म्हणजे गायनाचाही त्याचा अभ्यास होता, असं दिसतय.

विद्या, कला मिळवायला हरकत नाही. जिज्ञासा आली पाहिजे मात्र. ऋग्वेदाची पदे रावणाने पाडली आहेत. त्या पदांचाच आज अभ्यास चालू आहे. असं सांगतात. म्हणजे त्याचा वेदाचाही अभ्यास आहे, शास्त्राचाही अभ्यास आहे.संगीताचा अभ्यास आहे. तेही एक शास्त्रच आहे मोठं. वाद्य वगैरेही लागतात या गायनाला. जास्तीत जास्त रस उत्पत्ती करता. उत्तम राग रागिणींचे. कलांचं ज्ञान आहे. कोणच्या रागाची कोणती देवता आहे त्याचं ज्ञान आहे, हे सगळं संगीत शास्त्रामध्ये शास्त्रकारांनी सांगितलं आहे.

भैरवी रागाचं एक ठिकाणी वर्णन केलं आहे. भैरवी ही एक देवता आहे. राग देवता. केवळ स्वरोदय ध्वनी जे आहेत, पद्याचे वर्ण, त्या वर्णाच्या आधाराने ते ध्वनी वगैरे वेगळे वेगळे, आरोह, अवरोह ते सगळे आणखी दाखिवले जातात. त्या भैरवीचं ज्ञान शास्त्रकारांनी सांगितलं आहे. ही देवता कमलपत्रांनी भगवान महेशांचं अर्चन करीत आहे. तिच्या हातामध्ये माला आहे आणि तिचा जप चाललेला आहे. अशी ही भैरवांची स्त्री भैरवी आहे.

आता जो संगीततज्ञ आहे, त्याला हे सर्व ज्ञान पाहिजे. म्हणजे गायन जरी झालं, लोकरंजन जरी झालं, आत्मसमाधान जरी मिळालं तरी त्या कालाची भैरवी ही देवता आहे आणि त्या कालाला ते गायन करायचे. तर त्या देवतेचं अनुसंधान, स्मरण करून जर तो गायन करीत असेल त्या त्या देवतांची उपासना त्याला अनायासे घडती आहे. हे सगळं ज्ञान रावणाला आहे. वाद्य वेगळी वेगळी आहेत. सर्वांना आनंद देणारं ते दिव्य गायन आहे. आणि त्याच्यामध्ये त्याने उत्तम सिध्दी मिळिवली आहे त्यामुळे शंकरसुध्दा आणखी प्रसन्न झाले.

सर्व विद्या, त्याचे संप्रदाय हे शंकरांच्या पासून सुरू झालेले आहेत. त्यामुळे उत्तम गायन रावणाचं ऐकल्याबरोबर

प्रसन्न झाले शंकर. जवळ आले रावणाच्या. म्हणाले, ' रावणा, काय तुला पाहिजे ते मागून घे. ' आता इथे काय कमी आहे ? जे मागेल ते मिळेल. रावणाने जर ज्ञान मागितलं असतं, मोक्ष मागितला असता तरी त्याला मुक्त केलं असतं. बाहेरच्या ज्या विद्या आणि कला आहेत त्यांचा उपयोग कसा करायचा तशी बुध्दी मिळाली पाहिजे ईश्वराच्या कृपेने. परोक्ष ज्ञान का होईना, पण परोक्ष ज्ञानसुध्दा पूर्ण पाहिजे. परोक्ष ज्ञानानेसुध्दा पापक्षय होतो असे पंचदशीकार सांगताहेत. बुध्दीपूर्वक जी पापे घडलेली असतात ती परोक्ष ज्ञानाने नष्ट होतात. अपरोक्ष ज्ञानाच्या दृष्टीने त्याला कमीपणा असेल. परंतु परोक्ष ज्ञान सुध्दा ज्याला मिळालं नाही त्याने परोक्ष ज्ञानाची निंदा करून उपयोग नाही. अपरोक्ष ज्ञान झालेल्या माणसाने म्हटलं तर शोभेल. परोक्ष ज्ञान हे सुध्दा शास्त्रच आहे. त्या शास्त्राप्रमाणे जर उत्तम गुरू पासून ज्ञान मिळवलेलं असेल, त्याच्यामध्ये सुध्दा त्याची जर तपश्चर्या झाली असेल तर त्याचाही त्याला चांगला उपयोग होतो. योगक्षेम तर चालतोच पण ईश्वरसाक्षात्कार सुध्दा त्याला होऊ शकतो. रावण जरी राक्षस होता तरी गायनकलेचं उत्तम ज्ञान त्याने मिळिवलेलं आहे. वैराग्य म्हणजे ज्ञानाकरता वैराग्य उपयोगी नाहीये. ज्ञान हे मिळिवलच पाहिजे मग ते परोक्ष असो किंवा अपरोक्ष असो.

त्याचं फल त्याला मिळालं. शंकर प्रसन्न झाले. कैलास पर्वत हालवून, सगळी पाडापाड करून, त्रास देणारा हा दैत्य आहे हे त्यांनासुध्दा माहीत होते. परंतु त्याने संपादन केलेल्या कलेचे ज्ञान हे सुध्दा अप्रतिम आहे. गुण ग्राहक आहेत भगवान शंकर. शंकरांप्रमाणे गुण घ्यावेत आणि दोष टाकावेत असं एका सुभाषितकारांनी सांगितले आहे. भगवान शंकराच्याप्रमाणे गुणदोषांकडे दृष्टी ठेवावी. दुसऱ्याकडे चांगले गुण असतील तर अगदी मान हालवून वा, वा शाबासकी देऊन त्याचा सत्कार करावा. आणि दोष असेल दुसऱ्याचा तर कंठाच्या वर, बाहेर येऊ देऊ नये. ' दोषज्ञ ' असे ज्ञानी माणसाचं नांव आहे. ज्ञानी माणसाला दुसऱ्याचे दोषही समजतात तरच तो ज्ञानी आहे ना !

पण दोष समजले तरी कंठाच्या बाहेर काढायचे नाहीत.

त्याला दृष्टांत त्यांनी शंकरांचा दिलेला आहे. चंद्र हा प्रकाश देणारा आहे, हा त्याचा गुण पाहून त्याला मस्तकावर घेतलं शंकरांनी. आणि जे हलाहल विष उत्पन्न झालं समुद्रातून, ते कंठातच ठेवलं, बाहेर काढलच नाही. तेव्हां दोषांचं उद्घाटन करू नये. ज्ञान असावं. त्याप्रमाणे कोणी चांगला असो, वाईट असो, ज्ञानी महात्म्यांची त्याच्याकडे पहाण्याची समान दृष्टी असते. ' आशुतोष ' म्हणतात भगवान शंकरांना. ते फार लवकर संतुष्ट होतात. बहुतेक सगळे असुर शंकरांचीच भक्ती करणारे आहेत. विष्णूंच्याकडे जाणारे दैत्य फारसे नाहीयेत. कमी आहेत.

रावणाची प्रकृती आड आली. शंकर भगवान प्रसन्न झालेले आहेत. ज्यांनी ज्ञान दिल्यावर मुक्ती आहे पुनर्जन्म नाही, काही नाही, अशी वेळ आलेली आहे. परंतु ते मागण्याची बुध्दी मात्र नाहीये. वास्तविक आई मातीचे शिवलिंग करून पूजा करीत होती. ते याला पसंत पडलं नाही. मातेचं काम करण्याकरता म्हणून आलेला आहे हा. प्रसंगाने त्याला तो कैलास पर्वत नेणं साध्य झालं नाही. कसा तरी सुटला त्यातून. गायन विद्येमुळे शंकर प्रसन्न झाले. पण आईचं अगोदर बघायला पाहिजे की नको ? ते बाजूलाच राहिलं. प्रथम आपलं स्वतःचं मागून घेऊन मग आईची गोष्ट मागतोय.

'मला सुवर्णाची लंका नगरी राजधानी पाहिजे. लक्ष्मी माझ्याजवळ दासी म्हणून राहिली पाहिजे. ब्रह्मदेव जे आहेत सृष्टीमध्ये ते ब्रह्मसूत्र लिहून ठेवताहेत. जन्माला घालताना, कोणाला काय सुखदुःख मिळणार वगैरे. त्यांनी माझ्याजवळ राहून माझी सेवा करावी. त्याप्रमाणे मृत्यू माझा दास व्हावा. ' म्हणजे झालच की नाही ! तो यांचा दास झाल्यावर यांच्यावर आक्रमण कसा करील? सगळे देव हे माझे सेवक झाले पाहिजेत. असे सगळे स्वतःसाठी वर मागून घेतले. मग आईची गोष्ट काढली. ' माझी माता कैलास पर्वतावर राहून रोज आपलं दर्शन व्हावं म्हणून रोज पूजा करतीये. तेव्हां कैलास पर्वत नेण्याकरता मी आलेलो

आहे. आपणा सगळ्यांसकट कैलास पर्वत घेऊन मी जाणार आहे. ही माझी इच्छा आहे. मला हाच वर मागायचाय. '

भगवान् शंकर म्हणाले,' रावणा, कैलास पर्वत नेऊन काय करणार तू ?'

कैलासेन तु किं साध्यं प्राणलिङ्गं ततोधिकम् ।
गृहाणानेन मादृक्त्वं पूस्ते कैलासवभ्दवेत् ।।

संतोष झाल्यानंतर भगवान शंकर काय वर देतील सांगता येत नाही. ' माझं एक आत्मलिंग आहे. तेच तुला मी देतो. ' स्वतःजवळ जे आत्मलिंग म्हणून ठेवायचे तेही द्यायला तयार झाले. कैलास पर्वतापेक्षाही ते श्रेष्ठ आहे. ' आणि याची पूजा उपासना तू कर म्हणजे माझ्यासारखाच तू होशील.' असे म्हणाले. म्हणजे दुसरा ईश्वरच निर्माण केला त्यांनी. वृत्ती त्यांची बदलली नाही. तू ईश्वर होशील म्हणून सांगितलं म्हणजे सगळी सत्ता रावणाच्या जवळ येईल आणि तुझी नगरी म्हणजेच कैलास पर्वत होईल म्हणाले.

ह्यांनी त्याला वर दिला,'तू माझ्या सारखाच होशील.' पण तो यांना विचारणार आहे नंतर? असुर का म्हणायचं यांना? देवाची भक्ती करतात हे सगळे असुर. परंतु आपला अहंकार जो आहे तो घेऊन कार्य करतात ते. कर्म करतात, उपासना करतात. फार मोठी तपश्चर्या आहे असुरांची. तपश्चर्या करताना अन्नपाण्याचीही ते पर्वा करीत नाहीत. आणि एकदा उपास्य देवता प्रसन्न झाल्यानंतर वर मिळाल्यानंतर त्यांची बुध्दी अशी आहे की देवाने वर काय मला उगीच दिला? केवढी तपश्चर्या मी केलेली आहे. म्हणून वर दिलेला आहे. म्हणजे ईश्वराबद्दल कृतज्ञता स्वतःच्या मोठेपणापुढे त्यांना काही वाटत नाही. म्हणून ते असुर ठरलेले आहेत. भक्ती करीत असतील ते. बिभिषणही भक्त होता, रावणही भक्त होता. पण बिभिषण हा भक्त शेवटपर्यंत राहिलेला आहे.

तर, ' तूच माझ्याप्रमाणे होशील.' म्हणजे आता हा विचारणार ह्यांना? तुझी नगरीच कैलास पर्वताप्रमाणे होईल म्हणाले. म्हणजे त्याच्या आईची जरी बुध्दी असली की भगवान् शंकर श्रेष्ठ आहेत, कैलास पर्वत श्रेष्ठ आहे, ती तरी आता राहील की नाही कोणास ठाऊक. 'त्या हिरण्यकश्यपूची तपश्चर्या लवकर एकदा थांबवा,' अशी सर्व देवांनी ब्रह्मदेवाजवळ जाऊन विनंती केली. ' तुमच्या सृष्टीच्या विरुध्द सृष्टी करावी अशी त्याची इच्छा आहे. तुम्ही जे देव म्हणून ठरविलेत ते तो दैत्य ठरविणार आणि दैत्यांना देव ठरविणार. ईश्वरच तो होणार आहे तेव्हा त्याची तपश्चर्या थांबवा तुम्ही लवकर.' साममार्गाने जाऊन खलाचा विजय नाही. त्याचा पराजय कपटानेच केला पाहिजे.

तेव्हा शंकराने असा वर देऊन सांगितलं, ' तुझ्या नगराला जाईपर्यंत हे लिंग खाली ठेवू नकोस. खाली ठेवलस की तिथेच ते स्थिर राहील. काढता येणार नाही नंतर.' म्हणजे सगळे त्याला सुचिवलेले आहे. मन म्हणजे अगदी उदार. ज्याला ' आत्मीय ' म्हटलेलं आहे, त्याच्या गुण दोषांचा काहीही विचार नाही. भगवंतांचं समत्व हेच आहे मोठं. 'तुझ्या नगरामध्ये गेल्यानंतर या लिंगाची स्थापना तू कर. ' झालं. ते आत्मलिंग त्याला देऊन टाकलं शंकरांनी. आनंद झाला त्याला. आणखी लंकेला जाण्यासाठी तो निघालेला आहे. नारद होतेच त्या ठिकाणी. असुर जिथे जात तिथे नारदांचा संचार असायचा. हे असुर कुठे जातात, काय करतात, कोणाकडून काय वर मिळिवतात, त्यांनी आपली उन्नती किती प्रकारे केली आहे या सगळ्याचा विचार नारदांनी करावा. आणि ते संरक्षकांना म्हणजे महाविष्णूंना जाऊन सांगायचे.

नारदांना हे समजलं की रावणाला शंकरांनी असा मोठा वर दिला आहे. म्हणजे तो रावण आता शंकरच होणार होता. ब्रह्मदेवांच्या लोकामध्ये गेले नारद. ते योगीच होते. अशा वेळेला योगसिध्दीचा वापर करावा लागतो. रावण लंकेला जाऊन पोहोचण्याच्यापूर्वी काय करायचं ते केलं पाहिजे. ब्रह्मलोकामध्ये मनोगतीने गेलेले आहेत. ब्रह्मदेव म्हणाले, ' चला. आपण

वैकुंठलोकामध्ये जाऊ. ' ते लगेच विष्णूंच्याकडे आलेले आहेत. ब्रह्मदेव विष्णूंना म्हणाले, ' रावणाचा बंदोबस्त तुम्हीच करणार आहात. तो काही कोणाला आटोपणार नाही. शंकरांचा त्याला वर मिळालाय. सर्व देव त्याला अनुकूल होणार. ' मग नारद, ब्रह्मदेव आणि विष्णू कैलास पर्वतावर आले. शंकरांना म्हणाले, 'काय हे केलत आपण! रावणाला तुम्ही काय असा वर द्यायचा का, महादेवा ? सगळे देव त्याने बांधून ठेवले आहेत. सगळ्या देवांचा अहंकार काढून घेतला त्यांनी. रावण कसा आहे तुम्हाला माहीत होतं. अज्ञानानं झालं, असं नाहीये. शास्त्र विरूध्द वागणारा सगळ्या धर्माचा विच्छेद करणारा, प्रत्यक्ष राक्षसच आहे तो आणि ह्याला तुमच्यासारखा करणार तुम्ही ? '

शंकर म्हणाले, ' झालं खरं, होऊन गेलं. त्याचं गायन ऐकून मला संतोष झाला. गायन विद्येच्या योगाने माझं मन त्याने आकर्षित केलं. त्यामुळे मी आत्मलिंग दिलं. आता मी तुम्हाला उपाय सांगतो. हे तुम्हाला पसंत नाहीयेना ? संरक्षण कार्य तुमच्याकडे आहे. संहार खातं आमच्याकडे आहे. त्यालाही काही काल आहे. सध्यातरी संहाराचे काही काम नाही. आणि हे जर तुम्हाला अनुकूल नसेल तर अजून तो लंकेला जाऊन पोहोचलेला नाही, तोपर्यंत तुम्हाला काय करायचं तर करता येईल. '

विष्णूंना शंकरांचा अभिप्राय समजला. त्यांनी सगळी पुढची तयारी चालीवली. शंकरांचा भक्त आहे. म्हणून या दुष्ट माणसाची उपेक्षा करून भागणार नाही. तो अजून लंकेला गेलेला नाही तोपर्यंत आम्ही कसेही वागलो तरी शंकरांना आणखी राग येण्याचं कारण नाही. त्याला त्याच्या इच्छेप्रमाणे वर दिला, सगळं दिलं. त्याचा उपयोग असा करावा हे शंकरांना मान्य होणार नाही काही. म्हणून त्यांनी नारदांना सांगितलं, ' तुम्ही त्याची भेट घ्या. थांबवा त्याला वाटेत. आपल्या नगराला जाऊन तो शिवलिंग स्थापन करणार पण मध्ये वाटेत कुठं ठेवलं तर तिथेच ते स्थिर होणार. त्या नगरापर्यंत त्याने जाऊ नये शिवलिंग घेऊन, याकरता आपण त्याला थांबवा'.

आणि गणेशांना भगवान् विष्णूंनी सांगितलं 'विघ्न करणे.' व्यावहारिक कार्य करणारा पारमार्थिक कार्य करणारा, सगळ्या विघ्नांचा राजा आहे भगवान् गणेश. सगळी विघ्न त्यांच्या ताब्यात आहेत. सर्व कर्मांच ज्ञान त्यांना आहे.तेव्हा त्यांना सांगितले, 'इथं आता एक विघ्न तुम्ही करा. रावणाने आपल्या नगरापर्यंत हे शिवलिंग नेऊ नये. तुम्ही हस्तगत करुन घ्या ते. आणि तिथेच त्याची स्थापना करा. त्याच्या नगरामध्ये हे शिवलिंग गेलं की तो उपासना सुरू करणार, तो स्वतः शंकर बनणार त्या नगरीलाही कैलास पर्वत बनिवणार आणि हा शंकरांचा कैलास वगैरे सगळं बाजूला राहाणार.' म्हणून या हेतूने आणखी विष्णूंचा प्रयत्न चाललेला आहे.

प्रयत्नांनी आपली उन्नती कोणीही करुन घ्यावी. त्याबद्दल काही नाही. कारण ते असुर दैत्य वगैरे सुध्दा ऋषीकुमारच आहेत ना. वेदाध्ययन झालेलं आहे. परंतु आपण जी उन्नती करुन घ्यायची, आपण जे सामर्थ्य मिळवायचं त्यानी इतरांना जर पिडा ते देऊ लागले मात्र सगळ्या जगाचा विध्वंस होईल, म्हणून एकतर त्यांची उन्नती थांबिवणं, हा एक मार्ग किंवा ते जमलं नाही तर शेवटी त्यांचा नाश हा ठरलेलाच आहे. करायचाच आहे तो. त्याकरता भगवान् विष्णूंना यायचच आहे.

नारद येऊन भेटले रावणाला रस्त्यामध्ये. चौकशी केली, 'काय रावणा कुठून आलास ' वगैरे. तो म्हणाला,' आत्ता कैलास पर्वतावरुन आलो. भगवान शंकर संतुष्ट झाले माझ्यावर. त्यांनी हे आत्मलिंग दिलेलं आहे.' नारदांना सगळी माहिती होतीच ती. कसं शिवलिंग आहे, त्याची उपासना काय आहे वगैरे. नारदांनी विचार केला त्याला आता बोलण्यामध्ये गुंतवायचय. कदाचित नारद आपल्याला अनुकूलच आहेत असा त्याचा ग्रह व्हावा म्हणून चाललेले आहे.

ते म्हणाले,' हे कुठलं शिवलिंग आहे तुला सांगतो. एक मोठा मृग होता पूर्वी, वनातल्या अनेक प्राण्यांचा त्यांनी नाश करावा. ब्रह्मा, विष्णू, महेश्वर हे मृगयेला गेले असताना त्या

मृगाला त्यांनी मारलं आणि त्याच्या शिंगाखाली असलेली तीन लिंगे त्यांनी घेतली. सगळ्यांना ती मान्य झाली. प्रत्येकाने आणखी आत्मलिंग म्हणून आपल्या जवळ ठेवली आहेत. त्यापैकी हे शिवलिंग दैवानं मिळालं तुला, रावणा. मोठा भाग्यवान दिसतोयस. याच्या योगाने सायुज्य मुक्ती मिळेल. तू साक्षात् शंकर होशील.'

रावणाला लंका नगरीला जायची घाई झाली होती. कधी एकदा लंकेला जातो आणि हे शिवलिंग तिथे स्थापन करतो. आपल्या नगरात वाटेल तशी उपासना आपण करू आणि शिवरूप आपण होऊ. ही त्याला त्वरा झालेली आहे.तो म्हणाला, ' नारदा, मला आता काहीही ऐकायचं नाही, मला वेळ नाही. आणि मला लवकर लंका नगरीला पोचलं पाहिजे. '

आता नारद म्हणाले,' तू ऋषीकुमार आहेस. संध्याकाळ झालेली आहे. संध्यावंदनाची वेळ आलेली आहे. तर संध्या केल्याशिवाय कसा पुढे जातोस ? विचार कर. ' असं सांगून नारद निघून गेले. रावण हा संध्या करत होता, हे या वरून सिध्द होते. असुर जरी असले तरी शास्त्राची आज्ञा पाळायची बुध्दी त्यांच्याकडे होती. त्यामुळे संध्यादि नित्यकर्म त्याची चालू होती. पापक्षय व्हावा असं वाटतं ना प्रत्येकाला ! त्याप्रमाणे आता संध्या करायची आहे इथं समुद्रतीरावर. पण हे शिवलिंग कुठे ठेवायचं ? ' कोणचही कर्म करताना ते जवळ ठेवायचं नाही. कुठं तरी ठेवायचं आणि नंतर कर्म करायचं, ' असं शंकरांचं सांगणं होतं.

भगवान विष्णूंच्या सांगण्याप्रमाणे गणेश परमात्मा ब्रह्मचारी वेष धारण करून तिथे फिरत होते. रावणाची पुष्कळ इच्छा असेल संध्या करून नगराला जाऊ आणि मग तिथे हे शिवलिंग स्थापन करू. संध्या केल्याशिवाय जायचे नाही. आता हे शिवलिंग कोणाजवळ तरी दिले पाहिजे. इतक्यात हे गणेश ब्रह्मचारी वेषात त्या वनात फिरताना दिसले. बटु लहान ब्रह्मचारी आहे म्हणाला. 'माझं जर शिवलिंग याने साभाळलं; घेऊन उभा राहिला तर मला संध्या करता येईल.' विश्वास बसला त्याच्यावरती.

एकदम जाऊन रावणाने त्याला हाताला धरून विचारले, 'का रे मुला, कोणाचा मुलगा आहेस तू? तुझे आईबाप कोण आहेत ?'

तो मुलगा म्हणाला,' माझ्या आईवडिलांचं नांव कशाला विचारता ? काय देणं लागतात काय तुमचं ते ? भगवान् शंकर हे माझे पिताजी आहेत. पार्वती ही माझी माता आहे. सोड मला. मला जायचय. मला तुझी भीती वाटती. ' रावण म्हणाला,' माझं एवढं काम तू कर. माझी संध्या होईपर्यंत हे लिंग मी तुझ्याजवळ देतो. हे घेऊन उभा रहा. संध्या झाल्यावर मी घेऊन जाईन. सुवर्णाची लंका माझी नगरी आहे. तिथं तुला रहायला घेऊन जाईन. तुझी सगळी व्यवस्था करीन.'

गणेश म्हणाले,' ते तुझं शिवलिंग वगैरे काही मला घेता येणार नाही. ते माझ्या हातून पडलं बिडलं तर मी काय करणार ? मला इतकं काही जड लिंग घेता येणार नाही. आणि तुझ्या लंका नगरीत तर मला बिलकुल यायचं नाही. तिथे सगळी राक्षस मंडळी असतील.' तरी पण रावणाने त्यांची समजूत वगैरे केली आणि विरोधी अशा गणेशांच्या हातात ते शिवलिंग पडलेलं आहे. हे ज्ञान रावणाला नाहीये.

औरंगजेब पुष्कळ हेर नेमायचा. जो मोठ्या कामावर नेमलेला हेर असेल त्याच्यावर दुसरा एक हेर. असे कितीतरी हेर असायचे. समजून यायला पाहिजे बरोबर काम करतो की नाही !

गणेशांनी दुसरं रूपच धारण केलं होतं. अगदी लहान वय आहे. त्यामुळे रावणाला संशय येण्याचं कारणच नाही ना ! त्यामुळे ते शिवलिंग गणेशांच्या ताब्यात आलेलं आहे. हा संध्या करायला बसलेला आहे. त्यावेळी गणेशांनी सांगितलं,'हे जर मला जड झालं तर मी तुला फक्त तीन वेळा बोलावीन. तू आलास तर तुझ्या ताब्यात देईन आणि जर आला नाहीस तर मी ते याच ठिकाणी जमिनीवर ठेवीन.' ही त्याला अगोदरच कल्पना दिली. तीन वेळा बोलावणार म्हणजे अर्ध्या अर्ध्या मिनिटांच्या अंतराने हांक मारणार नाही कशावरून ? याची रावणाला कल्पना

नाहीये. सगळे देव आकाश मंडळामध्ये जमा झाले आहेत. गणेशांच्या ताब्यामध्ये शिवलिंग आलेलं आहे. ही एक गोष्ट चांगली झाली. परंतु तो रावण लवकरच मध्ये उठून आला तर ? म्हणून पुढचं कार्य कसं होतं पहाताहेत ते. सिद्धी बुध्दीपती आहेत ना ते.' बुध्दी देण्याचे कार्य त्यांच्याकडे आहे. कार्यसिध्दी, फल देण्याचं कार्यही ईश्वराच्याकडे आहे.

थोडा वेळ वाट पाहिली. हांक मारली. ' रावणा, हे जड झालय, म्हणाले. ठेवू का खाली ?' तो बिचारा संध्या करीत होता. कर्म व्यवस्थित करायचं. त्याला इतकी जी सत्ता मिळाली त्याला कारण त्याच्याकडे काही चांगले गुणही असले पाहिजेत. कर्म करीत होता तो. त्या कर्मावर श्रध्दा त्याची असली पाहिजे ना ! नाही कसं म्हणता येईल ? परंतु त्या असुरी प्रकृतीमुळे आपल्या हातून अन्याय घडतो आहे, पाप घडते आहे इकडे मात्र लक्ष नाहीये. अहंकारामुळे आपण जे वागतो तेच बरोबर आहे हीच त्याची वृत्ती वाढत गेल्यामुळे त्याचा नाश झालेला आहे. मनोनिग्रह किंवा इंद्रिय निग्रहाकडे या असुरांनी बिलकुल लक्ष दिलेलं नाही. आपल्या इच्छेप्रमाणे वाटेल तसा भोग घेणं हाच त्यांनी आपला पुरुषार्थ ठरविलेला आहे. अर्थ आणि काम यांनाच प्राधान्य दिलं आहे. धर्माचरण जरी करीत असले तरी धर्म हा त्यांनी गौण ठरविलेला आहे.

तीन वेळा बोलावूनसुध्दा रावण न आल्याने ते शिवलिंग जमिनीवर ठेवले आणि त्याची स्थापना झालेली आहे. थोड्यावेळाने रावण संध्या आटोपून आलेला आहे. भूमीवर लिंग ठेवल्याने गणेशांना मारु लागला. त्याने गणेशांना विचारलं, 'तुला ठेवू नकोस असं सांगितलं असतांना भूमीवर का ठेवलस?' करणार काय आता मारून तरी? ख़ाली ठेवलेलं आहे ना एकदा. 'पित्याला सांगतो;' असं म्हणून गणेश निघून गेले.

आता ते शिवलिंग भूमीतून काढायचं आहे. पण ते मात्र आता शक्य नाही. कैलास पर्वत उचलणारा रावण त्याची केवढी शक्ती असली पाहिजे. तो कैलास पर्वत त्याने लंकेपर्यंत नेला

असता की नाही ही गोष्ट आणखी निराळीच आहे. रावण ते शिवलिंग धरून हालिवतो आहे, ओढतो आहे पण त्याला देखिल ते शिवलिंग काही काढणं शक्य झाले नाही. भूमी हालू लागली पण शिवलिंग काही जागचे हालले नाही. 'महाबळेश्वर ' त्या लिंगाचं नांव आणि खरोखरचं महाबलवान रावणाला देखिल ते काढून घेता आलेलं नाही. थोडसं मुरडून काढतो आहे. गोकर्णाकृति झाली त्यामुळे. गोकर्ण महाबळेश्वर असचं त्याचं नांव पडलेलं आहे.

म्हणून सिध्द सांगताहेत नामधारकाला–

कैलासोयं क्षितौ साक्षाद्यत्रेशः परिवारयुक्।
सदा जागर्त्यतस्तत्र स्थिता देवर्षिसज्जनाः।।

सज्जनाश्रय म्हणून जे सांगितले त्याचे कारण आहे. भगवान् सदाशिव या आत्मलिंगरुपाने नेहमी याठिकाणी आहेत. त्यामुळे सगळे देव, ऋषी महात्मे, तपस्वी महापुरुष इथे येऊन राहिलेले आहेत. भगवान् शंकरांची उपासना करताहेत याठिकाणी येऊन. नुसते देवादिकच नव्हेत तर असुर आहेत, राक्षस आहेत, पशुपक्ष्यांच्या योनीला गेलेले भक्त आहेत. त्यांनी येऊन भगवान् शंकरांची कृपा संपादन केलेली आहे. शांत, पवित्र स्थान आहे म्हणून श्रीपादश्रीवल्लभ ह्या ठिकाणी येऊन राहिलेले आहेत.

साधक मंडळी इथे येताहेत. साधना करुन राहातात. त्यांच्या साधनेत जर काही प्रतिबंध येत असेल तर तो दूर करावा, आणि त्यांना मार्गदर्शन करुन त्यांचा साधनाभ्यास निर्विघ्नपणे पार पडावा, या उद्देशाने ते इथे आलेले आहेत. गणेशांनी शिवलिंगाची स्थापना केली हा एक कथाभाग झाला. आता त्या गोकर्ण क्षेत्रात कोणाचा उध्दार झाला याबद्दल एक कथा सांगताहेत सिध्द.

मित्रसह नांवाचा एक मोठा धार्मिक राजा होता. भगवद्‌भक्त होता. तो श्रेष्ठ जनांची पूजा करणारा, त्यांच्याबद्दल आदरभाव राखणारा असा होता. प्रजापालन उत्तम प्रकारे करी. त्याने एकदा

शिकारी करता वनामध्ये गमन केले. शिकार करत असताना एक दैत्य त्याला भेटला. राजाने बाणवर्षाव करून त्या दैत्याला मारले. त्याचा बंधू तिथे होता. त्या दैत्याने आपल्या बंधूला सांगितलं, 'राजाने मला मारलं आहे त्याचा तू सूड घे.' नंतर मनुष्यवेष धारण करून त्या दैत्याचा बंधू राजधानीमध्ये आलेला आहे. आणखी राजवाड्यामध्ये राजाच्या अनुज्ञेने नोकरीकरता राहिलेला आहे. राजवाड्यामध्ये स्वैपाक करणे वगैरे कामे करतो आहे.

एके दिवशी वसिष्ठ महर्षींना राजाने भोजनाकरता बोलवले आहे. तिकडे असे झाले की हा जो बंधू होता त्याचा, त्याने वसिष्ठांचं रूप घेतलं आणि राजवाड्यात जाऊन राजाला सांगितलं की मला जेवताना मृगमांस आणून द्या? राजा म्हणाला,' काही हरकत नाही.' मग मनुष्य वेष धारण केलेला जो दैत्याचा बंधू होता त्याने पाकशाळेत नरमांस तयार केलं आणि वसिष्ठ ऋषींच्या पात्रामध्ये ते वाढलं. ते पाहिल्याबरोबर अत्यंत रागावून त्यांनी मित्रासह राजाला शाप दिला. हेच त्या दैत्याला पाहिजे होतं. राजा जो आहे त्या राजाचा अधःपात झाला पाहिजे. बरं झालं, वसिष्ठांनी शाप दिला,' तू राक्षस होशील. हे असलं कर्म करणारा.' तो वसिष्ठांना म्हणाला,'तुम्हीच मला सांगितलंत मला नरमांस पाहिजे म्हणून मी काही स्वतः होऊन दिलं नाही. तुमच्या सांगण्याप्रमाणे मी केलय.मीही शाप देतो.' ती सगळी कथा टीकेमध्ये महाराजांनी दिलेली आहे.

त्याप्रमाणे शाप देण्याकरता त्या राजानेही आपल्या हातात जल घेतलेलं आहे. त्याची धर्मशील पत्नी त्याला पुढे होऊन म्हणाली,' गुरूंना शाप देणं बरं नाही. शांत व्हा.' क्षमा मागितली वसिष्ठांची त्या राणीने. वसिष्ठ म्हणाले, बारा वर्षे हा राक्षस बनून राहिल. राक्षस वृत्ती उत्पन्न होईल. नंतर तो पुन्हा राजा होऊन येईल.' राजाने ते पाणी आपल्या पायावर टाकले. त्याचे पाय सगळे काळे झाले. कल्मषपाद म्हणतात त्याला आणि राक्षस होऊन तो वनामध्ये गेला. म्हणजे वृत्ती बदलली त्याची. येणाऱ्या जाणाऱ्याला त्यानं ठार मारावं, नरमांस भक्षण करावं,

असं करायला लागला.

बुध्दीनाश हा सगळ्यात मोठा नाश आहे. ही बुध्दी तेवढी सुरक्षित ठेवावी आपली अशी प्रार्थना देवाजवळ सगळे संत महात्मे करत असतात. ' बुध्दी दे रघुनायका ' चांगली बुध्दी मला दे. एके दिवशी एक विद्वान ब्राम्हण आणि त्याची पत्नी त्या अरण्यातून जात असताना, ह्या राक्षसाने त्याला खाण्यासाठी धरले. त्या स्त्रीने राक्षसाची पुष्कळ विनवणी केली, ' माझा पती विद्वान आहे मला सौभाग्य दान दे.' पण राक्षसाने काही ऐकले नाही. त्या ब्राम्हणाला मारलं आणि त्याचं मांस भक्षण केलं.आपल्या पतीच्या अस्थि वगैरे जमा केल्या त्या स्त्रीने आणि आता सहगमन करायच्या वेळेला त्या राक्षसाला शाप दिलेला आहे. म्हणजे प्रारब्ध योग कसा आहे. चांगला राजा धर्माने वागणारा. पण त्या राक्षसाकडून ते कर्म झालं आणि ऋषींचा शाप मिळाला. ऋषीशापातून बारा वर्षानंतर मुक्त व्हायचय. तेवढ्यात हा दुसरा शाप.

ती स्त्री म्हणाली,' तू खरा राजा आहेस. पण ऋषींच्या शापामुळे तू राक्षस झाला आहेस. बारा वर्षानंतर पूर्वीची वृत्ती, भाव तुला उत्पन्न होईल आणि तू पुन्हा राजा होशील परंतु स्त्रीसंग जर करशील तर तुला तत्काल मृत्यू प्राप्त होईल.' असा शाप देऊन तिने सहगमन केलं.

बारा वर्षानंतर त्याची वृत्ती बदलली. राक्षसी वृत्ती नाहीशी झाली. निग्रह, अनुग्रह असं दोन्ही प्रकारचं तपाचं फळ आहे ना ! शाप देण्याचं सामर्थ्य आहे. त्या शापातून मुक्त करण्याचंही सामर्थ्य आहे. असं दोन्ही प्रकारचं सामर्थ्य आहे. पण इतकं असूनही अहंकार नाहीये. निरहंकार वृत्तीने राहाणारे हे तपस्वी पुरुष आहेत. राग येतो त्यांना, पण तो राग त्यांना बाधक नाहीये. जमदग्नी काय, दुर्वास ऋषी काय, लोकांची सुधारणा त्यांना करायची आहे. जमदग्नी मुनींनी रेणुकेला मारण्याची आज्ञा केली परशुरामांना. आधी इतर तिघा पुत्रांना आज्ञा केली. पण त्यांनी ऐकलं नाही. परशुरामाने मात्र तत्काल तिचा शिरच्छेद केला.

प्रसन्न झाले जमदग्नी. वर माग म्हणाले. परशुरामांनी सांगितलं, 'हे सगळे जिवंत व्हावेत आणि मी यांना मारलं याचा यांना स्मरण राहू नये.' दिला त्यांनी तसा वर.

स्वतःच्याच मनावर ताबा आहे असं नाही; दुसऱ्याच्याही मनावर ताबा ठेवणारे हे महर्षी आहेत. 'मला याने मारलेलं आहे.' याची आठवण सुध्दा मनात राहायची नाही म्हणजे काय. पण तीही व्यवस्था जमदग्नींच्या तपःसामर्थ्याने होऊ शकली आहे. हे परशुरामांना माहिती होतं, म्हणून पित्याची आज्ञा त्यांनी पालन केली. त्यांनीही हे जे केलं, ते या करता केलं. पाणी आणण्यासाठी गेलेल्या रेणुका मातेने राजाची जलक्रिडा पाहिली. आणि तिच्या मनामध्ये थोडा मोह उत्पन्न झाला. पण आवरला तिने. परत आली. पण हा मानसिक दोष जो आहे तो जमदग्नींना समजला. परशुरामांना आज्ञा करुन तिचा वध केला आणि पुन्हा जिवंतही केलं. म्हणजे आपल्या सान्निध्यात असणाऱ्या लोकांकडून शारीरिकच काय पण मानसिक दोषही होऊ नयेत या आत्मीयतेने त्यांना राग आला तर काय बिघडलं?

रजस्वला झाली म्हणजे स्त्री शुध्द होते म्हणतात. मग ती काय रजस्वला झाल्यावर शुध्द होते तेव्हा पाप झालं तरी हरकत नाही अशी समजूत होते आपली. परंतु एखादं शास्त्रवचन वाचून तेवढ्याने अर्थ करायचा नाही. मनोदृष्ट झालेली स्त्री रजाने शुध्द होते आहे. त्या वचनाचा आणि या वचनाचा संबंध जोडून अर्थ लावायचा. म्हणून जमदग्नी जरी रागावले तरी आपल्या सान्निध्यात असणारा जो आपला पोष्य वर्ग तो मनानेसुध्दा शुध्द असावा, दृष्ट होऊ देऊन उपयोगी नाही; त्यांचं मन ताब्यात असावं यासाठी यांचा राग आहे. विग्रहही केला पुन्हा जिवंतही त्यांना केलं.

त्याप्रमाणे मित्रासह राजाला वसिष्ठ मुनींचा शाप झाला. त्यातून मुक्तता झाली. परत आलेला आहे राजवाड्यामध्ये. आपल्या पत्नीला त्याने सांगितलं, असं असं झालं आणि आता दुसरा शाप झाला आहे. ऋषीच शाप देतात असं नाही, पतिव्रता स्त्रीसुध्दा शाप देऊ शकते. मृत्यू येईल म्हणून तिने सांगितले आहे. मग

सर्वांच्या विचार, सल्ल्याने तो मित्रासह राजा आपल्या परिवाराला घेऊन तीर्थयात्रा करतो आहे. तीर्थ स्नानाने आणखी पापक्षय होतो आहे. पातकांचा क्षय करण्याकरता तीर्थक्षेत्रांमध्ये जायचं देवतांचं दर्शन करायचं, पितरांचं तर्पण करायचं, यामुळे जी काही पातके घडली असतील ती नाहीशी होतात. त्यामुळे मनाची शुध्दी होते. पुन्हा तशी पातकं घडत नाहीत. ही व्यवस्था त्या स्थानामध्ये होऊ शकते. म्हणून तीर्थयात्रा कराव्यात असं मुद्दाम शास्त्राने सांगितलं आहे. ज्या ठिकाणी भगवंतांचा निरनिराळ्या मूर्ती रुपाने निवास असतो अशा पवित्र तीर्थ क्षेत्रामध्ये भगवत् भक्तही येऊन राहात असतात. म्हणून तीर्थक्षेत्रामध्ये असा सज्जनांचाही भेट/ सहवास होण्याचाही संभव आहे. पूर्ण श्रध्दा आणि भक्तीने मात्र तिथे गेले पाहिजे. नुसतं आपलं ट्रिप म्हणून तिथे जाऊन उपयोग नाही.

शुकाचार्य महाराज अजून वृंदावनामध्ये फिरत असतात म्हणतात पण दिसतात कोणाला? समजलं पाहिजे ना. कोणच्या तरी वेषात ते असतात. राजा निघाला आहे विश्वासाने. तीर्थस्नान, पूजन वगैरे करावं श्रध्देने. दान धर्मही पुष्कळ करायचा. ' पुण्यक्षेत्रे कृतं पापं वज्रलेपो भविष्यती ' म्हणतात. जसं पाप वज्रलेप होतं तसं पुण्यकर्मही वज्रलेप होतं. त्या भावनेनं तो करतो आहे. प्रत्यक्ष राजा असल्यामुळे सर्व अनुकूलताही आहे. अनेक यज्ञ याग करावेत. दान धर्म करावा, पूजन अर्चन करावं, असं त्याचं चाललेलं आहे. परंतु त्याने ब्रम्हहत्या केली आणि त्या ब्राम्हणीचा शाप झाला आहे पुन्हा. त्या दोषातून त्याला काही मुक्त होता येईना. चिंताग्रस्त झालेला आहे.

त्यानंतर मिथिला नगराच्या परिसरात एका झाडाखाली तो बसलेला असताना गौतम ऋषी त्या ठिकाणी शिष्य मंडळींसह आले. राजाला त्यांचं दर्शन झालं. राजा चिंताक्रांत आहे असे त्या ऋषींना दिसून आलेलं आहे. त्यांनी विचारलं,' काय राजा, तुला कसली चिंता उत्पन्न झाली.' राजा आहे म्हणून विचारले असे नाही, कोणीही असा दुःखी भेटला तरी ते असे विचारतात.

दुःख निवारण्याचा उपाय माहिती असतो त्यांना. ते तसा दुःख नाशाचा उपाय सांगून दुःखमुक्त करू शकतात. राजाने सगळा वृत्तांत सांगितला. असं असं झालय म्हणाला. प्रारब्ध कर्म आहे. ऋषी शापामुळे राक्षस झालो आणि ब्रम्हहत्या दोष अजून गेला नाही.

मग गौतमांनी त्याला सांगितलं, गोकर्ण हे मोठे तीर्थक्षेत्र आहे. क्षेत्रांमध्ये तरतमभाव आहे असा याचा अर्थ नाही. प्रत्येक क्षेत्राचे काहीतरी महत्व आहे. गोदावरीच्या तीरावर राहाणारे वेदधर्मा मुनी काशीमध्ये का गेले? गोदावरी म्हणजे सगळ्यांपेक्षा श्रेष्ठ आहे. परंतु काशीचाही काही प्रभाव आहे. ' मोक्षपुरी ' ती आहे म्हणून ते तिकडे गेले. तसा गोकर्ण क्षेत्राचाही विशेष प्रभाव शास्त्रकारांनी, पुराणकारांनी सांगितला आहे. त्या क्षेत्रामध्ये जाऊन तू पूजा अर्चा वगैरे कर म्हणजे तुझा हा दोष जाईल.

त्याचा आता दोषमुक्त होण्याचा काळही आला असेल म्हणून ब्रम्हज्ञानी गौतम ऋषींची गांठ पडली. त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे तो वागला आणि त्या दोषातून तो मुक्त झाला. मग गौतम ऋषींनी गोकर्ण क्षेत्राचे प्रत्यक्ष पाहिलेले महात्म्य सांगितले. ते म्हणाले, 'असेच आम्ही एका शिवरात्रीच्या दिवशी तिथे बसलो होतो. एका मरणोन्मुख चांडाळ स्त्रीचं तिथं प्राणोत्क्रमण झाल्याबरोबर शिवदूत विमान घेऊन आले. त्यांना आम्ही विचारलं, कोणाकरता विमान घेऊन आलात? ते म्हणाले, हिला न्यायचं आहे. आम्ही म्हटलं, हिने काय पुण्य केलय की हिला तुम्ही कैलास पर्वतावर घेऊन जाणार? ही तर त्याला अयोग्य आहे, पापी आहे.'

मग त्या शिवदूतांनी तिचा पूर्व जन्मीचा सगळा वृत्तांत सांगितला. पापी असेल पण पुण्यही घडलय. ही स्त्री पूर्व जन्मामध्ये एका कुलीन ब्राम्हणाच्या घरामध्ये जन्मालआली. उपवर झाल्यानंतर त्याच गांवामध्ये हिचा विवाहही करून दिला. मातापितरांनाही आनंद झाला आहे. पुढे दैवयोगाने काही दिवसांनी तिच्या पतीला मृत्यू आलेला आहे. ही माहेरी येऊन राहिलेली आहे. परंतु तारुण्य आहे. मोह आहे विषयांचा, वगैरे. त्या मोहामध्ये सापडली

ती. आणखी पापकर्म हिच्या हातून झालेलं आहे. समजलं सगळ्या लोकांना. ब्रम्हहत्या, सुरापान, सुवर्णस्तेय वगैरे महापातके सांगितली आहेत. आणि त्यांच्याशी संसर्ग ठेवणे हेदेखील महापाप म्हणून सांगितले आहे.

कलीयुगामध्ये ही महापापच घडतात ना. त्यासाठी नामस्मरण हा उपाय मुद्दाम संतांनी सांगितला आहे. तिकडे वृत्ती झाल्याशिवाय पापक्षय होणार नाही. तिला बहिष्कृत केलेलं आहे. आणि एका उत्तम व्यापाऱ्याच्या वाड्यामध्येच ती जाऊन राहिली. त्यानेही आपल्या घरामध्ये ठेऊन घेतलेलं आहे. त्याचं सगळं घर ती सांभाळते आहे. मद्यपान काय, मांसाहार काय, स्वतंत्रताच आहे. कोणी आवरणारे नाही, काही नाही.

एके दिवशी मद्यपान करून गाईचं वासरूच तिने मारलं, त्याचं मांस वगैरे शिजवलं आणि त्याचं मस्तक, एका शिंक्यावर ठेवलं. सावध झाल्यावर (नशा उतरल्यावर) पाहिलं तर गाईच्या वासराचं मस्तक आहे. तिला दुःख झालं. पश्चाताप झाला. 'शिव, शिव 'म्हणून शंकरांच स्मरण केलं आणि ते मस्तक जमिनीमध्ये पुरून टाकलं. आपलं वासरू वाघाने नेलं असं खोटच पतीला सांगितलं. आवरून टाकलं ते सर्व. पापकर्म करण्यामध्येच तिचं आयुष्य गेलं, म्हणाले.

नंतर तिला दुसरा जन्म मिळालेला आहे. आणि जन्मापासूनच सगळे शरीर रोगाने भरलेले, अंगातून पू वाहातो आहे, कुष्ठ झाले आहे. धर्माचा त्याग करून वागल्यामुळे हा रोग झालेला आहे. आईबापांनी जिवंत असेपर्यंत कसेतरी तिचं पालन पोषण केले. ती गेल्या नंतर कसेतरी भिक्षा मागून हिने दिवस काढले. एकदा गावातली मंडळी शिवरात्रीच्या यात्रेला जाण्याकरता गोकर्ण क्षेत्राला जायला निघाली. अंध होती ही, हिला काही नेत्र वगैरे नव्हते. आणि त्यांच्या बरोबर गोकर्ण क्षेत्री येऊन पोहोचली, म्हंणाले. शिवरात्रीचा दिवस आहे, अतिशय भूक लागलेली आहे. आहार नाही. हात पसरून सगळ्या लोकांना

' अन्न द्या ' म्हणून मागती आहे पण अन्न कोण देणार ?

कोणीतरी तिच्या हातावर बेलाची पाने टाकली आहेत. तिने वास घेतल्यावर समजले की हा खायचा पदार्थ नाही. टाकून दिली तिने ती पाने. ती नेमकी शिवलिंगावर जाऊन पडली. आहार नाही. जाग्रण घडलेलं आहे. यथाविधी शिवरात्री व्रत घडल्यामुळे शंकरांनी शिवदूत तिला आणण्यासाठी पाठवले.

गौतम ऋषींनी त्या राजाला ही कथा सांगितली. यातही आता महाराजांनी विचार केलेला आहे. हे जे शिवरात्रीचे व्रत घडलं हिच्याकडून पण बुध्दी आहे का तिची? शंकराला प्रसन्न करण्याकरता तिने बुध्दी पुरस्सर हे कर्म केले का? पण घडले ते. सहज कर्म जरी घडले तरी त्या कर्माचं सुध्दा फल मिळते. कारण भगवान् शंकर त्या स्थानामध्ये येऊन राहिलेले आहेत. त्या स्थानाचेच इतके महात्म्य आहे. त्या वस्तुशक्तीला बुध्दीची अपेक्षा नाही. आपल्या मुलाला ' नारायण ' म्हणून हाक मारणारा अजामेळ का मुक्त झाला? त्याची बुध्दी मन हे मुलामध्ये आहे. वाणीने नांव नारायणाचे आलेले आहे. त्या नारायण नांवाचीच अशी शक्ती आहे की त्या वस्तु शक्तीने त्याला फल मिळालं. बुध्दीची अपेक्षा नाही. म्हणजे मग असच करायचं काय सगळ्यांनी? तसे नाही.

उत्तम प्रकाराने कर्म काय करायचं, कसं करायचं हे सगळं समजून घेऊन यथाविधी श्रध्देने, पूर्ण भक्तीने जर कर्म केले तर त्याचे फळ मिळते. त्याला फळ नाही असं नाही. परंतु नकळत जरी घडलं असलं तरी, त्या स्थान महात्म्याने, ईश्वराच्या कृपा प्रसादाने त्या स्त्रीला मुक्ती मिळालेली आहे. परंतु हे सगळ्यांच्या बाबतीत घडायचं नाही. 'आम्हीही गोकर्णाला जाऊ, आम्हीही करु' असं म्हणतील कोणी पापी माणसं, पण जाणं होणारच नाही. काहीतरी अडचण उत्पन्न होईल. त्या स्त्रीच काहीतरी असेल ना. म्हणून एकदा का होईना तिच्या मुखातून ईश्वराचे नांव उच्चारले गेले आहे, पश्चाताप झाला आहे. तेव्हा हा योग आलेला आहे. ज्ञान नसताना श्रध्दापूर्वक केलेले कर्म, आणि

ज्ञानपूर्वक केलेले कर्म ह्या दोहोंचेही फल मिळते. हिच्याजवळ तर ज्ञान, श्रध्दा, भक्ती काहीच नसताना केवळ शिवरात्री व्रत घडल्यामुळे तिला फल मिळाले. त्या वस्तु शक्तीमुळे हे कार्य घडलं. इतकच त्याचं उत्तर आहे.

राजालाही आनंद झालेला आहे. गौतम ऋषींच्या आज्ञेप्रमाणे राजा गोकर्ण क्षेत्रामध्ये गेला. पुष्कळ पुण्यकर्म त्याने केलेले आहे. शंकरांची महापूजा केलेली आहे. सर्वही अन्नदान वगैरे पुष्कळ केलेले आहे. त्यामुळे त्या दोषातून तो मुक्त झाला. म्हणजे प्रारब्ध कर्माच्या तावडीत सांपडलेला राजा गौतम ऋषींच्या मार्गदर्शनाने मुक्त झाला. अशा प्रकारे हे क्षेत्र पवित्र आहे. म्हणून श्रीपादश्रीवल्लभ त्या ठिकाणी राहिलेले आहेत. अनेकांच्या उध्दाराकरताच ते तिथे राहिले होते. त्या कथा मात्र याच्यामध्ये आलेल्या नाहीत.

श्रीपादवल्लभांच्या एकंदर कथा फार कमी मिळालेल्या आहेत. त्यानंतर श्रीपादवल्लभ हे कृष्णातीरावर येऊन राहिलेले आहेत. रायचूर जवळ कुरुगड्डी म्हणून स्थान आहे. कृष्णा नदीच्या मध्यभागी बेटासारखे आहें. तिथे ते राहात होते. त्यावेळेला काही गांव वगैरे असेल तिथे. त्याचे वर्णन आता पुढे सिध्दाने नामधारकाला केलेलं आहे.

श्रीपादवल्लभ अदृश्य झाले म्हणून सांगितले त्यांनी. अदृश्य का झाले? कार्य तर अजून व्हायचय आणि यांचं तर कार्य संपणारं नाही. दत्तात्रेय जसे आहेत. जीवांचा उध्दार करायचा आहे. अज्ञानातून त्यांना मुक्त करायचं आहे. हे कार्य काही सोपं नाहीये. हे कार्य करण्याकरता अवतार झाला, सदगुरुस्वरुप अवतार आहे. सदगुरु स्वरुप अवतार हे कायमचे आहेत. बाकीचे ईश्वर अवतार हे काल मर्यादित आहेत. ते ते कार्य झाल्यानंतर ते निजधामाला गेलेले आहेत. श्रीपादवल्लभ एकरुप असतांना, दुसरं रुप कसं घेतलं? कशा करता घेतलं? अदृश्य होण्याचं कारण काय? वगैरे प्रश्न त्याने विचारले तर त्याचही कारण ते सांगताहेत.

अनंत कार्य आहेत, म्हणाले. अनेक जीवांचा उध्दार करायचा आहे. एक अवतार घेऊन जसं एक कार्य करायचं होतं तशीच कार्य दुसरा अवतार घेऊन करायची आहेत. अनंत संकल्प भगवंतांचे आहेत. त्या संकल्पांप्रमाणे हे कार्य होतयं, म्हणाले. ते कार्य कोणचं हे सांगण्याकरता ही कथा आता पुढे सांगताहेत.

कुरवपूर क्षेत्रामध्ये महाराज येऊन राहिले. त्या गांवामध्ये एक विद्वान ब्राम्हण राहात होता. अनेक विद्यार्थी त्याच्याकडे ज्ञान मिळवण्यासाठी येत असत. त्याला पुष्कळ दिवस मुलगा नव्हता. काही शास्त्रीय प्रयत्नांनी, दानधर्म करुन ईश्वराच्या कृपेने त्याला एक मुलगा झाला. तो मुलगा अगदी मंदबुध्दीचा झाला. त्याच्या काही लक्षात राहायचे नाही. याने आपले शिकवायचे त्याला. बाकीची मुलं जी शिकायची त्यांच्या लक्षात राहायचं. याच्या काही लक्षात राहायचं नाही.

पुढे त्याचं उपनयन झालं. गायत्री मंत्राचा उपदेश झाला. पण त्याला काही नाही. त्याला काही पाठच होत नव्हते. राग यावा त्या ब्राम्हणाला. आपल्या मुलाला त्याने मारावे. त्या स्त्रीने त्याला म्हटलं,' महाराज, मारुन काय करणार तुम्ही? त्याचं दैव आणि आपलं दैव. त्यामुळे जन्मापासून जो मंदबुध्दीचा आहे, काहीच ज्याला कळतं नाही त्याला मारुन तुम्ही काय करणार? कशाला मारता तुम्ही? आणि जर तुम्ही यापुढे त्याला मारलत तर मी काही प्राण ठेवणार नाही. '

ब्राम्हण उदासीन राहिला बिचारा. आणखी काही दिवसांनी त्याला मृत्यू आलेला आहे. आता हे दोघे राहिले. तो मुलगा आणि त्याची आई. आईने मागून आणलेल्या भिक्षेवर हा मुलगा निर्वाह करतो आहे. काही उद्योग नाही. ज्ञान नाही, लोकांचा आदर नाही. गावातील सगळी मंडळी त्याची निंदा करायला लागली. ' काय आईने भिक्षा मागायची आणि तू जेवायचस? जिवंत कशाला राहातोस? जा नदीत प्राण दे जा.' असे बोलावे त्याला. अतिशय दुःख झालं त्याला. तो आणि त्याची आई

नदीवरती आले. ते नदीत प्राण त्याग करणार एवढ्यात श्रीपादवल्लभांनी त्यांना बोलावले आहे. ' आत्महत्या फार मोठा दोष आहे.' म्हणाले, आत्महत्या हा एक दोष आणि ब्राम्हणाच्या शरीराचा नाश केल्याने ब्रम्हहत्या हा दुसरा दोष. या दोषांमुळे अत्यंत अज्ञानांधकारामध्ये तुम्ही राहाल. तुम्ही अज्ञानी व्हाल. पशू, पक्षी, वृक्ष वगैरे योनींमध्ये तुम्हाला जावं लागेल. त्यापेक्षा, आयुष्य असेपर्यंत तुम्हाला जे दुःख भोगायचं असेल ते सहन करून ईश्वराची काहीतरी उपासना करा.'

' ईश्वराच्या उपासनेने तुमची पापं वगैरे सर्व दूर होतील. तुम्हालाही चांगले दिवस येतील. चांगले जीवित तुम्हाला दिले असता त्याचा त्याग तुम्ही करणं हा मोठा दोष आहे. ' असे श्रीपादवल्लभांनी त्या मुलाला आणि त्याच्या आईला समजावून सांगितलेलं आहे.

त्या स्त्रीने विचारलं, ' महाराज, काय करायचं, सांगा आपण समजावून. मार्गदर्शन करा.' याप्रमाणे प्रार्थना तिने केलेली असताना श्रीपादवल्लभांनी भगवान् शंकरांची उपासना करायला सांगितली.

' शनिप्रदोषाचं जे व्रत आहे ते तुम्ही करत चला ' म्हणाले, ' उपोषण करून सायंकाळी प्रदोष काळी शंकरांची पूजा करून प्रसाद घ्यायचा. हे तुम्ही करा. शंकरांची उपासना करून तुमचा पापक्षय होईल. तुमचं कल्याण होईल. '

सत्पुरुषांच्या सांगण्याप्रमाणे तिच्याही मनामध्ये विश्वास उत्पन्न झाला. पुन्हा तिने विचारले,' महाराज, आपण सांगितलेलं शनिप्रदोष व्रत करायला मी तयार आहे. परंतु पूर्वी कोणी हे व्रत केले? त्याला काय काय फलं मिळालं? ते सांगा म्हणजे जास्ती विश्वास उत्पन्न होईल, जास्ती श्रध्देने व्रत करता येईलं.'

त्याबद्दल एक कथा श्रीपादवल्लभ सांगताहेत- उज्जैन नगरीचा राजा मणिभद्रसेन म्हणून होता. व्यास महर्षींनी अनेक

पुराणांची रचना करुन ठेवलेली आहे. त्या पुराणांवरुन कोणी कोणी काय काय केलं, कोणाचा काय काय दुःख परिहार झाला, हे कळून येतं आपल्याला. आणि त्याप्रमाणे जास्ती श्रध्देनं आपल्याला करता येतं. पण सध्या पुराणांच प्रामाण्यच सगळं संपलेलं आहे. कायदा असेल तेवढाच बघायचा. बाकी पुराणं, श्रुती, स्मृती वगैरेंच प्रामाण्य संपलेलं आहे. त्यामुळे कुठली व्रतं, कुठल्या कथा काय आहेत त्या बद्दल विश्वासही उत्पन्न होत नाही.

श्रीपादवल्लभांनी जरी सांगितले तिला तरी तिने विचारले,' याचे फलं कोणी मिळवलंय? कशी शंकरांची कृपा झाली याची कथा असेल तर सांगा मला.' त्याकरता या कथांचा उपयोग होत असतो. उज्जैनी नगराचा राजा चंद्रसेन आणि त्याचा मित्र मणिभद्र म्हणून होता. भगवान शंकरांचे ते दोघेहि भक्त होते. मणिभद्रही चांगला भक्त. शंकरांची कृपा त्याच्यावर झाली. शंकरांनी त्याला चिंतामणी दिलेला आहे. सर्व इच्छा पूर्ण करणारा परिस काय, चिंतामणी काय, आता आपण नुसतीं नांव ऐकतो. काव्यामध्ये आपलं वर्णन आलेलं असते. कवी कल्पना आहे असं म्हणायचं आणि सोडून द्यायचं.

तर त्या सर्वही इच्छा पूर्ण करणाऱ्या चिंतामणीची ख्याती सगळीकडे पसरली. मणिभद्राच्या जवळ चिंतामणी आहे. वाटेल ते त्याच्यापासून मिळते. पूजा वगैरे करताहेत त्याची. इतर राजे लोकांना तो मिळवायची इच्छा उत्पन्न झाली. ते म्हणाले, विकत दे आम्ही वाटेल तेवढे द्रव्य देतो. हा 'विकत नाही' म्हणाला. मग त्या सगळ्या राजेलोकांनी याच्याबरोबर युध्द करायचं ठरवले. आणि युध्द करुनच हा मणि घेऊन जायचा. मग सगळ्या राजे लोकांनी एकत्र येऊन त्या उज्जैनी नगरीला आपल्या सैन्याचा वेढा दिलेला आहे.

शनिप्रदोषाचा दिवस त्या दिवशी होता. संध्याकाळची वेळ झालेली आहे. चंद्रसेन राजा आणि त्याचा मित्र मणिभद्र पूजा करताहेत. एकचित्ताने पूजा चाललेली आहे. बाहेर सैन्याचा वेढा बसलेला आहे. तरी तिकडे लक्ष नाहीये. आज शंकरांच

पूजन करायचं आहे. निश्चिंत मनाने आणि शांत मनाने पूजन झालं पाहिजे. म्हणून ते सर्वही पूजेला बसलेले आहेत. इतक्यात त्याच गांवात राहाणाऱ्या गवळ्याची काही मुलं तिथे आली. राजेसाहेब पूजा करताहेत आपणही पूजा करुया म्हणाली. काही दगड बिगड मांडले असतील त्यांनी. शंकरांच प्रतिक म्हणून. काही झाडाची पानं वगैरे जे मिळालं ते आणलं. पूजा करीत बसले. संध्याकाळ होऊन गेली. सगळ्या मुलांना त्यांच्या त्यांच्या आईवडिलांनी आपापल्या घरी नेलं. एक मुलगा मात्र तिथेच पूजा करण्यात मग्न होऊन बसला. त्याचे पूर्व संस्कार चांगले होते. ' बहुत सुकृतांची जोडी म्हणूनी विठ्ठल आवडी ' आवडीने झाली पाहिजे उपासना. नामस्मरण किंवा इतर काही.

त्याच्या मनामध्ये भगवान् शंकराच्याबद्दल अत्यंत प्रेम आहे. शांतपणाने पूजा करतो आहे. तहान भूक काहीही नाही. माता येऊन म्हणाली त्याची, ' अरे, जेवायची वेळ झाली. तुला भूक लागेल, चल. ' पण त्याचं लक्ष नाहीये. त्या मातेला आला राग. ते सगळं पुढे जे काही मांडल होतं दगड धोंडे वगैरे ते सगळं फेकून दिलं तिने. आणि रागारागाने घरी निघून गेली. याच्या मनावर इतका परिणाम झालेला आहे बालवय असूनसुध्दा. भगवान शंकरांचा पूजा भंग झाला. आता आपण जिवंत राहून तरी काय करायचं ? तळमळ मनामध्ये उत्पन्न झालेली आहे. शंकरांच अखंड ध्यान करता करता प्राण जातो आहे की काय अशी अवस्था निर्माण झाली.

साक्षात भगवान् शंकर प्रगट झालेले आहेत. काय तुला पाहिजे ते मागून घे, म्हणाले.

त्या बालकाने सांगितले की, ' माझ्या मातेने तुमची पूजा मोडली. तिच्या त्या अपराधाची आपण प्रथम क्षमा करा. ' हे पहिल्यांदा मागितलं. आणि म्हणाला ' आपलं दर्शन झालेलं आहे. मला दुसरा वर वगैरे काही नको. ' शंकरांनी त्याला वर प्रदान केलं,' तू गोपालांचा राजा होशिल. तुझ्या मातेकडून झालेला अपराध हा अज्ञानाने झालेला आहे. अज्ञानाने झालेला अपराध

आणि बुध्दीपूर्वक झालेला अपराध यांत अंतर आहे. अहंकार ज्याचा प्रबल आहे. ' ईश्वरोहम् भोगी सिध्दोहम् बलवान् सुखी ' ही आणखी वृत्ती ज्यांच्या चित्तामध्ये आहे. स्वतःलाच ईश्वर समजून ईश्वराचा किंवा ईश्वर भक्तांचा तिरस्कार करणारे जे आहेत त्यांच्या हातून बुध्दीपूर्वक सगळे अपराध होतात त्याला जास्ती शासन आहे.तुला जेवायला मिळावं, तुला भूक लागली असेल या ममतेनं तिला राग आला असेल. 'तीसुध्दा भगवंतांची माता होणार आहे. तीच पुढं यशोदा झाली म्हणतात. आणि त्या यशोदेचा पुत्र होऊन भगवान् गोपालकृष्णांनी अनेक बाललीला दाखवून तिला पुष्कळ समाधान दिलेलं आहे.

शंकर गुप्त झालेले आहेत आणि तिथे त्यांचे ते दिव्य लिंग प्रगट झालेले आहे. अत्यंत तेजस्वी प्रकाश सगळीकडे पडलेला आहे. रत्नखचित लिंग प्रगट झाले. रात्रीची वेळ. सूर्यासारखा प्रकाश पडला. त्या राजे लोकांच्या बुध्दीवरही परिणाम झाला. हा राजा, म्हणाले, मोठा पुण्यवान आहे. त्याच्याबरोबर विरोध करणं बरोबर नाही. आपण याच्याशी मैत्री करूया. सगळे राजे लोक आलेले आहेत. भेटलेले आहेत राजाला. चंद्रसेन राजा म्हणाला, रात्रीच्या वेळेला प्रकाश कसला पडला आहे ? आलेले आहेत. पहाताहेत ते दिव्य शिवलिंग. ' महाकाळेश्वर ', ज्याला म्हणतात उज्जैनीमध्ये, त्याची ही कथा आहे.

सगळा विचार केल्यानंतर त्यांना समजलं की हा बालक त्याला कारण आहे. त्याच्याकरता म्हणून भगवान शंकर या शिवलिंग रूपाने प्रगट झाले आहेत. हे स्वयंभूच लिंग झालं की आता. कोणी स्थापन केलं नाही. काही नाही. मग सारे राजे लोकांनी गोपांचा राजा म्हणून त्याला मान्यता दिली. त्याला जमीन वगैरे दिली. असा तो मोठा झाला.

ही कथा श्रीपादवल्लभांनी त्या ब्राह्मण स्त्रीला सांगितली. आणखी म्हणाले, ' असं हे शनिप्रदोष व्रत कर.जा. शंकराच्या कृपेने पुढच्या जन्मामध्येच तू सुखी होशिल. तुला चांगला मुलगा होईल.' हे सगळं ऐकून ती म्हणाली,' मी करते व्रत.' करायला

लागली.

शनिप्रदोषाच्या दिवशी प्रदोषकाली त्या स्त्रीने महाराजांच्या आश्रमामध्ये यावे. शंकरांची पूजा प्रदोषकाली करायची (श्रीपाद) हेच चालते बोलते शंकर आहेत अशी तिची धारणा होती. 'गुरूदेवो महेश्वरः ' सद्‌गुरू महाराज हेच महेश्वर आहेत. या भावनेनं श्रीपादवल्लभांचीच पूजा तिने करावी. बिल्वपत्र, धूप, दीप, नैवेद्य त्यांना अर्पण करावा. अशी पूजा तिची चाललेली आहे. वारंवार यावं, बसावं, मुलगाही बरोबर असायचा. लोकनिंदा तर चालूच आहे. पण या भगवान शंकराच्या उपासनेच्या योगाने सहनशीलता तिला उत्पन्न झाली. ही एक आणखी ईश्वराची कृपा होती.

एके दिवशी अतिशय दुःखी झालेली ती स्त्री म्हणाली, 'महाराज ही उपासना आपण मला सांगितली ती चालू आहे पण याचं फल पुढच्या जन्मात मिळायचं.या जन्मात काही नाही फल. आपल्या सारखा मला मुलगा पाहिजे आहे. पण ती माझी इच्छा या जन्मात पूर्ण होणार नाही. निदान पुढच्या जन्मात तरी आपल्यासारखा मुलगा होईल असा वर द्या.'

तिची भक्ती प्रेम पाहून श्रीपाद म्हणाले, ' होईल. शंकरांची उपासना तू करतेस ती फुकट जाणार नाही. भगवान शंकराच्या कृपेने माझ्यासारखा मुलगा होईल.' तरीसुध्दा ती म्हणाली, ' हा जन्म मला दुःखातच रहावं लागेल महाराज. पुढच्या जन्मात होईल तेव्हां होईल. त्यावेळेला कसली आठवण रहाणार ? हा जन्म माझा असा दुःखात लोकनिंदा सहन करण्यातच जाणार का ?'

मग मात्र महाराजांना दया आलेली आहे. आणि लगेच त्या मुलाच्या मस्तकावर हात ठेवलेला आहे. प्रारब्ध कर्म दूर करायचं आहे. ' ददामि बुध्दीय़ोगंतं ये न मां उपयांति ते ' ही शक्ती फक्त परमेश्वराचीच आहे. कितीही बुध्दी आणखी दोषाने भरलेली आहे, अनेक दोष बुध्दीमध्ये आहेत. त्यामुळे अनेक पापकर्मे घडताहेत. आणि त्या पापकर्मांनी जास्ती जास्ती बुध्दी मलीन होऊन गेली आहे. ती बुध्दी शुध्द होण्याकरता पुण्य

कर्महि शास्त्रकारांनी सांगितली आहेत. परंतु त्या कर्मांनी बुध्दी शुध्द करायची म्हणजे किती कठिण आहे.

तांब्याचे भांडे अनेक दिवस घासलं नाही तर ते स्वच्छ करायचं म्हटलं तर त्याला चिंच बिंच लावून किती वेळा घासावे लागते. तसं पुटावर पुटं झालेली आहेत; अनेक जन्मांचे दोष त्याच्यामध्ये भरलेले आहेत. दोष जायचे कसे ? पुन्हा पुन्हा दोष होताहेत. तर ही अशी काहीतरी समर्थ ईश्वरशक्ती आहे. अनेक जन्मांचे पापसंस्कार जरी असले तर ते पाप संस्कारही नाहीसे करण्याचं सामर्थ्य भगवंताच्या शक्तीमध्ये आहे. नामामध्ये ती शक्ती आहे. पण पापाच्या वासना जोपर्यंत मनामध्ये आहेत तोपर्यंत पुन्हा पुन्हा पाप होत रहाणार आहेत. पाप बंद होणार नाही. झालेली पापं गेली. पण पुन्हा पुन्हा होत रहाणार, त्याची अवस्था काय ? म्हणून नामसंकीर्तन, गुणसंकीर्तन भगवंतांचं करायचं. चिंतन करायचं. त्यामुळे नुसती पापं जातात असं नाही. पाप घडवणारे मनातले पापसंस्कारही नाहीसे होतात. पुन्हा पातक होतच नाहीये. अशी शक्ती आणखी महापुरूषांची आहे, ईश्वराची आहे.

तो जो मुलगा होता, त्याची बुध्दी सुधारायचं कार्य त्याच्या पित्यालाही करता आलेलं नाहीये. पिता मोठा शास्त्रज्ञ होता. पण याची बुध्दी सुधारायची, बदलायची कशी? अज्ञान कसं दूर करायचं बुध्दीतलं. तेच महाराजांच्या नुसत्या हस्तस्पर्शानं अज्ञान गेलं बुध्दीतलं, ती पातकही गेली. ज्ञान संपन्न तो मुलगा झालेला आहे. इहजन्मातही त्यांनी त्या स्त्रीला आणखी सुखी केलं. तिने जे गुरूमहाराजांच्या सांगण्याप्रमाणे यथाविधी शनिप्रदोष व्रत केलेलं आहे- गुरूर्देवो महेश्वरः या भावनेने व्रत केलं आहे, त्यामुळे त्या व्रताचा प्रभाव अधिक झाला. लगेच तिच्यावर कृपा झाली. नुसती श्रध्दा निराळी. ज्ञानपूर्वक श्रध्दा जी आहे, तिचं महत्वं यामध्ये आहे.

त्यामुळे सर्व लोकांमध्ये तो मुलगा मान्य झाला. त्याचा विवाह झाला, पुष्कळ संपत्ती मिळाली. पुढे ते अतिशय सुखामध्ये

राहिलेले आहेत. हे एक श्रीपादवल्लभांच चरित्र कुरवपूरामध्ये होऊन गेलेलं आहे. तिलाही वर दिलेला आहे. पुढच्या जन्मामध्ये माझ्यासारखा पुत्र होईल. आता वर खरा करायला पाहिजे ना दिल्याप्रमाणे. ईश्वराचं वचन आहे ते. ते सत्य केलं पाहिजे. नाहीतर ईश्वर खोट बोलतो असं सगळे म्हणतील ना. 'सत्य संकल्प' अशी प्रसिध्दी आहे त्याची, सत्यवाणी आहे.

रामचंद्र सांगत होते ना ' माझी प्रतिज्ञा काय काय आहे? तर एकदा जोडलेला बाण पुन्हा जोडायचा नाही,' त्या वेळेला काही कार्य नाही तेव्हां पुन्हा भात्यात टाकावा आणि परत लागेल तेव्हा काढावा असं नाही. एकदा बाण जोडला की त्याला कार्य मिळालं पाहिजे. दुसरी प्रतिज्ञा- पाणिग्रहण एकदाच आहे. दुसऱ्या स्त्री बरोबर पाणिग्रहण नाही. दानही रामचंद्र एकदाच करतात. याचकाला दोन वेळा राम दान देत नाही. एकदाच देतात, त्याला पूर्ण सुखी करायला. आणि राम एकदाच बोलत असतात. आणि जे बोललेले असेल तसे वागायचे.

श्रीपादवल्लभ विचार करताहेत. वर प्रदान आपण केलेलं आहे. त्या स्त्रीची योग्यताही आहे. आणि तिने तसे योग्य रीतीने अनुष्ठानही केलेलं आहे. तेव्हा तिची इच्छा पूर्ण करायला पाहिजे आहे. हा एक त्यांचा संकल्प झाला. ' आपणच तिचा पुत्र व्हायचं. दुसर शरीर धारण करायचं.' हे शरीरही तसच ठेवायचय ना ! कारण कार्य आहेत पुष्कळ, म्हणून अदृश्य झाले. अदृश्य याचा अर्थ शरीर त्याग नाहीये. पहिलं शरीर आहेच आहे. जे कोण श्रीपादवल्लभांचं आपल्याला दर्शन व्हावं अशी तळमळ असणारे भक्त असतील त्यांना ते दृश्य होताहेत. ज्ञानेश्वर महाराज समाधीमध्ये जाऊन राहिलेले आहेत. त्यांचं दर्शन घेणारी योग्य मंडळी अजून आहेत. तितकी आणखी तळमळ ज्यांच्या मनामध्ये असेल त्यांना ज्ञानेश्वर महाराजांचं दर्शन होतय.

एकनाथ महाराजांना दृष्टांत देऊन सांगितलं ज्ञानेश्वरांनी,'गळ्याला वृक्षाचे मूळ लागते आहे तेवढे कापून टाका.' त्यावेळेला सगळे अरण्य होतं. एकनाथांनी ज्ञानेश्वरी

शुध्द करुन ठेवली. अजूनही भक्तमंडळींचं वेगवेगळं काम तिथे चाललेलं आहे.

तसा श्रीपादवल्लभांचाही संकल्प झालेला आहे. अनंत जीव जगामध्ये आहेत. कोणाला कसा प्रतिबंध होतो, काय होतो हे सगळं त्यांना समजतं ना ! पुण्यकर्म तेवढी लक्षात राहातात, पापकर्म झालेली जीवात्मा विसरुन जातो. पण विसरुन गेला तरी त्याचे फल मिळाल्याशिवाय रहात नाही. म्हणून ईश्वरानेच ते सगळं समजावून घ्यायचं आहे. काय कर्म आहे, कोणच्या कर्माचा भोग आहे, काय करायला पाहिजे, की कृपा करायला पाहिजे त्यांचं त्यांनी ठरवायचं. अशी अनेक कार्य करायची असल्याने श्रीपादवल्लभांनी आपलं शरीर अदृश्य केलं आहे. आणि दुसरं शरीर धारण करायचं त्यांनी ठरविलं.

अश्विन वद्य द्वादशी, या दिवशी श्रीपादवल्लभ अदृश्य झाले असे सांगतात. तो त्यांचा महोत्सव आहे. निर्याण नाहीये. माघ वद्य प्रतिपदेच्या दिवशी नृसिंहसरस्वती कर्दली वनामध्ये निघून गेले. श्रीपादवल्लभ त्याच ठिकाणी अदृश्य झाले. एवढीच कथा आहे. सिध्द आता एका रजकाची कथा सांगणार आहेत.

तर याप्रमाणे त्या स्त्रीचे जीवन सुखी केले. त्या स्त्रीमुळेच नृसिंहसरस्वती अवतार झालेला आहे. यात पुरुषाचा काही संबंध येत नाही. अनुसूयामाता, दत्तात्रेय अवतार तिच्यामुळे झाला. श्रीपादवल्लभ अवतार सुमती नांवाच्या स्त्रीच्या बुध्दीमुळे, श्रध्देमुळे झालेला आहे. नृसिंहसरस्वती अवतार या कुरवपूर क्षेत्रामध्ये राहाणारी, अत्यंत मूर्ख मुलगा जिच्या पोटी आला त्यामुळे कंटाळलेली परंतु सुदैवाने श्रीपादवल्लभांच दर्शन झालं, अशा स्त्रीच्यामुळे झाला. त्यांच्या आज्ञेप्रमाणे शेवटपर्यंत तिने शनिप्रदोष व्रत केलं त्यामुळे त्यांची कृपा झाली. तो मुलगाही मोठा पंडित झाला. आणि पुढच्या जन्मात श्रीपादवल्लभ तिचे पुत्र झालेले आहेत. नृसिंहसरस्वती अवतारास ही एक स्त्रीच कारण आहे.

तर याप्रमाणे स्त्रियांची योग्यता याठिकाणी दाखवली आहे. भक्ती, प्रेम, श्रध्दा यांचे महत्व आहे. जो श्रध्देने, भक्तीने मोठा

तोच खरा देवाजवळ मोठा मानला जातोय. व्यावहारिक लहानमोठेपण, योग्यायोग्यता याचा विचार भगवंतांजवळ नाही. प्रल्हादजींनी आपल्या मित्रांना उपदेश करताना शेवटी हेच सांगितले, निर्मल भक्ती, शुध्द प्रेम पाहिजे. भक्ती करता भक्ती पाहिजे. भक्ती दुसऱ्या कोणच्या कार्याकरता नको आहे. अशी भक्ती मिळवण्याकरता अनेक जन्म घालवावे लागतात, तेव्हा ती भक्ती मिळते. देवाजवळ मुक्ती मागितली तर मुक्ती देतात. 'जा मुक्त व्हा ' म्हणतात. पण भक्ती चटकन देत नाहीत. भक्ती मागणारेही थोडे आहेत आणि ती देताना देवाला सुध्दा विचार करावा लागतो.

गुरूचरित्रामध्ये आणखी एका रजकाची कथा सांगितली आहे.

श्रीपादवल्लभांनी एका रजकावर कृपा केली. तेही चरित्र श्रीपादवल्लभांचे आलेले आहे. महाराजांनी द्विसाहस्त्रीमध्ये शेवटी हे चरित्र दिलेले आहे. ज्या रजकावर कृपा केली तो पुढच्या जन्मात म्लेंच्छ झाला. त्याचे चरित्र सांगतानाच त्या प्रसंगाने रजकाचे चरित्र सांगितले आहे.

एक परिट, वस्त्र धुण्यासाठी नदीवर जातो. पूर्वी त्या ठिकाणी मोठे गांव असले पाहिजे. आता त्या ठिकाणी मंदिर आहे. पुजारी त्या ठिकाणी राहातात. बाहेर काही खोल्या बांधलेल्या आहेत. आता तिथे गांव असे काही नाही. शेती वगैरे करणारे लोक रहातात. तर तो रजक श्रीपादश्रीवल्लभांच्या दर्शनाला रोज येत असे. महाराजांच्या आश्रमात यावं, झाडून काढावं, दर्शन घ्यावं, त्यांच्याजवळ बसावं. कोणाला ते काय सांगतात ते ऐकावं. ' उपदेश ते न देती तरी ऐकाव्या त्यांच्या गोष्टी' असं म्हणतात. संतांच्या संगतीमध्ये काही प्रत्यक्ष वैयक्तिक उपदेश मिळालाच पाहिजे, अशा आग्रहाची जरुरी नाही. कोणाच्या द्वाराने कसे मार्गदर्शन मिळेल याचा नेम नाही. अवधूतांनी चोवीस गुरू केले. ज्याच्या मनामध्ये पूर्ण भक्ती आहे, असा जो अधिकारी साधक असेल त्या साधकाला कुठूनही मार्गदर्शन मिळू शकते. पंचमहाभूतांपासून मला कळलं असं अवधूत सांगताहेत. त्याप्रमाणे

हा रजक नुसता जाऊन बसत असे. भक्त यायचे, श्रीपाद त्यांना काही सांगायचे, याने फक्त ऐकायचे असा क्रम चालू होता. निस्सीम भक्ती आहे.

एके दिवशी, तो नदीवर धुणी धुण्याकरता गेला असता, तिथे एक राजा आलेला आहे. अनेक नावा आहेत, स्त्रीयाही पुष्कळ बरोबर आहेत. नोकर चाकर आहेत. वाद्ये वाजताहेत. ते राजाचे ऐश्वर्य त्या परिटाच्या दृष्टीला पडलेले आहे. आतापर्यंत अशा ऐश्वर्याची काही कल्पनाच नव्हती. काम करायचं. काय मिळेल तेवढ्यात उदरनिर्वाह करायचा. त्यामुळे राजाचे ऐश्वर्य पाहून त्याच्या मनात वासना प्रगट झाली. ' काय राजा भाग्यवान् आहे ' नंतर महाराजांच्या दर्शनाकरता आल्यावर त्यांना नमस्कार करता करता हे विचार त्याच्या मनात आलेले आहेत.

श्रीपादवल्लभांनी विचारले, ' काय रे रजका, काय विचार चाललेले आहेत ' चपापला तो. ' काही नाही महाराज. राजा भाग्यवान आहे असं वाटलं. किती सुखं त्याला आहेत. किती ऐश्वर्य आहे. मला नको ते वैभव. ' असं तो म्हणाला. पण मनातल्या वासना जातात काय कुठे. अंतरंगात असेल ते बाहेर प्रगट होतच म्हणतात. अशा आशयाचा तुकारामांचा एक अभंगही आहे.

तो रजक म्हणाला, ' तुमच्या जवळ राहायला मिळावे. तुमची सेवा घडावी. याखेरीज अन्य इच्छा नाही. '

श्रीपादवल्लभ म्हणाले, ' बाबा, मनांत उत्पन्न झालेल्या वासनांची तृप्ती झाल्याशिवाय मोक्षमार्ग सापडत नाही ' मनाचा निरोध करणं हे कर्तव्य आहे. परंतु जर विषय सुखांनी आपल्या वासनांची तृप्ती होत असेल, तर ती करायला हरकत नाही. त्या वासना जर. तशाच राहिल्या तर तत्वज्ञान झाल्यानंतरसुध्दा वासनाक्षयाचा एक स्वतंत्र अभ्यास करावा लागतो. तत्वज्ञान आहे- मीच ब्रह्मरूप आहे, सर्वव्यापी मी आहे अनन्य स्वरूप मी आहे, हे कळले, सगळे दुःख गेले. परंतु मनामध्ये असणाऱ्या सगळ्या वासनांचा क्षय होण्याकरता पुन्हा अभ्यास पाहिजे. म्हणून

असे करायला पाहिजे. समाधी अवस्था कायम टिकवण्याकरता प्रयत्न पाहिजेत. प्रयत्न केल्यानंतर सुध्दा जर प्रारब्ध कर्माचे प्रतिबंध असेल तर समाधी टिकू शकत नाही.

झोप घेण्याचं ठरवून जर आम्ही निजलो तरीसुध्दा त्या प्रारब्ध कर्मानी जागृतावस्था येते. आमच्या इच्छेप्रमाणे आम्ही झोप घेऊ शकत नाही. ' मला झोप यावी ' म्हणून कुंभकर्णाने वर मागून घेतला होता. म्हणून तो सहा सहा महिने निजत होता. इतकं आम्हाला शक्य नाही. मग समाधी अवस्था तर किती दूर आहे.

मग तो मनोनाश, निवृत्तिक मन करणं, स्थिर मन करणं, समाधी अवस्था ही सुध्दा कायम राहू शकत नाही. पुन्हा समाधीतून उठल्यावर ज्या वासना मनात उत्पन्न झालेल्या असतात किंवा होतात त्यांचा क्षय करण्याचा अभ्यास केला पाहिजे. विचार करूनच त्या वासनांचा क्षय करायचा. भगवंताच्या नामस्मरणाने, चिंतनाने, वाचनाने तो क्षय करायचा. तो स्वतंत्र क्षय करावा लागतो. त्याशिवाय विदेह मुक्ती प्राप्त होत नाही. देह संबंध कायमचा सुटत नाही म्हणून, ' तुझ्या मनामध्ये वासना आहे. तुला या जन्मात राजा व्हायचय की पुढच्या ?' असे श्रीपादवल्लभांनी विचारले.

तो म्हणाला, ' महाराज मी आता म्हातारा झालो आहे. या म्हातारपणात राज्य करून काय उपयोग होणार आहे ?' श्रीपाद म्हणाले, ' म्हणजे तुझ्या मनात राजा व्हायची इच्छा आहे हे सिध्द झालं. जा, काही हरकत नाही.'

संत महात्म्यांचा प्रसाद झालेला आहे. पण त्याची वासनाच त्याच्या आड आलेली आहे. भगवंतांचे सान्निध्य आहे, सेवा घडत आहे, पण ती सेवा मध्येच थांबली. त्याच्या वासनेने तो राजा झाला, हे चांगले झाले, की महाराजांची सेवा बंद झाली हे चांगले झाले? हे कसं ठरवायचं ? जर सजा झाली तर काय हरकत आहे? राज्य सुख भोगावित आणि पुन्हा महाराजांची सेवा करावी. पुन्हा महाराजांचे स्मरण राहील कशावरून ?

राज्य सुखामध्ये मन आसक्त झाल्यावर देवाचे स्मरण कसे राहाणार ? म्हणून कुंतीने देवाजवळ सांगितले, पांडवांना तुम्ही जास्त सुखी करू नका. साम्राज्य मिळालं, सर्व सत्ता मिळाली तर त्यामुळे अहंकार उत्पन्न होईल आणि तुम्हाला ते विसरून जातील. तुमची विस्मृती ज्यामुळे होणार आहे असं सुख आम्हाला नको. आम्हाला विपत्तीत, अरण्यातच ठेवा.'

हे कुंती विचारपूर्वक म्हणालेली आहे. पण रजकाला महाराजांनीच सांगितलं,' जा, तुला याकरता एक जन्म घ्यावा लागेल. राज्य सुख पुष्कळ मिळेल. सगळी व्यवस्था होईल' पण त्याचे संस्कार मात्र शेवटपर्यंत चांगले राहिलेले आहेत.' आम्ही दुसरा अवतार घेणार आहोत. त्यावेळी दर्शन व भेट होईल' असे त्याला आश्वासन देऊन त्याचे समाधान केले. लगेच त्याच्या छातीत दुखायला लागून त्याचे प्राणोत्क्रमण झाले. पुढच्या जन्मात तो बीदरचा बादशहा झाला. भक्तीयोग विभागामध्ये शेवटी हे चरित्र घातले आहे.

याप्रमाणे श्रीपादवल्लभ अदृश्य झाले. त्यांचा दुसरा संकल्प झाला. त्या स्त्रीला वरप्रदान केल्याप्रमाणे तिचा मुलगा व्हायला पाहिजे ना ! ह्या शरीराने तो संकल्प कसा पूर्ण होणार ? ती स्त्री म्हणाली, ' पुढच्या जन्माचं कुणी बघितलं ? मीच तुमच्या जवळ आहे. मलाच माता माना. मी तुम्हाला पुत्र समजते. असं आपण राहू या' सरळ बोलली ती. म्हणून तिच्या मुलावर कृपा केली. मुलाला घेऊन राहा म्हणाले.

तर ही माता होणार आहे. या जन्मामध्ये नाही पुढच्या जन्मामध्ये. म्हणून तो संकल्प झाला आणि हे शरीर त्यांनी अदृश्य ठेवले आहे. पण भगवान् श्रीपादांचे चिंतन करणारे जे असतील त्यांना अद्यापि त्यांचे दर्शन होते आहे.

अदृश्य झाल्यानंतरची एक कथा सिध्द सांगताहेत. भक्तांचं संरक्षण किंवा भक्ताची इच्छा ही देव कसे पूर्ण करतात, ईश्वराची काय शक्ती आहे या बद्दलची ही कथा आहे. कुरवपूरमध्ये राहाणाऱ्या एका ब्राह्मणाने बुध्दी जरा कमी असल्याने व्यापार करायला

सुरवात केली. अध्ययन वगैरे सोडलं. त्याला काही जमलं नाही ते. दुकान वगैरे काढलेलं आहे. व्यापार करतो आहे. श्रीपादवल्लभांचा भक्त होता तो. श्रीपादवल्लभ जरी अदृश्य झालेले असले तरी त्यांची कीर्ती ऐकल्यामुळे ह्यांच्या मनांत त्यांच्याबद्दल भक्ती मनामध्ये आहे.

त्याने एकदा त्यांना नवस केला की मला जर व्यापारात फायदा झाला तर मी एक सहस्त्र भोजन घालीन. पुष्कळ अन्नदान करीन. अगोदर कोणी हे करीत नाही. म्हणजे देवावर विश्वास आहे. पण 'देवांनी जर माझं हे काम केलं तर मी हे करीन ' असा विचार आहे. ते सुध्दा मिळालेलं सर्व काही तो देणार नाही तर त्यातील अंश देणार. म्हणजे सकाम भक्तीमध्ये श्रध्दा जरी असली तरी ती पुष्कळ कमी असते. विचार केल्यानंतर आपल्याला कळून येतं.

प्रल्हादजींनी नरसिंहांची स्तुती करीत असताना एक सिध्दांत मांडलेला आहे. भक्तांनी आपली सेवा करावी, पूजा करावी, काही तरी आपल्या करता करावं. द्यावं घ्यावं कशाचीही इच्छा नाही. कशा करता हे घ्यायचे ? काय कमी आहे ?लक्ष्मी साक्षात् जिथे राहाते आहे. आत्मानंदामध्ये निमग्न आहे. कोणाकडूनही पूजा अर्चा याची काहीही अपेक्षा नाही. हे जे भक्त पूजा करतात. कोणीही असो, लहान असो मोठा असो. प्रल्हादजींनी त्या करता एक सिध्दांत मांडलेला आहे.

देवाला जर आपण दिले तर आपल्याला मिळेल ही इच्छा सर्व जण करतात. म्हणजे काय तर विश्वरूपी परमात्मा आहे. विश्व म्हणजे त्याचं प्रतिबिंब आहे. आरशामध्ये जसे प्रतिबिंब दिसतं तसं ! बुध्दीमध्ये असलेलं प्रतिबिंब म्हणजे सर्व जीवात्मे आहेत. त्या प्रतिबिंबाला जर मिळायचे असेल तर अगोदर बिंबाला अर्पण करावे लागते. रत्नाची माळ प्रतिबिंबाला पाहिजे असेल तर बिंबाच्या कंठामध्ये ती माळ घातली पाहिजे. म्हणजे ती प्रतिबिंबाला मिळते. त्याप्रमाणे सगळेही आपण ईश्वराचे प्रतिबिंब आहोत. ईश्वराला दिले म्हणजे आपल्याला मिळेल त्याशिवाय

मिळू शकणार नाही, अशा इच्छेने ते सगळे पूजा करतात असा मोठा सिद्धांत त्यानी मांडला आहे.

भक्ती आहे, निश्चय आहे, देव देणार आहे. ' अगोदर नाही, नंतर अन्नदान करीन.' परंतु अगोदर केलं म्हणून काय झालं ? अगोदर आमच्या जवळ शक्ती नाही, ' आमच्या जवळ इतकं नाही 'म्हणतो आपण . त्यांना काही इतकचं लागतं असं नाही. थोडं असलं तरी करायला हरकत नाही. अगोदर देवाची पूजा करून नंतर प्रयत्न करायला काय हरकत आहे ? पण उलट आहे. प्रयत्नाला यश आल्यानंतर मग देवाला करायचं आहे. हा मनुष्य स्वभाव आहे.

पुष्कळ त्याला फायदा झाला आहे. निघाला तो पुष्कळ पैसा घेऊन. कुरवपूरात जायचे आहे आणि अन्नदान करायचे आहे. संकल्प आहे. काही चोरांना ही बातमी समजली. याला असा असा पैसा मिळालेला आहे, पैसा घेऊन हा निघालेला आहे, असा नवस केलेला आहे. ती मंडळीही त्याच्या बरोबर निघाली. म्हणाली,' आम्हीही कुरवपूरला यात्रेला जात असतो. बरं झालं. तुमचीही गांठ पडली. जाऊ या, आपण.' आणि जाता जाता अरण्यामध्ये ह्याला त्यांनी ठार मारले. त्याच्या जवळचा पैसा घेऊन ते निघाले. त्यांना भीती कशाची वाटणार ? पण भीती नाही म्हणावी तर लोकांसमक्ष का मारत नाहीत ? अरण्यामध्ये जाऊन कशाला मारायचं ? पैसा पाहिजे आहे ना ! पण इथे कुणीच नाही बरोबर. कोण आहे याचा संरक्षक ?

मारलं त्यांनी. एक चोर मात्र त्यांच्याशी सहमत नव्हता. कुरवपूरला जायला त्यांच्या बरोबर आला होता. इतक्यात, ' न मे भक्तः प्रणष्यति ' आता प्राण तर निघून गेला भक्ताचा. त्याला पुन्हा जिवंत करायचा. श्रीपादवल्लभ आले. ' माला कमंडलू अधः कर पद्मयुग्मे ' डमरू, त्रिशूळ हातात आहे. शंखचक्र वरती आहे. त्रिशूळाने सगळ्या चोरांना श्रीपादवल्लभांनी मारले. एक चोर मात्र शरण आलेला आहे. तो म्हणाला, ' महाराज, मी सहज आपला यात्रेला जाण्याकरता म्हणून आलो. मला काही हे

माहीत नाही.' त्याला जीवदान मिळाले.

मस्तक तुटलेले आहे. ते जोडायचे आहे.आणि जिवंत करायचे आहे. ही दोन्ही कामे म्हणजे मनुष्याच्या शक्तीच्या बाहेरचीच आहेत. त्या दुसऱ्या चोराला बोलावले 'हे मस्तक त्याला जोड' असे सांगितले. त्याला भस्म लावले आणखी आपल्या अमृत दृष्टीने पाहिल्यावर ते मस्तकही जोडलं गेलं आणि त्याला जीवही आलेला आहे. शरीर अगोदर तयार करायला पाहिजे ना ! स्थूल शरीर चांगले असेल तर त्याच्यामध्ये सूक्ष्म शरीर प्रवेश करू शकतं व कार्य करू शकतं. सूक्ष्म शरीरामुळे जीवदान आहे. तेही देह सोडून गेलेले आहे. ते सूक्ष्म शरीरही पुन्हा तिथे आणून दिलेलं आहे. दुसराच कोणी जीवात्मा तिथे आलेला नाही. कार्य करायचं म्हणजे ज्ञानपूर्वक करायचं ! सर्वज्ञ ईश्वर आहे हे या वरूनच सिध्द होते. तो गेलेला जीवात्माच पुन्हा त्या ठिकाणी आलेला आहे.

सावध झाला, उठून बसला. सूर्योदय झालेला होता. सगळे चोर मरून पडलेले होते. फक्त एक चोर जिवंत होता. 'काय झालं. बाबा ? कोणी मारलं ?' श्रीपादवल्लभ बाबा म्हणून एक साधू आले होते. त्यांनी त्रिशूळाने सगळ्या चोरांना मारून टाकलं आणि तुला जिवंत केलं हे दोन्ही त्या चोराने पाहिलेले आहे. याला फक्त मारलेल्या चोरांची प्रेतच दिसत होती. पण स्वतःला जिवंत केलं हे याला कसं कळणार ? त्या चोराने सांगितले की तुझा शिरच्छेद झाला होता. तुलाही जिवंत केलं आणि या चोरांना मारलं.

तो म्हणाला, ' देवा, काय आहे ? चोरांना दर्शन दिलस आणि मला दर्शन नाहीये.' त्याला वाईट वाटलं. द्रव्य घेऊन गेला. पुष्कळ मोठी समाराधना झाली. चार हजार मंडळींना अन्नदान केले.

भक्ताने केलेला संकल्प. आता याला मृत्यू आला. पुढच्या जन्मात हा अन्नदान करील. आत्मा काही मरत नाही. दुसरा मनुष्याचा देह याला देता येईल. देवांना काय तसं करता आलं

असतं. दुसऱ्या मनुष्याचा देह दिला तर त्या जन्मात करील की नाही. त्याने अन्नदान करण्याचा संकल्प काय पुढच्या जन्माकरता केला होता ? फायदा त्याला या जन्मात झालेला आहे आणि त्याच फल त्याला या जन्मातच दान करायचं आहे ना. म्हणजे भक्ताची सत्कर्म करण्याची ती बुध्दी आहे, तो संकल्प आहे तो त्याच जन्मात पूर्ण करून झाला पाहिजे. आणि ती पूर्ण करण्याची शक्ती ईश्वराजवळ आहे. या जन्मात पूर्ण होऊ नये म्हणून चोर आलेले आहेत. मारले सुध्दा त्यांनी. पण श्रीपादवल्लभांनी त्या चोरांचा नाश करून पुन्हा त्याला जिवंत करून हे कर्म करविले आहे.

म्हणून ईश्वराकरता जर संकल्प केला- मग तो सकाम असो निष्काम असो- त्या संकल्पाची सिध्दीही होणे शक्य आहे. पुढे पहाता येईल फळ वगैरे असे काही नाही आहे. कर्माचं फळ त्या अदृष्टाने त्याला मिळालं. त्याचा नाश व्हायचा होता तो झाला. परंतु स्वतंत्र ईश्वरकृपेचे हे स्वतंत्र फळ आहे. त्या कृपेचेही सामर्थ्य आहे. हे देखील या ठिकाणी दिसून आलेलं आहे. हा देह असेपर्यंत प्रारब्ध त्याच्याजवळ आहे. भगवंतांनी फळ दिलेलं आहे. पुढे आता त्याला दुसरा जन्म घेऊन यायचं आहे. ते प्रारब्ध केव्हां सुरू होईल तेव्हां होईल. हे जे काही मध्ये फळ मिळालेलं आहे, ते काही कर्माचे फळ म्हणता येईल. त्याने पूर्वी संकल्प केलेला आहे. तो संकल्प त्याचा पूर्ण झाला पाहिजे. ही तळमळ त्याला होती म्हणून तर तो त्याचे सर्वस्व घेऊन निघालेला आहे. ईश्वराची कृपा प्रारब्धाने झाली असे काही लोक म्हणतात. नाहीये. ईश्वराची कृपा ही स्वतंत्र आहे. ईश्वराच्या कृपेचे फळ प्रारब्धाने मिळाले असे समजून काय उपयोग आहे? कर्माला प्राधान्य आहे.

याचा देहपात झाल्यानंतर याचं प्रारब्ध या देहापुरतं संपलेलं आहे. आता याचं पुन्हा जिवंत होणं, पुन्हा तेच शरीर त्याला मिळणं, पुन्हा तीच वासना त्याची कायम राहाणं आणि त्याने मिळवलेल्या द्रव्याचा त्याप्रमाणे उपयोग करणं, हे जे कार्य आहे

हे ईश्वराच्या इच्छेमुळे झालेलं आहे. म्हणून ‘ कर्तुमकर्तुम् अन्यथा कर्तुम् ’ असे ईश्वराचे सामर्थ्य शास्त्रकारांनी मानलेले आहे. ईश्वराला सुध्दा आपल्या अनंत शक्तीची कल्पना नाही असे मानले जाते. ‘ यदि वा अंगवेदन वेद ’ वेदामध्ये सुध्दा वर्णन केले आहे. आपली माया शक्ती किंवा सामर्थ्य किती आहे हे त्याला तरी कळतं की नाही कोणासं ठाऊक? याचा अर्थ ईश्वराला अज्ञान आहे असा नाही. ती इतकी अनंत शक्ती आहे की ‘आपली शक्ती अनंत आहे’ इतकच त्याला माहीत आहे. किती आहे, काय आहे, काही नाही. पुष्कळ वाटेल तितकी शक्ती आहे. म्हणून याच्या वरती काही चिकित्सक लोक असं सांगतात. पण त्याचं उत्तर इथे देता येत नाही. प्रारब्धाने त्याला फळ मिळालेलं नाही. तो जिवंत झाला नाही. देह गेला म्हणजे त्याचं प्रारब्ध संपलेलं आहे. त्याच्या केवळ भक्तीचं फळ त्याला मिळालेलं आहे. आणि ते ईश्वराने दिलेलं आहे.

आता दुसऱ्या अवताराची कथा सिध्द सांगणार आहेत. विदर्भ प्रांतामध्ये कारंजा नावाचे गांव आहे.अद्यापही आहे.लाडाचा कारंजा त्याला म्हणतात.कस्तुरी,केशर यांचा फार मोठा व्यापार तिथे चालत होता. कस्तुरी, केशर उंटावरुन येत असे, असे लोक सांगतात. त्याठिकाणी जेव्हा सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजही गेले होते, तेव्हा तो वाडा वगैरे पाहून इथे (नृसिंहसरस्वतींची) जन्मभूमी असावी असे सांगितले. महाराजांचे एक शिष्य ब्रह्मानंदतीर्थ यांनी ही सगळी योजना केली. तिथे एक मंदिर बांधलेलं आहे. सगळी व्यवस्था करून दिलेली आहे. कायमची खर्चाची व्यवस्था आणि तिथे कार्य चाललेलं आहे. पौष शु. द्वितीया. माघ वद्य प्रतिपदेला महाराज कर्दळी वनांत निघून गेले.

त्या गावामध्ये- कुरवपूरामध्ये- राहाणारी जी स्त्री होती जिचा पुत्र पूर्वी मूर्ख होता व जो श्रीपादवल्लभांच्या कृपेने ज्ञानी झालेला आहे, त्या स्त्रीला मृत्यू आल्यानंतर, तिचा जन्म कारंजा गावामध्ये एका सत्शील घरामध्ये झालेला आहे. आणि तिचे

अंबा हे नांव ठेवले. त्या मुलीवर लहानपणापासून चांगले संस्कार आहेत. मनात शिवभक्ती आहे. लग्नाचा काल आल्यानंतर, त्याच गावामध्ये राहाणाऱ्या, माधव नांवाच्या ब्राह्मणाबरोबर तिचा विवाह झालेला आहे. तोही मोठा शिवभक्त होता. शनिप्रदोष व्रत त्यांच्याही घरामध्ये करीत होते. ही स्त्री पूर्वीच्या संस्कारांप्रमाणे शिवभक्ती करते आहे. त्या मुली बरोबर जन्माला आलेल्या कित्येक मुली असतील. त्या कुठे शिवभक्त झाल्या नाहीत. हीच तेवढी का झाली ? याचे काय उत्तर द्यायचे ? घरात सर्व मुली करतात म्हणून ती करत असेल हे काही बरोबर जमत नाही. तिला पटले पाहिजे. स्वभाव तसा पाहिजे. तो स्वभाव तसा पूर्व संस्कारांप्रमाणे बनत आलेला आहे. म्हणून पूर्वीचे संस्कार, पूर्व जन्म, त्याप्रमाणे या वेळेलाही कार्य चाललेले आहे.

ईश्वराची योजना आहे. पूर्वीच्या अभ्यासाप्रमाणे तो वागतो, याचा अर्थ जीव स्वतंत्र नाही. ईश्वराची कृपा पाहिजे. त्याशिवाय पुन्हा तसा जन्म मिळेल तेव्हां मिळेल. मिळाल्यानंतर ते पूर्वीच्या संस्काराप्रमाणे होईल. पण ते संस्कारही चांगले दृढ असायला हवेत तर होईल. ही तर ईश्वराची इच्छा आहे ना ! ईश्वरानेच तिला वर दिलेला आहे की मी तुझा पुत्र होणार आहे म्हणून पुढचाही जन्म चांगलाच मिळालेला आहे. आणि तिची शिवभक्ती चालू राहिलेली आहे. पुढे ती गर्भिणी झालेली आहे. श्रीपादवल्लभ तिच्या उदरामध्ये आलेले आहेत. दुसरे रूप धारण करणार आहेत आता. श्रीपादवल्लभ अदृश्यरूपाने त्या कुरवपूरात राहिले आहेत हे देखील सिध्दांनी सांगितले. अदृश्यरूपाने राहिलेले आहेत याचे विवरण करताना महाराजांनी खाली टीकेमध्ये एक विषय स्वतंत्रपणे मांडला आहे.

अध्ययन वगैरे करीत राहिले म्हणजे वेदाचेही फळ सांगितले आहे. दानाचे, यज्ञाचे, तपाचेही फल आहे. परंतु ज्या ठिकाणी श्रीपादवल्लभ राहिलेले आहेत, भगवंताचा त्या ठिकाणी वास आहे, त्या स्थानामध्ये राहून जर वेदाध्ययन, यज्ञ, तप दान केलं, तर जास्ती फल मिळतं, आणि लवकर फल मिळतं असं मुद्दाम

सांगितलं. पुण्यक्षेत्री राहून सत्कर्म होण्याचे जास्त व लवकर फल मिळते. श्रीपादवल्लभांनाही शरीर आहे. ते राहीले म्हणजे शरीरच आहे त्यांचे. आम्हालाही शरीर आहे. त्यांनाही शरीर आहे. मग त्यांच्या आमच्यामध्ये काय फरक आहे ? त्यांचही शरीर पंचमहाभूतांपासूनच उत्पन्न झालेलं आहे. पण ते त्या स्थानामध्ये येऊन राहिल्यावर त्या स्थानाला एवढं महत्व यायचं कारण काय? त्या स्थानामध्ये राहून जर अनुष्ठान, नामस्मरण केलं तर आणखी जास्त फळ मिळण्याचं कारण काय ? त्याबद्दल खुलासा मुद्दाम केलेला आहे.

आपल्या विदर्भ प्रांतातील गुलाबराव महाराज यांनी सुध्दा सिध्दांत मांडलेला आहे. भगवान् गोपालकृष्ण महाराज सर्वांनाच दिसत आहेत. आमच्या सारखेच त्यांनाही हातपाय आहेत. आमच्याप्रमाणेच चालताहेत, बोलताहेत. पण त्यांच शरीर पंचभौतिक नाही म्हणजे ते कर्मनिर्मित नाही. शुध्द चैतन्य घन स्वरूप आहे. परमात्म चैतन्यच त्या रूपामध्ये दिसते आहे.

त्याचप्रमाणे हा सिध्दांत. श्रीपादवल्लभांचं शरीर म्हणजे चैतन्यलीला आहे. ते अत्यंत शुध्द आहे. त्यामुळे त्यांचे शरीर व आपले शरीर जरी समान दिसले तरी पुष्कळच अंतर आहे. ते ज्या ठिकाणी राहातात त्या स्थानाचेही माहात्म्य वाढते. इतर ठिकाणी सत्कर्म करताना, नामस्मरण, ध्यान करताना प्रतिबंध येण्याचा संभव आहे. आपली कर्मे पुष्कळ प्रकारची असतात. त्या कर्मांमुळे आपला अभ्यास अखंड प्रतिबंधरहित चालू शकत नाही. अनेक विघ्ने उत्पन्न होतात.

असे जे ईश्वराचे स्थान असेल त्या स्थानात जाण्याचे भाग्य जर मिळाले तर त्या स्थानांत प्रतिबंध आले तरी ईश्वराच्या कृपेने दूर होतात. निर्विघ्नपणे आपला अभ्यास चालू राहातो. आणि त्या अभ्यासामध्ये जास्ती जास्ती उन्नती होऊन साक्षात्काराची योग्यता आपल्याला प्राप्त होते. म्हणून मोठे मोठे संत महात्मे नरसोबाच्या वाडीला येऊन राहात होते. मौनी स्वामी म्हणून एक फार मोठे अधिकारी आणि जीवन्मुक्त असे महात्मे तिथे येऊन

राहिले होते. सद्गुरू वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजही तिथे रहात होते.

याचं कारण त्यांनी सांगितलं आहे. संध्या घरात करण्यापेक्षा नदीतीरावर जाऊन केली तर जास्त पुण्य आहे. चित्ताला भ्रम, व्यग्र निर्माण करणारे प्रसंग आपण तिथे राहातो तिथे निर्माण होणे शक्य आहे. त्याही ठिकाणी जर आपलं अखंड अनुष्ठान चालू रहात असेल, तर, तेही स्थान तशा प्रकारचे पवित्र होतं.

म्हणून त्या ईश्वर स्थानामध्ये ज्याला राहाता येतं त्यांनी राहावं, प्रयत्न करावा. त्याठिकाणी सगळे प्रतिबंध दूर होतात. हे स्थानाचं माहात्म्य आहे.

बाहेरच्या गोष्टींकडे लक्ष देऊन काही उपयोग नाही. साधकांनी आपल्या साधनेकडेच लक्ष देऊन राहिले पाहिजे. ईश्वराची कृपा होण्याबद्दल आपल्या मनात तळमळ, करुणा वाढत राहिली पाहिजे. लोकांचा काही उपसर्ग झाला तरी तितिक्षेने राहायला पाहिजे. आणि आपलं साधन जर अखंड चालू ठेवलं तर ईश्वराच्या कृपेने तो साधनाभ्यास दृढ होत जातो. साक्षात्कार, मुक्ती, ज्ञान वगैरे सर्व प्राप्त होतं. म्हणून श्रीपादश्रीवल्लभ ज्या ठिकाणी राहिले त्या ठिकाणी राहावं आणि अनुष्ठान करावं, हा एक मार्ग सांगितला. जरी तसं नाही झालं तरी कुठेही राहून आपण त्यांचं स्मरणं केलं तरी श्रीपादवल्लभ कृपा करतात. हेही शेवटी त्यांनी सांगितलं आहे.

आता ही त्यांची माताच होणार आहे. तिचे पुण्य किती असेल ? शनिप्रदोष व्रत तिने आजन्म केलं पण श्रीपादवल्लभांनाच शंकर समजून केलं आहे. म्हणजे पुण्यामध्येसुध्दा तिच्या कितीतरी वाढ झाली आहे. नुसती शंकरांची उपासनाच नव्हे तर शंकरांवर श्रध्दा आहे. आणि श्रीपादवल्लभच शंकर आहेत ही दुसरी श्रध्दा आहे. त्यामुळे तिची श्रध्दा कितीतरी वाढली आणि म्हणून तिचे पुत्र झाले भगवान् श्रीपादवल्लभ. म्हणजे तिची पुण्याई सुध्दा कितीतरी मोठी आहे. गर्भस्थ भगवान् ! ज्ञानस्वरुप परमात्मा गर्भामध्ये आहे. गर्भिणी झाली आहे ती अंबा. घरी येणाऱ्या

जाणाऱ्या मंडळींबरोबर तत्वज्ञानाचे विचार ती मांडते आहे. अशा रीतीने नऊ महिने पूर्ण झाले आहेत आणि दहाव्या महिन्यामध्ये श्रीपादश्रीवल्लभ पुन्हा जन्माला आले आहेत. दुसरा जन्म आहे. त्यांचे पहिले शरीर कायमच आहे. परशुराम अवतार कायम असून रामावतार झालाच की नाही? दोन जन्म दोन रुपं धारण करणं, त्यांना काय अशक्य आहे? ते कार्य करण्याचा काल आलेला आहे. परशुराम अवताराचं कार्य थांबलेलं आहे. संपलेलं आहे. आता पुढे दुसरं कार्य करायचं आहे. रावणादिकांचा समाचार घ्यायचा आहे. त्यामुळे रामावतार झाला.

आता हे तर साक्षात भगवान् आहेत. आपल्या खऱ्या स्वरुपाची जाणीव करुन देण्यासाठी त्यांनी ओंकाराचा उच्चार केला. ओंकार ईश्वररूप मानतात. कोणीही जीवात्मा जन्माला आल्या बरोबर त्याला आपल्या खऱ्या स्वरूपाचे विस्मरण होते आणि तो रडू लागतो. हे केवळ अज्ञान आहे. पण इथे तर पूर्ण ज्ञान आहे. आपलं खरं ईश्वरीरूप इतरांना समजून यावं म्हणून दत्तप्रभूंनी ओंकाराचा उच्चार सुरू केला. ओंकार उच्चार करताच ते एकदम प्रगट झाले.

कृष्णावतारामध्ये प्रगट झाले ते सोळा वर्षांचं शंखचक्ररूप धारण करून. देवकी वसुदेवांनी ते पाहिलं. देवकी म्हणाली, हे रूप धारण करून काय करणार ? लहान व्हा. मग ते लहान झाले. इथे त्यांनी जे रूप धारण केलं ते बालरूप आहे. परंतु जन्माला आल्याबरोबर प्रणवाचा उच्चार सुरू झाला आहे. प्रणवाचे माहात्म्य मांडूक्योपनिषदांमध्ये पुष्कळ सांगितले आहे. 'प्रणव ' हे भगवंताचे अगदी प्रिय नांव आहे. खरं नांव बाजूला ठेवून बाबासाहेब,अण्णासाहेब अशा नांवाने हाक मारलेली आवडते म्हणतात तशी स्थिती आहे. ओंकार हे अत्यंत प्रिय नांव आहे. त्या ओंकाराच्या उपासनेने साक्षात भगवंताचे दर्शन होते. साक्षात्कार होतो. आपण असामान्य आहोत हे दाखवण्याकरता ओंकार पठण त्यांनी चालू केलं.

जातकर्म संस्कार केला ब्राह्मणाने. ज्योतिष मंडळींनी

बाळांची ग्रहस्थिती पाहिली कोणत्याही ग्रहाचा अस्त नाही. शुभस्थानी सगळे सौम्य ग्रह आहेत. अशी सगळी कालाचीही स्थिती पाहून त्यांनी सांगितले,' हा मुलगा संन्यासी होणार, गृहस्थाश्रमी नाही.' संन्यास दीक्षा म्हणजे सगळ्यांचा उध्दार करणारी दीक्षा आहे ती. हे महात्मे आपण मात्र अगदी अलिप्त राहून अखंड ब्रह्मचिंतन करतात.' हा काही सामान्य जीव नाही. मोठा अधिकारी आहे. परमेश्वर आहे ' असे त्यांनी सांगितले. सगळ्या गावामध्ये ही बातमी पसरली कारण जन्मल्या बरोबर प्रणवोच्चार करणारा मुलगा कधी कोणी पाहिलाही नव्हता की ऐकलाही नव्हता. ज्याला एक शब्दसुध्दा बोलता येत नाही इतक्या लहान मुलाने ओंकाराचे पठण करायचे म्हणजे काय ? लोकं कौतुकाने पहायला लागली. पण दृष्ट लागू नये म्हणून त्या ब्राह्मणाने त्या मुलाला, कोणी पाहू नये, म्हणून दाखवले नाही. आता इथे दृष्ट लागेल ही कल्पना मनामध्ये आहे.

वसुदेव देवकीला तरी अगोदर कल्पना होती की आठवा अवतार भगवान् श्रीकृष्ण घेणार आहेत. ब्रह्मादिकांनी स्तुती केली. ब्रह्मदेवांनी देवकीला सांगितलं,' तू घाबरू नकोस. साक्षात भगवान् विष्णू तुझ्या पोटी आले आहेत. ' ही कल्पना तरी देवकीला होती. इथे अंबेला तशी काही कल्पना नाहीये. ओंकार पठण करणारा जीव सामान्य कसा असू शकेल याची कोणालाही कल्पना आली नाही. ' दृष्ट लागेल ' म्हणाले. कोणालाच दर्शन नाही. कोणी बायका आल्या असतील त्यांना कदाचित दाखवलं असेल.

ह्या प्रमाणे दोन चार दिवस झाल्यानंतर त्या मातेने सांगितले,' अहो, माझ्या स्तनामध्ये दूध कमी आहे. एखादी दाई बघा. या बालकाला पुष्कळ दूध हवं आहे. ' पण त्या बालकाने स्तनाला नुसता स्पर्श करता क्षणी तिच्या स्तनातील दूध वाढलं आहे. हाही चमत्कार त्या मातेला दिसला. आणखी असे कितीतरी चमत्कार तिने पाहिले असतील, पण ते काही तिने प्रगट केलेले नाहीत.

यांप्रमाणे दोन तीन वर्षाचा काळ गेलेला आहे. यांच आपलं ओंकार पठण चालूच होतं. कोणी काही म्हटलं तर शांतपणे ऐकून घ्यावं. आणि प्रणवाचा उच्चार करावा. मुलाला काही समजत नाही असंही म्हणता येत नाही. सगळं व्यवस्थितपणे ऐकून घेतो आणि आपलं उत्तर प्रणवाने देतो आहे. अज्ञानी आहे असं नाही, पण बोलत का नाही ? मातापित्यांची चिंता वाढत चालली आहे. मग काही लोकांनी सांगितल्याप्रमाणे शनिवारी किंवा रविवारी अश्वत्थ वृक्षाच्या पानावर अन्न कालवून त्याला भोजन घालणे असे काही उपाय चाललेत. त्या बालकाला वाणी यावी म्हणून. पण काही उपयोग होत नाहीये.

उपनयनाचा काल आला. सात आठ वर्षे होत आली. तरी वाचा नाही. आणि मग मात्र त्यांच्या मनांत चिंता उत्पन्न झाली. म्हणाले,' आम्ही प्रदोष व्रत केलं. अजूनसुध्दा करतो. उपासना चालू आहे. आणि शंकरांनी मला असला कसला मुलगा दिला ? काही बोलता येत नाही. समजतय सगळं, ऐकून घेतो सगळं. याचं उपनयन कसं करायचं ? गायत्री मंत्राचा उपदेश कसा करायचा ?' अशी चिंता मातापितरांना उत्पन्न झाली. तेव्हां त्या बालकाने खुणेने सांगितले की जानवं वगैरे घातलं की मी बोलायला लागेन. आणि एक लोखंडाची काही पहार आणली आणि तिला स्पर्श केल्याबरोबर त्यांचं सोनं झाले. असा एक चमत्कार करून दाखवला. चमत्कारांनी विश्वास जास्त बसतो म्हणतात. तो टिकतो की नाही कोणास ठाऊक ? पूर्ण सामर्थ्याने चमत्कार झाले व ते टिकायला हरकत नाही पण काही तत्कालिन सामर्थ्याने चमत्कार झाले व ते सामर्थ्य कमी झालं की विश्वासही कमी होतो. तर त्यांच्या मनामध्ये हा कोणीतरी लोकोत्तर महात्मा आहे अशी खात्री झाली.

मुंजीची सर्व तयारी झाली. मुलाचं नांव 'नरहरी' असं ठेवलं होतं. सर्वांच्या पातकांना दूर करणारा हा मनुष्य असला तरी हरीप्रमाणे आहे. म्हणून 'नरहरी' नांव ठेवलं आहे. त्याची मुंज झाली. मातेने भिक्षा घातलेली आहे आणि त्यांची वेदमंत्र

म्हणायला सुरवात झाली. आठ वर्ष कोणीही शब्द ऐकला नाही. आणि आता उत्तम वेदमंत्र म्हणतो आहे. यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, वेदमंत्र जाणणारी मंडळी त्यावेळी होती. त्यांनी ते मंत्र ऐकले. उत्तम शुध्द मंत्रोच्चार आहेत. अभ्यास नसताना. यावरूनही हा कोणीतरी महात्मा आहे अशी सर्वांची खात्री झाली.

अज्ञानी तर येतायतच पण ज्ञानीही येतायत. काय याचा अर्थ लावायचा ? एक तरी ओवी अनुभवावी म्हणतात नामदेव. अनुभव घेण्याकरता संतांकडे जावे लागते. वाचनाने ज्ञान होते, नाही असे नाही. त्याप्रमाणे वेदशास्त्राचा अभ्यास केलेली जरी पंडित मंडळी असली तरी मनामध्ये संदेह शिल्लक राहातात, सर्व संशय निवृत्ती होत नाही. म्हणून मुद्दाम तिथे यायचं. दत्तप्रभूंकडून शास्त्रार्थ समजावून घ्यायचा त्यामुळे समाधान मिळत असे त्यांना.

मग महाराजांनी आईला व पित्याला सांगितले, ' आता मला संन्यास दीक्षा धारण करायची आहे. मी आता घरातून बाहेर जाणार आहे.' आई म्हणाली,' इतके दिवस तुम्ही बोललात सुध्दा नाही. आता बोलायला लागल्यावर लगेच घरदार सोडून जाणार म्हणता. हा काही क्रम नाही. उपनयन संस्कार झाल्यावर वेदशास्त्राचा अभ्यास करायचा. ज्ञान मिळवायचे व ज्ञान मिळविल्यानंतर कर्मानुष्ठान करायचे. कर्मानुष्ठान म्हणजे गृहस्थाश्रम करायचा. सगळी कर्मे व्यवस्थितपणे करायची. नंतर वानप्रस्थाश्रम सांगितलेला आहे. कर्मनिवृत्तीही त्याचे उद्दिष्ट आहे. विषयासक्तीची निवृत्ती. शरीरासक्तीची निवृत्ती. या करिताच वानप्रस्थाश्रम आहे. आणि नंतर शेवटी संन्यास आहे. तुम्ही एकदम संन्यासदीक्षा कशी धारण करणार ? हे जमणार नाही. मनामध्ये अनंत वासना असतात. त्या वासनांचा क्षय करण्याकरता किंवा वासनापूर्ती करण्याकरता हा गृहस्थाश्रम आहे.' हे सगळे त्या आईने महाराजांना सांगितले.

महाराज म्हणाले,' शास्त्रकारांची अनुज्ञा आहे. ज्या दिवशी आपल्या मनामध्ये पूर्ण वैराग्य उत्पन्न झाले अशी खात्री पटेल, त्या दिवशी संन्यास घ्यायला हरकत नाही. गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम

झालाच पाहिजे असं नाही. कर्माने संन्यास महत्वाचा. अज्ञानी लोक आहेत. विषयासक्ती ज्यांच्या अंतःकरणात आहे, या विषयांचा भोग घेऊन शेवटी,'आपण काय करायचा तो परमार्थ करून असेच विचार ज्यांच्या मनामध्ये येतात त्यांनी सावकाश करावे. परंतु शरीर जोपर्यंत चांगलं आहे तोपर्यंत काही तरी ईश्वराची आराधना, संन्यासाश्रम वगैरे तोपर्यंत केला पाहिजे. शरीर केव्हां जाईल त्याचा काही नेम नाही. गर्भातच शरीराचा नाश होतो, जन्मल्यानंतर होतो, बालवयात होतो, तरुण वयात होतो, वृध्दावस्थेत होतो, कोणत्यावेळेला होईल सांगता येत नाही. जोपर्यंत शरीर दृढ आहे आणि मनही दृढ आहे तर त्याला काही गृहस्थाश्रम घेतलाच पाहिजे असा काही प्रतिबंध नाही. महाराजांनी पुष्कळ समजावून सांगितलं. आयुष्य कसं कसं जातं. अर्ध झोपेमध्ये, बालपणामध्ये, क्रिडेत जाते. तारुण्यावस्थेत विषयोपभोगामध्ये जाते. वृध्दावस्थेत चिंतामग्न होतो आहे. ईश्वराची उपासना ही शांत चित्ताने होणार केव्हा? म्हणून याच वेळेला ज्याला पूर्ण विरक्ती झाली, विषयाची इच्छा नको आपल्याला-हे ज्याला पूर्णपणे पटले आहे त्याच्या करता हा मार्ग आहे. त्याने संन्यास घ्यायला हरकत नाही अशी शास्त्राची संमती आहे. त्या करता मला जायचे आहे. पुष्कळ उपदेश आहे त्यांचा. त्यानंतर आई बापांना बर वाटावं म्हणून'तुम्हाला दोन मुलं होतील.' म्हणाले. मुंज झाल्याबरोबर जायला निघाले म्हणून त्या आईला वाईट वाटले. तरीही आईने सांगितले,' तुम्ही मुलं झाल्यानंतर तरी चला'. अशी तिने प्रार्थना केल्यानंतर वर्षभर महाराज थांबले. वर्षानंतर तिला दोन जुळी मुले झाली. दोन तीन महिने झाल्यानंतर पुन्हा आले. म्हणाले,'आईसाहेब,आता परवानगी द्या. तुमची इच्छा पूर्ण झाली ना? या नंतर आणखी एक मुलगी आणि दोन मुलगे तुम्हाला होणार आहेत. प्रपंचात राहून तुम्ही ईश्वराची उपासना करा. मला अनुज्ञा द्या.' त्याप्रमाणे मातापित्यांनी अनुज्ञा दिली. गावातील सर्व मंडळी पोहोचविण्याकरता म्हणून निघाली. त्या सर्वांचा निरोप घेण्यापूर्वी मातेला आपलं पूर्व स्वरुपही दाखवलं-

श्रीपादवल्लभांच. त्या मातेलाही तिच्या पूर्वजन्माचं स्मरण झालेलं आहे. श्रीपादवल्लभ आपलं वचन खरं करण्याकरताच पुत्र होऊन आले हे तिला पटलेलं आहे. ' तीस वर्षानंतर भेट होईल,' असं सांगून काशीला निघून गेले.

आणि काशीमध्ये योगाभ्यास चालू आहे, ध्यानाभ्यास चालू आहे. सर्व लोकांना, साधकांना, अहर्निश अभ्यासामध्ये कसं निमग्न राहिलं पाहिजे हे शिकवण्याकरिता अभ्यास चालू आहे. त्यांच चित्त थोडचं बाहेर विषयांकडे धाव घेणार आहे? चित्ताचा निग्रह करायचा म्हणून प्राणायाम करायचा, असही काही नाही. ही सगळी तपःसिध्द साधना आहे. सिध्दासन घालून प्राणायामाचा अभ्यास चालू आहे. श्वासोच्छवास पूरक व कुंभक हे नियंत्रित केलेले आहेत.

भगवंतांनी अर्जुनाला सांगितलय,' बाहेर असणाऱ्या विषयांना बाहेरच ठेव. हे कसं काय, तर इंद्रियांच्या द्वारा आपले मन बाह्य विषयांकडे जातं. त्या विषयांशी संबंध आल्यावर ते, विषय संस्कार रुपाने पुन्हा आत येतात. आत आल्यानंतर त्या संस्कार रुपाने ते मन परत बाहेर जातं, असं सारखं चाललेलं आहे. त्याकरता बाहेरचे विषय बाहेरच ठेवणे याचा अर्थ इंद्रियांचा निरोध झालेला आहे. ज्याला प्रत्याहार म्हणतात. इंद्रियांचा निरोध झाल्यावर मनही बाहेर जायचं बंद झालं. खिडक्या उघडल्या नंतर बाहेरचा वारा आत येणार, बंद केल्यावर कशाला येतोय ? त्याचप्रमाणे बाहेर मन जायचं बंदच झाल्यामुळे ते विषय आत येण्याचे बंद झाले. संस्कार नाही. वासना नाही. बाहेरच्या बाहेर ते विषय राहिले.'

त्यानंतर अगदी डोळे मिटून बसलं तर व्यग्रता येणार, हे दिसलं ते दिसलं असे विचार येणार म्हणून अर्धोन्मिलित दृष्टी सांगितली आहे. भ्रूमध्यात नेत्र न्यायचे. श्वास प्रश्वास पूरक व रेचक हे सम करायचे. बाहेरही श्वास जायचा नाही, आतही यायचा नाही. तो फक्त सम म्हणजे कुंभक रूपाने राहिलेला आहे. कुंभक म्हणजे प्राणाची स्थिरता, मनाची स्थिरता. ही समाधी

अवस्था, उन्मनी अवस्था ज्याला म्हणतात. त्या अवस्थेत निरंतर रहायचे. हा अभ्यास, आत्मचिंतन चालू आहे.

त्या ठिकाणी अशी संन्यास दीक्षा घेतलेले पुष्कळ संन्यासी राहात होते. काशीमध्ये पूर्वी असे अनेक संन्यासी होते. त्यांच्यात एक मुख्य कृष्ण सरस्वती म्हणून होते. त्यांनी महाराजांना ओळखलं. ' हा साक्षात् अवतारी महात्मा आहे' असं सगळ्या संन्याशांना सांगितले, ' आपण जाऊन प्रार्थना करा की आपण संन्यास दीक्षा घ्या. म्हणजे आम्हाला आपली पूजा करता येईल.'

शंकराचार्यांनी अवतार धारण करून संन्यास घेतला. जरी कलीयुगात अग्निहोत्र घेऊ नये, संन्यास घेऊ नये वगैरे सांगितले आहे तरी दुसराही विधी आहे. वेदमार्ग जो पर्यंत चालू आहे, त्याचप्रमाणे वर्ण विभाग काही अंशाने आहे, तो पर्यंत अग्निहोत्र करण्यास व संन्यास घेण्यास हरकत नाही म्हणतात. त्याप्रमाणे शंकराचार्यांनी अवतार धारण करून संन्यास घेतला. संन्यासाश्रमही असू शकतो आणि तो उच्च, श्रेष्ठ आश्रम आहे. हे त्यांनी लोकांपुढे मांडलेले आहे. सर्व विषयांचा परित्याग करायचा. ही भूमिका किती मोठी आहे. नांवे ठेवतात काही लोक पण नांवे ठेवण्यात काही अर्थ नाही. सगळेही विषय सोडून द्यायचे. तो मोठा अधिकार आहे. आणि तोही केवळ आत्मचिंतनाकरता आहे. दुसरं काहीही नाही. आत्मानात्म विवेक अखंड चालू आहे. सृष्टी व्यक्त कशी झाली ? त्याचा अध्यारोप कसा आहे? पुन्हा अव्यक्त कशी होते आहे ? त्या मूळ अधिष्ठानाचे चिंतन, सृष्टीचा व्यक्ताभिव्यक्त विचार अखंड चालू आहे. त्या करिता शरीराकडे लक्ष नाही. देहासक्ती कमी झाली. मन मात्र तल्लीन झालेलं आहे. अशा प्रकारचे संन्यासी अधिकारी आहेत.

तर हा अभ्यास चाललेला असतांना, त्या कृष्णसरस्वतींनी सांगितल्याप्रमाणे सर्व मंडळी महाराजांच्या जवळ आली आणि त्यांनी प्रार्थना केली, ' महाराज, सगळे लोक हल्ली संन्यासाश्रम निषिध्द मानत आहेत. तो घेण्याकडे कोणाचीही प्रवृत्ती नाही.

ब्रह्मचार्याश्रमही संपलेला आहे. फक्त गृहस्थाश्रम तेवढां उरलेला आहे. तोसुध्दा शास्त्राप्रमाणे आहे की नाही कोणास ठाऊक. त्या करिता आपण संन्यासाश्रम घ्या. म्हणजे या आश्रमाबद्दल सगळ्यांच्या मनात श्रध्दा निर्माण होईल. आम्हालाही आपली पूजा करता येईल. आपला अनुग्रह घेता येईल.'

अशी प्रार्थना केल्यानंतर महाराजांनी संन्यासाश्रम घेतलेला आहे. कृष्ण सरस्वती गुरू महाराज. भगवान् शंकरांपासून ती ज्ञानाची परंपरा आलेली आहे. शंकराचार्यही त्याच परंपरेत होऊन गेलेले आहेत. ती परंपरा कृष्ण सरस्वतींपर्यंत आलेली आहे. महाराजांनी या कृष्ण सरस्वतींकडून संन्यास दीक्षा धारण केली. महावाक्याचाही उपदेश त्यांना झालेला आहे. त्याचप्रमाणे सर्वही संन्याशांना आश्रमधर्माचा उपदेश त्यांनी केलेला आहे. कसं वागावं, काय वागावं, वगैरे विचार सांगितले आहेत. आणि अधिकारी जे संन्यासी होते त्यांना उत्तम उपदेश केला आहे. त्यांना कृतार्थही महाराजांनी केलं आहे.

महाराजांनी गुरू का केला, असा एक प्रश्न नामधारकांनी केला. प्रत्यक्ष ईश्वराला गुरू करण्याची आवश्यकता काय ? सिध्द असले तरी मनुष्य म्हणून आलेले आहेत ना. राम कृष्णांनी नाही का गुरू केले ? सांदिपनींची सेवा केली कृष्णांनी. रामांनी वसिष्ठांना गुरू केले. तसं यांनीही कृष्णसरस्वतींकडून अनुग्रह घेतलेला आहे. शास्त्राप्रमाणे धर्माचरण करायचं आहे. सद्गुरूंकडून ही संन्यास दीक्षा त्यांनी धारण केली. व सर्वही संन्यासांना सर्व धर्म समजावून सांगितलेले आहेत. वैराग्य कसे असले पाहिजे, वैराग्य कसे उत्पन्न होईल, वैराग्याची सीमा कशी असेल, हे सगळं सांगितलं.

पंचदशीकार म्हणतात, वैराग्याचा हेतू सांगताना, दोष दृष्टी निर्माण झाली पाहिजे. संसारामध्ये दोष काय आहे हे समजले पाहिजे. ती दोषदृष्टी उत्पन्न झाली की हे मला नको आहे अशी त्याच्यापासून निवृत्ती उत्पन्न होते. विष असलेले अन्न कोण खाईल? समजल्यावर कोणीही टाकूनच देणार. तसं संसारामध्ये सुख

नाही. टिकणारा एकही विषय यात नाही, हा जर विचार (म्हणजे दोषांचा) मनामध्ये आला तर हे सुख नकोय, टिकाऊ नाही असे वाटेल.

सदाशिव ब्रम्हेंद्रांची कथा सांगतात ना. सदाशिव ब्रम्हेंद्र आचार्यांच्या परंपरेत अलिकडच्या काळात होऊन गेले. टिपू सुलतानच्या वेळेस होते म्हणतात. ते फार मोठे योगी, ब्रम्हज्ञानी होते. अरण्यातूनच फिरता फिरता यवन स्त्रीयांच्या तंबूत एका बाजूने शिरून दुसऱ्या दाराने बाहेर पडले. ह्यांना देहाचे भान नाही. भावावस्थेत होते. यवन रक्षकांना राग आला. अंगावर वस्त्र नसलेल्या अवस्थेत हा वैरागी आमच्या स्त्रीयांच्या तंबूतून फिरतो म्हणजे काय ? त्यांनी तलवारीने ह्यांचे दोन्ही हात तोडून टाकले तरीही ह्यांना काहीही भान नाही. तसेच पुढे निघाले.

ते पाहून मात्र यवनांच्या मनावर परिणाम झाला. हात तोडले तरी काही जाणीव नाही. ते चालले आहेत. यवनही त्यांच्या पाठीमागे चालला आहे. सदाशिव ब्रम्हेंद्र एका झाडाजवळ थांबले आणि मग त्यांनी डोळे उघडले. यवन शरण आला. तो म्हणाला,' चूक झाली'.

'काय झाले ?'

'तुमचे हात तोडल'

'कुठे तोडले ?'

सदाशिव ब्रम्हेंद्रांनी दोन्ही हातांच्या जागी पाहिल्यावर पुन्हा हात आले. विकार नाही, काही नाही.

त्यांची आणखी एक कथा सांगताहेत. त्यांचा विवाह झाला. गर्भदानाचा दिवस. पाहुणे वगैरे आलेले आहेत. सहाजिकच वेळ झाला जेवायला, त्यांनी आईला कारण विचारले. ती माऊली म्हणाली,'आज तुझ्या संसाराचा आरंभ आहे, असं चालायचच.'

ते म्हणाले,' संसाराच्या पहिल्याच दिवशी जर जेवायला असा उशीर झाला, पुढे जेवायलाच मिळायचं नाही. असला संसार करून काय करायचय ?'आईला नमस्कार केला आणि त्याच क्षणी निघून गेले. काशीला निघून गेले. तीव्र वैराग्य,

पूर्वसुकृत किती आहे. किती ईश्वरांची कृपा आहे. तुलसीदासजींची कथा सांगतात ना. त्यांची पत्नी बोलली आणि लगेच निवृत्त झाले.

तर याप्रमाणे सद्‌गुरू महाराजांनी संन्यास दीक्षा धारण करून सगळीकडे संचार करण्यास आरंभ केला आहे. पुढे आता नृसिंहसरस्वती त्यांच नामाभिधान झालेलं आहे. त्यांच्या बरोबरही पुष्कळ गृहस्थाश्रमी संन्यासी शिष्य होते. तीर्थयात्रा वगैरे केल्या. आणि त्या तीर्थयात्रेच्या निमित्ताने त्यांच्या काही कथा घडल्या आहेत. त्या चरित्रातील आणखी कथा सिध्द नामधारकांना क्रमाने सांगताहेत. आपणही त्याचं चिंतन करायचं. पुष्कळ कथा आहेत.

**भगवान नृसिंहसरस्वती** स्वामी महाराजांनी काशी क्षेत्रात जाऊन संन्यास दीक्षा धारण केली. कृष्णसरस्वतींपासून संन्यास घेतला. तीर्थयात्रा वगैरे करुन ते आपल्या जन्मभूमीत आले. संन्यासी म्हणजे ' निर्ममः निरहंकारः ', सर्व संग परित्याग ज्यांनी केलेला आहे, पूर्वीचे काहीही स्मरण सुध्दा नाही, असा ज्यांचा त्याग झाला, त्यांनी आपल्या जन्मभूमीत लोकांना भेटायला यायचं हे योग्य आहे की नाही असे नामधारकांना वाटले.

संन्यास घेतल्यानंतर गावी का जायचे? वास्तविक सर्वत्र संचार करायचा म्हणजे गावी गेले तर बिघडले कुठे त्यात? याकरिताच ते जाताहेत असं नाही. पण नामधारकांना तसे वाटले. थोरल्या महाराजांना दत्तात्रेयांनी माणगांव सोडायला सांगितले. ' उद्या इथून निघायचं ' म्हणाले. तयारीच होती त्यांच्या अंतःकरणाची. हजारो मंडळी जमून प्रत्येक शनिवारी पालखी निघायची. रात्रभर तो सोहळा चालायचा. नारळ, पेढे, बर्फी असे सगळे कितीतरी पुढे पडलेले असायचे. पण तिकडे त्यांचे लक्ष नसायचे. प्रत्यक्ष दत्तात्रेयांचा निवास तिथे असायचा. ' आम्ही तिथे रहायला येणार आहोत,' असे सांगून महाराज दत्तात्रेय तिथे आले होते आणि ' उद्या येथून निघायचे ' म्हणाले. ' उत्तरेकडे जायचे ' म्हणाले. त्यांची तयारी होती. अंतःकरणामध्ये काहीही ममत्व नव्हते.

हे इतके सगळे इथे आहे, तरी संग्रहाची भावना नव्हती. पण देवाच्या पूजेची वगैरे व्यवस्था करायला नको? ती सुध्दा काळजी त्यांनी केली नाही. खरोखरच निघाले. पुन्हा काही महाराज माणगांवला गेले नाहीत. आता आई वगैरेही त्यावेळेला नव्हती. आई असती तर गेलेही असते. तेच कारण सिध्द सांगताहेत. पण एक शंका मनात येते आहे, आक्षेप वाटतो आपल्याला ! सद्‌गुरु महाराजांचे जे जे काही कर्म आहे ते दिव्य आहे याची आपल्याला जाणीव पाहिजे. वल्लभाचार्य म्हणतात, 'मधुराधिपतेरखिलं मधुरं ' काहीही त्यात चूक काढता येणार नाही. पण तशी दृष्टी पाहिजे. श्रध्दा पाहिजे. नामधारकांनी विचारले, कोणकोणती शिष्य मंडळी महाराजांची झाली? त्यांचे चरित्र

सांगा, म्हणाले.

सिध्दमुनी नामधारकांना सांगताहेत, बद्रिकाश्रम वगैरे सर्व तीर्थयात्रा त्यांनी केल्या. जाताना आईला सांगितले होते, तीस वर्षांनी पुन्हा दर्शन देईन. मातेच्या दर्शनाकरता म्हणून महाराज आलेले आहेत. श्रेष्ठ पुरुषाचे त्यांनी लक्षण सांगितलेलं आहे. ज्ञानी लोक कधीही असत्य बोलत नाहीत. लोकांना जरी कदाचित त्यांची वाणी असत्य वाटली तरी त्यांच्या वाणीतून जे निघते तसे घडून येते. महात्म्यांची सिध्दी आहे. अमावास्येला चंद्रोदय होईल म्हटल्यावर चंद्रोदय होतो, अशी काही उदाहरणे आहेत विदर्भामध्ये. सत्य हे परमात्म्याचे स्वरुप आहे. भगवान सत्यस्वरुप आहेत.

आईला सांगितलेलं होतं,' येईन म्हणाले,' 'पुन्हा मी ' त्यामुळे आईच्या दर्शनाकरिता आलेले आहेत. ' माता वंद्यायते रविः 'हा एक फार मोठा सिध्दान्त आहे. धर्मशास्त्रकार सांगतात, पुत्राने संन्यास दीक्षा धारण केल्यानंतर कोणालाही नमस्कार करायचा नाही. सर्वांनी त्याला नमस्कार केला पाहिजे. पित्याने सुध्दा संन्यास घेतलेल्या मुलाला नमस्कार केला पाहिजे. म्हणजे संन्यासी जो आहे तो विश्ववंद्य झाला. परंतु यति जरी सर्ववंद्य असला तरी मातेला पाहिल्यावर त्याने मातेला नमस्कार केला पाहिजे. हे मातेचे महत्व धर्मशास्त्रकारांनीही मान्य केले आहे. म्हणून मातेच्या दर्शनाकरता महाराज आले आहेत. ह्यात शास्त्राविरूध्द काहीच नाही.

त्यानंतर सिध्दांनी शिष्य मंडळींचे वर्णन केले आहे. सरस्वती सांप्रदाय आहे हा. म्हणून कृष्णसरस्वतींच्या नंतर हे नृसिंहसरस्वती झाले. आणि त्यांचे शिष्य सगळे संन्यासी बालसरस्वती, कृष्णसरस्वती, उपेंद्रसरस्वती, ज्ञानज्योतीसरस्वती, सदानंदसरस्वती, माधवसरस्वती आणि हे सिध्द. यांनाही सिध्द उपाधी असेल कदाचित. पण हे सिध्द म्हणूनच प्रसिध्द आहेत. असे हे मुख्य सात शिष्य सांगितले आहेत.

या सर्व मंडळींना घेऊन महाराज कारंजा नगरीत आले आहेत. सर्वांना अत्यंत आनंद झाला आहे. उपनयन झाल्यावर

महाराज बाहेर पडले होते. इतक्या अल्प वयात जर पूर्ण वैराग्य असेल तरच संन्यास घेता येतो नाहीतर नाही. मग ब्रम्हचार्यातूनही घेऊ शकतात. कर्म संन्यासच पाहिजे असे नाही. विरक्तांना केव्हांही संन्यास घेता येतो. मातेचे समाधान केले. आणि निघाले आहेत महाराज. सर्वांच्याही भेटी झाल्या. सर्वांच्या घरी गेले महाराज, त्यामुळे सर्वांना आनंद झालेला आहे. गावातल्या प्रत्येक घरात महाराजांनी पूजा घेतली. तिथे प्रत्येक घरामध्ये महाराज आहेत. कर्माने एकाच वेळेला सर्वांचेही समाधान झाले आहे. तेही भाग्यवान आहेत. महाराजांचा अवतार ज्या गांवात झाला ते गांव, गावकरी यांचे पुण्य, सुकृत असले पाहिजे. त्या पुण्यामुळेच त्यांना महाराजांचे दर्शन झालेले आहे.

त्यावेळी पित्यानेही पूजा केली. मग मातेला दिव्य दृष्टी देऊन तिच्या पूर्वजन्माचे स्मरण घडवले. महाराज हेच श्रीपादवल्लभ आहेत हे तिला समजले. सर्व वृत्तांत तिने आपल्या पती महाराजांना सांगितला. मी देहत्याग करण्याकरिता नदीवर आले असता ह्याच श्रीपादश्रीवल्लभांनी मला जीवदान दिले. मार्गदर्शन केले आणि शेवटी ' माझ्या सारखा पुत्र होईल ' असा आशीर्वादही दिला.

आता तो आशीर्वाद खरा करायचा म्हणजे आपल्याला हिच्या पोटी जन्म घेतला पाहिजे. आपल्यासारखा दुसरा कोण आहे जगामध्ये? परमात्मा अद्वितीय आहे ना ! 'एकमेवं अद्वितीयम' असे ज्याचे वर्णन केले आहे; ज्याला सजातीय नाही, विजातीय नाही, त्याचप्रमाणे अवयव वगैरे काही नाहीत. निरवयव आहे. म्हणून महाराज स्वतःच तिचे पुत्र झाले.

ती आपल्या पतिला सांगते आहे आणि महाराजांची प्रार्थना करते आहे ' आपण व्यवहार दृष्टीने माझे पुत्र आहात असे लोक म्हणतात. परंतु आपण पुत्र नसून केवळ परमात्मा आहात. सर्व ब्रम्हांड निर्माण करणारे सृष्टीकर्ते आहात. या भवसागरातून आपण माझा माता म्हणून संबंध आहेच. तेव्हां हा देखिल संबंध लक्षात घेऊन माझा उध्दार करा. माझी इच्छा पूर्ण करा. '

ही सगळी माया उत्पन्न झालेली आहे-

कालदैवक्रियेशात्म -द्रव्यांगास्वात्मवैकृताः ।
तत्संघातः प्रवाहोसौ त्वन्मायैतां निवारय ।।

मायेचा सर्वही भेद ती स्वतः सांगते आहे. कालरूप हे परमात्म्याचेच आहे. हा गुणांमध्ये क्षोभ निर्माण करणारा आहे. त्रिगुणांची साम्यावस्था निर्माण झाली म्हणजे प्रलय होतो. आता पुन्हा सृष्टी व्हायची म्हणजे त्रिगुणांमध्ये क्षोभ हा कालामुळे होतो आहे. त्यानंतर जीवांचे कर्म निमित्त होते. कसा जन्म यायचा? कोणते स्वरूप निर्माण व्हायचे? जीव कोणत्या शरीरात जाणार? त्याला कारण म्हणून क्रियाकर्म आहे. आणि तेच कर्म फलाभिमुख झाले म्हणजे त्याला दैव असे म्हणतात. पूर्व संस्कार ! पूर्वप्रज्ञा ज्याला म्हणतात ती आधीच्या जन्मात अमूर्त होती. त्याचप्रमाणे सर्व द्रव्य म्हणजे सूक्ष्म भूत. स्थूल शरीर म्हणजे अंग. असु म्हणजे प्राण. त्याचप्रमाणे वैकला म्हणजे एकादश इंद्रिय. राजस् अहंकारापासून, सात्विक अहंकारापासून उत्पन्न झालेली महाभूते. हा संपूर्ण संघात म्हणजे सृष्टी झाली. आणि हाच प्रवाह सतत चालू आहे.

‘ ही आपली माया आहे.यातून मला आपण मुक्त करा.’

आत्मा वस्तुतः असंग आहेपण ते आम्हाला कळत नाही. याच्याशीच संबंध ठेवून सर्वत्र अध्यास झालेला आहे. त्याच्यातून आपण मुक्त करा अशी प्रार्थना त्या मातेने केल्यानंतर महाराज म्हणाले,

संन्यासी यत्कुले ज़ातस्तरत्यपि तरिष्यति ।
कुलैकविंशतिः पित्रोर्दुर्गताप्यमृतं लभेत् ।।

संन्यासाश्रमाचे इतके महत्व महाराज सांगत आहेत. ज्या कुलामध्ये संन्यासी जन्माला आला, संन्यास दीक्षा ज्याने धारण

केली त्या कुळाच्या एकवीस पिढ्या तरून जातात. त्यावेळेला असणारेही तरतील पुढे होणारेही तरतील. कदाचित त्या कुळातील कोणी जीव दुर्गतीला गेले असले तर त्यांचाही उध्दार होतो. इतके संन्यास दीक्षेचे महत्व सांगितले आहे. तेव्हां या तुमच्या कुळामध्ये मी संन्यास घेतला आहे. तुझी इच्छा काय आहे ? शेवटी तेच सांगत आहेत-

संपत्प्रजान्वितानां वः काश्यां मुक्तिर्भविष्यति ।

महाराजांचा आशीर्वाद मातेला मिळाला. ' संपत्ती आहे, संतती आहे. संसारात महत्वाचे सगळे तुम्हाला मिळाले आहे. इकडची काही काळजी नाही. तुम्ही काशी क्षेत्रांत मुक्त व्हांल.' असा महाराजांचा आशीर्वाद मिळाला. मातेचेही समाधान झालेले आहे. त्यांची, भगवंतांची, नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांची ती माता आहे. तिच्या मनामध्ये मोह वगैरे राहील कसा? हा आशीर्वादही त्या प्रेमामुळे तिला मिळाला.

महाराज कारंजा सोडून तीर्थयात्रेला गेले तेव्हां तिला दोन मुले झालेली होती आणि एक कन्या होईल म्हणून सांगितले होतो. ती ही मुलगी झालेली आहे. त्यांची भगिनी रत्ना म्हणून होती. ती शरण आलेली आहे. सर्वांनाच महाराजांबद्दल अत्यंत आदरबुध्दी आहे. पूर्वी सर्वांनी ऐकलेले चरित्र आहे. या भगिनीने वगैरे पाहिलेले नाही. पण आज इथे आल्यावर प्रत्येक घरात जाऊन पूजा ग्रहण केली हाही चमत्कार पहायला मिळाला ना ! त्यामुळे हे साक्षात् परमेश्वर आहेत अशी भावना सर्वांची होती.

ती भगिनी विचारते आहे, ' प्रपंच आणि परमार्थ याबद्दल माझी कशी स्थिती होईल? भवसमुद्र मोठा आहे. त्यातून तरून जायची माझी शक्ती नाही.

पापिष्ठां मोध्दर हरे सद्गुरूस्त्वं हि मे प्रभो ।

आपण सद्गुरूस्वरूप भ्राता आहात. मार्गदर्शन करून माझ्यासारख्या पापी स्त्रीचा उध्दार करा.'

महाराजांनी तिला सांगितले की स्त्रीयांनी पतिसेवा करणं हे एकच तारक कर्म आहे. दुसरे काहीही करायचे नाही. ते पातिव्रत्य धारण करून तू राहा. पतिसेवा शुध्द बुध्दीने कर म्हणजे तू तरून जाशील. आणखी एक सांगितले, पूर्व जन्मामध्ये तुझ्याच घराजवळ राहाणारे एक दांपत्य होते. तुझ्यामुळे त्यांच्या एकमेकांच्या मनांत कलुष्य निर्माण झाले, वैर निर्माण झाले. याला एक सांगायचे त्या स्त्रीला दुसरे सांगायचे. त्यामुळे दोघेही एकमेकांपासून दूर गेली. दंपतीचा वियोग तुझ्यामुळे झालेला आहे तसेच एकदा रागाने तू गाईला लाथ मारली होतीस. या दोन दोषांमुळे तुझा पति संन्यासी होणार आहे. पतिपत्नींच्यात तू वैर उत्पन्न केलेस. म्हणून तुला कुष्ठरोग होणार आहे.

जास्तच घाबरली ती. पातिव्रत्याने रहा वगैरे मार्गदर्शन केलेलेच होते. पण या जन्मामध्ये हे दुःख भोगावेच लागणार आहे. ती अत्यंत भीतीग्रस्त झाली. मग महाराजांनी तिचे समाधान केले. म्हणाले ' हे म्हातारपणी होणार आहे. संसार सगळा आटोपल्यानंतर शेवटी हे पातकाचे फळ भोगावे लागणार आहे. ते काही चुकणार नाही. परंतु जरी कुष्ठरोग झाला तरी माझ्या मार्गदर्शनाने जाईल. एक मात्र लक्षात ठेव तुझा पति संन्यास घेणार आहे. तो काही पुन्हा गृहस्थाश्रमी होणार नाही. एकवेळ झालेला रोग बरा होईल. पण पतिवियोग मात्र अटळ आहे.' तिचेही समाधान केले आहे. आणि सगळ्यांचा निरोप घेऊन महाराज गौतमी तीरावर म्हणजे यात्रा करण्याकरता निघाले आहेत.

गौतमीला गौतम ऋषींनी याठिकाणी आणली. गौतम ऋषी मोठे तपस्वी. तपस्येने धान्य वगैरे मिळवून दुर्भिक्ष असताना सर्वांना धान्य देऊन सर्वांचे संरक्षण करण्याचे कार्य त्यांनी आपल्या तपोबलाने केले आहे. सर्व ऋषींना वाटले जर गंगा पृथ्वीवर आली तर सर्व लोकांना पापक्षय करता येईल. दर्शन होईल, तीर्थस्नान वगैरे होईल. म्हणून त्यांनी मायेने एक गाय निर्माण

केली. गौतमी ऋषींच्याकडून तिचा नाश झाला. सर्व ऋषींनी निर्णय दिला की तुम्ही गंगा पृथ्वीवर आणली तर तुमचा हा गोहत्या दोष जाईल. त्याशिवाय जाणार नाही.

मग त्यांनी पुष्कळ तपश्चर्या केली. भगवान् शंकर प्रसन्न झाले. त्यांनी गौतमीला आज्ञा केली त्याप्रमाणे गौतमी इथे आली. त्यांचा गोहत्या दोष दूर करण्याकरता त्यांनी तपश्चर्या केली पण त्यामुळे सगळ्यांचा फायदा झालेला आहे ना ! ऋषी मंडळींचा उपयोग विश्वाला, राष्ट्राला कसा होतो याचे हे उदाहरण आहे. गौतमीमध्ये महाराजांनी स्नान केले. त्याठिकाणी माधव नांवाचा विप्र त्यांना भेटलेला आहे. अधिकारी होता तो महात्मा ! त्याला महाराजांनी संसार बंधनातून मुक्त केले. त्यानेही महाराजांची स्तुती केली. आणि मग तिथून महाराज दक्षिणेकडे जायला निघाले.

एका गावामध्ये, गोदावरीच्या तीरावरती, एका वृक्षाखाली थांबले असता त्या गांवातील एक ब्राम्हण पोटशूळाला कंटाळून प्राणत्याग करायला आलेला त्यांनी पाहिला. त्याला अन्न खाल्ल्याबरोबर पोटशूळ व्हायचा. तो गळ्यात दगड बांधून नदीत जीव द्यायला निघाला. महाराजांनी आपल्या शिष्यांना पाठवून त्याला बोलावून घेतले.शिष्यांनी त्याला आणल्यावर महाराज विचारताहेत, ' विधत्सेसाहसं कुतः? कां, बाबा, जीवाला एवढा का कंटाळलास ? चांगला ब्राम्हण जन्म तुला मिळाला आहे. या जन्मामध्ये काहीतरी ईश्वराची आराधना करून आपले कल्याण करून घेता येते. आणि आता देह कां टाकतोस?'

तो अतिशय त्रस्त झाला होता. म्हणाला,' नुसते विचारून काय करता? मी जन्माला आल्यापासून किती दुःख भोगतो आहे. हा पोटशूळ झालेला आहे. जिवंत कसं राहायचं? अन्न हे वैरी आहे. इतर देहधाऱ्यांना तेच अन्न पोषक आहे. सहन करता येत नाही ही वेदना !

प्राणोन्नं जीवनं चान्नं लयोन्नं जीवमन्नमुत् ।
उद्भवोन्नं कथं स्थेयमृतेन्नात्तन्मृतिर्वरम् ।।

अन्न हे प्राण आहे. शरीरामध्ये प्राणाचे संरक्षण अन्नाशिवाय होऊ शकत नाही. प्राण जाऊ शकत नाही. त्यानंतर जीवनही आहे. लय म्हणजे निद्रा असा अर्थ केला महाराजांनी. जीवन राहाण्याकरता शरीर स्थितीचे औषध आहे. त्याच प्रमाणे उध्दवः अन्नम् !वीर्यरूपाने परिणत झालेलं अन्न हेच उत्पत्तीचे कारण आहे. उत्पत्तीला, संरक्षणाला, निद्रेला सगळ्याला कारण असलेलं हे अन्न ! या अन्नाशिवाय राहायचं कसं ? ते तर अन्न मला वैरी झालेले आहे.

थोडही अन्न मी खाऊ शकत नाही. पूर्व जन्मामध्ये माझ्या हातून कधीही अन्नदान झालेले नसेल. पुण्य कोणचही मी केलं नाही. गायींचा, विप्रांचा ग्रास मी हरण केला असेल. मातापितरांची निंदा माझ्या हातून झालेली असेल. ईश्वराची पूजा, अतिथींची पूजा माझ्या हातून घडलेली नाही. मातापितरांना सोडून देऊन स्त्रीसह मी एकट्यानेच मिष्टान्न ग्रहण केलेले असेल. माझ्या हातून काहीही उपकार घडला नसेल. म्हणून माझी अशी स्थिती झाली असेल. व्यर्थ भूभार होऊन राहाण्यापेक्षा जीवन संपवलेले बरे.'

हा आर्त भक्त आहे. महाराजांची गांठ पडलेली आहे. तो आपण होऊन काही महाराजांना भेटलेला नाही. संकटात सांपडलेला आहे. ' मला असं असं संकट आहे,' म्हणून सांगणारा तोही भक्त आहे. पूर्वीचे काही सुकृत असेल त्याचे. म्हणून प्राणत्याग करायला गेला, त्यावेळी त्याला महाराजांचे दर्शन झाले आणि त्यानीच ह्याला बोलावले.

मा भीर्दास्येन्नपथ्यं ते दिव्योषधमहं भिषक्।।

गुरुमहाराज सांगताहेत. ' ब्राम्हणा, भिऊ नकोस. तुझा दोष सगळा गेला. माझ्याजवळ औषध आहे. ते मी तुला सांगतो. मी उत्तम वैद्य आहे.' भवरोग वैद्य म्हणतात ना देवाला !' सर्वही

तुझा रोग समूळ निघून जाईल. रोगाचे कारण म्हणजे जे काही पातक आहे, त्या पातकामुळे हा रोग उत्पन्न झाला आहे.'

समाधान झाले ब्राम्हणाचे. महाराजांच्या कृपेने आपण बरे होऊ असे त्याला वाटले. मूळ कडगंचीस राहाणाऱ्या सायंदेव नांवाच्या ब्राम्हणाची, त्या गांवचा अधिकारी म्हणून नेमणूक झाली होती. अतिशय नम्र होता तो. यवनाच्या पदरी नोकरी करीत होता त्याने येऊन महाराजांनी नमस्कार केला. महाराज सायंदेवाला म्हणाले,' बाबा या ब्राम्हणाला आत्यंतिक पोटशूळाच्या व्यथेने देहत्याग करावासा वाटतो आहे. त्याला मी एक औषध सांगतो आहे. तूही त्याला सहाय्य कर. स्वादु अन्नम् अर्पय.' दुसरे कोणते तरी औषध देतील असे वाटले याला. त्यानीसुध्दा रोग बरा झाला असता. परंतु शक्ती म्हणून जी आहे सर्वत्र दिसणारी मग ती तारक असो अथवा मारक असो. जगामध्ये असणारी सगळी शक्ती ' बलम् बलवतांचाहं कामरागविवर्जितम' म्हणून जे भगवान् सांगताहेत.

प्रल्हादजींनी आपल्या पित्याला हेच सांगितलं. 'पिताजी, माझ्याजवळ कोणाचं बल आहे असं तुम्ही विचारलत. कोणाच्या बळावर माझी आज्ञा तू उल्लंघन करतोस? तर तुमच्याजवळ तरी कोणाचे बल आहे हा विचार तरी तुम्ही केला का? सर्वत्र एक बलरुपाने परमेश्वराचीच शक्ती आहे.'

दुसरे औषध दिले असते तरी रोग गेला असता. पोटशूळ जायला काय? भस्म दिलं असते तरी पोटशूळ गेला असता परंतु अन्नाची त्याला भीती वाटती आहे. अन्नामुळे आपण मरणार आहोत. अन्न हे जीवन आहे. उत्पत्ती स्थिती, लय या सर्वांना कारण अन्न आहे. मग त्या अन्नामध्ये असलेली शक्ती का गेली, असा त्याचा प्रश्न आहे. ' ईश्वराने निर्माण केलेल्या अन्नातील शक्ती माझ्या पुरती गेली नाही. ती आहे.' हे दाखवायचय महाराजांना. पूर्व कर्माने काही रोग होत असेल. उत्तम पक्वान्न हेच त्याला औषध दिलं.

आता महाराजांची शक्ती सर्व रुपाने आहे. अन्नामध्ये

शक्ती आहेच आहे. हा ब्राम्हण मात्र त्या अन्नामध्ये त्याला मारक शक्ती आहे असे समजतो आहे. 'अन्न वैरी झालं ' असे म्हणतोय. महाराज म्हणतात,' नाही. अन्न हे ब्रह्मरुप आहे असं शास्त्रकारांनी सांगितलं आहे.' पण त्या सायंदेवाला कसे पटणार? नुकतीच भेट झाली होती. महाराजांचे हे पहिलेच दर्शन. त्याच गावात राहाणारा तो ब्राम्हण.

सायंदेव म्हणाला,' महाराज, अतिशय भूक लागली तर पंधरा दिवसांनी हा थोडंस अन्न खातो. त्याला काही राहावत नाही. थोडंस अन्न खायचा अवकाश की लगेच पोटशूळ सुरु होतो. वेदनेने हा तडफडतो आहे. याला तुम्ही अन्न द्या म्हणता ! अन्नदानात् भवेत हत्त्या इति भाति मे.'

सायंदेव जरी भक्त होते तरी भक्ताला सुध्दा देवाची खरी ओळख व्हायला वेळ लागतो. भक्ती असेल, श्रध्दा असेल. पण त्याच बरोबर अश्रध्दाही त्याच्या जवळ असते. पूर्वकर्म म्हणा, काही का असेना ! ईश्वर शक्तीचे ज्ञानही अगम्य आहे. ईश्वरशक्ती समजणे हेही कारण असेल.

अन्नाचा बाह्य व्यवहारादी कार्यकारण भाव आहे तो ठरलेला आहे. अन्न हे इतरांना जीवभूत आहे, पोषक आहे. पण या ब्राम्हणापुरते मात्र अन्न मारक आहे. अत्यंत पीडा देणारे आहे. हा कार्यकारण भाव याच्यापुरता. सर्व गावामध्ये प्रसिध्द झालेला आहे. प्रत्यक्ष प्रमाणाने अन्न हे याला मारक आहे. हे सिध्द झालेले आहे. तो स्वतः सांगतो आहे. सगळी मंडळी सांगताहेत. परंतु महाराज म्हणताहेत त्याला अन्न हेच औषध आहे.

आता हे ' शब्दप्रमाण ' आहे. या ब्राम्हणाचा जो अनुभव, आहे हे ' प्रत्यक्ष प्रमाण ' आहे. महाराजांचा शब्द आहे की हे अन्नच याला तारक आहे हे ' शब्दप्रमाण ' आहे. म्हणून सायंदेवांसारखा भक्तसुध्दा म्हणाला की याला जर मी अन्न खाऊ घातले तर हा मरेल आणि ब्रम्हहत्येचा दोष मला लागेल.

सांगावे लागते कोण मी आहे. सांगायला पाहिजे की नको! हा काही अहंकार नाही. सांगितल्याशिवाय आपली भक्ती

काय आहे ती कळायची कशी लोकांना? भक्तांना सुध्दा ! इतरांना जाऊं दे. पण भक्ताला सुध्दा ही ईश्वरी शक्ती कळून येण्याकरता स्वतः जाणावं लागतं.

मी कोण आहे हे अर्जुनाला सांगताना भगवान म्हणतात,' सर्वांचा संहार करणारा मी काल आहे. तूं गेलास तरी हे कौरव कोणी जिवंत राहाणार नाहीत.' हे त्याला सांगावे लागले.

भिषक्तमोस्मि नाशंक्य सापूपं देहि माषयुक्।

महाराज सांगताहेत,' मी उत्तम, सर्वश्रेष्ठ वैद्य आहे. त्याच्याकरीता चांगले अनारसे, उडदाचे वडे वगैरे कर आणि उत्तम अन्न दे. काही भिऊ नकोस. रोगाचा प्रतिकार कसा करायचा ते मला माहीत आहे. ' तो ब्राम्हणही सांगतो आहे,' पण मला अन्नद्वेष का झाला ते कळत नाही. ' आपल्या सर्व पूर्वकर्माचा पाढा त्याने वाचून दाखवला.

महाराजांनी अभय दिल्यावर त्यांच्या शक्तीमुळे अन्न हेच ब्राम्हणाला तारक होईल असा विश्वास उत्पन्न झाला, अनायासे महाराजांनासुध्दा आपल्या घरी भिक्षेला बोलवावे, आपण गृहस्थाश्रमी आहोत. महाराज साक्षात ईश्वररुप संन्यासी महात्मा आहेत. विष्णू स्वरुप आहेत. अशी इच्छा सायंदेवाला झालेली आहे.

तथा कुर्यामपि भवान्सशिष्योंगीकरोतु मे।।

' बरयं महाराज, आपली आज्ञा मला मान्य आहे. मी या ब्राम्हणाला जेवायला घालतो.' सगळ्या मंडळींना ते पटलं की नाही कुणास ठाऊक ! पण सगळ्यांच्या शंका कुठे दूर करत बसायचं ! कार्यसिध्दी, फलसिध्दी झाल्याशिवाय काही शंका दूर होत नाहीत. ' सिध्दयन्ते सर्व संशयात् ' ही शेवटची अवस्था आहे. परमात्म साक्षात्कार ज्यावेळेला होईल त्यावेळेला सर्व संशय दूर होतात. ईश्वराबद्दलही संशय असतात, आपल्या

स्वतःबद्दलही संशय असतात. सगळेच संशय. ' महाराजांनी आपल्या परिवारासह आपल्या घरी येऊन भिक्षा ग्रहण करावी आणि माझा उध्दार करावा.' हा सायंदेवाचा विचार चांगला आहे. नम्र आहे. विनीत आहे. सायंदेव म्हणजे महाराजांच्या भक्तांपैकी मोठे भक्त आहेत. पुढे त्यांचे पुष्कळ वर्णन आलेले आहे. ते जरी यवनांचे अधिकारी असले तरी वर्णाश्रम धर्माचे आचरण करणारे, ईश्वरभक्ती, गुरुभक्ती अंतःकरणामध्ये असणारे आहेत. भक्ती व कर्म यांचा समुच्चय त्यांच्या जीवनामध्ये आहे, शास्त्रकारांनी सांगितल्या प्रमाणे ज्ञानही आहे. विवेक ज्ञानी आहेत.

त्यांची ती वाणी ऐकल्याबरोबर महाराज म्हणाले,' बरय आम्ही येतो तुमच्या घरी. सगळी तयारी झाली म्हणजे सांगा.' सगळ्यांचे आन्हिक वगैरे झालेलेच होते. सर्वजण सायंदेवांच्या घरी गेले. सायंदेवांची पत्नी देखिल चांगली अनुरुप मिळालेली आहे.

' पत्निम् मनोरमांदेवीम् मनोवृत्तानुसारिणम् ' अशी भगवतीची प्रार्थना करावी लागते. संयमी, दुर्गम संसार सागरातून तारणारी पत्नी मिळावी म्हणून भगवतीची उपासना करावी लागते. अशी स्त्री मिळाली पाहिजे.

ब्रह्मदेवाने आपल्या मुलांना संसार करायची आज्ञा केली. सनत् कुमार वगैरे म्हणाले,' आम्हाला हे मान्य नाही. आम्हाला संसार करायचा नाही. प्रवृत्ती मार्ग आम्हाला पसंत नाहीत. 'खरे तर शेवटी प्रवृत्तीच निवृत्तीरुप होते. पण आता कुठे सगळे सांगत बसायचे असा विचार ब्रह्मदेवांनी केला ! ते सगळे विरक्त झाले. कर्दमांनी मात्र ऐकलं आणि पित्याची आज्ञा पालन करण्यासाठी अशी स्त्री आपल्याला मिळावी म्हणून दहा हजार वर्षे तपश्चर्या केली. भगवान् श्रीहरि प्रसन्न झाले. आणि त्यांनी मनु राजाची कन्या कर्दमांना दिली. भगवंतांनी तिच्यापासून अवतार धारण केला.

शिष्यांना बरोबर घेऊन महाराज सायंदेवाच्या घरी आले आहेत. सुंदर रांगोळ्या काढलेल्या आहेत. प्रत्येकाला उत्तम

आसने मांडलेली आहेत. सायंदेवांनी सर्वांची यथाविधी पूजा वगैरे केली. पुरुषसूक्त म्हटले. इतर मंत्र म्हटले. महाराज साक्षात् परमेश्वर आहेत या बुध्दीने सर्व केले आहे. तो कवी असेल किंवा त्याच्या ठिकाणी काव्य शक्ती निर्माण झाली असेल. महाराजांना संतोष दिलेला आहे. महाराजांच्या चरणतीर्थाची सुध्दा पूजा केली.

राजाचे दर्शन देखिल पवित्र आहे. संन्याशाचे नुसते दर्शन झाले तरी पापक्षय होतो आणि महोदधिचे दर्शन झाले तरीही पापक्षय होतो. इथे तर अनंत ब्रह्मांडांनी प्रकटलेले साक्षात् भगवान् श्रीपादश्रीवल्लभ नृसिंहसरस्वती स्वामी महाराज स्वतः भिक्षा ग्रहण करायला आले आहेत. बरोबर त्यांच्या परीक्षेमध्ये उतरलेली शिष्य मंडळी होती. तीही सगळी संन्याशीच. सर्वांची पूजा झाली, तीर्थग्रहण केलं. अन्न वाढायला सुरवात झालेली आहे.

अन्नं चतुर्विधं स्वादु सुरसं गव्य संयुतम् ।
प्रादात्प्रकामं सर्वेभ्यो मधुरोक्त्यादरेण सः ।।

भक्ष, भोज्य असे अन्नाचे प्रकार सांगितले आहेत. त्या सर्वही प्रकारचे अन्न वाढलेले आहे. मधुर भाषण चाललेले आहे. महाराजांची स्तुती चाललेली आहे. पोटशूळ झालेल्या ब्राम्हणाला आपल्या समोर जेवायला बसवून महाराज त्याला म्हणाले,' सावकाश जेवा. तुमची व्यथा गेलेली आहे. तुमचा रोग गेलेला आहे. जे अन्न तुम्हाला वैरी वाटत होतं ते अन्न तुम्हाला तारक, पोषक आहे.'

त्यानेही भोजन केले. महाराजांच्या सान्निध्यात त्याच्या मनात असलेली अन्नाबद्दलची भीती दूर झाली आहे. वैद्य चांगला असला म्हणजे त्याच्या भाषणानेसुध्दा अर्धा रोग बरा होतो म्हणतात. औषध हे नंतर द्यायचे आहे. नुसत्या त्याच्या भाषणानेच रोग्याच्या मनामध्ये विश्वास निर्माण होतो आहे.

भुक्त्वान्नं गुरुपंक्त्यां स भेजे रुग्णोप्यनामयम् ।।

यथेच्छ जेवण केले, भूकही लागली होती. त्याचा शूळ एकदम थांबला. आणि तो पुन्हा कधीही उद्‌भवला नाही.

सिध्द सांगताहेत,' नामधारका,

नेदं चित्रं हि यद्‌भक्ता न्घंत्युद्‌भवमहारूजं ।

भगवान् श्रीहरीचे भक्त जन्ममृत्युरूप संसाररूपी महारोगांपासूनही मुक्त होतात. महाराजांची कृपादृष्टी आहे. त्यांचा संकल्प आहे. मग त्यांच्या सान्निध्यात बसलेल्या या सामान्य ब्राम्हणाचा सामान्य रोग दूर होईल यात काय आश्चर्य आहे ?'

ब्राम्हणाच्याही मनावर परिणाम झालेला आहे. महाराजांची शक्ती काय आहे हे त्याला समजले आहे. त्याच्या मनात संसाराबद्दल वैराग्य निर्माण होईन, तो सर्व परित्याग करून महाराजांच्या जवळ सेवा करण्यासाठी राहिला.

सर्वतोभजदच्युतम् ।

सायंदेवांनी सर्वांचे भोजन झाल्यावर मुखवासासाठी लवंग, वेलदोडा वगैरे दिले आहे. अत्तर लावलेले आहे.

आपल्याला सगळे लागते. स्वामी महाराजांना काही लागत नाही अशी आपली आपण समजूत करून घ्यायची. ते अन्न एकत्र करून खातात त्यांना काहीही व कसही दिले तरी चालते. अशी आपण आपली आपणच समजूत करून घेऊन काही उपयोग नाही. एक तर शास्त्रविधींची संपूर्ण माहिती करून घेऊन वागायचं नाही तर श्रध्देने वागायचं.

अंघ्र्याब्जवंदनात्तेद्य सफलं जन्म कर्म मे ।

नंतर सायंदेवांनी महाराजांची पुष्कळ स्तुती करून आपली हकीकत सांगायला सुरवात केली. ते म्हणाले, ' महाराज ! आपल्या चरणांना वंदन करायला मला मिळालं माझा जन्म आणि कर्म सगळं सफल झालं आहे. सर्व उत्तम झाले. माझे सर्व पितरही मुक्त झाले. कृतार्थ झालो मी. माझी आता काही इच्छा शिल्लक राहिली नाही. आपल्या दर्शनाचे महात्म्य इतके आहे. गंगा पापक्षय करणारी आहे. चंद्र उदयाला आल्यावर उन्हाचा ताप वगैरे कमी होतो. शांत होतो. आणि कल्पवृक्षाच्या जवळ गेलं तर दारिद्र्य दूर होते. मागेल ते तो देतो. ही तीनही फले केवळ आपल्या दर्शनाने प्राप्त होत आहेत. ' 'दर्शनंहतित्रयं.' पाप जातं, तापही जातो आणि दैन्यही जातं. हा एक पूर्ण विश्वास, निष्ठा महाराजांच्या शक्ती बद्दल ज्यांच्या मनात उत्पन्न झाली आहे त्यांना ही तीनही फळे मिळतात. पण वस्तुतः ते फळाची आकांक्षा करीत नाहीत हे मोठे फळ आहे. फलाची इच्छा असेल तर महाराज फल देतील. सकाम भक्त जरी असला तरी त्याच्या कामनेप्रमाणे फल मिळेल. पण ईश्वराचे, महात्म्यांचे सामर्थ्यच असे आहे की ज्या फलाची इच्छा निर्माण होते ती इच्छाच नाहीशी होते आहे. आत्मानंद मिळाल्यानंतर काही इच्छा होत नाही किंवा राहात नाही. तशी स्थिती झाली आहे.

सायंदेव म्हणतात,' आपण सर्वसाक्षी आहात महाराज. सर्वांच्या अंतर्यामी रहाता. नियामक आपण आहात. आपण असंग आहात, परमात्मा आहात. मनुष्य रुपाने आपण अवतार घेऊन आला आहात.' म्हणजे सायंदेव महाराजांना मनुष्य समजत नाहीत.

(भगवान् उध्दवजींना सांगतात,' आचार्य म्हणजे मी आहे अशी समजूत पाहिजे. जन्म नाही, मृत्यू नाही, काहीही नाही. तरी साधूंचे संरक्षण करण्याकरता आपण या ठिकाणी अवतार घेऊन आला आहात. मला दुसरं काही नको.' प्रल्हादजींचे तेच मागणे आहे.) सायंदेव पुढे मागतात, निर्मल दास्यभक्ती मला द्यावी. दास्य मला पाहिजे दुसरं काही नको. मला तर पाहिजेच पण आमच्या वंशोवंशी आपली भक्ती रहावी. हीच फक्त याचना

करायची आहे. याप्रमाणे आपलं खर अंतःकरण प्रकट केलं.

पण सध्या सायंदेवांवर जो प्रसंग आलेला आहे तो आता ते सांगताहेत-

'महाराज, एक मानसिक चिंता उत्पन्न झाली आहे. ज्याच्या स्वाधीन मी आहे, ज्याचा अधिकारी म्हणून माझी नेमणूक झालेली आहे तो एक यवन आहे. आणि ब्राम्हणांची तो हिंसा करीत असतो. मला त्याने बोलावले दरवर्षी, पण अजून पर्यंत मी गेलेलो नाही. ते बोलावणे म्हणजे मृत्यूचेच बोलावणे आहे. त्याच्या जवळ गेल्यावर मला काही परत येता येणार नाही. तिथेच माझा नाश होणार ' ही एक भीती त्यांनी व्यक्त केली. महाराजांचे प्रत्यक्ष चरित्र पाहिलं होतं. अन्न भक्षण केल्यावर ज्याला पोटशूळ उठे तेच अन्न भक्षण केल्यावर तो पोटशूळ नाहीसा झाला. हा चमत्कार पाहिल्यावर आपलं मनोगत, जे दुखः आहे ते सांगावं, काय हरकत आहे? स्वामींना सांगायच नाही तर कुणाला? दास्यभक्ती मागितली त्यांनी. पण दास्यभक्ती म्हणजे,'जैशी स्थिती आहे तैशापरि राहे ' असे राहायचे की काय? यवनाने बोलावल्यावर जायचे आणि त्यांने मारल्यावर मरायचे असे करायचे की काय? अजूनही महाराजांची सेवा भक्ती वंशोवंशी घडायला पाहिजे अशी प्रबळ वासना आहे. ही वासना आपल्या अंतःकरणात असल्यामुळे ती जी वासना आपण व्यक्त केली ती पूरी होईल. उगीच मरायचे नाही, त्यात काय अर्थ आहे? मृत्यूची भीती म्हणून नाहीये. मृत्यू जर टळला तर महाराजांची सेवा आपल्याला करता येईल. ही खरी इच्छा आहे. म्हणून सांगितलं त्यांनी.

मा भीः क्रूरमपीदानीं यवनं याह्यसंशयम् ।

लगेच महाराज म्हणाले,' सायंदेवा, तुझा जो मालक आहे त्याला निःशंक भेटायला जा. काही भ्यायचं कारण नाही. तुझा सत्कार होईल आणि मोठ्या आनंदाने तू परत येशील. 'नमेभक्तः प्रणश्यति ' हे भगवंताचे आश्वासन आहे. 'कौन्तेय

प्रतिजानामि न मे भक्तः प्रणश्यति ' प्रवचनकार सांगतात- अर्जुना तू प्रतिज्ञा कर. माझ्यावर लोकांचा विश्वास नाही तू माझ्यावतीने प्रतिज्ञा कर की देवाच्या भक्ताचा कधीही नाश होत नाही.' महाराजांनी सायंदेवाला सांगितलं,'जा यवनाकडे जाऊन ये. तो तुझी पूजा करील आणि तू परत येईपर्यंत आम्ही तुझ्या गांवामध्ये राहातो.' ईश्वराच्या भक्ताला भीती कसली ! भीती मनात असली तर ती काढून टाकली पाहिजे. दैवी संपत्तीचे पहिले लक्षण म्हणजे' अभयं सत्वसंशुध्दि' अभय हे मुख्य लक्षण आहे. अभय ही देवाने दिलेली संपत्ती आहे. निर्भय झाल पाहिजे भक्तांनी. मृत्यूची सुध्दा भीती नसावी.

आनंद झाला सायंदेवाला. आत्तापर्यंत टाळाटाळ केली होती. प्रत्येक वर्षाला बोलावणे यायचे. काही तरी सांगून यांनी ते पुढे ढकलले होते. सायंदेव त्या यवनाच्या वाड्यात गेला. यवनाने त्याला पाहिले. तो आंत गेला. तिथे त्याला थोडी झोप लागली म्हणा, शस्त्र घेऊन कोणी तरी एक विप्र आपल्या अंगावर येतो आहे, आपलं शरीर छिन्न करो आहे, आपल्याला मारतो आहे असा त्याला भास झाला. तो एकदम घाबरुन उठला आणि बाहेर आला. सायंदेवाजवळ येऊन त्याला नमस्कार केला. त्याची पूजा करुन वस्त्र वगैरे देऊन त्याचा सत्कार केला. म्हणाल,' जा, बाबा. तुम्ही तुमचा अधिकार व्यवस्थित सांभाळा. काम वगैरे व्यवस्थित पहा.'

त्या यवनाची कीर्ती अत्यंत क्रूर अशी होती. शरीरामध्ये उत्पन्न झालेला रोग दूर करणं हे भौतिक कार्य आहे. परंतु ज्याची बुध्दी अत्यंत क्रूर अशा प्रकारची होती त्या बुध्दीचे सुध्दा परिवर्तन महाराजांनी केलेले सायंदेवाला पहायला मिळालं. तो निराश झाला होता. आपण अधिकारावर आहोत खरे पण आपला नाश कधी होईल याचा नेम नाही. किती दिवस चुकवणार आपण, आज येऊ उद्या येऊ म्हणून? पण महाराजांचे दर्शन झाले मृत्यूची भीती दूर झाली. आपण सुरक्षित आहोत हा विश्वास निर्माण झाला. यवनाचा आदर, प्रेम संपादन करुन तो परत आला

आणि महाराजांचे स्मरण करीत तो गेलेला आहे.

सायंदेवोपि वीताधिर्हृष्टः श्रीगुरुमाययौ।

आनंद झाला. महाराजांना भेटण्यासाठी सायंदेव नदीतीरावर धावत धावता आला. सर्व वृत्तांत सांगितला.

सिध्द मुनी सांगताहेत नामधारकाला, गरुडाच्या पिल्लाला नाग भक्षण करणे शक्य आहे का? सिंहाच्या छाव्याला हत्ती पीडा देऊ शकेल का? तसा हा जो गुरुभक्त आहे त्याला यवन काय करणार?

न क्षमोप्यंतको द्रष्टुं यवनः किमुताल्पकः।।

प्रत्यक्ष मृत्यू त्या गुरुभक्ताकडे पाहू सुध्दा शकत नाही. सायंदेवाला इच्छा झाली यवनाची सेवा करण्यापेक्षा महाराजांची सेवा करावी आपण. त्यांच्या बरोबरच रहावे म्हणजे आपला खरा लाभ होईल. हा जो द्रव्यलाभ आहे तो काही खरा नाही. संतांच्या संगतीने विवेक उत्पन्न झाला. विवेक आणि सत्संगति हे दोन महत्वाचे गुण महाराजांनी सांगितले आहेत. तो विवेक उत्पन्न झालेला आहे आणि सत्संगतीही मिळालेली आहे. तीही कायम रहावी म्हणजे विवेक जाणार नाही. तो विवेकही वाढत राहील आणि सत्संगतीही कायम राहील. महाराजांच्या बरोबर राहाण्यामागे असा उद्देश सायंदेवाचा होता. पण महाराजांनी त्याला सांगितले, सध्या माझ्या बरोबर येऊ नको. इथेच नोकरी करत राहा.

दासोसीष्टं लभेत्ते मे द्व्यष्टाब्दैर्दर्शनं भवेत्।।

दास्य द्या म्हणालास ना तू ! दास्य भक्ती म्हणजे काय गुरुंच्या बरोबरच राहिले म्हणजे दास्यभक्ती होते असे नाही. आपल्या वर्णाश्रम धर्माचे-कर्मयोगाचे-आचरण करणे ही सुध्दा

दास्यभक्तीच आहे. कर्मयोगाचा दास्यभक्तीमध्ये अंतर्भाव केला आहे शास्त्रकारांनी. ईश्वराच्या आज्ञेचे पालन करणे, स्वामींची आज्ञा पालन करणे हे दासांचे कर्तव्य आहे ना ! मग देवाने जसे वागायला सांगितले तसे वागले म्हणजे दास्यभक्ती झाली नाही अस समजण्याचे कारण नाही. ती दास्यभक्तीच आहे. ' तू दास आहेस ' असे महाराजांनी सांगितले म्हणजे दास्यभक्ती त्याला मिळालेलीच आहे. ' पुन्हा सोळा वर्षांनी आमची भेट होईल ' असे आश्वासन त्याला दिलेले आहे.

सायंदेव तिथेच राहिला आहे. प्रत्यक्ष महाराजांचे दर्शन झाले, पूजा झाली सर्व संकट टळले. महाराजांची दृष्टी आहे आपल्यावर अशी त्याची भावना झाली यवनाच्या वाड्यापर्यंत काही महाराज त्याच्या बरोबर आले नव्हते. याच्या गांवात राहूनच त्यांनी याचे संकट दूर केलेले आहे. आपण आता कुठेही राहिलो तरी महाराजांची दृष्टी आपल्यावर आहे. परमात्मा हा सर्व व्यापी आहे. हे समजण्याकरता असाही अनुभव यायला पाहिजे. सायंदेवाला वाटले हेही काही वाईट नाही.

दूरही आहे आणि जवळही आहे असे वर्णन उपनिषदामध्ये आले आहे. बुध्दीवादी लोक म्हणतात,' काय विसंगती आहे! जवळही आहे आणि दूरही आहे असे म्हणणे ही विसंगती आहे.' महाराज म्हणाले, यात काहीच विसंगती नाही. दूर आहे पण कोणाला? ' जै जगा धाकुटे होईजे तै जवळीक माझी.' जवळ आहे परमात्मा पण धाकटं व्हायला हंव निरहंकार झालेल्या माणसाला परमात्मा जवळ आहे. स्वतःचा अहंकार ज्याला वाढवायचाय, स्वतःचच सामर्थ्य समजतय अस जो समजणारा आहे त्याला ते दूर आहे. त्याचप्रमाणे हा विश्वास निर्माण झाला, दास्यभक्तीही त्याला मिळाली आणि जास्त विश्वास वाढलेला आहे की महाराज कुठेही असले तरी आपल्या जवळ आहेत.

तिथून निघून महाराज परळी वैजनाथ क्षेत्री आले. तिथे गुप्तरुपाने राहिले असे म्हणतात. अशा अनंत लीला गुरुमहाराजांच्या झाल्या आहेत. सर्वांच्या मनात भक्ती निर्माण झाली पाहिजे.

यासाठी त्यांनी त्या केल्या. सर्व भूतांच्या ठायी प्रेम निर्माण होणे ही भक्तीची उच्च मुख्य भूमिका आहे. सर्वत्र एक परमात्मा आहे. परंतु तितकी भूमिका मिळायला अधिकार प्राप्त होण कठीण आहे ! हळुहळू होणार तो ! म्हणून ही जी काही विभूती रुपे परमात्म्याने धारण केली आहेत त्यांच्या ठिकाणी का होईना ( प्रतीकाच्या ठिकाणी जरी) भक्ती उत्पन्न झाली तरीसुध्दा ती उत्तम भूमिकेपर्यंत नेऊ शकते आहे. ती भक्ती शिकायची आहे. ह्याकरता अनेक लीला महाराजांनी केल्या आहेत.

भजेयुर्मां कथमपि लोका इत्याशयोस्य तु।

काय वाटेल ते मागा पण भक्ती करा. सकाम भक्ती सुरुवातीला असली तरी हरकत नाही. भक्ती करुन तुमचे कल्याण करुन घ्या. म्हणून महाराजांनी अनेक लीला केल्या आहेत.

लौकिकानन्दजनकां चमत्कृतिमिहाकरोत्।।

देवाची भक्ती केल्यावर काही तरी मिळाले पाहिजे असे वाटणे स्वाभाविक आहे. वासनामय आहे जीवात्मा ! वासनेने व्यापून गेलेला आहे. देवांने आपल्याला काही तरी द्यावे असे त्याला वाटते. हरकत नाही म्हणाले. त्यांना आनंद मिळतो आहे ना?काय मागतो ते द्यायला हरकत नाही म्हणून त्यांना आनंद देऊन, असे चमत्कार मुद्दाम त्यांनी दाखवले. एकदा त्यांची भक्ती, प्रेम दृढ होत गेलं म्हणजे मग त्यांचा आपोआप उध्दार होतो, क्रमाने. उत्तम अधिकारी ते होतील अशा आशयाने महाराजांनी अनंत लीला केल्या आहेत.

सद्हेतुक भक्ती का होईना पण करतील लोक आणि भगवद्भजनाने निर्माण होईल. उपभोग घ्यायची इच्छा अगोदर भगवंताच्या कृपेने पूर्ण झाली की भगवंताच्या भजनाकडे आपोआप लक्ष जाते. इतकं देव देतो आपल्याला काही तरी थोडंस

त्याच्याकरीता करायला पाहिजे. ‘ मोटके निमिषभरी देइ’ म्हणतात. एक निमिष तरी दे. आणि ते निमिष देऊन जर ती भक्ती वाढत गेली तर भुभुक्षा शांत होत जाऊन मुमुक्षा निर्माण होते. मुमुक्षेमुळे वैराग्य प्राप्त होते. ध्यानयोगाचा अभ्यास होतो. आणि त्या उपासना मार्गात अधिकार प्राप्त होऊन भगवंताचा मोठा प्रसाद मिळतो.

महावाक्यापासून मीच परमात्मस्वरुप आहे, मीच ब्रम्हरुप आहे, अशा प्रकारचे ऐक्यज्ञान उत्पन्न होते, आणि सर्व अविद्या दूर होते. पूर्ण शांती मिळते. अशा प्रकारचे जे भक्त ते आत्माराम होताहेत. आत्मानंदामध्ये निमग्न झालेले आहेत आणि पूर्ण मुक्ती म्हणजे सर्व कर्म बंधनातून ते कायमचे मुक्त झालेले आहेत. जन्म मृत्यू काही नाही.

म्हणून सिध्द सांगताहेत-

स्पर्शेक्षाकीर्तनादीनां सद्‌गुरोर्महिमा त्वियान्।।

भगवंतांचा स्पर्श आहे. सद्‌गुरुंच्या पायावर मस्तक ठेवायला मिळालं तर त्या स्पर्शाने आपला दुरित क्षय होतो आहे. त्यांची दृष्टी आपल्यावर पडली तर त्या दृष्टीचाही महिमा आहे. त्यांचं नामसंकीर्तन घडलं तर त्याचाही महिमा आहे. कोणच्याही उपायाने का होईना चंचल असलेले अंतःकरण सद्‌गुरुंच्या ठिकाणी, भगवंतांच्या ठिकाणी आपल्याला स्थिर करता आले तरी भगवत् स्वरुप होऊन जाते आपण. स्नेह, भीती, भक्ती असे अनेक उपाय भगवंतांनी सांगितले आहेत. हे फक्त मनुष्यालाच करता येणार. ईश्वराने दिलेल्या बुध्दीने विचार करुन भगवत्स्वरुप समजून घ्यायचे आहे.

या प्रमाणे ही कथा इथपर्यंत सांगितली सिध्दांनी ते ऐकल्यावर नामधारकांनी विचारले,‘ महाराज वैजनाथ क्षेत्रामध्ये गुप्त रुपाने राहिले, मग प्रगट का झाले नाहीत? ईश्वराचं महात्म्य कसं झाकता येईल? कस्तुरी ही गुप्त ठेवली तरी वास सगळीकडे येतोच की नाही? हे गुप्त कसे झाले हा एक प्रश्न आहे . त्यांच्या

बरोबरची शिष्यमंडळी कुठे गेली हे सगळ सांगा महाराज' नामधारकांच्या मनामध्येही सद्‌गुरुंच चरित्र जितके जास्ती ऐकायला मिळेल तितके ऐकावे अशी इच्छा उत्पन्न झाली. विचारतो आहे सिध्दांना. सिध्दांना आनंद होतो आहे. सिध्द सांगताहेत नामधारकांना-

सर्वे शिष्या भविष्याम इति मत्वात्र यान्त्यतः।।
मत्वा स्थेयं रह इति छात्रान्त्सद्‌गुरुरब्रवीत्।।

पुष्कळ शिष्य मंडळी आता येऊ लागली. महाराजांची कीर्ती जिकडे तिकडे पसरली. आता या ब्राम्हणाची, अन्न खाऊनच पोटदुखी बंद झाल्याचे, किती ठिकाणी पसरले असेल गांवोगावी जायचा प्रसंग त्याला यायचा पण अन्न काही खाता येत नव्हते. यवनाच्या वाड्यात जाऊन तो परत आलेला आहे. आजपर्यंत असे कधी घडले नाही. कित्येक लोक गेले होते, यवनाने त्यांना मारले होते. सायंदेव मात्र सुरक्षित आहेत. त्यामुळे सगळ्यांनाच वाटले महाराजांच्या बरोबर रहावे. महाराजांची संगती घडावी. त्यामुळे महाराजांनी विचार केला हे काही बरोबर नाही. आपली परंपरा ही शुध्द परंपरा आहे. ती शुध्द परंपरा सुरक्षित राहिली पाहिजे. तसा अधिकारी असेल तर तो बरोबर असला तरी हरकत नाही. तसा अधिकारी शिष्य असेल तर त्याला बरोबर घ्यायला हरकत नाही. वाटेल त्याला ती परंपरा नाही. अधिकाराशिवाय ज्ञान दिलं तर ते टिकत सुध्दा नाही.

अर्जुनासारख्याचे सुध्दा गीताज्ञान हे काही वेळ स्थगित झाले ना ! युध्दाच्या आरंभी त्याला ते ज्ञान भगवंतांनी दिले, त्यामुळे त्याचा मोह दूर झाला. ' मी कर्ता आहे, मारणारा मी आहे, ' हा मोह विश्वरुप दर्शन झाल्यामुळे दूर झाला. परंतु आत्मज्ञान होण्याला विलंब लागला. भगवान् श्रीकृष्ण निजधामाला गेले मग मात्र हा बेचैन झालेला आहे.तळमळ लागलेली आहे. आता काय करावे? त्या वेळेला ते आत्मज्ञान पुन्हा प्रगट झाले. विस्मरण झाले याचा अर्थ ते गेलं नाही. प्रतिबंध झालेला आहे

अज्ञान आहे., त्याचप्रमाणे त्याचे प्रारब्धकर्म आहे. त्यामुळे प्रतिबंध झालेले ज्ञान त्याला परत मिळालेले आहे. देवाचा शब्द आहे तो. त्याच्या वाणीतून मिळालेले ज्ञान फुकट कसे जाईल? त्या शब्दाला सामर्थ्य आहे. म्हणून इतकी शिष्य मंडळी बरोबर नको म्हणाले, परंपरा सुरक्षित राहिली पाहिजे आणि शिष्यांचीही परीक्षा पाहिली पाहिजे. उगीच वाटेल त्याला ज्ञान नाही द्यायचे. म्हणून महाराज गुप्तपणे राहिले आणि बाकीच्या शिष्यांना कर्ममार्गाचा उपदेश केला.

उपनयन झाल्याबरोबर ब्रम्हचर्याश्रमाचे आचरण करायचे. त्याचे मुख्य कर्तव्य म्हणजे वेदाध्ययन करणे. तिन्ही वेदांचा अभ्यास करायचा. आता ते शक्य नाही. १२ वर्षे, ८ वर्षे आपल्या स्वाध्यायाचा अभ्यास करणं हे कर्तव्य ब्रम्हचाऱ्याचे आहे. प्रातःकाली सायंकाळी त्यांनी होम करावा. भिक्षा मागून आणून ते भिक्षान्न सद्‌गुरुंना अर्पण करावं.त्यांची सेवा करावी. त्यांनी दिलेल्या अन्नाचा प्रसाद म्हणून स्वीकार करावा. याप्रमाणे गुरुंच्या सान्निध्यात राहून ज्ञानार्जन करायचे. सगळेही नियम पाळून ज्ञानार्जन करायचे. दिवसा झोपायचे नाही.संध्यावंदन, अग्निकार्य ही सगळी कार्ये करुन विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर, त्यांनी यथाशक्ती गुरुदक्षिणा देऊन कोणत्या तरी आश्रमाचा स्वीकार करावा. कारण प्रत्यवाय होतो. कोणत्या तरी दुसऱ्या आश्रमाचा स्वीकार एक आश्रम सोडताना करावा लागतो. नाही तर याच आश्रमात रहायच असेल तर उत्तमच आहे. यावत्जीव ब्रह्मचर्याश्रमात राहाण्याचे सामर्थ्य असेल तर राहावे. वेदाध्ययन करावे, वेद अनंत आहेत. त्या सर्वांचा अभ्यास करणे शक्य नाही म्हणून स्नातकांनी गृहस्थाश्रमी व्हावे, गृहसूत्रांप्रमाणे आचरण त्यांनी करावे.

पोष्यभृद्यज्ञकृव्देद -शास्त्रधर्मपरो भवेत।।

स्त्री, पुत्र, आप्तेष्ट, नातेवाईक या सर्वांचे पोषण करण्याकरता त्याने प्रयत्न करावेत. देवतांच्या प्रीतीकरता

यज्ञयागादिक करावेत. आणि जे जे काही गृहस्थाश्रमाचे धर्म सांगितलेत त्याप्रमाणे आचरण करावे. त्यात अतिथी धर्माचे पालन मुख्य आहे. जे आजपर्यंत धर्मकर्म करीत आलेलो आहोत ते त्याला सांगायचे आहे. मी आजपर्यंत जो काही ब्रह्माचा, वेदाचा विचार केलेला आहे त्याप्रमाणे त्यानेही ब्रह्माचा, वेदाचा विचार करण्याचे कबूल करायचे. ज्या प्रमाणे मी यज्ञकर्मे केली त्याप्रमाणे मुलानेही करावीत. अशारीतीने ही परंपरा पुत्राच्या स्वाधीन करुन वानप्रस्थाश्रमात जायचे. इंद्रियांचा निग्रह पाहिजे. चित्तशुध्दी पाहिजे, निग्रह पूर्ण होईपर्यंत तिथे राहायचे आणि मग भार्येची आज्ञा घेऊन, अग्निचा, समारोप करुन त्यांनी संन्यासदीक्षा धारण करायची असते.

यतिधर्म सर्व समजून घेऊंन त्याप्रमाणे त्यांनी वागावे. त्रिकालस्नायी संन्यासी जो आहे त्याच्याबद्दल महाराजांनी लिहिले आहे. ' कुटिचक' 'बहुचक' 'हंस' आणि 'परमहंस' असे संन्याशांमध्ये चार भेद आहेत. आपल्याच घरात राहाणारा अशक्त, संन्यास घेतला तरी फिरु न शकणारा तो कुटिचक संन्यासी. घरात न राहाता गांवातच एका मंदिरात राहातो आहे. त्यांना त्रिकालस्नायी म्हणून हा धर्म सांगितला आहे. सूत्र, शिखा, एषणा वगैरे सगळ्या सोडून द्या. भिक्षाटन करावे ब्रह्मचिंतनात रहावे, सर्व इंद्रियांचा निग्रह करावा. विषयांचा विचार मनामध्ये सुध्दा येऊ देऊ नये. दिवसासुध्दा शयन करणे वगैरे काही योग्य नाही. त्याचप्रमाणे वेणुदंड हातात धारण करावे, मृत्तिकेचे किंवा काष्ठाचे पात्र वापरावे आणि एकदाच भिक्षा मागून त्या अन्नाचे सेवन करावे. ब्रह्म चिंतन अखंड करावे. तीर्थक्षेत्री संचार करावा. पावसाळा सोडून एरव्ही कधीही तीन दिवसापेक्षा जास्त एका ठिकाणी राहू नये. संचार करण्याचे सामर्थ्य नसेल तर एखाद्या क्षेत्रात भगवंतांचे ध्यान करीत राहायला हरकत नाही.

महाराजांनी आपल्या ब्रह्मचारी, गृहस्थाश्रमी, संन्यासी शिष्यांना त्यांचे त्यांचे आचार धर्म समजावून सांगितले. तुम्ही तुमच्या

आचार धर्माचे पालन केले नाही तर तुमचा अधःपात होईल असे सांगितले. गृहस्थाश्रमी शिष्यांना त्यांच्या त्यांच्या घरी पाठवून दिले. संन्यासी शिष्यांना मात्र तीर्थयात्रा करायला सांगितल्या. काशी, प्रयाग, गया, श्रीशैल्य, नैमिषारण्य, कुरुक्षेत्र, बद्रिकाश्रम, गोकर्ण, अयोध्या वगैरे सर्व तीर्थांचा उल्लेख केला आहे. त्याच प्रमाणे गंगा, यमुना, सरस्वती, चंद्रभागा, गोदावरी अशा अनेक नद्यांच्या तीरावर संचार करावा, स्नान करावे, त्यांच्या तीर्थांचे दर्शन घ्यावे, असे सांगितले. पुढे म्हणाले,'बहुधान्य संवत्सरामध्ये श्रीशैल्यावर येऊन भेटा.' जवळ जवळ तीस चाळीस वर्षांचा काळ झाला असेल महाराजांचा. आठव्या वर्षी बाहेर पडले आणि पुन्हा तीस वर्षांनी कारंज्याला परत आले.त्यानंतर दोन तीन वर्षे गेली असतील. मग परळी क्षेत्रामध्ये येऊन राहिले.

खालच्या टीकेत प.पू.श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी थोडासा विचार मांडला आहे. संन्यासी शिष्यांना तीर्थयात्रा करण्यासाठी का पाठवले? काय कारण आहे?

यद्यपि उत्तमासहजापूजामध्दमायोगधारणा।
अधमाप्रतिमापूजातीर्थयात्राधमाधमा।।

असे एक वचन आहे. याचा वर वर दिसणारा अर्थ घेतला तर तीर्थयात्रा ही अगदी कनिष्ठ आहे. सहज पूजा होणेही कठीण आहे. अशी ही ,स्थिती म्हणजे सर्व कर्मे ही परमेश्वराची पूजाच आहे. ही सहजपूजा म्हणजे उत्तमाधिकारी आहे. योगाभ्यासाने अंतःकरणाची बाहेरच्या विषयांपासून निवृत्ती करायची. प्रत्याहार वगैरेंनी इंद्रियांना निवृत्त करून एका ठिकाणी चित्त लावायचे हे मध्यम आहे. प्रतिमापूजा ही अगदी कनिष्ठ आहे. अगदी परिच्छिन्न मूर्तीमध्ये परमात्मा परिच्छिन्न आहे, हाच अभ्यास आहे ना ! अपरिच्छिन्न परमात्म्याचे स्वरूप मनामध्ये यायला किती वेळ लागेल ? तिथे मनाला स्थिरता यावी अशी अपेक्षा आहे. प्रतिमापूजा अधम आहे याचा अर्थ त्याज्य नाही. कुठेच चित्त लागत नसेल

तर ते एका ठिकाणी ( प्रतिमेच्या ठिकाणी ) राहू शकते आणि तोच परमात्मा आहे अशी दृढ भावना झाली तर त्याचेही फळ मिळते.

नरसोबाच्या वाडीला सद्गुरू वासुदेवानंद सरस्वती महाराज होते आणि त्यांना अतिशय क्लेश व्हायला लागले. उष्णतेचा त्रास व्हायला लागला. दिवाळीच्या दिवसात पादुकांवर थंड पाणी घालत नाहीत. मोठा हंडा तापत ठेवलेला असतो. लोक जातात अंघोळ करून येतात. तसाच तांब्या त्या हंड्यात बुडवून ते पाणी पादुकांवर घालायचे. महाराजांनी विचारले,' अरे, तुम्ही अंगावर इतकं कढत पाणी घेता का? तुम्ही पादुकांवर कढत पाणी घालता त्याचा मला त्रास व्हायला लागला आहे.' मग ती मंडळी जपून वागायला लागली. म्हणजे त्या ठिकाणी का होईना जे स्वरूप आहे- त्या परिच्छिन्न स्वरूपाच्या ठिकाणीसुध्दा इतकी मनाची स्थिरता झाली, निष्ठा उत्पन्न झाली तर त्याचंही फळ मिळतं आपल्याला. तेही दृश्य होत आहे.

परंतु पुढे अपरिच्छिन्न स्वरूप समजून घेण्याच्या दृष्टीन 'सर्वभूतेषु यत्पथेत भगवत भावमात्मनः ' ही फार मोठी भूमिका आहे. आरंभाला ज्याला भक्तिमार्गात प्रवेश करायचा त्याला तोच मार्ग श्रेष्ठ आहे. तीर्थयात्रा उपयोगी आहेत हे कसे काय? आता त्यात मनाची पात्रता कशी आहे त्याच्यावर अवलंबून आहे. पुण्यक्षेत्रात जायचे असेल तर आपल्या हातून काया वाचा मने पाप घडणार नाही याची काळजी घेऊन जायला पाहिजे नाहीतर पुण्यक्षेत्री घडलेले पाप न जाता वज्रलेप होऊन जाईल.

ज्ञान होण्याकरता पापक्षय झाला पाहिजे. आत्मस्वरूप बुध्दीग्राह्य आहे पण बुध्दी शुध्द झाली पाहिजे. आरशावर जर मळ असेल तर आपलं प्रतिबिंब आरशात चांगलं दिसत नाही. आरसा स्वच्छ केला पाहिजे. त्याप्रमाणे पापक्षय झाल्याशिवाय आत्मज्ञान होत नाही. पापक्षय होण्याकरता योगाभ्यास, यज्ञयागानुष्ठाने सांगितली आहेत. ही साधने फार मोठी आहेत

असे काहींना वाटते. मोक्ष तर पाहिजे. दुःखं जावीत असं तर वाटतं. विरक्तता चित्तामध्ये उत्पन्न झाली आहे. पण योगाभ्यास यज्ञयागादिक मात्र करता येत नाहीत. मग ज्ञान प्रतिबंधक पापे जाणार कशी?

त्याकरता तीर्थयात्रा सांगितल्या आहेत. जे उच्च भूमिकेवर गेले आहेत, एकाच ठिकाणी राहून ज्यांचे चित्त स्थिर होऊ लागले आहे, अपरिच्छिन्न भगवंतांचे ज्ञान ज्यांना झालेले आहे त्यांना तीर्थयात्रेच्या निमित्ताने सर्वत्र संचार करायची जरूर काय आहे? सर्वत्र भगवत् स्वरूप पहाण्याचा अभ्यास करण्याकरताच सर्वत्र संचार करायचा. त्याकरता तीर्थयात्रा करायला महाराजांनी आपल्या शिष्यांना सांगितले. पापक्षय व्हायला पाहिजे, त्याशिवाय ज्ञान होणार नाही. मुमुक्षा तर आहेच. त्या मुमुक्षूंना हे तीर्थयात्रेचे साधन सांगितले आहे. शुध्द बुध्दी झाल्यानंतर ज्ञान होतं आहे. त्यातही महाराजांनी एक आक्षेप घेतला आहे. ज्ञान उत्पन्न होण्याकरता कर्माचा उपयोग आहे. यज्ञयाग करणे. दान करणे, तप करणे, ही तुझी तीर्थयात्रा कुठे आहे? कर्मामध्ये तीर्थयात्रा कुठे घेतलेली आहे? पवित्र स्थानी गेल्यावर सर्व पापी तरून जातात. सर्व पापांचा क्षय होतो, म्हणून सर्व नद्यांना 'तीर्थ ' म्हटले आहे. गंगा, गोदावरी वगैरे सर्वही महानद्या तीर्थरूप आहेत. अनेक ऋषीमंडळी त्यांच्या किनाऱ्यावर तपश्चर्या करीत आहेत. त्याठिकाणी स्नान करणे, कर्मानुष्ठान वगैरे करणे म्हणजे सर्व उपात्त दुरितांचा क्षय होतो आहे. रामाला सुध्दा भारद्वाजांनी तीर्थयात्रा करायला सांगितली, असे म्हणतात. तर या तीर्थयात्रेचे हे एक महत्व आहे. पवित्र स्थान आहे. पवित्र नद्या आहेत. त्याठिकाणी गेल्यावर पापक्षय होतो आणि कर्मानुष्ठानही अधिकाधिक प्रभावी होते. चित्तशुध्दीला कारण होते म्हणून महाराजांनी सर्वही संन्याशांना तीर्थयात्रा करायला सांगितली. नामधारकांनी विचारले-

शिष्यांस्तु तीर्थयात्रायै प्रेरयित्वा स्वयं कुह ।
उवास भगवान्ब्रूहि श्रोतुमिच्छामि सादरम् ।।

कुठं राहिले महाराज? सिध्दांनी सांगितले ' मी तेवढा बरोबर होतो. ' सिध्दांनाही त्या ठिकाणी प्रल्हाद, यदुराजाला जे दत्तात्रेयांनी ज्ञान सांगितले ते आत्मज्ञान सांगितले म्हणतात. तेच फक्त महाराजांजवळ होते. ' तेव्हा कुठे राहिले महाराज ते सांगा.' सिध्द सांगताहेत,' वैद्यनाथ क्षेत्रामध्ये परळी येथे महाराजांचा मुक्काम झाला. एक वर्षभर महाराज तिथे राहिले . मी त्यांची सेवा करण्याकरता तिथे राहिलो. महाराज तिथे गुप्तरुपाने राहिले. कुठे जाणे नाही येणे नाही. हा चमत्कार घडला, म्हणजे हे कुठे गेले होते? तिथे तो ब्राम्हण गळ्यात दगड अडकवून आत्महत्या करायला निघाला होता. त्याला बोलावले, त्याचा उध्दार केला. ही गोष्ट निराळी. सायंदेवही बोलला त्याच्या संकटाबद्दल म्हणून तेही निवारण करुन दिलं आहे. जाहिरातबाजी नाहीये. 'आम्ही असं करतो तसं करतो ' असं कशाला सांगायला पाहिजे? सांगायला लागतच नाही. ज्या ठिकाणी शुध्द आणि श्रेष्ठ सामर्थ्य आहे त्या ठिकाणी आपोआप लोकांचे आगमन होते.

तर म्हणाले, आम्ही परळीमध्ये राहात असताना-

तत्रैत्यैको व्दिजो मन्दो नमस्कृत्याब्रवीद्‌गुरुम्।
प्रपद्ये भगवंस्त्वां मे मोक्षोपायमुपादिश ।।

मुमुक्ष असा तो एक ब्राम्हण महाराजांच्याकडे येऊन म्हणाला,' महाराज, मी आपल्याला शरण आलो आहे. मोक्षाचं साधन मला सांगा. मोक्ष कशाने मिळेल?' आणि आपण काय काय केले ते तो सांगतो आहे-

मया तु सिध्दये कष्टं भूर्यकारि तथापि मे।

' मोक्षसिध्दी मला मिळावी म्हणून मी किती तरी तप केले पण मला मोक्ष काही मिळाला नाही. शास्त्रकारांनी योगाभ्यासादि

साधने सांगितली आहेतच. प्राणायामादिकांनी मनाचा निग्रह केला. परंतु भगवंताची, सद्‌गुरुची कृपा पाहिजे, त्यांची भक्ती पाहिजे तर या साधनांचा उपयोग होतो. ईश्वराचे अधिष्ठान पाहिजे असे योगशास्त्रकार सांगतात. तो म्हणतो. मी पुष्कळ कष्ट केले, तप केले, साधनाभ्यास केला पण मला सन्मार्ग दाखवणारे गुरुसुध्दा मिळाले नाहीत. मला सिध्दी मिळाली नाही.'

गुरुमहाराजांनी त्याला विचारलं,' का, रे, स्वतःच्या बुध्दीनेच सगळं साधन, तप केलस का? कोणी तुला सांगितलं नाही? केनयोजिता सिध्दये? कोणाच्या आज्ञेने तूं हे तप केलेस?'

हे ऐकल्यावर तो ब्राम्हण म्हणाला ' एक गुरु मला भेटले होते. परंतु दुर्वास ऋषींच होते ते गुरु! अतिशय रागीट! त्यांनी मला फार पिडा दिली. त्यांना माझ्याकडून सेवा करुन घ्यायची होती, आपलं काम करुन घ्यायचं होतं. त्या सेवेच्या इच्छेने त्यांनी मला पुष्कळ त्रास दिला. अतिशय त्रास दिल्यामुळे मी त्यांना सोडून दिले.'

हे ऐकल्यावर महाराजांनी फार राग आला.' ब्राम्हणा, धिक्कार असो तुझा! आमच्या समोर येऊ नकोस. चालता हो. गुरुद्रोही माणसाचे तोंडसुध्दा पाहू नये इतकं तुझं पाप आहे. कधीही तुझं कल्याण होणार नाही.'

आता ते गुरु तर रागावलेच, यांच दर्शन होऊन यांच्याकडून काही कल्याण होईल तर हे सुध्दा रागावले. ' गुरुंचा त्याग का केलास? तुझ्याकडे सेवाधर्म नाही. नम्रपणे गुरुजवळ राहिले पाहिजे. नम्रतेने परिप्रश्न केले पाहिजेत. तत्वजिज्ञासेने प्रश्न केले पाहिजेत. म्हणजे त्याचं ज्ञान होईल. हा सेवा धर्म तुझ्याजवळ काहीही नाही. गुरुंची सेवा करणं तुला पीडा वाटते काय? सेवा घेतली म्हणजे पीडा दिली! ही कसली सेवा? सेवा करणं हे तुला कष्ट आणि पीडा वाटते आहे तेव्हां तुझ्या बुध्दीला ज्ञान होणार कसं? हे सेवाधर्म जो पाळतो त्याच्यावर गुरुंचा प्रसाद होतो.'

त्या ब्राम्हणाने ते ऐकून घेतलं. ' सांगा महाराज. झाली खरी चूक माझ्या हातून. सद्‌गुरुंच ज्ञान कसं होणार? हे खरे

सद्गुरु आहेत. आपलं कल्याण करणारे आहेत. हे ज्ञान झाल्याशिवाय सेवा तरी कशी होणार? हे सर्व मला समजावून सांगा. अज्ञानाने माझ्या हातून गुरुद्रोह झालेला आहे. या दोषातून आपण माझा उध्दार करा.' अशी प्रार्थना त्याने केली.

सद्गुरुंचे स्वरुप काय आहे ते महाराज सांगताहेत. 'सद्गुरु निरुपमः ' हा एक सिध्दांत आहे. हे गुरुमहाराज कोणासारखे आहेत याची चौकशी करायची नाही. असं आचार्य महाराजांनीच सांगितलेले आहे. ज्ञानदान करणारे जे सद्गुरु आहेत, भवसागरातून सोडविणारे, उध्दार करणारे, त्यांना जगामध्ये दृष्टांत नाही. मग समजायचे कसे?

ब्रम्हविष्णूशिवात्मकः । हे तीन मूर्ती आहेत ना ! सर्व सृष्टीचे कार्य या तीन रूपांनी परमेश्वर करतो आहे. यांचं स्वरूप एक आहे. म्हणजे ईश्वरस्वरूप सद्गुरू आहेत. एक तर त्यांना उपमा नाही. त्यांच्यासारखा दुसरा नाही. ईश्वरस्वरूप सद्गुरू आहेत हे कळायला वेळ लागतो. संसारासक्त अंतःकरण ज्यांचे आहे त्यांना सद्गुरू हे त्रिमूर्ती रूप आहेत हे ज्ञान होत नाही. ते आपल्याप्रमाणेच आहेत असे वाटते. तेही बोलतात, चालतात, पहातात. आम्ही जसे वागतो तसे तेही वागतात. असेच आम्ही वागतो. आमच्याप्रमाणे सर्व त्यांचे आहे.

सद्गुरू ' निरूपमः ' आहेत म्हणजे आमच्याप्रमाणे कसे म्हणायचे? पण तशीच बुध्दी होते. तेव्हा विषयांध जे झालेले आहेत, ज्यांच्या मनामध्ये संसाराच्याच अशुभ वासना भरून राहिलेल्या आहेत, त्यांना गुरूस्वरूप समजणार नाही. आणि सेवाही त्यांच्याकडून घडणार नाही. हे महाराजांनी त्या ब्राम्हणाला स्पष्ट सांगितले. ' तुला ते समजणारही नाही. तुझ्या हातून सेवाही घडणार नाही. ' कशी सेवा केली पाहिजे? सद्गुरूंचा कृपाप्रसाद कसा होतो हे त्याला महाराज समजावून सांगताहेत.

धौम्य नांवाचे एक महर्षी द्वापारयुगात होऊन गेले. त्यावेळची कथा सांगताहेत. त्यांना तीन शिष्य होते- बैद, आरूणि आणि उपमन्यू ' सेवाधर्मसुशिक्षितः ' हे त्या शिष्यांचे वर्ण केले आहे.

त्यांनी सेवा धर्माचे शिक्षण घेतलेले होते. गुरूची सेवा उत्तम रीतीने कशी करायची हे त्यांना माहीत होते.त्यांची परीक्षा धौम्य ऋषींना घ्यायची आहे. हा ज्ञाननिधी त्यांना द्यायचा आहे ना ! आत्मज्ञान निधी द्यायचा. हा निधी दिला तर त्याचे ते संरक्षण करू शकतील की नाही हे सगळे पहाण्याकरिता अगोदर त्यांची परीक्षा घ्यायचे ठरवले.

धौम्य ऋषींनी एकदा आरूणि नांवाच्या आपल्या शिष्याला सांगितले, ' बाबा, गावाबाहेर आमचे एक शेत आहे. तिथे एक छोटासा झरा वाहातो आहे. त्याचं पाणी आमच्या शेतात जाईल अशी व्यवस्था करायची म्हणजे पुष्कळ धान्य वगैरे येईल. कोणीतरी प्रयत्न करा आणि त्या शेतामध्ये ते पाणी आणून सोडण्याची व्यवस्था करा.' तो अरूणी निघाला. पुढे आपल्याला या शिक्षणाचा काय उपयोग होणार आहे, हे विचार सुरू झाले म्हणजे ज्ञानही कमी होते. आरूणिने शेतात जाऊन पाहिलं सगळं. शेत उंच आहे. खालून तो झरा वाहातो आहे. ते पाणी वर कसे न्यायचे? दगड वगैरे आणलेले आहेत. पाणी अडविण्याचा प्रयत्न केला. अडविले की वरून जाईल असे त्याला वाटले. पाणी वेगाने वाहात होते. दगड काही राहीनात. पाणी शेतात कसे जाणार? त्याला वाटले, 'गुरू महाराज काय म्हणतील? त्यांची इच्छा आहे की पाणी शेतामध्ये जायला पाहिजे. एक थेंब सुध्दा शेतामध्ये गेला नाही तर सेवा कशी होईल?' असे म्हणून त्याने मनाचा एक निश्चय केला. देह पडला तरी हरकत नाही. सद्‌गुरूच्या मनातील भाव थोडाही कमी होऊ नये याकरता त्याने आपले शरीरच पाण्याला प्रतिबंध म्हणून वापरले. दगड धोंडे ठेवण्याऐवजी आपले शरीरच तिथे ठेवले. त्यामुळे पाणी अडवले जाऊन शेताकडे जाऊ लागले.

धौम्य मुनी संध्याकाळच्या वेळेस तिथे आले. काय चाललय बघूया, म्हणाले. त्यांना पाहिलं, शेतामध्ये अगदी भरपूर पाणी आहे. सगळ्या साळींना पाणी मिळालेलं आहे. पण शिष्य कुठे आहे? कसे पाणी मिळालं शेताला? हांक मारताहेत,' आरूणि

बाळा तू कुठे आहेस?' आरूणिने हांक ऐकली. पण त्याला काही बोलता येईना. पाण्यात पडलेला आहे तो. वरून पाणी वहातय. हलक्या स्वरात त्याने ओ दिली. धौम्य मुनी त्याच्याजवळ आले त्याला उठविला.

कृपया परयोत्थाप्य भक्तिं ज्ञात्वास्य तत्क्षणम् ।
तस्मिन्प्रसन्नः सम्भूय स्वीयं साम्यं व्यधान्मुनिः ।

सद्गुरू स्वतःचे साम्य त्याला देतात. परिस हा लोखंडाचं सोनं करेल. आपली जी योग्यता आहे तीच योग्यता शिष्याची करणं हे फक्त सद्गुरूंचच सामर्थ्य आहे. आरूणिला देहासक्ती नाहीये. सद्गुरूंच्या कार्याकरता देह गेला तरी हरकत नाही अशी भावना आहे. आता देहाची आसक्ती सुटणे फार कठीण आहे. देहात्मभाव गेला पाहिजे आणि तो देहात्मभाव ' अहं ब्रम्हास्मि ' हे ज्ञान झाल्याशिवाय जात नाही. शेवटी जातो म्हणतात. देहाध्यास हा शेवटी जातो. ही त्याची देहबुध्दी दूर झालेली आहे. फक्त सद्गुरूंची सेवा करायची आहे. सेवेशिवाय दुसरं काहीही नाही. धौम्यमुनींनी आरुणिला उठवले आणि त्याला आपल्या सारखे केले.

विद्याविनयसम्पन्नो भूत्त्वा सन्तोष्य सद्गुरूम् ।
तदाज्ञया ययौ धाम स्वमर्च्योभवदत्र सः ।।

सर्व विद्या विनय प्राप्त झाला त्याला. सद्गुरूंच्या चित्ताचे समाधान झाले. आशीर्वाद मिळालेले आहेत आणि नंतर तो आपल्या स्थानाला निघून गेला.

आता दुसरा शिष्य बैद. त्याला सांगितले,' शेताला पाणी मिळालेले आहे. धान्यही आता पुष्कळ येईल. तिकडे तू लक्ष दे. चांगलं धान्य पिकवायची व्यवस्था कर. रक्षा कर धान्याची आणि तयार झाले म्हणजे आणून दे.' तोही शिष्य शेताकडे निघाला.

पशु, पक्षी वगैरे पुष्कळांपासून धान्याचे संरक्षण करावे लागते. ते त्याने केले. तोडून मळणी करून धान्याच्या पुष्कळ राशी केल्या. मग गुरू महाराजांना येऊन सांगितले,' धान्य राशी झालेल्या आहेत. आता आणायचे कसे? एक गाडी पाहिजे.' आता गुरू महाराजांनी त्याला गाडी दिली आणि जोडायला एक रेडा दिला. गाडीला दोन्ही कडे जोडायला दोन रेडे पाहिजेत. त्याने सगळ्या साळी आणि भात त्या गाडीत भरलं. एका बाजूला रेडा जोडला आणि दुसरीकडे स्वतःला जुंपून घेतले. दोघे गाडी ओढताहेत. आता त्या रेड्याची शक्ती केवढी आणि त्याच्यापुढे याची शक्ती किती असणार? मधूनमधून याच्याही गळयाला फांस लागतो आहे. मध्येच एका ठिकाणी पावसाने चिखल झाला होता त्यात त्या गाडीचे चाक रुतून बसले. ओढता काही येईना. कंटाळला. फास लागलेला आहे. काय करायचं? शेवटी खाली पडला.

इतक्यात धौम्य गुरुमहाराज तिथे आले. म्हणाले, काय भयंकर हे ! मानेवर जू ठेवून ओढतो आहे ! लगेच त्याला मुक्त केला. प्रसन्न होऊन वर दिला. त्यांच्या कृपेने प्रपंचात व परमार्थातही श्रेष्ठता त्याला मिळालेली आहे.

तिसरा शिष्य उपमन्यू त्याची परीक्षा केली आहे. त्याला आज्ञा केली,' गायी चरायला वनात घेऊन जा आणि संध्याकाळी परत आण.' त्याला खूप भूक लागायची. गायी वनात न्यायचा लगेच परत आणायचा. गुरू महाराजांनी सांगितले, ' लगेच परत यायचे नाही. संध्याकाळ पर्यंत तिथे थांबायचे.' आता त्याला भूक लागल्यावर काय करायचं? तिथे काही घरं असायची. तिथे भिक्षा मागावी, तिथेच जेवण करावं. संध्याकाळी आल्यावर गुरू महाराजांच्या घरी जे काही मिळेल त्यावर निर्वाह करावा. जेवण काही पोटभर मिळत नव्हतं. त्याची सुध्दा परीक्षा चालली आहे. अन्नमय शरीर आहे पण साधकाला मितहार सांगितला आहे. पवित्र आहार पाहिजे. मितहार याला काही जमत नव्हता. पोटभर जेवण पाहिजे.

गुरू महाराजांनी त्याला विचारले,' अरे, संध्याकाळी तू

एकदा जेवतोस तुझं शरीर इतकं चांगलं कसं राहिलं? भूकबिक लागत नाही का तुला? ' तो म्हणाला,' लागते ' ह्यांनी विचारले,' मग काय करतोस ?' तो म्हणाला,' तिथेच भिक्षा मागतो आणि तिथंच जेवतो.' सरळ वृत्ती आहे. खोटेपणा नाही. काय म्हणतील गुरू महाराज वगैरे विचार नाही.

लगेच धौम्य मुनी म्हणाले,' दुपारी भिक्षा मागितल्यावर इथे आणून देत जा आणि परत वनात जाऊन संध्याकाळी परत ये.' काय वाटलं असेल त्याला! पण गुरु आज्ञा त्याला मान्य आहे.

स पश्र्चाद्याच्ञयारक्षत्स्वं तव्देदापि वै मुनिः।।

पुन्हा दुसऱ्यांदा भिक्षा मागावी. लोक भिक्षा घालतही होते. ' कां, बाबा, पुन्हा पुन्हा कां येतोस,' असं म्हणाले नाहीत. लहान मुलगा आहे. लागत असेल भूक . म्हणून घालावी भिक्षा. असे काही दिवस गेले. हे धौम्य मुनींना समजलं ते म्हणाले,'दोन्ही वेळेची भिक्षा आणून देत जा.'

हे ऐकल्यावर राग यावा की नाही अशा मनुष्याला? काही खाऊच द्यायचं नाही त्याला राग येणारच. पण नाही. निग्रह मोठा आहे. गुरुभक्तीचे माहात्म्य आहे. साधकांची लक्षणं सांगताना भगवंतांनी सांगितले आहे- मान नाही, मत्सर नाही, असूया नाही. कार्यदक्ष आहे. गुरुसेवेमध्ये जो निमग्न झालेला आहे त्याच्या मनांत गुरुंची आज्ञापालन करण्याशिवाय दुसरा विचार नाही.

दोन्ही वेळेला भिक्षा आणून द्यायची पुन्हा जायचे आणि संध्याकाळशिवाय यायचे नाही घरी. ही अट आहे. भूक तर लाग़ायची. लहान वय आहे. आता काय करायचे? गायींची वासरं दूध प्यायची. वासरं किती पिणार? वासरं दूध पिताना जे खाली पडायचं ते याने ओंजळीत घेऊन प्यावं. संध्याकाळी आल्यानंतर काही दिले गुरुंनी तर खायचे. थोडे असेल तरी तेवढ्यातच समाधान मानून राहायचे. काही दिवसांनी गुरु महाराज

म्हणाले,' दोन्ही वेळेची भिक्षा इकडे आणून देतोस मग तुला भूक लागल्यावर काय करतोस? ' तेव्हा त्याने सांगितले की 'वासरे दूध पिताना जे सांडते ते घेतो.' गुरुमहाराज म्हणाले, 'अरे ! उष्टं दूध पितोस तू? दूध खाल्ल्याने बुध्दीभ्रंश होतो. बुध्दी चांगली राहिली पाहिजे. तुला शिकायचे आहे ना ! मग असे उच्छीष्ट पिऊ नकोस.' तोही मार्ग बंद झाला.

दुसऱ्या दिवशी रानात गेल्यावर त्याने रुईच्या झाडाचा चीक दुधासारखा प्यायला घेताना तो डोळ्यांना लागला आणि त्याची दृष्टी गेली. अंध झाला. संध्याकाळ झाली उपमन्यु आला नाही. पण तरीही त्याला काळजी लागली की आता आपण अंध झालो आपल्या हातून गुरु सेवा कशी घडणार? धौम्य मुनींना हे समजले. तिथे जाऊन त्यांनी उपमन्युला अश्विनीकुमारांचे स्मरण करण्यास सांगितले. ते केल्याबरोबर त्याला दृष्टी प्राप्त झाली. गुरुंचा संकल्प आहे तो. त्याच्यावर पूर्ण कृपा झालेली आहे. देहाची आस्था जाणे फार कठीण आहे. देहाकडे लक्ष दिले नाही तर सेवा चांगली होते. पण याचे देहाकडे लक्ष असूनसुध्दा सेवा चालू आहे. गुरुमहाराजांची आज्ञा पालन करतो आहे. उपमन्युवर पूर्ण कृपा झाली . त्याचे शिष्यही त्याच्यासारखे समर्थ झालेले आहेत.

परीक्षित राजाला तक्षकाने दंश केल्यामुळे त्याच्या मुलांनी जनमेजय राजाने सर्व सर्पांचा नाश करण्यासाठी सर्पसत्र सुरु केले. त्याचे पौरोहित्य करणारे उत्तंक मुनी उपमन्युचे शिष्य होते. या सर्पयज्ञात हजारो सर्पांचा नाश झाला. शेवटी तक्षकाची पाळी आली. तो इंद्राला शरण गेला. इंद्राने त्याला आश्रय दिला. राजाने राजाने मुनींना सांगितले की अपराधी माणसाला आश्रय देणाराही अपराधी आहे. इंद्रासहीत तक्षकाला मंत्रसामर्थ्याने कुंडात आणा. पण मग बृहस्पतींनी येऊन त्याचे समाधान केले आणि तो सर्व यज्ञ थांबलेला आहे.

आरंभाला गुरु शिष्याची बुध्दी इंद्रिय वगैरे कशी आहेत ही सगळी तपासणी करतात. ज्या बुध्दीमध्ये ज्ञानाचे संक्रमण

करायचे ती बुध्दी चांगली आहे की नाही हे पाहिल्याशिवाय ज्ञान कसे देणार? बुध्दी शुध्द करण्याकरता हे सर्व कष्ट आहेत. ' सेवा घेतली म्हणजे पिडा दिली असे तू समजतो आहेस, तुला ज्ञान कसे होईल?

अतस्तमेव शरणं सर्वभावेन गच्छ भोः।

ज्या गुरुंना तू सोडून आलास त्यांनाच शरण जा. त्यांना प्रसन्न करुन घे. म्हणजे तुला मोक्ष मिळेल. आम्ही काहीही सांगणार नाही.'

काय करावे आता? तो ब्राम्हण निराश झालेला आहे. आपली चूक झाली हे त्याला पटलेले आहे. आता आपण देह ठेवायचा नाही. त्याने महाराजांना विचारले,' महाराज, मी जर माझ्या गुरुंच्याकडे गेलो तर ते रागावतील की प्रसन्न होतील? सुवर्णादि धातू जोडले तरी पुन्हा वितळवून ते जोडता येतात पण एकदा फुटलेला मोती परत जोडता येत नाही. त्याच प्रमाणे गुरुमहाराजांचे ह्रदयच मी छिन्नविच्छिन्न करुन आलेलो आहे. ते ह्रदय कसे जोडायचे? ते शक्य नाही हे पाप माझ्या हातून झालेले आहे. तोच एक उपाय असेल तर मला देह ठेवता येत नाही. मी आता देहत्याग करतो. आपल्या समोरच मी प्राणत्याग करतो.'

त्याचा तो निश्चय पाहून महाराजांनी त्याच्यावर कृपा केली. त्याला सांगितले,'तुझ्या गुरुंचे स्मरण कर.' म्हणजे त्याच्या मनामध्ये राग अजून शिल्लक आहे की नाही ते पहायचे आहे. रागावून आलेला आहे तो. पश्चात्ताप झाला याचा अर्थ राग गेला पाहिजे. आपण गुरुमहाराजांचा अपराध केला चूक केलेली आहे. म्हणून गुरुमहाराजांचं स्मरण कर. त्याने गुरुंचे स्मरण केले आणि महाराजांकडे पाहिले तर महाराजच त्याच्या गुरु स्वरुपामध्ये त्याला दिसले त्यांनी आपणच कृपा केली असे त्याला दाखवलं. संतोष झालेला आहे. प्रेमाश्रु वाहाताहेत त्या ब्राम्हणाच्या नेत्रातून.

हात जोडून तो उभा राहिला. महाराजांनी त्याला सांगितले,

‘आश्रम धर्माचं आचरण तू कर. त्या आश्रम धर्माच्या आचरणाने तुझी चित्तशुध्दी होऊन तुला आत्मज्ञानाची प्राप्ती होईल. जे स्वरुप तू पाहिलंस त्याचे स्मरण करीत जा. म्हणजे तुला मोक्षसिध्दी प्राप्त होईल.’ गुरु महाराजांची त्या ब्राम्हणावर कृपा झालेली आहे. आत्मसुखाचा अधिकारी तो झाला.

नंतर महाराज तिथून निघून पुढे दक्षिणेला निघालेले आहेत. दक्षिणेला कृष्णा तीरावरती येऊन पोहोचले. सध्या त्यालाच औदुंबर क्षेत्र असे म्हणतात. त्या औदुंबर क्षेत्रात महाराजांचा चातुर्मास झाला. पलिकडच्या तीरावर भुवनेश्वरी देवीचे स्थान आहे. त्यावेळी एक ब्राम्हण कुमार महाराजांच्याकडे आलेला आहे. विद्या मिळावी चार लोकांत मान सन्मान मिळावा या इच्छेने तो आलेला आहे. त्याचे चरित्र आता सिध्द मुनी सांगताहेत. त्याचा उध्दार कसा केला ते सांगताहेत.

करवीर क्षेत्रामध्ये, कोल्हापूरामध्ये एक विद्वान् ब्राम्हण राहात होता. अनेक शिष्य मंडळी येताहेत, ज्ञान मिळविताहेत जाताहेत. त्यांना हा शिकवितो आहे. त्याला एक मुलगा झाला. पण त्या मुलाला मात्र काही ज्ञान नाही. बुध्दीच नाही ना ! धारणा शक्तीच नाही. बुध्दीची धारणा शक्ती पाहिजे, मेधा जिला म्हणतात. सांगणाऱ्याने सांगितले पुष्कळ. उत्तम अगदी सांगणारे आहेत. काही संशय राहात नाहीये. पण याच्या चित्तामध्ये धारणा शक्तीच नसेल तर ते ज्ञान राहातय कुठे! पुन्हा पहिल्यासारखा कोरडा. त्याला ज्ञान देण्याचा त्याच्या पित्याने पुष्कळ प्रयत्न केला. शेवटी निराश झालेला आहे. पुढे मातापिता दोघांनाही मृत्यू आला आहे.

आणि मग सगळी मंडळी त्याची निंदा करु लागली. आता त्याची निंदा करुन काय होणार? पण लोकांना काय, जे समोर दिसते तेवढ्या पुरते पहायचे. ते म्हणाले,‘ जन्माला कशाला आलास? पशूच तुला म्हटलं पाहिजे. फक्त शिंग आणि पुच्छ नाही. बाकी पशू आणि तू यांच्यात काहीच अंतर नाही. भाग्य आहे म्हणाले गायी बैलांचे तू गवत खायला लागला नाहीस. त्यांचं ते गवतही तू खाल्ले असतेस म्हणजे त्यांना मिळाले नसते.’

असे वाटेल तसे बोलावे त्यांनी.

विद्या हा मोठा निधी आहे, म्हणाले. चोरांनी तो कितीही हरण करण्याचा प्रयत्न केला तरी त्यांना तो मिळणार नाही. दुसरं धन दिल्यानंतर कमी होतं. पण विद्या हे धन दुसऱ्याला - शिष्याला दिल्यावर ते वाढत असतं. म्हणून ही विद्या परंपरा अखंड चालू आहे. या परंपरेमुळे वेदांचे शास्त्रांचे, या विद्येचे संरक्षण झालेले आहे. जरी आपल्या जवळ योग्यता नसली तरी सुध्दा जर विद्या प्राप्त झाली तर ती योग्यता त्याच्यात उत्पन्न होते. तर अशा प्रकारची विद्या मिळविण्याकरता तू काहीच प्रयत्न केले नाहीस. किती तुझा पिता विद्वान होता. त्याला तरी विचारायचेस, म्हणाले. कशाने माझी बुध्दी वाढेल.

तू काहीच प्रयत्न केला नाहीस. लक्ष दिले नाहीस. पुष्कळ निंदा होऊ लागली. गावात त्याला राहाणे अशक्य झाले. आणि ते गांव सोडून या भिल्लवडी क्षेत्रामध्ये तो आलेला आहे.

प्रायोपविष्टोनशन आनर्च भुवनेश्वरीम्।

दुसरीकडे कुठे गेला नाही. देवीच्या जवळ येऊन बसला मंदिरामध्ये. आपली कार्यसिध्दी झाल्याशिवाय उठायचे नाही असे त्याने ठरविले. अन्न नाही, पाणी नाही काही नाही.हा एक निश्चयच आहे ना. आपल्याला देवीचं दर्शन झाल्याशिवाय तिची कृपा झाल्याशिवाय उठायचे नाही. एक पक्का निश्चय झाले. निश्चयानेच कार्य सिध्दी होते ना ! अमुक एक करायचे असा निश्चय पाहिजे. आणि मध्ये कितीही विघ्ने आली तरीसुध्दा अनुत्साह नाही, निर्वेद नाही. उत्साह कायम आहे. या दोन गुणांनीच कार्यसिध्दी होते आहे.

आला तो. भुवनेश्वरीचे पूजन केलेले आहे. आणखी दोन तीन दिवस झाले, दर्शन नाही देवीचं. आता त्याला महाराजांकडे त्या देवीला पाठवायचे होते असही असेल किंवा देवांचा स्वभावही असेल. वस्तुतः 'कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति '

असं जगदंबेचे वर्णन आहे. जरी आणखी पुत्राचे पुष्कळ अपराध असले तरी माता काही ते आपल्या लक्षात ठेवत नाही. हेच मातेचे लक्षण आहे. म्हणून ' न मातुःपरदैवतम् ' म्हणतात शास्त्रकार. संयमी, सहनशील असती माता. त्या कुमाराची परीक्षा पहायची असेल म्हणा त्याची योग्यता अधिकाधिक वाढावी हाही उद्देश असेल.

तीन दिवस झाल्यानंतर मात्र हा रागावलेला आहे. ती दिवस अन्न नाही पाणी नाही. जगन्मातेचा प्रसाद झाला नाही म्हणून शस्त्र घेऊन आपली जीभ तोडून त्याने देवीच्या चरणावर वाहिला. आणि सांगितले, उद्या सकाळपर्यंत जर तुझे दर्शन झाले नाही तर माझे मस्तकही तुझ्या चरणाजवळ मी ठेवणार आहे. मग मात्र त्याला दृष्टांत झालेला आहे.

जगदंबेने सांगितले,' बाळ पलीकडच्या तीरावरती भगवान नरहरी आहेत. नरसिंह सरस्वती महाराज. त्यांचं दर्शन तू कर. तिकडे जा, म्हणजे तुझ्या सगळ्या इच्छा पूर्ण होतील.' त्याची जीभ तुटल्यामुळे जखमेतून रक्त वाहात होत, वेदना होत होत्या. प्रत्यक्ष नाही पण स्वप्नामध्ये का होईना आपल्याला दर्शन झाल्याचा त्याला आनंद झाला. धैर्याने महाराजांच्या जवळ आला. महाराज त्या औदुंबर वृक्षाच्या खाली बसलेले आहेत. त्या ब्राम्हण कुमाराने येऊन साष्टांग नमस्कार केला. त्याच्या नेत्रातून अश्रुधारा वाहाताहेत. 'त्वंनो माता त्वं पिताप्त्योधिपस्त्व' अशी त्याची भवना झाली. आईनं सोडून दिलं म्हणून महाराज हेच मातापिता सर्वरुपी आहेत. हा त्याची भावना झाली. साष्टांग नमस्कार घातलेला आहे.

सिध्द सांगताहेत, नामधारका, प्रारब्धकर्म इतकं विलक्षण त्या द्विजकुमाराचं होतं. ज्ञानी पिता मिळालेला आहे. अनेक ज्ञानार्थी विद्यार्थी येऊन विद्या ग्रहण करुन कृतकार्य होऊन गेलेले आहेत. त्या पित्यापासून आणखी ज्ञान मिळालं नाही. त्यानंतर जगदंबा आहे. जगन्माता. त्या जगदंबेच्या जवळ आलेला आहे. बिचारा त्रस्त झाला होता लोकनिंदेमुळे. त्याला ज्ञान पाहिजे. दुसरी इच्छा नाही. अर्थार्थी जरी असला तरी विद्यार्थी होता तो.

त्या जगदंबेनही उपेक्षा केली सद्गुरु दाखवून दिले मात्र. ही कृपा झालेली आहे मोठी. तो महाराजांना शरण आलेला आहे.

स्पर्शेयोपि यथा हेम हंसः काकोपि मानसे ।
यथा विव्दांस्तथाभूत्स सुजिह्वः स्पर्शनाव्दिभोः।।

आणि महाराजांनी त्याच्या मस्तकावर हात ठेवल्या बरोबर त्याची जिव्हा तर त्याला मिळालीच पुन्हा परंतु परिसाचा स्पर्श झाल्याबरोबर ज्याप्रमाणे लोखंडाचं सुवर्ण होत तसा तो विद्वान झालेला आहे. दुरितक्षय हा मानवाच्या प्रयत्नाने होणं कठीण आहे. प्रत्यक्ष सद्गुरुंची कृपा त्याच्यावर झाली. त्यामुळे अत्यंत ज्ञान संपन्न तो झालेला आहे.

ते सांगताहेत सिध्द मुनी-

वज्रांकुशध्वजाब्जांकं ध्यायत्यं घ्र्यब्जमस्य ये।
अपैति तत्प्रसादाध्दी -जाड्याद्यं नात्र चित्रमित्।।

ध्यानयोगाचा अभ्यास सांगताना कपिल मुनींनी भगवंतांचं दिव्य चरणकमल, साक्षात्कार संपन्न अशा प्रकारच्या महात्म्यांनी ध्यानयोगाचं वर्णन केलेलं आहे. संपूर्ण अवयवांचं ध्यान त्यांनी केलेलं आहे. म्हणून प्रत्येक अवयवांचे त्यांनी वर्णन केलेलं आहे. श्रीकृष्णांच्या चरणावर वज्र, अंकुश, ध्वज, कमल ही चिन्ह होती. अक्रूरजी जेव्हां गोकुळात गेले तेव्हां तिथे भगवंतांची उमटलेली पाऊले त्यांनी पाहिली आणि या चिन्हांवरुन त्यांनी ती ओळखली. कृष्णांचे भक्त ते होते. रथातून उडी मारुन त्या रस्त्यावरच्या धुळीमध्येच ते लोळू लागले.

तर सिध्द सांगताहेत. नामधारका, भगवंताच्या ह्या चरणकमलांचे जे ध्यान करतात. त्या ध्यानामुळे भगवंताचा त्यांच्यावर प्रसाद होऊन धिजाड्य, प्रारब्धकर्म हे सगळही नाहीसे होते. यात काही आश्चर्य नाहीये. आमची अशक्ती, आमच्या

असमर्थतेमुळे आम्हाला याचे आश्चर्य वाटते. परंतु भगवंताच्या वस्तुशक्तीच्या दृष्टीनं अशक्य काही नाही.

ब्राम्हण कुमार कृतार्थ झाला. माणसांनीही त्याची उपेक्षा केली, देवांनीही केली परंतु महाराजांच्या कृपेने पूर्ण ज्ञानसंपन्न होऊन तो घरी गेलेला आहे. सर्वही ऐहिक सिध्दी त्याला मिळाल्या. सर्व मंडळी त्याला मान सन्मान देऊ लागली.

भगवांस्तत उत्थाय दक्षिणाभिमुखो ययौ।

कृष्णावेणीपंचनदी -संगमं सुमनोहरम्।
अष्टतीर्थान्वितं पुण्यं दृष्ट्वा तस्थौ परे तटे।।

तसेच कृष्णातीरावरुन जिथे कृष्णा पंचगंगेचा संगम झालेला आहे तिथे आलेले आहेत महाराज. सध्याचे नरसोबावाडी क्षेत्र तिथे आहे. अष्टतीर्थ, शुक्लतीर्थ, काम्यतीर्थ इ. सिध्दतीर्थ त्या ठिकाणी आहेत. पश्चिम तीरावरती महाराजांचा मुक्काम झाला. त्यावेळी तिथे अरण्य होते, गांव नव्हते. समोरच्या किनाऱ्यावर अमरापूर म्हणून एक गांव होते. सध्या त्याला औरवाड म्हणतात. दोन तीं मैलावर शिरोळ नांवाचं गांव आहे. कुरुंदवाडही असेल कदाचित त्यावेळेला. पण महाराज जिथे राहिला तिथे अरण्य आहे. सरस्वती, शिवा, भद्रा, कुंभी, भोगवती या पंचनद्या आणि कृष्णामाई यांचा संगम झालेला आहे.

'कृष्णालहरी' महाराजांनी केलेलीच आहे. त्यात कृष्णा देवी ही कशी आहे हे सगळं वर्णन केलेलं आहे. कृष्णा ही साक्षात् हरिस्वरुप आहे, म्हणाले. गंगा ही हरिच्या चरणापासून निघालेली आहे. 'कृष्णा विष्णु तनुः साक्षात्' ही भगवत स्वरुप आहे. असं पुष्कळ वर्णन त्यात आहे. आणि पलिकडच्या पूर्व तीरावरती अमरेश्वर भगवान विश्वनाथ. काशी क्षेत्रासारखे ज्याला महत्व आहे, विश्वेश्वरतुल्य असे अमरेश्वर त्या ठिकाणी आहेत. आणि चौसष्ट योगिनी या अमरेश्वराच्या सन्निध राहाताहेत अस हे

स्थान या स्थानामध्ये महाराजांचा निवास झालेला आहे.

मुमुक्ष्वाश्वासनं कामि -हितं सत्तमरंजनम्।
दृष्ट्वाश्रमं मूर्तिमत्स्वं परात्मोदुंबरे व्यधात्।।

त्या स्थानाचं महत्व सांगताहेत आणखी सिध्द मुनी. भगवान् नरसिंह सरस्वती महाराजांनी विचार केला आणि ते तिथे राहिले. सर्व बाजूला सगळी तीर्थ आहेत. कृष्णा पंचगंगा यांचा संगम आहे. तीर्थयात्रा आणखी महाराजांनी का कराव्यात याचे प्रतिपादन सद्गुरु वासुदेवानंद स्वामी महाराजांनी एका ठिकाणी केलेले आहे. तीर्थस्वरुप महाराज तीर्थयात्रा करुन तीर्थस्नान करण्याकरता जातात कशाला? स्वामी महाराज म्हणाले, तीर्थ प्रकाश करायचा आहे ना! कुठं तीर्थ आहेत. गाणगापुरामध्ये अष्टतीर्थ आहेत. नरसोबावाडीमध्ये कशी आहेत. हे दाखविणार कोण? आपली नदी वाहाते आहे. कृष्णा नदीचेही काय सामर्थ्य आहे. कोणचे स्वरुप आहे. हे तरी महाराजांनी दाखिवले म्हणून कळतयं. कृष्णा महात्म्य वगैरे आहे, दासांनी लिहून ठेवलय, पण वाचणार कोण?

तसं ह्या स्थानाचं ' मुमुक्षु आश्वासनं ' नरसोबा वाडीच वर्णन करताहेत महाराज. मुमुक्षु जर या ठिकाणी गेला तर मोक्षसिध्दी या स्थानात नक्की होईल असं आश्वासन आहे. 'कामी हितं ' महाराज गेल्यापासून आता ५०० वर्ष होऊन गेली. इथून महाराज गाणगापूरला गेले असे वर्णन आहे. किती तरी आणखी अर्थी, अर्थार्थी भक्त आले असतील. त्यांच्या किती तरी इच्छा पूर्ण झाल्या असतील. हजारो लोक येऊन गेले असतील. सर्वांची कामना पूर्ण करणारे हे स्थान आहे. आणि ' सत् तव रंजनम् ' मोठे मोठे अधिकारी महात्मे. रामचंद्र योगी महाराज, नरसिंह सरस्वती महाराज या ठिकाणी येणार हे समजल्या नंतर त्यांच्या येण्यापूर्वीच २०० वर्ष अगोदर इथे येऊन राहिले म्हणतात.

रामचंद्र योगींची समाधी वरच्या बाजूला आहे. मनोहर

पादुका खाली आहेत. पुराचे पाणी आले म्हणजे मनोहर पादुका पाण्याखाली जातात अशा वेळी ज्यांचा प्रदक्षिणा घालायचा नियम असेल त्यांनी रामचंद्र योगी महाराजांना प्रदक्षिणा घातल्या तरी त्या देवाला पोहोचतात असे म्हणतात.

त्यानंतर आणखी नारायण स्वामी महाराज तर महाराजांचे शिष्यच होते. गोविंद स्वामी, गोपाळ स्वामी, मौनी स्वामी असे अनेक शिष्य होऊन गेले. ' सत् तव रंजनम् ' त्यांना याठिकाणी आणखी आनंद होत आहे असे हे स्थान. इथे महाराजांनी आपला आश्रम केला.

पूर्व तीरावरती अमरापूर क्षेत्र आहे. विश्वनाथांचे, ते स्थान, अमरेश्वरांचे. तिथे घडलेली हकिकत सिध्द सांगताहेत. या गावामध्ये केव्हां केव्हां महाराज भिक्षेला जायचे. रोज काही भिक्षेला जायचं नाही, काही नाही. त्यांचं वर्णन पुढे आलेलं आहे. त्या सगळ्या योगिनींनीच त्यांची पुजा करावी. त्यांना भिक्षा द्यावी. हे सगळे त्या नदीच्या पात्रात करीत होत्या. त्या अमरापूर क्षेत्रामध्ये एक वैदिक ब्राम्हण राहात होता. अत्यंत दरिद्री होता बिचारा. प्रारब्ध कर्म प्रतिकूल आहे म्हणून दरिद्री आहे. परंतु महाराज त्याच्या घरी भिक्षेला जाताहेत म्हणजे त्याचे हे दैन्य त्याला अनुकूलच आहे.

स्वाचारं वैदिकं दीनं प्रभुर्भिक्षां स्म याचते।

तो ब्राम्हण काही घरामध्ये नाही. भिक्षा मागायची. कोरान्न भिक्षा मागायची. मिळाली तर कोणी अतिथी वगैरे आला तर त्यालाही अन्नदान करायचं. हे कार्य चाललेलं आहे. त्याच्या वाड्यामध्ये एक घेवड्याच्या शेंगांचा फळवेल होता. त्याला शेंगा वगैरे लागायच्या. भिक्षा मिळाली नाही तर त्या शेंगा काढायच्या, त्यांची भाजी करायची. देवाला नैवेद्य अर्पण करायचा आणि आपणही परिवारासह फक्त भाजी खाऊन राहायचं. ' भाजी-भाकरी' आहे म्हणतात. पण भाकरीसुध्दा नाही. नुसती भाजी

आहे. त्याच्याकडे महाराज भिक्षेला गेलेले आहेत.

क्षुद्रव्याधिश्च चिकित्स्यतां प्रतिदिनं।
भिक्षौबधम् भुज्यतां।।
स्वाद्वन्नं न तु याच्यतां विधिवशात् प्राप्तेन्।
संतुष्यताम् ।

आचार्य महाराजांनी हे साधना पंचकात सांगितलं आहे. क्षुधा ही एक व्याधी आहे म्हणाले. भूक म्हणजे एक रोग आहे. आणि त्या रोगाचं औषध म्हणजे भिक्षा मागून आणलेलं अन्न. औषध गोड आहे का चांगले आहे असं कोणी पाहातं का? औषध म्हणून घ्यायचं. तसं भिक्षा हे औषध आहे. हे सेवन करायचं. ही आणखी मुमुक्षुंची स्थिती आहे. तर महाराज त्या घरीच भिक्षेला आले.

भिक्षावृत्तेस्तदा साध्वी सात्विकस्य कुटुंबिनी।
अन्नाभावातद्ददौ शाकमातिथेयी तु भिक्षवे।।

काय, त्या दिवशी भिक्षेत धान्य मिळालेलं नाही. ठरल्याप्रमाणे त्या शेंगा काढून ठेवल्या होत्या. त्या घेवड्याच्या शेंगाचीच भाजी केली. तेल, तिखट, फोडणीचे सामान तरी घरात कुठुन असणार? महाराजांना बसायला आसन दिलेलं आहे. तो ब्राम्हण आणि त्याच्या पत्नीने महाराजांची पूजा केली. आणि ती भाजीच त्यांच्या पानात वाढलेली आहे. भक्तीने, प्रेमाने अर्पण केल्यामुळे महाराजांना ती पक्वान्नासारखी वाटली.

सुदामजींचे मुठभर कोरडे पोहे आपण होऊन घेतले म्हणे देवाने. नुसते कोरडे पोहे आणि तेच खाल्ले आहेत. श्रीकृष्णांचं केवढं ऐश्वर्य आहे ! सुदामजींनासुध्दा लाज वाटली आरंभाला.

भक्त्यार्पितमपि प्राश्य शाकं संतृप्त ईश्वरः ।
तत्र शाकलतां दृष्ट्वा तामुत्पाट्याश्रमं ययौ ।

सिध्द सांगताहेत, नामधारका नुसती भाजी जरी महाराजांना दिली त्या स्त्री ब्राम्हणाने तरी भक्तीने ती दिली. प्रेमाने दिलेली आहेत. निरहंकार वृत्तीने दिलेली आहेत.

रुक्मिणी बरोबर बोलताना भगवान सांगताहेत की रुक्मिणी आम्ही अकिंचन आहोत. आणि अकिंचन लोकच आमच्यावर प्रेम करतात. ती वृत्ती अंतःकरणामध्ये आहे त्या ब्राम्हणाच्या. तीच निरहंकार वृत्ती. काही नाही. कशाचा अहंकार धरायचा. अर्थ नाही, काम नाही, धर्माचा तरी अभिमान कशाला धरायचा! सर्व नियामक भगवान आहे. सर्वांचही संरक्षण करणारे. संतृप्त म्हणतात त्यांना.

आनंद झाला महाराजांना. आता या ब्राम्हणाला काय द्यायचं. सुदामजींकडून मुठभर पोहे घेतले आणि द्वारका नगरी दिली. पण सुदामजींना ते पसंत पडले नाही. बाहेरचं साम्य काय करायचय, म्हणाले, असलं.

तृप्त झाले महाराज. आणखी जाता जाता अंगणातला तो घेवड्याचा वेल होता तो मुळासकट उपटला टाकून दिला आणि निघाले. आपल्या आश्रमात गेले. ते पाहून त्या ब्राम्हणाच्या स्त्रीला जास्त दुःख झालं आहे. भिक्षा मिळाली नाही तर या वेलाच्या शेंगा खाऊन आपला योगक्षेम चालायचा आणि या संन्यासी माहात्म्याने तो योगक्षेमच बंद करून टाकला. ' योगक्षेमम् वहाम्यहम् ' हे भगवंतांचे वचन असतांना यांनी असं काय केलं? भिक्षा घालताना आमची काही चूक झाली का? आम्ही आम्हाला तेवढं चांगलं अन्न ठेवून दिलं आणि यांना नुसती भाजी वाढली का? यांना कळतय सगळं. ज्ञानी आहेत हे असं का करावं या संन्यासी महाराजांनी? असं ती बोलायला लागली.

पण हा जो ब्राम्हण आहे तो विवेक संपन्न आहे. भक्ती आहे, कर्म आहे, दोन्ही आहे, त्याच्याजवळ. म्हणून तो स्वतःला

अकिंचन समजतो आहे. मी काय केलं हे सुध्दा बोलायचं नाही. ' आम्ही काहीच देऊ शकत नाही देवाला ' ही मनाची तयारी पाहिजे. बली राजाला त्या स्त्रीनं सांगितलं, माझं शरीर अजून राहिलेलं आहे. हा तिसरा पाय ठेवा. चुकलं म्हणाले. यांची सुधारणा करा.

तां भर्तोचे मौनमेहि न कोपि सुखदुःखदः ।

विवेक ज्ञान त्याला पूर्ण झालेलं आहे. ब्राम्हणाने सांगितले,' बाई, बोलू नकोस तू. सुख दुःख देणारा दुसरा कोणीही नाही. कारण सगळेही जीव हे स्वकर्म सूत्राने बांधले गेलेले आहेत. त्यांनी केलेल्या कर्माचं त्यांनी फळ भोगलं पाहिजे. त्याबद्दल ईश्वराला काय दोष द्यायचा?' अहंकार धारण करून आपले केलेले कर्मही आणखी कबूल न करणारे आम्ही आणि ईश्वराला दोष देतो.

ईशाधीनं जगत्सर्वं येनाप्तव्यं तु यत्ततः ।
कोपि नेशोन्यथाकर्तुमायुश्चान्न स यच्छति ।।

कर्मानुसार सगळे चाललेले आहे. कर्माने सगळे मिळते. अनंत जन्माची कर्म आमची आहेत. जेवढं आम्हाला मिळायचं तेवढं मिळतं, म्हणाले. यात बदल कोणीही करू शकत नाही. परंतु ईश्वराची एवढी कृपा आहे की आमच्या उदर निर्वाहाची सोय तो करतो आहे. कोणच्याही योनीमध्ये गेलं तरी ' आयुर्न्नम् प्रयच्छति ' उत्पत्ती, स्थिती आणि लय करणारा परमात्मा समदृष्टी आहे. विद्वान असो, अज्ञानी असो, राजा असो, रंक असो त्याची सर्वत्र समदृष्टी आहे. आमच्या कर्मामुळे आम्हाला हे मिळालेलं आहे. योगक्षेम करणारा तो आहे काय त्याची इच्छा असेल तसे होईल एवढा विश्वास ठेव, म्हणाले. आपल्या पत्नीचे समाधान त्यानं केलं.

त्याने विचार केला त्या वेलाचं मूळ काढून टाकू या. त्याचा आता काय उपयोग. त्याला काही शेंगा येणार नाही काही नाही. म्हणून तो जेव्हां उकरायला गेला तेव्हां सुवर्णाच्या मोहरांनी भरलेली घागर त्याला मिळाली. सद्‌गुरूचा प्रसाद हेच त्याला कारण आहे. आता घागर तिथे आधी होतीच असही कुणी म्हणतील. ती याला आधी का मिळाली नाही? महाराजांच्या प्रसादाने मिळाली हे मानतील की नाही ! घागर असेल बुवा. काही हरकत नाही. पण ह्याला जी मिळाली ती महाराजांनी तो वेल उपटून टाकला म्हणून मिळाली ना ! म्हणजे इथे तरी महाराजांचा प्रसाद मानायचा की नाही. की त्याच्या नशिबातच होती, त्याचच ते द्रव्य होतं असच म्हणत बसायचं?

' सद्‌गुरो संप्रसादात् ' हाच सिध्दांत सांगताहेत. त्या स्त्रीलाही पश्चात्ताप झालेला आहे. तिला हे सगळे पटले. दोघेही पति पत्नी महाराजांच्या दर्शनाला गेली आहेत. त्यांनी सांगितले,' महाराज ! नुसती भाजी आपल्याला अर्पण केली त्याचं फळ आहे हे. आम्ही काही मिळवलं नाही. याची आम्हाला कल्पनाही नव्हती किंवा त्याची इच्छाही नव्हती. पूर्वी भाजी फक्त खाऊन आम्ही संतोषाने राहात होतो. आपणही ती घेऊन संतोष दाखवलेला आहे. पण आपल्या प्रसादाने घागर मिळाली एवढं खरं !'

ईश्वराच्या प्रसादाने धन मिळाले ही बुध्दी खरी. अशी भावना पाहिजे. आम्ही जेवायला घातलं, भिक्षा घातली म्हणून आम्हाला मिळालं ही बुध्दी उपयोगी नाही. अहंकार आहे. अकिंचन झालं पाहिजे. धर्माचाही अहंकार आहे. काय ते मुठभर पोहे आणि ती सोन्याची नगरी. कसा, जमा खर्च कसा करायचा? ते काय व्यवहारात तरी बरोबर दिसतय का? तर महाराजांनी सांगितलं-

गोप्यमिदं श्रीर्नान्यथा ध्रुवा ।

त्या दोघांना भीतीही घातली थोडी. जर तुम्ही हे सर्वांना सांगत सुटलात तर ही मिळालेली संपत्ती राहाणार नाही. सगळे

म्हणजे चोरांची वगैरे दृष्टी जायचीच त्यांच्यावर हा अर्थ आहे त्यात. व्यवहार दृष्टीने सुध्दा लक्ष्मी ही जाहीर करू नये असं आहे.

आपल्याला ही काही उपाधी नको. योग्य असा कोणी अधिकारी भेटला त्याला सगळं दिलं म्हणजे झालं. त्याने आपले ते मुकाट्याने करावे एवढीच महाराजांची इच्छा आहे.

मोक्षं गमिष्यथो नूनं गन्तव्यं सुखमालयम् ।

पूर्ण संसारसुख पुष्कळ तुम्हाला मिळेल. आणि शेवटी तुम्हाला मोक्ष मिळेल. त्या दोघांचेही समाधान करून महाराजांनी त्यांना घरी पाठवले आहे.

नामधारकांनी विचारले, संपूर्ण ब्रह्माण्ड ज्यांनी निर्माण केले, सर्वांचं संरक्षण करण्याची शक्ती ज्यांच्या जवळ आहे त्यांनी भिक्षा मागावी हे कसं?

त्यावेळी सिध्द मुनी सांगताहेत, ईश्वराच्या, महात्म्यांच्या चरित्राबद्दल असे संशय अशा आशंका मनात उत्पन्न होतात.जिज्ञासू बुध्दीने होत असतील. पण त्यांचे समाधान करणारे कोणी भेटलं तर त्या शंका दूर होतात. मनाचे समाधान होते. नामधारकाला सिध्द मुनी भेटले हे त्याचे मोठं भाग्य आहे.' तू संशयी आहेस, तुझ्याजवळ श्रध्दा नाही म्हणून तुझ्यावर महाराजांची कृपा नाही' हे त्याला सिध्दांनी स्पष्ट सांगितले. नामधारकाची इच्छा महाराजांचं चरित्र ऐकावं अशी आहे. सिध्द सांगताहेत-

पक्वान्नभिक्षुको भिक्षुरिति श्रुतमतं प्रभुः ।
भिक्षुः सन्लीलया भेजे शम्भुवृत्तिरियं पुनः ।।

संन्यासी आणि ब्रम्हचारी यांचं पक्वान्न म्हणजे श्रीखंड पुरी सारखे पदार्थ नाहीत. पक्व म्हणजे तयार झालेलं अन्न. ते अन्न त्यांनी ग्रहण करावं. त्यांनी जर स्वतःचे अन्न तयार करायचे

म्हटले तर सगळा संसारच त्यांच्या मागे लागेल. भिक्षेमध्ये जे काही मिळेल ते खाऊन झाल्यावर भांडी विसळून टाकली की पुन्हा आत्मचिंतनात मग्न झाले. अखंड आत्मचिंतन चालू आहे. म्हणून महाराजांनी ही भिक्षावृत्ती धारण केली.

औदुंबर वृक्षाखाली राहायचे कारण म्हणजे औदुंबर वृक्ष भगवंतांना फार प्रिय आहे. भगवंतांनी नृसिंह अवतारात हिरण्यकश्यपूचं पोट फाडलं तेव्हां त्याच्या पोटातल्या विषाने त्यांच्या बोटांचा दाह होऊ लागला. त्यावेळी लक्ष्मी देवीने देवाला औदुंबराची फळे दिल. भगवंतांनी आपली बोटे नखे त्या फळात रोवल्यावर तो दाह शांत झाला. म्हणून भगवंतांना औदुंबर वृक्ष प्रिय आहे.

अशा या औदुंबर वृक्षाच्या खाली नरसोबा वाडीत महाराजांचा मुक्काम झाला. तिथे काही चिकित्सक मंडळी होती. त्यांना प्रश्न पडायचा हे तर कुठे भिक्षेला जात नाही, यांचा उदरनिर्वाह कसा होतो? यांचे खाणे पिणे कुठे होते? मागे त्या दरिद्री ब्राम्हणाच्या घरी भिक्षेला गेले होते म्हणे. काय मिळणार तिथे? अर्थात त्याच्यावर महाराजांनी कृपा केली तेव्हांच त्याला ही गोष्ट कोणाला सांगू नकोस असे सांगितले होते. त्यामुळे ते कोणालाच माहीत नव्हते.

बरे, ह्यांना जर एवढी काळजी होती, तर ह्या मंडळींनी महाराजांची स्वतः जाऊन चौकशी करुन त्यांच्या भिक्षेची व्यवस्था करायला काय हरकत होती? गृहस्थाश्रमाचा अतिथी धर्म नव्हता काय? अतिथी आला घरी तरच भिक्षा घालावी अस कुठे आहे? पण हे लोक महाराजांपासून दूरच राहिले. ईश्वरापासून दूरच राहाणार. नुसती चिकित्सा करायची. हे स्वामी भिक्षेचं काय करतात हे या लोकांनी लपून राहून पहायचं ठरवलं. काय खातात? कोण आणून देतात हे पहायचं ठरवलं.

ज्याच्या कृपेने क्षुधा तृषा वगैरे सगळ्या उर्मी नाहीशा होतात त्याला स्वतःला क्षुधा तृषेचे काय? पण भगवंताच्या सामर्थ्याची कल्पना कशी येणार? आपल्यासारखीच यांनाही तहान भूक

लागते अशीच यांची समजूत. महाराजांच्या मागावर गेले पण काही पत्ता लागला नाही. उलट भीती वाटायला लागली आणि तिथून ते निघून गेले. विश्वमित्रांनी रामचंद्र आणि लक्ष्मणांना बला, अतिबला विद्या दिल्या. त्यामुळे यांची तहान भूक नाहीशी झाली. अशाही मंत्रविद्या आहेत. पण ईश्वराचा यांच्याशी काही संबंध नाही.

पण दैवयोग एका शेतकऱ्याचा होता. गंगानुज नांवाच्या एका शेतकऱ्याला मात्र हे सर्व दर्शन झालेले आहे.

भगवान श्रीकृष्णांनी रासक्रीडा केली असे आपण ऐकतो. त्याचे रसग्रहण न करता त्याच्या सत्यासत्यतेबद्दल आपल्या मनांत शंका निर्माण होतात. पण तशी योग्यता असणाऱ्या कृष्णभक्तांना आजही ती रासक्रीडा पहायला मिळते असे म्हणतात.

तर या गंगानुजाचे सुकृत चांगले आहे. महाराजांची चिकित्सा करावी असे त्याच्या कधी मनांत आले नाही. महाराजांच्या दर्शनाला तो जात असे पण निष्कारण निंदा वगैरे त्याने कधी केली नाही. तो आपल्या शेतात काम करीत असताना महाराज दंड कमंडलू घेऊन तिथे आलेले आहेत. कृष्णा नदीचे पात्र दुभंगले आणि महाराज आत गेले. त्या दिवशी त्याला तेवढं समजलं. दुसऱ्या दिवशी महाराजांच्या बरोबर जायचे म्हणून तो वाट पहात बसला. दुसऱ्या दिवशी महाराज आले आणि नदीच्या पात्रात गेले. हाही गेला त्यांच्या बरोबर.

त्याने तिथे पाहिले. महाराज एका रत्नजडित सिंहासनावर बसले. तिथे चौसष्ट योगिनी होत्या. त्यांनी महाराजांची पूजा, आरती वगैरे केली. हे सगळं गंगानुजाला पहायला मिळालं. एवढ्यात महाराजांचं त्याच्याकडे लक्ष गेलं. त्यांनी विचारले, कोण तू? कसा इथे आलास? कशाकरता आलास?

गंगानुजाभिधोहं त्वामत्रत्यो द्रष्टुमन्वगाम्।
भवान्परात्मा सर्वेशो दैवान्मेद्यात्र गोचरः।।

' अमुक एक ठिकाणी देवाचं दर्शन होत हे समजल्यानंतर त्या ठिकाणीं भक्तांनी जायचं नाही का? माझे नांव गंगानुज आहे. तुम्ही साक्षात परमेश्वर आहात. तुम्ही इथे आलात म्हणून तुमच्या दर्शनासाठी मी इथे आलो.'

परमात्म स्वरुप अतिंद्रिय आहे. व्यक्त झाल्यावर ते इंद्रियांनी दिसते. ते दिसण्याची योग्यता असताना हे स्वामी कुठले, हे जेवतात कुठे काय खात नाहीत का अशा परीक्षा करण्याकडे आमची बुध्दी गेली तर आम्हाला त्यांचे खरे दर्शन कधीच व्हायचं नाही. त्यांचे खरे स्वरुप कधीच समजून यायचे नाही. पण गंगानुजाची बुध्दी तशी नाही. तो म्हणतो, तुमचं दर्शन होत असताना मी का येऊ नये? अस काय म्हणता महाराज ! माझं दैव चांगलं म्हणून आपले दर्शन झालं महाराज.

इतके सगळे लोक त्या गांवात राहात होते. पण त्यांचा सगळा वेळ चिकित्सा करण्यात गेला. परीक्षा बघण्यापलिकडे काही नाही. पण गंगानुज मात्र तिथपर्यंत गेला. महाराजांचं, योगिनींचे दर्शन झाले. मला या संसार सागरातून मुक्त करा अशी प्रार्थना त्याने केली.

महाराज त्याला म्हणाले,' तू इथे आलास, इथे योगिनींनी पूजा केली वगैरे जे सर्व तू पाहिलंस ते कोणाला सांगू नकोस.' नामस्मरण करणाऱ्या भक्ताला चांगले अनुभव येतात, चित्तवृत्ती सात्विक होते, दर्शने होतात हे कोणाला सांगू नये. लोक दुर्जन आहेत. त्यांना नामाचे वैभव सांगू नये. दुर्जनांना सांगून काय उपयोग? ते काय नामाकडे वळणार आहेत का? हा एक नामापराध आहे. जो तशा प्रकारचा भक्त असेल त्याच्या जवळ बोलायला हरकत नाहा. परंतु दुर्जनांजवळ मात्र बिलकुल सांगू नये. तो उलट जास्त निंदा करणार, जास्त टिंगल करणार. ही सगळी बुवाबाजी चालली आहे. याने म्हणे हे पाहिलं, ते पाहिलं. नदी दुभंगली. नदी कुठे दुभंगते काय? म्हणजे असे अनेक आक्षेप ते घेणार.

म्हणून महाराजांनी त्याला सांगितले,' हे कुणालाही सांगायचं

नाही. तुझा अनुभव तुझ्याकडेच ठेव. असेही काही भक्त असतात की कोणाला काही सांगत नाहीत. ईश्वर दयाळू आहे वगैरे सांगतात. पण स्वतःवर काय दया झाली आहे ते सांगत नाहीत. मी असे पर्यंत कुणालाही हे सांगायचे नाही.'

मयि सत्यत्र यदृष्टं नाख्येयं कस्यचित्वया।।

तो म्हणाला,' बर. तुमची आज्ञा मी मानेन. परत शेतामध्ये आल्यावर एका ठिकाणी उकरताना त्याला द्रव्याने भरलेला हंडा मिळाला. नाही सांगायचं तर राहिलं. या द्रव्यातून काही परोपकार करता आला तर करु.'देवाचं चरित्र सांगून काही उपयोग होत नाही म्हणून महाराज सांगतात, सांगू नका.' असति नाम वैभव कथा ' असति म्हणून शब्द घातलेला आहे.

मग त्या दिवसापासून गंगानुज रोज महाराजांच्या दर्शनाला जातो आहे. झाडून काढतो आहे, सेवा करतो आहे. बसावे जाऊन, चार शब्द बोलावेत. दुसरे कोणीच तिथे येत नसे. अशी उत्तम सत्संगती त्याला घडली. सद्‌गुरू आणि परमेश्वर एक रूपाने त्याला भेटले. तो एक दिवस महाराजांना म्हणाला,' काशी, गया, प्रयाग अशी त्रिस्थळी यात्रा करावी असं म्हणतात. आपल्याला पुष्कळ मुलं झाली म्हणजे त्यातला एखादा तरी गयेला जाईल. विष्णूपदावर जाऊन पिंडदान करेल. सगळ्या पितरांचा उध्दार होईल. म्हणून आपल्याला पुष्कळ मुलं व्हावीत अशी इच्छा करावी म्हणतात. अशी त्रिस्थळी यात्रा श्रेष्ठ आहे असे लोक सांगतात. मला काही कळत नाही. मला कुठली त्रिस्थळी यात्रा.'

मग महाराजांनी सांगितलं,' बाबा, हा संगम म्हणजे प्रयाग आहे. त्याचप्रमाणे गया म्हणजे करवीर.' तुलाही त्रिस्थळी दाखवतो म्हणाले. त्याला डोळे मिटून स्वतःच्या आसनाला धरायला सांगितले. तिथून त्याला नेऊन करवीर क्षेत्र वगैरे दाखवून आणले. आणि 'श्रध्दा ठेऊन तू आपलं कर्तव्य कर्म करीत रहा म्हणजे मुक्त होशील.' असे त्याला सांगितले आहे. त्याच्याकडून अखंड भगवंतांचे

ध्यान घडले. त्याच्या चित्तामध्ये भक्ती उत्पन्न झाली आणि महाराजांच्या कृपेने तो मुक्त झाला आहे.

महाराजांचा महिमा वाढत चाललेला आहे. त्यावेळची एक कथा सद्गुरू वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी आपल्या कुमार शिक्षा या ग्रंथात घातली आहे. गुरूचरित्रामध्ये मात्र ती आलेली नाही.

जसे अमरापूरला भिक्षेला गेले तसेच शिरोळलाही जात असावेत. वाडीपासून दोन तीन मैलावर हे गाव आहे. कर्म मार्गाचे आचरण केले असता कसा उध्दार होतो, भगवंताची कृपा होते हे सांगण्याकरता ही कथा मुद्दाम सांगितली आहे. शिरोळ गावातल्या एका ब्राम्हणाच्या घरी महाराज भिक्षेला गेले. तो ब्राम्हण काही घरी नव्हता, कुठेतरी भिक्षेला गेला होता. गरीब होता तो. त्या पत्नीने महाराजांना बसायला सांगितले. त्या दिवशी त्यांच्या घरी खायला फक्त कण्याच होत्या. पण वाढणार कशावर? महाराजांनी म्हणे बाहेर जाऊन एक दगड आणला. तो धुवून त्याच्यावरच वाढायला सांगितले. महाराज साक्षात श्रीहरी आहेत या भावनेने त्या दगडावरच त्या स्त्रीने महाराजांना कण्या वाढल्या. महाराजांनी त्या खाल्या. आणि आशीर्वाद देऊन महाराज गेले. त्या पाषाणावरती महाराजांची बोटे उमटली आहेत. भोजनपात्र म्हणतात त्याला.

याप्रमाणे जास्तीत जास्त महिमा वाढत चालला आहे. मग महाराजांनी विचार केला आपल्याकडे जसे सज्जन येतील तसे दुर्जनही येतील. आपण आता इथे जास्त दिवस रहाणं बरं नाही. इथून दुसरीकडे जावे कुठेतरी.

म्हणजे महाराज खरोखरच जाणार होते किंवा गेले असे समजता येत नाही. थोरल्या महाराजांनी याचा उल्लेख एका स्तोत्रामध्ये केला आहे.नरसिंह वाडी क्षेत्रामध्ये बारा वर्षे महाराज राहिले आणि गाणगापूरला गेले म्हणजे ते वाडीत नाहीत असा त्याचा अर्थ नाही. वाडी क्षेत्रात राहूनच ते गंधर्वपुरात म्हणजे गाणगापुरात येऊन राहिले आहे.

वाडीला आम्हाला शाळेत लागू म्हणून मास्तर पुजाऱ्यांपैकी होते. त्यांना एकदा वाटले गाणगापूरला दर्शनाला जावे. गेले. तिथे पूजा अर्चा केली. रात्री निजल्यावर दत्तप्रभूंनी स्वप्नात येऊन विचारले,' वाडीत नाही का मी? इथे कशाला आलास?' दुसऱ्या दिवशी उठून लगेच त्यांनी वाडीचा रस्ता धरला.

तेव्हां आता दुसरीकडे कुठे तरी जावे असा महाराजांनी विचार केला. त्या सगळ्या योगिनींना दुःख झालं. त्यांनी रोज महाराजांची पूजा करावी, भिक्षा द्यावी, सेवा करावी. वास्तविक त्या सगळ्या योगिनी होत्या महाराज गाणगापूरला गेल्यावर ह्यांना तिथे जाऊन महाराजांचे दर्शन करून परत यायला किती वेळ लागणार? पण महाराजांनी प्रत्यक्ष इथं राहावं असं त्यांना वाटत होतं. म्हणून श्रीदत्तप्रभूंनी त्यांना सांगितलं-

'अत्र तिष्ठामि लोकदृष्ट्या गमिष्य इत् ।।

इथेच राहाणार आहे मी, तुमची जर अशी भावना असेल तर इथेच व्यक्त होतो मी.

भक्त्केष्टदा मयाप्यत्र स्थेयं वस्तुष्ट्ये सदा ।।

तुमच्या संतोषाकरता मी नेहमी इथेच राहाणार आहे. अमरेश्वर प्रभू याठिकाणी आहेत. अन्नपूर्णा याठिकाणी आहे. विघ्नेश्वर आहेत. तुम्ही सगळ्या योगिनी याठिकाणी आहात. मर्यादित वस्तूला जाणं येणं आहे.सर्व व्यापी जो विभू, परमात्मा त्याला आणखी हे येणं जाणं कसं शक्य आहे? यापुढे हे क्षेत्र फार प्रसिध्द होणार आहे. अनेक संत महात्मे, भक्त लोक या ठिकाणी येऊन रहातील. अनेक पुण्यकर्म इथे होतील. इथे आल्यावर आलेल्यांची रोगराई दूर होईल. या क्षेत्रामध्ये जो जो जी जी इच्छा मनात धरून येईल त्याची ती सगळी इच्छा पूर्ण होईल. मुमुक्षु असेल त्याला मोक्ष मिळेल. रोगी असेल त्याला आरोग्य मिळेल.

पर्वकाली,ग्रहणकाली, संक्रांतीला इथे जर स्नान करून दान धर्म केला तर त्याला सहस्त्र गोधनाचे फल मिळेल.'

कोणताही याग झाला म्हणजे कर्म मार्गात या चौसष्ठ योगिनींची पूजा सांगितली आहे. या कृष्णा पंचगंगा संगमावर नारायण स्वामी महाराज रोज पहाटे स्नानाला जात असत. क्षेत्राचं महात्म्य असल्यामुळे या क्षेत्रामध्ये रहाण्याचा आग्रह आहे. तीर्थयात्रा याकरता करायची. अल्प जप जरी केला, एक रुद्र आवर्तन जरी केलं तरी अतिरुद्राचं फळ मिळेल.

पण तेवढेच करायचे असा त्याचा अर्थ नाही. अधिक व्हावे अशी इच्छा पाहिजे ना ! नाही तर देवांनीच सांगितलय की एक रुद्रावर्तन झाले म्हणजे अतिरुद्राचे फळ मिळते, तेवढं एक केलं म्हणजे झालं. बाकीचा सगळा वेळ आपल्या संसारात घालवायचा असा याचा अर्थ नाही. जर एखादा अशक्त असेल त्याच्यासाठी ते सांगितलं आहे. भगवंतांना, मनोहर पादुकांना जर प्रदक्षिणा घातल्या तर अश्वमेघादि यज्ञाचं फल मिळतं. दुर्गतीला गेलेल्या पितरांना याक्षेत्रात त्यांच्या तृप्तीसाठी श्राध्द केले असता सद्गती प्राप्त होते. आपल्या मनोहर पादुका औदुंबरा खाली महाराजांनी स्थापन केल्या. आणि सांगितलं की या क्षेत्रात स्नान करून या मनोहर पादुकांचे अर्चन आणि योगिनींची जो पूजा करील त्याला अभिष्ट सिध्दी प्राप्त होईल. आणि तिथून निघून महाराज भीमा तीरावरती गाणगापुरामध्ये येऊन राहिलेले आहेत.

आम्ही इथे राहाणार आहोत असें सांगून महाराज इथून गेले मग महाराज इथे ( म्हणजे वाडीत ) आहेत कशावरून हे समजण्याकरता एक चरित्र घातलं आहे. पुढचं सगळं चरित्र म्हणजे गाणगापुरामध्ये झालेल्या कथा सिध्दांनी नामधारकाला सांगितल्या आहेत.

नामधारकांनी विचारले,' महाराज वाडीहून गाणगापूरला गेल्यानंतर त्याठिकाणी ( वाडीला ) येणाऱ्या भक्तांची कार्यसिध्दी कोण करीत होते?' म्हणजे नामधारकांची कल्पना अशी की महाराजांना भक्तांची कार्यसिध्दी होण्याकरता दुसऱ्या कोणी अधिकारी

व्यक्तीची, एखाद्या देवतेची नेमणूक केली की काय. त्याकरता सिध्दांनी नामधारकांना आणखी एक सिध्दांत सांगितला-

गतिस्थित्यासनस्वप्ना न कदापि चिदात्मनि ।
लीलेयं मानुषी तस्य नरानुकृतिकारिणः ।।

महाराज गेले आणि राहिले वगैरे काही नाही. वस्तुतः आनंदघनरूप परमात्मा सर्वव्यापी आहे. तो सर्वव्यापी आहे म्हटल्यावर तो जाणे येणे ह्या कल्पना योग्य ठरतील का? कारण जायचे म्हणजे ज्या ठिकाणी नाही तिथे जायचे. पण महाराज साक्षात परमेश्वर असल्याने ते कुठे नाहीत असे होऊच शकत नाही. गाणगापूरला महाराज गेले म्हणजे पूर्वी गाणगापुरामध्ये नव्हते असे म्हणावे लागेल. वाडीहून तिथे गेले म्हणजे वाडीत नाहीत असे म्हणावे लागेल पण परमात्म स्वरूपाला तर कोणती क्रिया नाही, गती नाही आणि गती निवृत्ती म्हणजे स्थित राहाणे हेही नाही. निद्रा नाही, आसन म्हणजे कुठही रहाणे, बसणे हेही काही नाही.

निद्रा नाही याबद्दल सामान्यतः उल्लेख आहे भगवद् गीतेमध्ये-

या निशां सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ।।

रात्र नाही याचा अर्थ निराळा आहे. आत्मस्वरुप हे अविद्येमुळेच जीवांना भासत नाही. भौतिक पदार्थांकडेच जीवांचे लक्ष.आहे. तेव्हां सायंप्रकाश जो आनंदघन आत्मा आहे त्याच्या संदर्भात जीवांची रात्र आहे. काही नाही, अंधार आहे. ' तस्यां जागर्ति संयमी ' सर्व भूते ज्या ठिकाणी निद्रिस्त असतात, त्यांना आत्मस्वरुपाचे भान नसते तिथे संयमी, ज्ञानी महात्म्याला आत्मस्वरुप परिपूर्ण भासते. आणि या अविद्यात्मक सृष्टीच्या

ठिकाणी सर्व भूते 'आम्ही जागे आहोत ' असे म्हणतात. जागृती म्हणजे जागे आहोत असे नाही. आत्मस्वरुप ज्याला पहायला मिळाले त्याला ही सर्व सृष्टी अविद्या रुप अशी रात्र आहे असा त्याचा अर्थ केला आहे आचार्य महाराजांना.

क्षुधा, तृषा, निद्रा हेही दोष आहेत. प्राणमय कोषाचे ते विकार आहेत. त्याप्रमाणे सुषुप्तीही निद्रा हा देखील अविद्येचाच परिणाम आहे. अविद्याच ज्याची नाहीशी झालेली आहे किंवा अविद्या ज्या ठिकाणी बिलकुल नाही अशा आत्मस्वरूप परमात्म्याला काही नाही. स्वप्नही नाही सुषुप्तीही नाही.

थोरल्या महाराजांचे सांगतात ना! वाडीला वगैरे कुठेही असताना ते रात्री भजनाला जाऊन बसायचे. ते भजन बारा, एक, दोन पर्यंत चालायचे. त्याच्या नंतर झोप. पुन्हा पहाटे चार वाजता उठून स्नानाला जायचे आणि एकदा नित्यक्रम सुरू झाला की, दिवसभरात विश्रांती नाही काही नाही. अनेक भक्त मंडळी यायची, त्यांना मार्गदर्शन करायचे.

तर सिद्ध म्हणतात, 'नामधारका! महाराज गेलेही नाहीत आणि आलेही नाहीत. कुणी तरी काय चालवले पुढे! याचा अर्थ महाराज तिथून गेले असे समजतोस काय ? त्यांना गती स्थिती काही नाही. फक्त ही लीला दाखवली त्यांनी. बाहेर जे स्वरूप दाखवले ते स्वरूप त्या ठिकाणी अदृष्य झाले आणि दुसरीकडे प्रगट झाले. इतकाच काय तो त्याला अर्थ आहे. मूळ आत्मस्वरूपाने भगवंतांचे सर्वत्र वास्तव्य आहे.' खालच्या टीकेमध्ये 'आत्मा' या शब्दाचे अनेक अर्थ महाराजांनी दाखवले आहेत.

सुषुप्तीमध्ये जीवात्मा आपल्या मूळ स्वरूपामध्ये मिळून जातो. स्वप्नामध्ये सर्वही वासनांचा संग्रह करतो. स्वप्नावस्थेत बाह्य सृष्टीची जाण नसते. फक्त वासना सृष्टी असते. मनामध्ये असलेल्या वासनांपासून ती निर्माण होते. बाहेरील सृष्टीप्रमाणेच स्वप्नामध्ये वासनामय सृष्टी निर्माण होते. जागृतीच्या वेळेला 'आगत्ये' म्हणजे वासनात्मक सृष्टी नाही, ती मायामय सृष्टी

आहे, ती जागृतीमध्ये. त्या सृष्टीमध्ये आणखी सृष्टीचे ग्रहण करतो, ज्ञान संपादन करतो. वगैरे आणि निरंतर भासणारे असे जे स्वयंप्रकाशी मूळ स्वरूप आहे त्याला कोणत्याही प्रकारे व्यावहारिक दृष्ट्या आलो, गेलो वगैरेचा काही संबंध नाही.

जीवात्मा सुद्धा तसाच आहे. तो मूळ आत्मरूप, परमात्मरूप आहे. अंशरूप आहे. त्यालासुद्धा गती अगती वगैरे नाहीये. स्वर्ग लोकाला जातो पुण्य करून आणि पाप केल्याने नरकाला जातो. याचा अर्थ ते जे सूक्ष्म लिंग शरीर आहे त्याला गती अगती वगैरे आहे आणि त्याच्याशी तादात्म्यध्यास झालेला आत्मा पाण्यात पडलेल्या प्रतिबिंबाप्रमाणे असतो. पाणी हलल्यानंतर पाण्यात पडलेले प्रतिबिंब हलू लागते. पाणी शांत झाले की ते प्रतिबिंबही शांत होते. म्हणजे पाण्याचे जे काही विकार आहेत - हलणे वगैरे त्याप्रतिबिंबाच्या ठिकाणी दिसतात, तसे त्यांच्याशी मिसळून गेलेला जो आहे, जीवात्मा तो सर्वव्यापी परमेश्वराचा केवळ अंश असून त्यालाही जिथे गती अगती नाही तिथे परमात्म्याला हे जाणे येणे कुठून असणार ? मनुष्यरूप धारण करून भगवान आलेले आहेत. त्याप्रमाणे ही लीला आहे. या रूपामध्ये ते इथे होते, आता ते रूप अदृष्य झालेले आहे. गाणगापूरला ते प्रगट झाले म्हणून ते तिकडे गेले असे म्हणायचे.

जशी भावना आपण करावी तसे वाटते तिथे आहेत म्हटले तर तिथे आहेत.उपनिषदांमध्ये एक वर्णन आलेले आहे. 'ब्रह्म भगवान परमात्मा आहे अशी एक दृष्टी आहे आणि नाही अशी एक दृष्टी आहे. नास्तिक माणसाला ईश्वर प्राप्तीची बुद्धी नाही. त्याच्या बुद्धीने सगळेच नाहीसे झाल्यामुळे तो स्वतःच नाहीसा होतो म्हणजे अधोगतीला जातो.

पण आहे. ईश्वर आहे म्हटल्यावर भगवंतांनी सांगितलेला सगळा साधनमार्गही आहे. ही अस्तित्वबुद्धि असणारा जो आहे तो त्याप्रमाणे आचरण करतो आणि फल प्राप्ती करून घेतो. बुद्धीनेच सगळे आणखी मिळवायचेय ना ! ' ईश्वर नाही ' अशी बुद्धी झाली की सगळं गेलं – साधनेही गेली, साध्यही गेलं. तेव्हा

बुद्धीवर जसे संस्कार असतील त्याप्रमाणे तो परमात्मा आहे असे सांगतात.

योगिनीवरदानादि यैर्यैर्गङानुजाच्छ्रुतम् ।
ते ते भक्त्या भजंस्तत्र तं स तत्कामदोभवत् ।।

परमेश्वर या ठिकाणी आहे हे नरसिंह वाडीमधल्या सर्व लोकांना समजायला तो गंगानुज कारणीभूत झाला. तिथे ६४ योगीनी आहेत. त्यांनी महाराजांची पूजा वगैरे केली. भिक्षादान केले हे सगळे त्याने डोळ्याने पाहिले होते. महाराजांनी त्याला हे कोणाला सांगू नकोस असे सांगितले होते पण त्याला राहवले नाही. महाराजांच्याबद्दल त्यावेळेला जसे श्रध्दा बाळगणारे होते तसे अंधश्रद्धा बाळगणारेही लोक होते. श्रद्धावान लोकांना त्याने काय पाहिले ते सांगितले तेही महाराजांचे भक्त झाले. लोकांची ये-जा सुरू झाली. बारा वर्षे तिथे महाराज राहिले ना! इतके दिवस महाराज कुठेही राहिले नाहीत. आता महाराजांनी तेथून निघून गाणगापूरला जायचे ठरवले.

महाराज वाडी सोडून गेल्यावर त्यांच्या तिथल्या अस्तित्वाबद्दलची एक कथा आता सिद्ध सांगणार आहेत. सद्गुरूंची कृपादृष्टी ज्यांच्यावर पडली ते अर्थाअर्थी संसारामध्ये जरी आसक्त झालेले असले तरी त्यांचा उद्धार झालेला आहे. केवळ विषयासक्त आहेत, अशा लोकांवरही दया करून महाराजांनी त्यांचा उद्धार केला आहे. महाराज म्हणाले, 'विषयासक्त असेनात का. पण त्यांचा उद्धार झाला तर अशी एक उद्धारक ईश्वर शक्ती आहे, याची जाणीव त्यांना होईल आणि ते सन्मार्गाला लागतील.' हे महाराजांचे भक्त वात्सल्य आहे. असा त्याचा अर्थ आहे. अशाच प्रकारची एक कथा सिद्ध सांगताहेत.

वाडीपासून २-३ मैलावर असलेल्या शिरोळ गावात घडलेली कथा आहे ही. त्यागावात एक दरिद्री ब्राह्मण होता. तो आणि त्याची पत्नी दोघेही भाविक होते. परंतु प्रारब्ध कर्म असले

काही विलक्षण आहे की, ४-५ मुलं होऊनही तिचे एकसुद्धा मूल जगले नाही. त्या गावात एक चांगला शास्त्रज्ञ ब्राम्हण होता. त्याच्याकडे जाऊन तिने विनवणी केली की मला पुत्र दोष का होतो? त्याच्यावर उपाय काय?

भक्तीचा प्रसार देवानेच करायचा असतो. भगवान नरसिंहसरस्वती स्वामी महाराजांना आपली भक्ती वाढवायची आहे. भागवत हे ब्रह्मदेवांना आरंभाला स्वतः भगवंतानीच सांगितले. ब्रह्मदेवांनी नारदाला, नारदांनी व्यासांना मग व्यासांनी त्याची विस्तृत रचना केली. पण हे आरंभाला भगवंतांनीच सांगितले आहे. त्याची शक्ती त्यांनाच माहिती असणार. कल्पनेने ते ज्ञान बरोबर आहे की नाही हे समजायचं नाही.

तसे स्वतःची भक्ती आता वाढली पाहिजे या इच्छेने देवांनेच त्या शास्त्रज्ञ ब्राह्मणाच्या बुद्धीला प्रेरणा केली आणि त्याप्रमाणे तो त्या स्त्रीला सांगू लागला. म्हणजे अशी ही ईश्वरदत्त बुद्धी असू शकते किंवा होऊ शकते. एखादे वेळेला 'नतुज्योतिःशास्त्राज्ञाधारेण ।' असं मोठ्या महाराजांनी टीकेत मुद्दाम लिहिले आहे. ज्योतिषशास्त्राचाही त्याने अभ्यास केला होता. त्या ज्योतिषशास्त्राच्या आधाराने त्या बाईला उपाय न सांगता, महाराजांनी जशी त्याच्या बुद्धीला प्रेरणा दिली त्याप्रमाणे त्याने सांगितले.

त्या ब्राह्मणाने त्या स्त्रीला कर्मविपाक शास्त्रात सांगितलेले अनेक दोष समजावले. तो म्हणाला,' ब्रह्महत्या दोष महापातकापैकी एक आहे. संततीच्या नाशाला अशी पुष्कळ कारणे सांगितली आहेत. भ्रूणहत्या, गायीची हत्या, पशूंची हत्या, परद्रव्य अपहरण करणारा, ब्रह्मस्व हरण करणारा, सुवर्णाची चोरी वगैरे कारण सामान्यतः सांगतात. एक वेळ लोखंडाचे भस्म करता येईल. पण ब्रह्मस्व हरणाचा दोष मात्र जाणार नाही. एखाद्या ब्राह्मणाचे कोणी बुडविले तर मृत्यूनंतर तो पिशाच्च होतो आणि त्याचे द्रव्य हरण करणाऱ्याच्या वंशाचा नाश करतो.

आता त्या ब्राह्मणाने या स्त्रीला तिचा दोष सांगितला.

म्हणाला,‘ बाई पूर्व जन्मामध्ये शौनक गोत्राच्या ब्राह्मणाकडून १०० रूपये कर्ज घेतलेस. ते काही तुझ्याकडून त्याला परत केले गेले नाहीत. त्याने आत्महत्या केली आणि तो आता पिशाच्च होऊन तुझ्या संततीचा नाश करतो आहे. तुझ्या कर्माचे फळ तुला भोगण्याशिवाय गत्यतंर नाही. त्याचे निवारण होऊ शकणार नाही. हा जन्म तुझा असाच जाणार.’

तरी तिने त्याला विनवले, ‘महाराज, झालेल्या कर्माचे दोष निवारण्यासाठी शास्त्रातकाही तरी उपाय सांगितले असतील ते मला सांगा.’

तेव्हां तो ब्राह्मण म्हणाला,‘ बाई या पिशाच्याच्या मुक्तीसाठी कृष्णा पंचगंगा संगमावर तुझ्या पतीकडून त्याचे और्ध्वदेहिक कर. मग महिनाभर महाराजांच्या मनोहर पादुकांचे अर्चन कर, नंतर यथा शक्ती ब्राह्मण भोजन घाल आणि शौनक गोत्राच्या एखाद्या ब्राह्मणाला बोलावून १०० रू. दे. असं जर केलस तर तुझा दोष जाईल आणि तुला पुत्र संतती होईल.’

हे ऐकून ती स्त्री म्हणाली, ‘महाराज, मी अगदी गरीब आहे. और्ध्वदेहिक करायला सांगता येईल यथाशक्ती, महिनाभर अष्टतीर्थात स्नान करून पादुकांची पूजा निष्ठेने करीन मी. शरीराने जेवढी होईल तेवढी सेवा करीन मी पण द्रव्य मात्र मला मिळणार नाही. भगवान श्री नरसिंह सरस्वती महाराज माझं रक्षण करतील असा विश्वास मला आहे.’

त्याप्रमाणे मोठ्या भक्तीभावाने तिने अष्टतीर्थात स्नान करून औदूंबर वृक्षाखाली असलेल्या मनोहर पादुकांचे अर्चन करायला सुरवात झाली. दोन तीन दिवस झाल्यावर एके दिवशी रात्री तो पिशाच्च झालेला ब्राह्मण स्वप्नात येऊन म्हणाला, ‘माझे पैसे तू देत नाहीस तोपर्यंत तुझा एकही मुलगा मी जिवंत ठेवणार नाही.’ ती घाबरली. एवढ्यात तिला औदुंबर वृक्ष व त्याच्या खाली महाराज बसलेले दिसले. ती भीतीने महाराजांच्या बाजूला जाऊन उभी राहीली. महाराज त्या पिशाच्याला म्हणाले, ‘दुष्टा, या बिचाऱ्या पतिव्रता स्त्रीला तू का त्रास देतो आहेस?’

तो पिशाच्च जरा उर्मटच होता. तो म्हणाला,' स्वामी महाराज, तुम्ही पक्षपातीपणा करू नका. उगीच या स्त्रीची बाजू घेऊन तुम्ही बोलायला लागलात तुम्हांला माहिती तरी आहे का? काय झाले ते? माझे द्रव्य हिने घेतलय तेच मी परत मागतो आहे .हिने ते द्रव्य मला परत दिले पाहिजे.'

महाराज म्हणाले,' तुझ्या अपराधाने, पाप कर्मामुळे तुला हा पिशाच्चाचा जन्म आलेला आहे. आत्महत्या हा केवढा दोष आहे. द्रव्याकरिता आत्महत्या करायची? पुन्हा पिशाच्च योनीत आल्यावर तू हिची मुले मारलीस. किती दोष तुझ्याकडून घडलेत? कधीतरी या पिशाच्च योनीतून मुक्त होशील का? तुला या पिशाच्च योनीतून मुक्त व्हायचं असेल तर मी सांगतो तसं ऐकावे लागेल. तर मुक्त होशील नाहीतर या रागद्वेषादि विकारांच्या जास्तीत जास्त आधीन होऊन तू जर ही पाप कर्म करायला लागलास तर या योनीतून तुझी सुटका कधीच व्हायची नाही. पिशाच्चच राहायचे का तुला?'

महाराजांनी पुढे विचारले,' पूर्वीच्या जन्मात या बाईने द्रव्य घेतलेय, आता त्याचा काय संबंध? यावेळेला ही स्त्री दुसऱ्या जन्माला आलेली आहे, त्या जन्मामध्ये तू जर मागितले असतं तर गोष्ट निराळी. एक वेळ विचार केला असता. या जन्मात हिने तुझे द्रव्य परत दिलं पाहिजे असे तुझे म्हणणे असेल तर ही आता दरिद्री कुळात आहे. हिचा पती दरिद्री आहे. कुठून द्रव्य आणायचं हिने? शास्त्राप्रमाणे तुझे और्ध्वदेहिक करून शक्य असेल तेवढे द्रव्य तुझ्या गोत्रातल्या ब्राह्मणाला ही देईल. तुला ते द्रव्य घेता येणार नाही ना ! तुला द्रव्य कुठं द्यायचं? तुझी योनीच तशी आहे. अन्नपाणी सुद्धा घेता येत नाही तुला. अशा योनीमध्ये तू आलेला आहेस. हे जर तुला पसंत असेल तर.तू या योनीतून मुक्त होशील.

जर आमचं हे म्हणणं तुला मान्य नसेल तर याच योनीत रहावं लागेल. मी या स्त्रीचे रक्षण करणार आहे. यापुढे या स्त्रीला तुला त्रास देता येणार नाही.'

पिशाच्चाला हे म्हणणे पटलेले आहे. महाराजांच्या दर्शनाने त्याची बुद्धी पालटली. त्याने सांगितले, महाराज, आपल्या दर्शनाने मी कृतार्थ झालो आहे. आपली आज्ञा मला मान्य आहे.

मग महाराज त्या स्त्रीला म्हणाले, ' आमचे बोलणे तू ऐकलेस,आता तुझ्या शक्तीप्रमाणे तू कर. काही द्रव्य आहे आणि ते द्यायचं नाही असं करु नकोस. म्हणजे यालाही सद्गती मिळेल. पिशाच्च योनीतून हा मुक्त झाला म्हणजे तुझी वंश वृद्धी होईल.' असे सांगून महाराज अदृश्य झाले.

म्हणजे ऋणानुबंध हे फक्त एकाच जन्मापुरते असतात असे नाही. दुसऱ्या जन्मातसुद्धा ते कर्म मागे लागते. नरसोबाच्या वाडीला हिंगोलीचे एक गृहस्थ पूर्वी आले होते. आमच्या घराच्या माडीवर उतरले होते. महाराजांचे दर्शन झाले होते त्यांना. महाराजांनी त्यांना काही अनुष्ठान सांगितले होते. त्यांना पिशाच्च बाधा होती. त्या पिशाच्चाचा संचार झाला. की ते पिशाच्च बोलू लागायचे. ती एक स्त्री होती. ती म्हणायची सात जन्मापूर्वी याने मला ठार मारले आहे. म्हणून मी याला धरले आहे.

ती स्त्री जागी झाली. पतीला तिने आपले स्वप्न सांगितले. लगेच त्याने दुसऱ्या दिवशी सर्व तयारी केली. स्मशानामध्ये जाऊन ते सगळं और्ध्वदेहिक कृत्य केले. पिशाच्याला सद्गती मिळून तो मुक्त झाला. हिचेही पाप नष्ट झाले.

दुसरे दिवशी पुन्हा स्वप्नामध्ये महाराजांचे दर्शन झालेले आहे. महाराजांनी तिच्याओटीमध्ये दोन नारळ टाकले. ते म्हणाले,' ब्राह्मण संतर्पण करून ही फळे भक्षण कर.' जागी झाल्यावर तिच्या ओटीत खरोखरच दोन नारळ होते. काही काही स्वप्ने सूचक खरी होणारी असतात.

त्या स्त्रीने महाराजांना सांगितल्याप्रमाणे ब्राह्मण भोजन केले आणि फळे भक्षणकेली. काही दिवसांनी ती गर्भिणी झाली. योग्य वेळी प्रसूत होऊन तिला दोन जुळी मुले झाली. त्यांचा जातकर्म संस्कार त्या ब्राह्मणाने केला. पुढे ती मुले मोठी झाल्यावर आठव्या वर्षी त्यातल्या ज्येष्ठ मुलाचे उपनयन करायचे ठरवले.

पण आश्चर्य असे की त्याला अचानक सन्निपात ज्वर होऊन मृत्यू आला. अतिशय दुःख झालं त्या स्त्रीला. रडत रडत डोकं बडवून घेत आहे. छाती पिटून घेते आहे. मुलाला हाक मारते आहे. 'कुठे गेलास बाळा तू? किती वेळ निजलास? ऊठ लवकर. दुधाची वेळ झाली. भूक लागली असेल तुला. तुझी मित्रमंडळी तुला बोलवत आहेत, लवकर ऊठ, निजू नकोस, नाही तर मी प्राण त्याग करीन. गर्भातूनच माझी तीन मुलं गेली ते सगळं दुःख मी भोगलं. परंतु तू जन्माला आल्यापासून ते सगळ दुःख विसरून मी आनंदात होते आणि तू एकदम सोडून गेलास आम्हांला' वगैरे.

त्या वेळेस बाकीची मंडळी तिची समजूत काढू लागली,'बाई रडून काय करणार? देव, ऋषी, दानव अशा मोठ-मोठ्यांना मृत्यू चुकला नाही. कोणाचही विस्मरण काळाला होत नाही. बरोबर त्याच्या वेळेला तो घेऊन जातो. मनुष्यांची काय कथा? रामकृष्णादि अवतारसुद्धा काही काळपर्यंत राहिले आणि निजधामाला गेले. कशाला शोक करतेस? बाई, विचार कर.'

एकदम तिच्या मनावर परिणाम झाला आहे. ईश्वरावर विश्वास ठेवावा. श्रद्धा ठेवावी असे शास्त्र सांगते आहे. 'श्रद्धावान लभते ज्ञानम्.' मुख्य अंतरंग साधन म्हणजे श्रद्धा आहे. बाकीच्या साधनांपेक्षा श्रद्धा हे साधन मुख्य आहे.

ती म्हणाली,' पिशाच्चाची भीती परमेश्वराने दूर केली आणि मला हे फळ म्हणजे मुलं दिली. महाराजांनी दिलेलं फळ नाहीस कसं झालं याचं कोड वाटत मला. ईश्वराचे वचन जर खोट होत असेल तर त्याची सेवा का करतात? बिभिषण, ध्रुव वगैरेची चरित्रं ऐकतो आम्ही त्यांना हे माहीत नाही का देव सत्यानिष्ठ नाहीत? कशाला सेवा करा? तेव्हां मला इथं रहायच नाही. जिवंत मी राहाणार नाही. मोठमोठ्या संत महात्म्यांनी स्वानुभावाने सांगितलेला साधन खोटं ठरलं आहे.'

कर्म जरी स्वतःचं असले तरी ईश्वराची आवश्यकता काय आहे ते सिद्ध पुढे सांगणार आहेत.

ह्या साधनापासून आपली कार्यसिद्धी होत नाही असं कधीही झालेलं नाही. सर्वांनी अनुभवाने सांगितले सारे ते खोटे ठरले आहे. ह्या मुलाला मी स्मशानात नेऊ देणार नाही. याला माझ्या बरोबर जाळून टाका. लोकांतरामध्ये मी जाईन आणि तिथे यांची कीर्ती सांगेन.' असे सात्विक रागाने ती बोलली.

आता त्या मुलावर संस्कार केल्याशिवाय गांवातल्या लोकांना जेवणखाण वगैरे काही करता आले नाही. सगळे लोक त्रस्त झाले. इतक्यात एक जटाधारी साधू तिथे आले. विवेक ज्ञानाने त्यांनी तिची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, 'साध्वी, कशाला दुःख करतेस? मुलगा गेलेला आहे. कोणता मुलगा तुझा? हा समोर पडलेला जो देह आहे. हा तुझा मुलगा आहे कि हा देह सोडून गेलेला जो जीवात्मा आहे तो तुझा मुलगा आहे? देह मुलगा कसा होईल? रक्त, मांस सगळं भरलेला अपवित्र, अमंगल देह हा कधी मुलगा होणार नाही. तो अचेतन, जड आहे. याला घरात कोण ठेवणार? ज्या जीवात्म्याबद्दल तुला दुःख होतय त्या जीवात्म्याला मरण नाही. त्याला जन्मही नाही मरणही नाही. तो सर्वव्यापी आहे, अनंत आहे. त्याच्याबद्दल शोक कसला करतेस?

जगताची तीन कारणे आहेत. काल कारण, कर्म कारण, गुण कारण. प्रलयाच्या वेळेस साम्यावस्थेमध्ये सर्व गुण होते. नंतर आता सृष्टी निर्माण करायची तर त्या गुणामध्ये क्षोभ, वैषम्य निर्माण करणे हे कालामुळे घडते. कर्मामुळे त्या गुणांपासून कोणता देह उत्पन्न व्हायचा, कोणती सृष्टी निर्माण करायची ते ठरते. ( गुण हे उपादानकारक आहे. त्रिगुण हे करण.) त्यांचेच कार्यरूप आणि परिणाम रूपांतर म्हणजे ही सृष्टी आहे.

ही सृष्टी आभासात्मक आहे. कोणतीही सृष्टी स्थिर नाही. अशा रितीने उत्पन्न झालेले शरीर किंवा शरीरी जो जीवाला तो माझा मुलगा आहे, मी त्याची आई आहे ही नुसती कल्पना आहे. ही सगळी कल्पना मिथ्या आहे. हे नाते संबंध जर खरे असतील तर पूर्वीच्या जन्मामध्ये हा कोण होता आणि तू त्याची

कोण होतीस हे तुला सांगता आले पाहीजे. तुमच्या दोघांचा संबंध निश्चित ठरला असेल. तू कोण होतीस? तू स्त्री तरी होतीस का पूर्वीच्या जन्मात? हाच तुझा मुलगा होता का?

ती स्त्री म्हणाली काय सांगता येत नाही. देहाचं सोडून द्या. जीव जन्म-मृत्यू रहीत जरी असला तरी तो जन्माला येतो आणि तो मृत्यू पावतो हे पाहून मला दुःख होते महाराज म्हणाले, असं म्हणशील तर ते चालायचंच.' जन्म-मृत्यू कालवशात अलंध्यौ।' काळाच्या ओघाने जीवात्मा जन्माला आल्यासारखा वाटतो. देह मिळाल्यावर अगदी लहान असताना 'बाल' म्हणतात. पुढे तो तरुण होतो, वृद्ध होतो.

शारीरिक अवस्था ज्या प्रमाणे बदलतात त्याप्रमाणे शरीर धारण केलं जातं. पुन्हा ते सोडून दिलं जातं. जन्म-मृत्यू हेही त्याला त्याचप्रमाणे आहे. हे भ्रमण सारखेच चाललं आहे.आणि हा भ्रमही सतत चालू आहे. 'हा माझा आहे' असे समजून आनंद वाटतो. तो गेला की दुःख वाटते. दोन्हीही भ्रम आहेत. हा भ्रम कशाने जाईल?

सद्गुरूंचा प्रसाद जर झाला तरच हा संसार भ्रम पूर्णपणे नाहीसा होतो. 'पुनरपि जननं पुनरपि मरणं.' हे सारखं चाललेलं आहे. कोणाच्या ना कोणाच्या जन्मात त्याला जावेच लागते. सद्गुरूंचा प्रसाद होऊन, मार्गदर्शन मिळाल्यावर, जिवाकडून प्रयत्न घडतात. ते प्रयत्न सुद्धा अखंड चालू पाहीजेत. दीर्घ काल पर्यंत असे योगसूत्रकार सांगतात. साधनाभ्यास दीर्घ कालपर्यंत चालू राहिला पाहिजे.

परिक्षेला ज्या विद्यार्थ्याला बसायचे त्याने केव्हा तरी सुट्टीच्या दिवशी अभ्यास करून कसं चालेल? असं केलं तर तो वार्षिक परिक्षेत पास होईलच असे नाही. सतत निरंतर अभ्यास करावा लागतो. एखादे दिवशी जास्त वेळ एखादे दिवशी काहीच अभ्यास नाही असे करून चालणार नाही. रोज नियमितपणे चालू पाहिजे. आणि तेही विश्वास ठेवून. मी जे काही करतो आहे माझ्या प्रयत्नांना यश मिळालेच पाहिजे. अशा विश्वासाने तो

अभ्यास ते प्रयत्न झाले पाहिजे. तरच त्याचे फळ मिळते.

तेव्हां सद्‌गुरूंचा जर प्रसाद झाला नाही तर तो जीव पुन्हा जन्म-मृत्यूच्या फेरात सापडतो. पण जन्म-मृत्यू अपरिहार्य आहे म्हणून तू शोक करू नकोस.' अर्जुनाला जे भगवंतानी सांगितले तेच महाराजांनी या स्त्रीला इथे सांगितले आहे. 'तू पुष्कळ शोक केलास.तरी हा पुन्हा जिवंत होणार आहे का? गेला तो गेला.'

पण त्या स्त्रीला हे पटले नाही. वास्तविक न्याय, ज्ञान देण्याकरता भगवान् आलेले आहेत.त्यांना तिला या भवसागरातून कायमचे बाहेर काढायचे आहे. मुलगा गेला असता तर तेवढ्या पुरता शोक केला असता. परंतु संसार बंधन कायमचेच राहीले असते की नाही! ती स्त्री म्हणाली,'वेदान्त तत्वज्ञान वगैरे मला काही कळत नाही.'

अर्थार्थीच भक्त ती आहे. आता दुःखी झालेली आहे. अजून जिज्ञासू वृत्तीवर आलेलीच नाही. महाराजांना वाटले तिला उपदेश केला म्हणजे ती उपदेशाच्या मार्गाने जाईल. विचार करील आणि आत्मकल्याण करून घेईल. गुरूप्रसाद झाल्याशिवाय संसार बंधन जाणार नाही. प्रसाद करण्याकरता महाराज आलेत पण ही म्हणते,'ज्याच्यावर मी विश्वास ठेवला त्यांनी दिलेलं हे फल, म्हणजे हा मुलगा, मग तो कसा गेला?'

'ठेवील अनंते तैसेची रहावे' ही ओवी काय सांगते. भक्तीमध्ये सुद्धा ईश्वराची इच्छा आहे. त्याच्या इच्छेप्रमाणे राहाणे ही फार मोठी भूमिका आहे. संसारासक्त चित्त असणाऱ्याच्या मनामध्ये भक्ती जरी असली तरी त्याला ही भूमिका मिळणार नाही. त्या अनंताची इच्छा आहे तसंच राहिलं पाहिजे. समाधान होत नाही. असं कां झालं? कारण स्वतःच्या कर्तृत्वाचा एक अभिमान त्यात शिल्लक राहातो. 'मी इतकं केलं मी इतका विश्वास ठेवला आणि ईश्वराने असे करावे?'

ही स्त्री नास्तिक नाही. संसारातील सर्व इच्छा पूर्ण झाल्या तर ईश्वराची शक्ती मानायची तयारी आहे. पण संसारातून सोडवणारा

ईश्वर आहे ही भावना त्याच्यामध्ये नाही. संसार सुटावा असे वाटतच नाही आम्हांला. ही स्त्री ईश्वराची ही शक्ती मानायला नाही असा प्रसंग आहे. ती म्हणते,' गुरूप्रसादाशिवाय मी जाणार नाही.' महाराज म्हणातायत,'प्रसाद करायची तयारी आहे.' उपदेश करताहेत पण ती म्हणाली,'मला वेदान्त आवडत नाही. ईश्वरावर विश्वास कसा ठेवायचा?'

महाराज म्हणाले,'मग जिथे तुला वर मिळाला तिथे जा.' त्या देवतेला विचार पुरे करतो मी माझा उपदेश.' ग्राहकच नाहीना कोणी! उपदेश करायला प्रत्यक्ष स्वतःच ज्ञानरूप परमात्मा आलेले असताना ' मला वेदान्त आवडत नाही' म्हणणारी स्त्री म्हणजे ग्राहकच नाही. ग्राहक संपल्यामुळे (नसल्यामुळे) उपदेश होत नाही. देवांनी दुर्लक्ष केले असे म्हणायचे कारण नाही. आमच्या मनातील जिज्ञासा संपलेली आहे. ज्ञान देणारे समर्थ आहेत. सर्वज्ञ संत महात्मे आहेत. ईश्वराच्या आज्ञेने फिरत आहेत. पण ग्राहक नाही. ते देत असलेले ज्ञान घेणारे कोणी नाही. म्हणून शेवटी, महाराज म्हणाले,'पुरे, मी कशाला बोललो असे माझे मलाच वाटतयं. तुला नकोय ना हे, जातो मी. ईश्वरावर विश्वास का ठेवायचा हे तुला ज्याने फलप्रसाद दिला त्यालाच जाऊन विचार.'

म्हणजे जिज्ञासू भूमिका चांगली की अर्थार्थी भूमिका चांगली! पण ही जिज्ञासू भूमिका स्वतः महाराजांनी येऊन प्रत्यक्ष उपदेश केल्यावर तरी निर्माण व्हायला हवी की नको! सबंध तत्वविचार त्यांनी युक्तीवादांने सांगितला. देह कसा आहे, देहापेक्षा निराळे आत्मस्वरूप कसे आहे, देह उत्पन्न झाला म्हणजे तो नाश पावणारचं. हे सगळे विचार त्यांनी मांडले. पण त्या स्त्रीच्या बुद्धीला ते पटलेले नाहीत. 'आणखी सांगा महाराज़' असे तिने म्हटले असते तर महाराजांनी आणखी समजावून सांगितले असते. या जन्मापुरता संबंध येतो मागच्या जन्मात नाही, पुढच्या जन्मात नाही. जशी नदीतून वाहात येणारी लाकडे काही काळ एकत्र येतात, नंतर प्रवाहाबरोबर एकमेकांपासून दूर वाहात जातात. हे

सगळे दृष्टांत आहे. या सगळ्या युक्त्या आहेत. सांगणारे अशाप्रकारचे 'शाब्दे परेच निष्णात' महात्मे आहेत. पण आमची बुद्धीच तशी तयार नाही ना !

त्यामुळे शेवटी महाराजांनी त्या स्त्रीला सांगितले, 'अलम आस्ति. मी आता हा उपदेश थांबवितो आणि जातो. तुला जेथे प्रसाद मिळाला तेथे जा. तेथे तुला उत्तर मिळेल.' पण महाराजांनी तिची उपेक्षा केली नाही.

तर ही जिज्ञासू भूमिका प्राप्त होणे फार कठिण आहे. तीव्र जिज्ञासा उत्पन्न व्हायला पाहिजे. सद्‌गुरूची भेट व्हावी त्याच्याकडून मार्गदर्शन व्हावे, आत्मोन्नतीचा मार्ग कोणता आहे हे कळावे अशी तीव्र इच्छा उत्पन्न झाली पाहिजे. तरच तशा सद्‌गुरूची भेट होऊन कार्य होते.

आता भक्तीमार्गाच्या दृष्टीने हा एक मोठा विचार आहे. या स्त्रीची भक्ती श्रेष्ठ आहे. असे म्हणायला हरकत नाही. जिज्ञासू बुद्धी गेली ती अविद्येमुळे गेली. शोकामुळे गेली. अज्ञानामुळे ती भूमिका त्या स्त्रीने स्वीकारली नाही. भक्तीच्या दृष्टीने तिची भक्ती मोठी आहे. असे म्हणायला हरकत नाही.

त्या स्त्रीला वाटले ती जर त्या ठिकाणी राहिली तर तिच्याकडून महाराजांची निंदा होईल. म्हणून,' जाते. लोकांतरला जाते. तिथे सांगेन कोणाला तरी नाही तर तशीच राहीन. या लोकात राहायला नको. ज्या देवाने योगिनींना वरदान दिले, ज्यांची कीर्ती सगळीकडे पसरली त्यांनी मला मात्र असच सोडून दिल. अशी उपेक्षा करण समर्थांचे काम नाही.' हा तिचा विचार अयोग्य आहे असे नाही. कर्मामध्ये जीव गुंतले आहेत ना ! कर्माकडे बोट दाखवून ईश्वर जर बाजूला होईल आणि प्रारब्ध कर्म जर श्रेष्ठ मानले तर ईश्वराची जरुरी काय आहे? हा एक मोठा सवाल तिने परमेश्वराला विचारला आहे. त्यांना तो मान्य करावा लागला. कर्म हे प्रबळ आहे. जीवांनी मान्य केले पाहिजे. कर्माची शक्ती ईश्वरापेक्षा जास्त आहे का? या भूमिकेवरती मग ती सकर्म भक्ती जरी असली तरी ती भूमिका मोठी आहे.

ईश्वराचे भजन कशा करता करायचे? जीवांनी दुसरीकडे जायचे, कोणाकडे? सगळेच जीव सारखे आहेत. सगळेच आपापल्या कर्मात गुंतलेले आहेत, मग कोण कोणाचा उद्धार करणार? कर्माचा ज्याला बिलकुल संबंध नाही, जन्म मृत्यू ज्याला बिलकुल नाहीत, कालचा संबंध नाही तो समर्थ ईश्वर. त्याने उपेक्षा का करावी? हा प्रश्न तिने परमेश्वरालाच विचारला आहे. म्हणून मला वेदान्त नको, म्हणाली, जिज्ञासू नाही झाले तरी हरकत नाही. तिने ठरविले, महाराजांना सांगितल्या प्रमाणे तिला जिथे वर मिळाला तिथे मुलाला घेऊन जायचे.

त्याप्रमाणे मुलाचे प्रेत घेऊन ती मनोहर पादुकांजवळ आली. तिच्या बरोबरची मंडळी म्हणू लागली,'एकदा दहन संस्कार उरकून घेऊ. किती वेळ प्रेत तसे ठेवणार.' पण या स्त्रीची, मनोहर पादुका म्हणजे साक्षात भगवान् आहेत, ही भावना कायम आहे. ती रडत आहे. मस्तक पादुकांवर आपटते आहे. मध्यरात्र झाली. बरोबरची मंडळी कंटाळून निघून गेली. ही दोघे पतीपत्नी तिथेच राहिली.

त्या स्त्रीला थोडीशी झोप लागली आणि स्वप्नात तिला महाराजांचे दर्शन झाले. पूर्वी दोन वेळा स्वप्नातच तिला महाराज दिसले होते. ज्ञान देण्याकरता महाराज आले होते. पण ते ज्ञान तिने नाकारले. हे देखिल प्रारब्धच आहे. तिला मुलगा हवा आहे. पण आता प्रत्यक्ष महाराज प्रगट झाले. त्यांनी विचारले,'काय बाई, कशा करता रागावलीस आमच्यावर? काय केलं आम्ही तुझी काय उपेक्षा केली?'

तिची इच्छा ईश्वराच्या दृष्टीने अगदी सामान्य आहे. ती पूर्ण करायला काय वेळ लागणार आहे? बाह्य ज्ञानाने ही गोष्ट अगोचर आहे. शक्य नाही. सर्व पदार्थ अतिंद्रिय आहेत. प्राणवायू म्हणजे जीवात्मा असाच अर्थ थोरल्या महाराजांनी केला आहे. त्याकरता पुष्कळ शास्त्रार्थ दिले आहेत. शरीरात तो राहतो म्हणजे शरीरातील सर्व ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये, मन, बुद्धी ही सगळी तत्वे, पंचप्राण रहात आहेत. स्थूल शरीर हे फक्त काही काळ राहणारे

असते. पण याच्यामध्ये राहणारा जो साधनवर्ग - ज्याला लिंग शरीर किंवा सूक्ष्म शरीर म्हणतात.तो साधन वर्ग मात्र मोक्षापर्यंत राहाणार आहे.या लिंग किंवा सूक्ष्म शरीराचा जीवात्मा बनलेला आहे. अंत:करण, मन वगैरे सगळं आहेत. संस्कार आहेत. पण सगळी इंद्रिये, मन, बुद्धी म्हणजेच मी आहे असे तो समजतो आहे. मला राग द्वेष वगैरे आहे. म्हणजेच मनाचे जे धर्म आहेत ते सगळे माझेच धर्म आहेत. इतका त्या मन, बुद्धीमध्ये तो अध्यस्थ झाला आहे. त्यामुळे ती गेली की ही सुद्धा गेल्या सारखाच होतो. मला जायला पाहीजे, यायला पाहीजे, मला जन्मञ्मृत्यु आला असं तो मानतो. इतका तादात्म्य पावलेला आहे.

पण वस्तुतः जो प्राण म्हणजे आत्मा परमात्मा आहे, तोच हा झालेला आहे. सर्वांपेक्षा वायुदेवाचे महत्त्व जास्त आहे म्हणतात. तोच सर्वांचा संहार करतो. पृथ्वी, जल,तेज वगैरे सर्व त्याच्यामध्ये लीन होते. व मग तो त्यांच्यामध्ये लीनच होतो.

महाराजांनी तिला विचारलं, 'हा बाहेर गेलेला जीवात्मा तुला परत आणून हवा ना? तुझा मुलगा जिवंत झालेला आहे. शोक सोडून दे. शोकामुळे तुझी अवस्था अशी भ्रांत झाली आहे. योग्य काय आणि अयोग्य काय तुला समजेनासे झाले आहे. हा शोक म्हणजे तुला संसाराची आसक्ती, ममता, मोह आहे. त्याकरता ईश्वराची शक्ती कमी पडली असं तुला वाटतं पण ती कमी नाही.' असे म्हणुन महाराज अदृष्य झाले. एकदम ती जागी झाली. तिला पश्चात्ताप झालाय. आपलं चुकलं. उगाच देवाला आपण दोष दिला असं तिला वाटलं. इतक्यात झोपेतुन उठावा तसा तो मुलगा उठून बसला.

त्याच स्त्रीला आनंद झाला. तिने पतीला उठवलेले आहे. तो मुलगा भूकेने रडतो आहे. त्या मुलाच्या मस्तकाचे अंवग्राहण त्यांनी मंत्रपूर्वक केलेले आहे. भगवान नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांची स्तुती, प्रार्थना केली आहे. सूर्योदय झालेला आहे. पादुकांवर रक्त सांडलेले होते. ते त्यांनी स्वच्छ केले. पादुकांची

पूजा करुन आरतीला ते उभे राहिलेले आहेत. गावातल्या मंडळींना याची काहीच कल्पना नाही. ते आपले त्या मुलाचा हट्ट ही स्त्री सोडून देईल म्हणजे आपण त्याचे और्ध्वदेहिक करुन या विचाराने आले. पण हे सर्व पाहून सगळ्यांना आनंद झालेला आहे.

महाराज गाणगापूरला गेले वाडीत नाहीत, असा नामधारकांचा जो गैरसमज झाला होता तो दूर करण्यासाठी सिद्धांनी ही कथा सांगितली आहे. अदृष्यरूपाने महाराज राहिल्यामुळे संशय येणे स्वाभाविकच आहे. परंतु श्रद्धा! श्रद्धेची भूमिका तशी पाहिजे. दिसले नाही म्हणजे मनुष्य नाही, असे कसे म्हणायचे? आपण एखाद्याला भेटायला घरी गेलो आणि तो नाही कुठे बाहेर गेला म्हणजे तो जगात नाहीच असं समजायचं का? असेल कुठेतरी गेलेला, अशी कल्पना करायला काय हरकत आहे?

ईश्वराबद्दल असे कोणी सांगावे? भक्त नाना प्रकारे स्तुती करतात. देवा, माझ्याकडे लक्ष द्यावे. तुमच्याकडे असे हजारो भक्त येतात त्यांच्या कामात गुंतून गेल्यामुळे माझ्याकडे लक्ष दिले नाही. तुम्ही माझी उपेक्षा केलीत असे खरे देवाचे भक्त कधीही म्हणणार नाहीत. पण ही स्त्री पुत्रशोकामुळे तसे बोलून गेली. त्या स्त्रीचे सर्व मनोरथ महाराजांनी पूर्ण केले आहेत. तो मुलगा पुढे दीर्घायुषी झाला.

योगसूत्रकार सांगतात विवेकी पुरूष सदैव दुःखीच असतात. अनुकूल परिस्थिती सुद्धा त्यांना दुःखदायकच वाटते. आज ना उद्या हे सर्व जाणार आहे याची त्यांना जाणीव असते. विनाश हा दोष सर्व भौतिक पदार्थांमध्ये असतो. त्या दोषाचे जर चिंतन केले तर त्या पदार्थापासून दुःखच वाटेल, सुख कधीही वाटणार नाही. महाभारतात वर्णन केल्याप्रमाणे युद्ध संपल्यावर श्रीकृष्णांनी जेव्हा कुंतीला काय इच्छा आहे असे विचारले तेव्हा तिने दुःखच मागितले. ती म्हणाली दुःखातच मला तुझे स्मरण चांगले राहील. अरण्यात रहात असताना सतत तुझी आठवण यायची. विवेकी होती ती.

म्हणून सिद्ध सांगताहेत, नरसिंह सरस्वती स्वामी महाराज

सदैव जागेच आहेत. केव्हाही त्यांच्याकडे जाल तेव्हा त्यांचे भक्त वात्सल्य अनुभवायला येईल. पण अशी दृढ भक्ती पाहीजे. भक्ती असते, प्रेम असते परंतु दृढ आहे की नाही याची परीक्षा सद्‌गुरू करतात. त्यांचे ऐकले पाहीजे. नुसती 'आपल्याजवळ भक्ती आहे' असे समजून भागत नाही.

याप्रमाणे गाणगापुरात महाराज गेल्यानंतरसुद्धा नृसिंहवाडी क्षेत्रामध्ये ते जागृत आहेत. आज एवढे काम केले आणि नंतर पुन्हा गाणगापुरला गेले असा त्याचा अर्थ नाही. तिथे ते कायमच आहेत हे त्यांनी सिद्ध केले.

आता गाणगापुरातल्या लीलांना सुरवात झाली आहे. नामधारक म्हणतो, माझ्या वाटेला दुःख का यावे? माझ्या वडिल, आजोबा, पणजोबांनी वंशोवंशी त्यांची सेवा केली आहे. मीही परंपरेने त्यांचा शिष्य आहे. मग मीच असा दुःखी का?

सिद्धांनी उत्तर दिले,'महाराजांचे पुढचे चरित्र ऐक. कशी कशी स्थिती पाहिजे, कशी कशी भक्ती पाहीजे. त्या भक्तीच्या बरोबर नुसती आम्ही सेवा केली, परंपरेने सेवा केली असे नुसते म्हणून भागत नाही. बुद्धीमध्ये असलेले दोष दूर व्हायला पाहिजेत. आणि मग सेवा घडली पाहिजे. त्या सेवेचे फळ म्हणजे उपेक्षा केली असे म्हणणारच नाही भक्त. ही सुद्धा चांगली स्थिती आहे. देवाने दिलेली स्थिती चांगलीच आहे असे भक्ताला वाटत असते. भक्तांनी, साधकांनी, उपासकांनी हा विचार नेहमी मनात ठेवला पाहिजे की देव भक्तावर कधीही रागवत नाही. ही बुद्धी पाहिजे. देव भक्तांची उपेक्षा कधीही करीत नाही. रागावणे, उपेक्षा करणे हे अल्प सामर्थांचे लक्षण आहे. देवाचे परिपूर्ण सामर्थ आहे, ही जाणीव एकदा पक्की झाली म्हणजे देव रागवला, त्याने लक्ष दिले नाही असे कधीच वाटणार नाही. 'जैसी स्थिती आहे, तैशा परि राहे.' आपल्या संचिताकडे लक्ष द्या, असे संत सांगताहेत. आपल्या कर्माकडे लक्ष द्या. देवाच्या सामर्थ्याची अवहेलना करू नका.'

नामधारक चरित्र श्रवणामध्ये अगदी रंगून गेला आहे.

महाराजांना ज्यांनी प्रत्यक्ष पाहिले, महाराजांशी ज्यांचा समागम झाला, महाराजांचे चरित्र ज्यांनी पाहिले ते सिद्धच महाराजांचे चरित्र सांगताहेत. ऐकून किंवा वाचून सांगत नाहीत. नामधारकांनी विचारले, महाराजांनी भिमातीरावरती गमन केले. पुढे त्यांच्या लीला कायकाय झाल्या ते मला सांगा.

जगाचे अधिराजे आहेत ते आता भीमा अमरजा संगमावर येऊन राहिले. सगळे त्यांचे घर आहे. कृष्णा पंचगंगा नदीच्या संगमावर काही वर्षे राहीले. आता येथे येऊन राहिले. सुरूवातीला त्यांचा निवास गावापासून २-३ मैलावर जो भीमा अमरजेचा संगम आहे तेथे होता. भिक्षा घ्यायला महाराज गावात येत. भक्तांचा उद्धार करण्यासाठी महाराज अवतार घेऊन आलेले आहेत. अदृश्य झाले तरीसुद्धा त्यांची कार्य चाललेलं आहे. त्या ब्राह्मण स्त्रीची कथा सांगितली ती ! महाराजांनी तिची उपेक्षा केली नाही. आमचे काम संपले आहे, आम्ही निवृत्त झालो, आम्हांला काही पहायचे नाही असे निवृत्त म्हणतात. वस्तुतः त्यांना कोणी काम करायलाच देत नाहीत त्यामुळे आम्हांला काम पहायचे नाही असे ते म्हणतात. मनातून वाटते आणखी मिळाले तर बरेच आहे.

पण महाराजांच्या बाबतीत तसे नाही. निवृत्ती नाही. अश्रांत भक्तांचा उद्धार करायचा आहे. भक्तांचे कार्य करायचे आहे. ही त्यांची दया आहे.

गाणगापूरात एक दरिद्री ब्राह्मण होता. भिक्षा मागून उदर निर्वाह करत होता. एक दिवस महाराज त्याच्या घरी भिक्षा मागायला आले. त्यांना ह्याच्या घरी भिक्षेला जाताना पाहून गावातील धनिक मंडळी हसून म्हणू लागली,' स्वामी महाराजांना इथे काय भिक्षा मिळाणार ? भाकरीचा तुकडा तरी मिळेल की नाही कोणास ठाऊक ?' पण भगवंताला भक्ती प्रिय आहे. बाह्यधनाची अपेक्षा नाहीत. महाराजांची अजून ओळख पटलेली नाही. गावात कधी कधी भिक्षेला येताना दिसणारे संन्यासी अशीच त्यांची समजूत होती.

सूर्यावरती जरी मेघ आले तरी सूर्याचे किरण ते रोखू शकतात का? मेघांनी सूर्याला झाकले हे म्हणणे बरोबर आहे का? सूर्य जर झाकला असता तर अंधार पडून मेघ तरी दिसला असता का? प्रकाश कोणाचा आहे?

तर महाराज जेव्हा या दरिद्री ब्राह्मणाच्या घरी भिक्षेला आले तेव्हा तो भिक्षा मागायला बाहेर कुठे तरी गेला होता. त्याच्या बायकोने महाराजांना आसन देऊन बसायची प्रार्थना केली आणि यजमान घरी आले की भिक्षेची व्यवस्था करते, असे म्हणाली.

आत्मस्वरूप जे आहे ते अज्ञानाने झाकलेले आहे. स्वयंप्रकाशित आत्मा कसा झाकला जाईल? आमची दृष्टी मेघाने झाकल्यामुळे पुढे सूर्यापर्यंत जाऊ शकत नाही. म्हणून सूर्य दिसत नाही. मेघांनी सूर्याला झाकलेले नसून आपल्या दृष्टीला झाकलेले आहे. प्रतिबंध केला आहे. तसे परमात्म्याला, आत्मस्वरूपाला पाहणारे जे भक्त आहेत त्यांची बुद्धी, इंद्रिये आवृत्त झालेली आहेत. ती पाहूच शकत नाही. तो स्वंयप्रकाशित, सर्वव्यापी, सर्वज्ञ आहे. पण अशा रीतीने महाराज अद्यापी प्रगट झालेले नव्हते.

त्या ब्राह्मणाच्या घरी महाराज कोरान्न भिक्षा मागायला गेले होते. त्यांच्या स्त्रीने दिलेल्या आसनावर ते बसलेले आहेत. त्या ब्राह्मणाच्या अंगणात एक म्हैस बांधलेली होती. ती वांझ असल्यामुळे तिचा उपयोग सामान, माती वाहण्यासाठी करीत. त्या म्हशीकडे महाराजांचे लक्ष गेले. त्यांनी विचारले, 'बाई तुमच्याकडे म्हैस दिसते आहे. मग त्या म्हशीचे दूध आम्हांला दिले तरी हरकत नाही. आम्हांला अन्नच पाहीजे असे नाही. तीच दुधाची भिक्षा आम्हांला पुरे.'

त्या बाईने महाराजांना सांगितले की, ती वांझ म्हैस आहे, दूध देत नाही कधी. पण तिचा उपयोग कामाला होतो. गावातले लोक माती वगैरे वाहायला तिला नेतात. म्हणून आम्ही ठेवली आहे. त्यामुळे चार पैसे मिळतात. महाराजांनी त्या बाईला

विचारले,' तुम्हांला दुध द्यायचे नाही म्हणून असे सांगता का? धार काढून आणा. ही म्हैस दूध देणारी आहे.'

आता श्रद्धा कशी पाहिजे याचे हे उदाहरण आहे. या स्त्रीच्या घरात जन्मभर ती म्हैस आहे. एकदा सुद्धा तिने दूध दिले नाही. गावातल्या लोकांनाही माहित आहे. की ही म्हैस दूध देणारी नाही. म्हणजे बहुमत कोणाकडचे आहे? आणि प्रत्यक्ष प्रमाण आहे. नुसते बोलणे नव्हे. प्रत्यक्ष प्रमाणाने म्हैस दूध देणारी नाही हे सिद्धच आहे. पण महाराज म्हणातायेत,' म्हैस दूध देणारी आहे.' काय मान्य करायचे? शब्दप्रमाण श्रेष्ठ की प्रत्यक्ष प्रमाण श्रेष्ठ? हा एक विचार उत्पन्न झालेला आहे. निर्णय करायला फक्त श्रद्धा पाहिजे.

आम्हांला दिसते या म्हशीने आजपर्यंत कधीही दूध दिलेले नाही. तेव्हा ती दूध देणारी नाही. त्या बाईने अशी उत्तरे दिले असते-'तुम्हांला थांबायचे असेल तर थांबा. दूधच पाहिजे असेल तर कुठून तरी आणून देते.' पण ही निर्णयाची वेळ आहे. महात्म्यांची कृपा होण्याची वेळ आहे. बुद्धी कशी आहे? प्रारब्ध अनुकून असेल तर बुद्धी अनुकूल होते. तिच्या मनात विश्वास निर्माण झालेला आहे की महाराजांच्या शब्द आहे म्हैस दूध देणारी आहे. ती काही वादविवाद करीत बसली नाही. तिने चिकीत्सा केली नाही. चिकीत्सेने निर्णय काही झाला नसता. महाराज निघून गेले असते.

महाराजांच्या सांगण्याप्रमाणे ती गेली म्हशी जवळ भांडे घेऊन आणि म्हशीने दूध दिले. ते तापवून तिने महाराजांना दिले. दूध पिऊन आशीर्वाद देऊन महाराज संगमावर निघून गेलेले आहेत. हे सगळे घडून गेलेले आहे.

म्हणजे फल मिळाल्याशिवाय श्रद्धा ठेवायची नाही. आणि श्रद्धा असल्याशिवाय फल मिळायचे नाही ? काय निर्णय करायचा? तिच्या श्रद्धेने फल मिळाले की महाराजांच्या संकल्पाने ? तिची श्रद्धा आहे की महाराजांचा संकल्प सत्य आहे. त्यामुळे तिला फळ मिळाले आहे. अशक्य आहे, असंभवनीय आहे, जीव हा

परब्रह्मरूप नाही असेच आम्हाला वाटते. श्रद्धाच नाही आमची शब्दप्रमाणावर. प्रत्यक्ष अनुभव आहे पण आमच्या बुद्धीला ते पटतच नाही. त्याचं कारण संसारामध्येच आमचा अनेक काळ गेला आहे. तोच तोच सांसारिक अनुभव येतो आहे.

या स्त्रीची आणि महाराजांची भेट झाली आणि त्यांच्या संकल्पाने त्यांच्या शब्दावर तिची श्रद्धा उत्पन्न झाली. त्याप्रमाणे सद्गुरूंच्या मार्गदर्शनानुसार साधकांचे अनुष्ठान, अनुसंधान अखंड चालू राहिले तर हे सर्व पटेल. मी संसारी आहे, मी दुःखी आहे हा अनुभवही खोटा ठरतो आहे. स्वप्न दृष्टांत आहे. स्वप्नामध्ये आपण सर्व पहातो पण प्रत्यक्षात पहावे तर काहीही नाही. गाढ झोपेमध्ये तर काहीच नाही, फक्त आनंद आहे. प्रयत्नाने धन मिळवायचे आणि धनाने सगळी सुख साधने जमवून सुखाचा उपभोग घ्यायचा, हा जो साध्यसाधनभाव, कार्यकारणभाव आहे हा रोज सुषुप्तीच्या अवस्थेत चुकीचा ठरतो आहे. हा साध्यसाधनभाव, कार्यकारणभाव ठरविला कोणी असे जर कोणी म्हटले तर कोणीही त्याला उत्तर देऊ शकत नाही. सुख मिळणार नाही. हे सगळे परंपरेने चालत आलेले आहे. धनाशिवाय पदार्थ, खाणंपिणं मिळणार नाही, त्याशिवाय जीवन चालणार नाही.सुख मिळणार नाही.ही जशी परंपरा आहे तशी याहून वेगळी संतमहात्म्यांची परंपरा आहे.संत महात्मे भक्तीमार्गाने गेले आहेत. स्वतः तर त्या मार्गाने जाऊन सुखी झालेच आहेत पण इतरांनाही सुखी करताहेत. इतरांची दुःख दूर करताहेत.ही परंपरा आहे. पण ही परंपरा मात्र आम्हाला मान्य होत नाही. गाढ झोपेच्या वेळेस तो देह शय्येवर पडला आहे. कोणतेही चैतन्य, विषय त्याच्या ठिकाणी नाही.खाणंपिणं नाही, गाणंबजावणं नाही, काही नाही. इंद्रियांनी ज्या विषयांचा संबंध आलेला असता सुख मिळणार, ती इंद्रियेसुद्धा तिथे नाहीत, विषयही नाहीत, सुखाची कोणतीही साधने नसताना सुख मिळते कसे? आनंद कसा मिळतो? पण हा रोजचा अनुभव आहे. रोजचा अनुभव बुद्धीला मिळतो आहे.

उपनिषदांमध्ये सांगितले आहे की आनंद आपल्या जवळच

आहे. तो समजावण्यासाठी एक दृष्टात दिलेला आहे. एका शेतात शेतकऱ्यांने आपले धन दडवून ठेवले आहे. त्याचा मुलगा शेत नांगरतो आहे. पण त्याला ते मिळत नाही. तो दाखवणारा कोणी तरी भेटला पाहिजे. हे सर्व कार्यकारण भाव अनुभवाने चुकीचे ठरताहेत. प्रत्यक्ष अनुभव रोजचा आहे. या प्रमाणे महाराज आशीर्वाद देऊन गेलेले आहेत.

इकडे तो ब्राह्मण भिक्षा घेऊन घरी आला. त्याच्या स्त्रीने त्याला सांगितले, असे असे स्वामी आले होते आणि त्यांनी आज्ञा केल्यावर त्या शब्दांनी आपल्या म्हशीने दूध दिलं.

म्हणजे तेवढ्या पुरते दूध दिलं असे नाही. कारण चिकित्सक लोक काय म्हणतील याचा नेम नाही. त्यानंतर रोजच तिने दूध दिले. दुसऱ्या दिवशी ब्राह्मण त्याच्या स्त्रीला बरोबर घेऊन संगमावर गेला महाराजांची यथासांग यथाविधी पूजा केली. महाराजांनी त्याला वर देऊन सांगितले, धर्माचरण करून सुखाने, आनंदाने राहा.

काही शेतकरी मंडळी ती म्हैस रोज कामाला नेत होते. आता महाराज जेव्हां त्या ब्राह्मणाच्या घरी आले त्या दिवशी ती घरी होती हे तिचेही भाग्यच आहे. महाराजांनी तिचे दूध प्राशन केले. तिच्यावरही कृपा झालेली आहे. दुसऱ्या दिवशी ते लोक तिला मागायला आले. ब्राह्मणाने सांगितले ती म्हैस आता दूध देऊ लागली आहे आता ती कामाला मिळणार नाही.

त्या लोकांनी जाऊन राजाच्या कानावर हा चमत्कार घातला. राजा चांगला व सत्संगतीचा भोक्ता होता. तो लगेच या ब्राह्मणाला भेटायला आला. सर्व वृतांत ऐकला. ब्राह्मण म्हणाला ,' संगमावर जे संन्यासी महाराज आहेत त्यांच्या सांगण्यावरून हे झालेलं आहे.' राजा लगेच आपल्या लव्याजम्यासह संगमावर आला. अत्यंत भक्तीभावाने त्याने महाराजांना साष्टांग नमस्कार घातला आहे. त्याने प्रार्थना केली, 'महाराज, मी आपला सेवक आहे. आपण माझे रक्षण करा.' महाराजांच्या दर्शनाने त्याची बुद्धी निरहंकार झालेली आहे.

महाराज म्हणाले,' बाबा, रानावनांत राहाणारे आम्ही संन्यासी लोक आणि तूं एवढा मोठा राजा आहेस. सैन्य वगैरे घेऊन कशाला आलास? काय काम आहे तुझे?' राजा म्हणाला,' महाराज, आपण काही सामान्य संन्यासी नाही. साक्षात् परमेश्वर आहात. आपण गांवामध्ये राहाण्यास यावे. आमचे गांव आपण पवित्र करा. अरण्यात कशाला राहाता, महाराज? आमच्याकडून काही तरी सेवा घ्या.'

दरिद्री माणसाच्याच घरी जायचे असा काही महाराजांचा आग्रह नाही, हेही लक्षात घेतले पाहिजे. महापुरुषांची सेवा केली म्हणजे ' दंभ ' हा दोष जातो. राजाला काही दंभ नाही, दाखवण्याकरता धर्माचरण नाही. आणि महाराजांची समदृष्टी आहे. श्रीमंतांची आम्हाला जरुरी नाही असं नाही. राजा बोलवायला आला त्याच्या बरोबर जायची तयारी आहे.

महाराजांना पालखीत बसवून स्वतः पायी चालत राजा निघालेला आहे. हातात छत्र चामरे घेतली आहेत. ब्राम्हण मंडळी वेदघोष करताहेत, स्तुतीपाठक स्तुती करताहेत. सर्वत्र जयजयकार चालला आहे. गावाच्या वेशीजवळ सर्व मंडळी आली. तिथे पश्चिमेला एक पुरातन अश्वत्थ वृक्ष होता. त्यावर एक भयानक ब्रह्मराक्षस राहात होता. तो तिथे येणाऱ्या कोणालाही जिवंत ठेवत नसे. महाराजांना अंतर्ज्ञानाने हे समजले. महाराजांना पाहिल्यावर तो राक्षस मनुष्यरुप धारण करुन त्यांच्या जवळ आला. महाराजांच्या दर्शनाने शांत होऊन त्याने महाराजांना पिशाच्च योनीतून मुक्त करायची प्रार्थना केली.म्हणजे पिशाच्च योनीत गेल्यावरही ईश्वरशक्तीचे ज्ञान असते,असे म्हणायला हरकत नाही. त्या पिशाच्याला महाराजांनी मस्तकावर हात ठेवून सांगितले,' भीमा अमरजा संगमावर जाऊन तू स्नान कर म्हणजे मुक्त होशील ' वास्तविक पहाता ते पिशाच्च गाणगापुरमध्येच राहात होते. त्याने काय संगम पाहिला नसेल? पण त्या संगमाचे माहात्म्य काय आहे हे माहीत नसल्यामुळे म्हणा, अहंकाराने म्हणा, त्या संगमात स्नान केल्यावर आपण मुक्त होऊ असे त्याला कधी

वाटलेच नाही.पण महाराजांचे सांगणे त्याला पटले. संगमात स्नान करून तो मुक्त झाला. जोपर्यंत त्याचा अहंकार होता तोपर्यंत त्याची बुध्दी बदलली नव्हती. क्षेत्रमाहात्म्य महाराजांनी सांगितले. आता तो संगमात स्नान करून मुक्त झाला की महाराजांच्या शब्दाने मुक्त झाला हाही विचार करण्यासारखा प्रश्न आहे. सर्व ग्रामस्थांनी हा चमत्कार पाहिलेला आहे.

राजाच्या प्रार्थनेप्रमाणे महाराजांनी गांवातच राहायचे ठरवले. राजाने मठ बांधून दिला. नेहमी महाराजांच्या दर्शनाला यावे, त्यांची पूजा अर्चा करावी, गायन वगैरे करावे, जवळ बसावे. मग गांवातल्या लोकांचही येणे जाणे सुरू झाले. रोज सकाळी संगमावर स्नान करून बारा वाजता महाराज मठात यायचे. कधी कधी राजा व इतरांबरोबर वनभोजनाला जावं. राजाच्या भक्तीने प्रेमाने ते त्याच्या आधीन झाले.

गाणगापुरजवळ कुमसी नांवाचे एक गांव आहे. तिथे त्रिविक्रमभारती नांवाचे मोठे तपस्वी ज्ञानी संन्यासी राहात होते. त्यांच्या कानावर ही गोष्ट गेलेली आहे. कोणी संन्यासी इथे आलेत, राजा सांगेल त्याप्रमाणे ते वागताहेत. राजा शिकारीला निघाला की हे देखिल निघाले त्याच्याबरोबर. राजा म्हणेल तिथे पालखीत बसून जातात. संन्यासाश्रमाला हे योग्य आहे का? असे विचार त्यांच्या मनांत आले.

आपल्या ज्ञानाने म्हणा, साधनेने म्हणा, ज्याला ज्येष्ठता, श्रेष्ठता प्राप्त झाली आहे त्याच्या मनामध्ये जर अहंकार निर्माण झाला तर त्याचेही नुकसान आहे. आणि अनुयायांचही नुकसान आहे. अशा त्रिविक्रम भारतींना अहंकार निर्माण झाला आहे. म्हणून संन्याशांची ते निंदा करताहेत. ' संन्यासी माणसाने असे वागणे बरोबर नाही. आपला प्रणवाचा जय करावा, निरंतर ध्यान, आत्मचिंतन वगैरे करावं ते सोडून हे काय राजा नेईल तिथे जाताहेत हे कसले संन्यासी?' असे नुसते विचारच त्यांच्या मनांत आले नाहीत तर इतर लोकांजवळही ते महाराजांची निंदा करू लागले. त्यामुळे लोकांच्याही मनांत आले, हे कसले संन्यासी?

भगवान श्रीकृष्ण सांगताहेत, श्रेष्ठ पुरुषाला कर्म करण्याची जरुरी नाही. ज्याने सर्व संग परित्याग केला आहे तो कर्म बंधनातून मुक्त झाला आहे. 'कर्माचा बंधू ' म्हणून ज्ञानेश्वर महाराजांनी जो सांगितला आहे तो कर्तृत्वाभिमान आहे. 'या कर्मामुळे मला अमुक एक फल मिळणार आहे आणि ते मी मिळवणार आहे,'याचच नांव कर्मबंधन. नुसतं कर्म केले म्हणजे कर्म बंधन नाही. ज्याच्या अंतःकरणातून कर्तृत्व अभिमान गेलेला आहे, कोणच्याही फलाची आशा इच्छा राहिलेली नाही, त्याला त्याच्याकडून घडणाऱ्या कोणत्याही कर्माचे बंधन नाही.

तसे महाराजांचे कार्य चाललेले आहे. स्वतःचे काही नाही. भक्तांच्या इच्छेप्रमाणं सर्व चाललेले आहे. पण हे सगळे पाहून त्रिविक्रम भारतीयांच्या मनात मात्र विकल्प निर्माण झाला. ज्ञान आहे ना जवळ ! तीनही वेदांचा अभ्यास त्यांनी केला होता, म्हणतात. त्या प्रांतामध्ये ते अत्यंत ज्ञानी म्हणून प्रसिद्ध होते. शिवाय त्यागी होते. ज्ञान असून सुद्धा मानसन्मानाची काही इच्छा नाही. कुठेही गेले असते तरी त्यांचा सत्कार वगैरे झाला असता. पण ती इच्छा त्यांना नाही. त्याग वैराग्य आहे. असे संन्यासी जेव्हा महाराजांबद्दल म्हणतात की महाराजांचे वागणे आश्रमधर्माला अनुसरून नाही तेव्हा बुद्धिमंद होण्याचा प्रसंग निर्माण झाला आहे. चार लोकांच्या कानावर महाराजांची जी कीर्ती आली असेल ती खंडित होणार.

लोकांनी महाराजांना येऊन सांगितले त्रिविक्रमभारती काय म्हणतात ते. महाराजांना ते अंतर्ज्ञानाने समजले आहे. त्यांनी विचार केला, ज्ञान, वैराग्य, भक्ती, असणारे समाजामध्ये स्थान असणारे त्रिविक्रमभारती या निंदा करण्याच्या फंदात का पडतात? त्यांच्या बुद्धीची सुधारणा केली पाहिजे. आपापलं कर्तव्य करीत रहायचे. दुसऱ्याचे दोष तिसऱ्यापुढे कशाला वर्णन करावे? निदान त्यांनी इथे येऊन सत्यता तर पडताळून पहावी की नाही !

याला पैशून्य म्हणतात. एकाचे दोष दुसऱ्याला जाऊन सांगायचे. हे आसुरी संपत्तीचे लक्षण आहे. निर्भयता नाही. ज्याने

दोष केलेला आहे त्याला जाऊन त्याचा दोषसांगणे ही निर्भयता आहे. सुधारणा करायची तर अशी केली पाहिजे. वास्तविक पाहता त्रिविक्रम भारतीसुद्धा संन्याशीच होते. आपल्या ध्यानधारणेत मग्न रहायचे सोडून महाराजांची निंदा करायला यांना कोणी सांगितले?

महाराजांनी त्रिविक्रमभारतींचा उद्धार करायचे ठरविले. 'सज्ञानाचे झोंबी कंठी - नाना संकटी नासवी' हा अहंकार ज्ञानी माणसाला संकटात टाकतो. अज्ञानी माणसावर त्याचा काही प्रभाव चालत नाही. किंवा त्यांचा काही उपयोगही नाही. म्हणून या ज्ञानी माणसाची सुधारणा केली पाहिजे. त्याची बुद्धी सुधारली पाहीजे. केवढी बुद्धी मिळाली आहे ती! सर्व अध्ययन केलेलं आहे, ज्ञान मिळालेले आहे. सर्वांना शास्त्राप्रमाणे मार्गदर्शन करण्याची योग्यता आहे आणि करतही आहेत. धर्माचरण करताहेत. त्यागी आहेत अशा मनुष्याची बुद्धी जर अहंकाराने ग्रासली तर सगळं ज्ञान मलीन होऊन जाईल अशी महाराजांना काळजी वाटली. दया आहे त्याच्याकडे. आपली निंदा केली म्हणून राग आला नाही त्यांना.

त्यांनी राजाला सांगितलं, बाबा, आम्हाला कुमसी गावाला जायचं. त्रिविक्रम भारतींची भेट घ्यायची आहे. राजाने सर्व तयारी केली. सर्व जण कुमसी गावाला जायला निघाले आहेत. त्रिविक्रम भारती नृसिंहाचे मोठे भक्त, उपासक होते. सगुण व निर्गुण एकरुप मानून त्यांची भक्ती चालू होती. भगवान शंकराचार्यांचे प्रमुख शिष्य पद्मपादाचार्य नृसिंहाचे उपासक होते. आचार्यांच्या मुखातून प्रस्थानत्रयी तीन वेळा त्यांनी ऐकली होती. ब्रह्मचर्याश्रमातूनच त्यांनी संन्यास घेतला होता. लहानपणापासूनच आचार्यांच्या सान्निध्यात असल्यामुळे आचार्यांच्या मुखातूनच त्यांना सर्वज्ञान ऐकायला मिळाले होते. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' ही पक्की खात्री असूनही भगवत् भक्ती त्यांनी कधी मिथ्या मानली नाही. हे ज्ञानाचं खरं फळ आहे. व्युत्थान दशेमध्ये मन कोणच्याही विषयाकडे जाणारच. मग मिथ्या असताना मन जातं कसं दुसरीकडे

? व्युत्थान दशा बंद करता येत नाही. ती प्रारब्धाने येते आहे. मग तिकडे गेलेले मन विचारांनी आवरावेसे वाटते. मन असक्त होऊ द्यायचे नाही एवढंच जपायचं. भगवान् गीतेत सांगतात, राग आला तरी हरकत नाही. व्यवहारात जोपर्यंत अंतःकरण आहे, व्युत्थान दशा जोपर्यंत संपलेली नाही. तोपर्यंत राग यायला हरकत नाही. पण तो आवेग उत्पन्न होता कामा नये. आवेग आवरता आला पाहिजे. रागाचा अतिरेक होऊ नये. इतके जपले पाहीजे. हे ज्याला साध्य झालं, राग, लोभ जो आवरू शकला तो योगी आहे. सुखी तो आहे.

सगुण भक्ती ही त्याप्रमाणे करायला उत्तम आहे. आपल्याला वासनांमुळे व्युत्थान येते. अद्यापि, वासना सूक्ष्म रूपात का होईना शिल्लक आहेत ना! त्यामुळे ते प्रारब्ध समाधी दशेतून जीवाला बाहेर ढकलतं आणि व्युत्थान दशा येते. अनेकांशी आपला संग होतो त्यांच्या संगात राहून आपले मन बाहेर काढायचे आहे. निर्गुण समाधी अवस्था साध्य झाली तरी ती टिकवायला सगुणाची भक्ती किती तरी उपयोगी आहे. तो एक आनंद मिळाल्यावर आपोआप संसाराचा विसर पडतो. योगाभ्यासाने समाधी अवस्था प्राप्त होते त्याकरता प्राणायामाचा, प्रत्याहाराचा अभ्यास आहे. सर्व इंद्रिये आवरावी लागतात. इंद्रियांना आपापल्या स्थानात आणायचा प्रयत्न प्रत्याहाराच्या अभ्यासात करावा लागतो.

भगवान् श्रीकृष्णांच्या भक्तीत गोपी रंगून गेल्यावर त्यांना सर्वत्र गोपालकृष्णच दिसू लागले. सगळ्या जुन्या आठवणी आल्या. या झाडाखाली गोपालकृष्ण उभे राहिले होते, तिथे मुरली वाजवली होती, इथे आमच्याशी बोलले, वगैरे. या स्मरणभक्तीत मनाला, इंद्रियांना आवरण्याची जरुरी भासत नाही हे या भक्तीचे वैशिष्ट्य आहे. खरी भक्ती जर उत्पन्न झाली तर अंतःकरण तन्मय होऊन जाते. डोळे मिटायला नकोत, काही नको. समाधी अवस्थासुध्दा नको. त्यामुळे जे खरे ज्ञानी असतात ते कधीही भक्तीमार्ग सोडत नाहीत. भगवंतांचे ध्यान करणे, नामस्मरण करणे. ' पडिले वळण इंद्रिया सकळा ' हे वळण त्यांनी सर्व इंद्रियांना लावले.

तसे आचार्यांचे पद्मपादाचार्य हे मोठे गुरुभक्त आणि नृसिंह भक्त होते. त्यांचे आधीचे नांव सनंदन होते. एकदा आचार्य नदीच्या पलीकडे व हे अलिकडच्या तीरावर होते. आचार्यांनी त्यांना एकदम हाक मारली-सनंदन इकडे ये. नदीच्या पात्रात भरपूर पाणी होते. आचार्यांची आज्ञा आल्याबरोबर त्यांनी नदीत पाऊल टाकलं. ' आपण बुडून जाऊ,' वगैरे कसलाही विचार त्यांच्या मनात आला नाहा. त्या नदीलाच भीती वाटली की हा गुरुभक्त जर बुडाला तर माझी अपकीर्ती होईल. त्यांनी जिथे पाय ठेवला तिथे एकेक कमळ उत्पन्न होत गेले. त्यावर ते पाय देत देत ते पलीकडे गेले. त्यामुळे 'पद्मपाद' असे नांव त्यांना पडले. ही फार मोठी गुरुभक्ती आहे. आपल्या उपास्य देवतेशी एकरुप होणे ही भक्तीची पराकाष्ठा आहे. दास होणेही चांगले. पण ध्यानाचा परिपाक म्हणजे तद्रूप होऊन जाणे. ध्यान करता करता पद्मपादाचार्य नृसिंहरुप होत असत, असे त्यांच्या चरित्रात सांगितले आहे.

तसेच त्रिविक्रम भारती ज्ञानी आहेत. नृसिंहांचे मोठे भक्त आहेत, परंतु अद्यापी गुरुभक्ती मिळायची आहे. महाराजांना ती द्यायची आहे म्हणून महाराज स्वतः होऊन कुमसी गांवात आले. कशाला जायचे त्याच्याकडे असे महाराजांना कधीही वाटले नाही. ज्याच्या प्रसादाने ' मानापमानयोस्तुल्यः '- या भूमिकेवर जीव जाऊ शकतो त्या परमात्म्याला मानापमानाचा काय संबंध ! त्रिविक्रम भारती रोज नृसिंहाचे ध्यान करायचे. त्या दिवशी ध्यानाला बसल्यावर त्यांचे मन चंचल झाले. नरसिंहांची मूर्ती काही चित्तात येईना. नरसिंहांची स्तुती करत त्यांनी प्रार्थना केली,' देवा, आज तुम्ही माझ्या मनामध्ये का येत नाही ? दया करा.' इतक्यात त्यांना आतून प्रेरणा झाली की नदीतीरावर गेल्यावर नरसिंहांचे दर्शन होईल.

तशाच अवस्थेत ते उठून नदीतीरावर आले. तिथे पाहातो तो पालखीत बसलेले महाराज संन्यासी, सैन्य वगैरे सर्व बरोबरचे लोकही संन्यासी. कोणी लहान, कोणी मोठा. वस्तुतः फक्त महाराजच

संन्यासी होते. पण यांना मात्र सगळेच संन्यासी दिसले. त्रिविक्रमभारती आश्चर्याने, विस्मयाने पाहू लागले. इतक्यात महाराज म्हणाले,' यती महाराज ! मी एक दांभिक यती आहे. भ्रष्ट झालेला संन्यासी मी आहे. पण तुम्ही इथे कशाला आलात?'

ते म्हणाले,'तुमची परीक्षा बघायला आलो.' महाराज म्हणाले,' नृसिहांचे ध्यान करणारे आहात ना तुम्ही ! दांभिक कोण व कसा हे आम्हाला जरा समजावून सांगा. यतीधर्माचे उत्तम शिक्षण तुम्ही घेतलेले आहे. सर्व लोकांमध्ये प्रसिध्द, वैराग्यसंपन्न संन्यासी म्हणून तुमची कीर्ती आहे. तुम्ही मोठे विद्वान म्हणून आम्ही ऐकलं आहे. वेषाला धरुन संन्यास मानायचा का? दांभिक कोण आहे? काय त्याग केलात? फक्त यज्ञोपवीत आणि शेंडी काढून टाकलीत. दंड धारण केलात पण मनात रागद्वेषादी सर्व विकार भरलेले आहेत. तुम्ही समजावून सांगा आम्ही कसं वागायचं ते.'

हे सगळे वागणारा मी आहे आणि हा संन्यासी असे वागत नाही, म्हणजे त्रिविक्रम भारतींनी हे सगळे आपल्याकडे घेतले. पुण्य झाले तरी पापात्मक पुण्य आणि पुण्यात्मक पाप म्हणून ज्ञानेश्वर महाराजांनी फार सुंदर विवेचन केले आहे. पुण्याने स्वर्गलोकाला जातात म्हणे पण ते पापात्मक पुण्य आहे. संतांची दृष्टी फार वेगळी आहे. त्यांचे विवेकज्ञान फार मोठे आहे.

आचार्य महाराजांनी दांभिक शब्दाची व्याख्या करताना स्पष्टीकरण केलं आहे की आपण कसे वागतो हे आपल्या तोंडाने सांगणारा दांभिक आहे. ' मी इतका दानधर्म केला. मी परोपकार करतो. मी तीर्थयात्रा करतो. ' हे स्वतःच्या तोंडाने सांगणं म्हणजे दंभ आहे.

त्रिविक्रम भारतींचे डोळे उघडले. आपल्या अंतःकरणाचे ज्ञान महाराजांना आहे याची जाणीव झाली. बुध्दीसाक्षी परमात्मा हा आहे याची खात्री पटली. अहंकार दूर झाल्यावर काय विचारायचे? निरहंकार वृत्ती दूर झाल्यामुळे मनातला दोष निघून गेला. त्यांनी महाराजांची प्रार्थना केली, 'महाराज, माझी दुर्बुध्दी

तुम्ही दूर केली आहे. या मायामोहामध्ये मी सापडलो. सगळेच सापडतात.काही मी सांगू शकत नाही. बोलू शकत नाही. मी शरण आलेलो आहे. माझ्या अपराधांची आपण क्षमा करा. आजपर्यंत आपल्याच कृपेने जे ध्यान घडले त्या पुण्याने आपले दर्शन व साक्षात्कार झाला. आपणच साक्षात नरसिंह आहात. माझ्यावर दया करा.'

मनातले दोष दूर करणे किती कठीण आहे ! हा जो अहंकाररुपी अंधःकार आहे तो दूर करायला बाहेरच्या कोणच्याही प्रकाशाचा उपयोग नाही. तो अज्ञानांधःकार दूर करण्याची शक्ती फक्त सद्गुरुंजवळ आहे. महात्म्यांच्याजवळ आहे. तो अंधःकार महाराजांसारख्यांनी दूर केला आहे. त्रिविक्रम भारतींना कोणी दुसऱ्याने जाऊन सांगितले असते तर त्यांनी ऐकले नसते.

मग एकदम तिथे सैन्य दिसू लागले. स्वामीमहाराज एकटेच संन्यासी दिसू लागले. राजा, त्याचे मंत्री वगैरे आहेत. राजा महाराजांना वारा घालतो आहे. हात जोडतो आहे. हे विश्वरुप आपल्या नेत्रांनी त्रिविक्रम भारती पाहू सुध्दा शकले नाहीत. त्यांनी डोळे झाकून घेतले. अर्जुनाची अशीच स्थिती झाली होती. शेवटी त्याने श्रीकृष्णांना आपले नेहमीचेच रुप दाखवण्याची प्रार्थना केली.

त्रिविक्रम भारती सावध झालेले आहेत. त्रिविक्रम भारतींच्या अंतःकरणातील अहंकार दूर झालेला आहे. पूर्ण स्वस्थता आली आणि त्यांनी प्रार्थना करुन क्षमा मागितली. शरीराने माझ्या हातून अपराध झालेले आहेत, मनाने, वाणीने, इंद्रियांनी सतत अपराध चालूच असतात. त्या अपराधांची गणनासुध्दा करता येणार नाही. जर दुसरा एखादा स्वामी किंवा न्यायाधीश असता तर आपल्या प्रत्येक अपराधाला किती शिक्षा केली असती, असा विचार करायचा झाला तर सुटका होणे शक्य नाही. आपला अपराध माझ्या हातून झालेला आहे. मीच मोठा आहे, मीच ज्ञानी आहे असा जो मला अहंकार झाला होता त्याबद्दल आपण मला

क्षमा करावी. पूर्वी अर्जुनाला आपण विश्वरुप दाखवले आहे.

श्रीकृष्णांनी त्यावेळी त्याला सर्वप्रकारे समजावले. मित्र म्हणून उपदेश केला, शिष्य म्हणून उपदेश केला. शेवटी विश्वरुप दाखवून त्याला सांगितले की 'अर्जुना, तुला जायचं असेल तर चालता हो. तुझी काहीही जरुरी नाही. माझ्या संकल्पाने हे सगळे मरणार आहेत. ' तुझा विचार काही मला पटत नाही.' असे म्हणतोस ना; नाही पटत तर चालता हो. तू गेलास तरीही हे कोणीही जिवंत राहाणार नाहीयेत.' असं जेव्हा विश्वरुप दाखवून श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितले तेव्हा त्याचा हट्ट, अहंकार गेला. तसाच महाराजांच्या कृपेने त्रिविक्रम भारतींचा अहंकार गेलेला आहे.

भगवंतांच्या कृपेने ज्ञानरुपी नौका आपल्या गुरुंकडून मिळाली आहे. त्यांनी महाराजांना प्रार्थना केली,' मी अविद्यारुपी प्रवाहात सांपडलो आहे. आत्मस्वरुपरुपी तीराच्या जवळ मला न्या या ज्ञान नौकेने.' महाराजांनी त्यांना सांगितले,' तुम्ही इथेच राहा. गाणगापूरला येण्याचं कारण नाही. ज्ञान आहेच तुमच्याजवळ. पण तुम्ही ते विसरुन गेलात. ज्ञान मिळवूनसुध्दा तुम्ही अज्ञानात गेलात म्हणून आम्हाला जरासे यावे लागले. तुम्हाला परत आत्मस्वरुपाची प्राप्ती होईल.' नंतर कर्ममार्गाचा उपदेश करुन महाराज, राजा व त्याच्या सैन्यासह पुन्हा गाणगापूरमध्ये परत आलेले आहेत. इथे ज्ञानकांड पूर्ण झालेले आहे.

**।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।**